—चं०२५२०

श्री

# तुकारामाचें चरित्र

(पूर्वार्ध)

लेखक
पुरुषोत्तम मंगेश लाड

सत्यमेव जयते

शके १८७८ दुर्मुखनामसंवत्सरे ] मुंबई : गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस [ इसवी सन १९५७

२६३८१ (७३)

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत १५२०
२६३८१/९३६

SHRI.CHA.PRATAPSINH MAHARAJ (THORALE) NAGAR WACHNALAYA, SATARA.
026381

## प्रकरण पहिलें

## कुळपरंपरा

तुकारामाची आदि सांगतांना आधीं त्याच्या कुळाचा उज्ज्वल वृत्तांत वर्णिला पाहिजे. पूर्वजन्माच्या संचिताविषयीं साशंक असलेले आधुनिक शास्त्रज्ञ सुद्धां लोकोत्तर व्यक्तींच्या आनुवंशिक संस्कारांची चौकशी करितात. त्या दृष्टीनें पाहतां तुकाराम हा मशागत न केलेल्या रेताड जमिनींत केवळ यदृच्छया प्रगट झालेली विभूति नसून, पिढ्यानुपिढ्यांच्या कसदार भूमींत पेरलेल्या हरिभक्तीच्या संचिताचें अत्यंत गोमटें व रसाळ फळ होय असें म्हटलें पाहिजे. त्याचे पूर्वज शुद्ध आचरणाचे व उदार हृदयाचे धीरोदात्त स्त्री-पुरुष होते असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसतें. शुद्ध बीजाला स्वतः तुकाराम फार वाखाणीत असे.[१] वडिलांचें महत्त्व वाढविणें हें गृहस्थाश्रमाचें एक फळ आहे अशी त्याची शिकवणूक होती.[२] कुळधर्माची महती त्याच्याइतकी फारच थोड्या संतकवींनीं गाइली असेल.[३] आपल्या कुळाच्या परंपरेची त्याला पुरी जाणीव होती.[४] त्या परंपरेच्या मुशींत ओतलेली कुळाच्या सकळ पुण्याईची तुकाराम ही सुवर्णमूर्ति होती.

तुकारामापासून आठवा मूळ पुरुष विश्वंभर हा त्या परंपरेचा जनक. विश्वंभरापूर्वींच्या माहितीची कोणी नोंद करून ठेविलेली दिसत नाहीं. पिढी सरासरी तीस-पस्तीस वर्षांची कल्पिली तर विश्वंभर इ. स. १३५० ते १४०० पर्यंतच्या काळांत विद्यमान होता असें अनुमान निघतें. कदाचित् तो नामदेवाचा समकालीन असूं शकेल. एवढें मात्र निश्चित कीं, पंढरपूरच्या विठ्ठलाचा भक्तिपंथ त्याच्या हयातींत वाढीस लागला होता. आज त्याजविषयीं जी माहिती उपलब्ध आहे ती सारी महिपतीच्या भक्तलीलामृतावरच आधारलेली आहे. विश्वंभराच्या आईनें त्याला आठवण दिली कीं "आतां पंढरीस जावया कारणें। सिद्ध होणें सत्वर ॥ तुझ्या वाडवडिलीं निर्धारीं । चालविली पंढरीची वारी । त्यासी सर्वथा अंतर न करीं । तरीच संसारीं सुफळ ॥".[५] वाडवडिलांच्या या निर्धाराचा विश्वंभरास विसर कां पडावा हें महिपतीनें स्पष्ट केलें नाहीं. पुढील कथाभाग पाहतां या कुळास विठ्ठलाची ओळख विश्वंभरानेंच प्रथम करून दिली असावी हें अधिक संभवतें. पहिल्याच भेटींत तो इतका तन्मय झाला कीं त्यानें त्या सुंदर ध्यानाचा छंदच घेतला. त्या अनुपम

१ अभंग ६२. बीज तसें फळ हा तुकारामाचा आवडता सिद्धांत अनेक अभंगांत सांपडेल.

२ अभंग २८६४.

३ अभंग १०२६.

४ पृ. ६–८ वर दिलेलीं अवतरणें पाहावींत.

५ भक्तलीलामृत अध्याय २५, ओव्या २३–२४; द्वितीय आवृत्ति; दामोदर सांवळाराम आणि मंडळी, मुंबई, १९३५. यापुढील भक्तलीलामृतांतील अवतरणें या प्रतींतून घेतलीं आहेत.

सुखाला तो इतका 'सोकला' कीं कार्तिकापासून ज्येष्ठापर्यंत त्यानें सोळा येरझारा केल्या. विश्वंभराच्या या चिकाटीच्या निष्ठेनें देव सेवाऋणी झाले, आणि त्यांनीं स्वप्नांत येऊन विश्वंभरास सांगितलें कीं, मीच आतां तुझ्या गांवांत राहावयास आलों आहें, आणि यापुढें तुला पंढरीस यावयास आज्ञा नाहीं. "ऐसें बोलोनियां चक्रपाणी । गेले आंबियाचे वनीं । निद्रित जाहले तये स्थानीं । इतुकें स्वप्नीं देखिलें ॥[१]. तुकारामाच्या आयुष्यांतील प्रमुख प्रसंग सुद्धां याप्रमाणें 'स्वप्नींच्या प्रस्तावा'वर आधारलेले आहेत हें आपणांस पुढें कळून येईलच. स्वप्नांतील दृष्टांताप्रमाणें विश्वंभरास आंब्याच्या वनांत विठ्ठल-रखुमाईची मूर्ति भूमींत सांपडली. गांवकऱ्यांसमवेत ती गांवांत आणून, समीप इंद्रायणी वाहत होती अशा स्थळीं त्यानें तिची स्थापना केली. जी मूर्ति स्थापन केली ती विश्वंभरास देहू गांवापासून सुमारें मैलाच्या अंतरावर ओहोळाजवळ एका आंब्याखालीं मिळाली अशी आख्यायिका आहे. यामुळें या आंब्यास 'विठ्ठल आंबा' म्हणत असत. हा आंबा कालानें नाहींसा झाला आहे. परंतु त्याचें ठिकाण देहूकर दाखवीत असत.[२] ही मूर्ति अद्यापि विठ्ठलमंदिरांत पूजिली जाते. देहू हें गांव पूर्वीपासून क्षेत्र मानिलें जात असे कीं विश्वंभरानें देवाला भाक देऊन तेथें बैसविलें त्यामुळें देहूची धरणी पुण्य झाली, हें नक्की सांगणें कठीण आहे.[३] अपभ्रंश भाषेंत 'देहूर' म्हणजे देवकुल, देवस्थान अथवा मंदिर.[४] विश्वंभरानें स्थापन केलेला विठ्ठल हाच कदाचित् तो 'देऊ' असेल. तो आसमंतात् प्रख्यात होता, व त्या विठ्ठलदेऊला जमीन इनाम मिळाली होती; ती कागदोपत्रीं विठलटीकें या नांवानें ओळखिली जात असे.[५]

विश्वंभरानें विठ्ठलाची भक्ति वंशपरंपरा मागून घेतली, आणि विठ्ठलानें त्याला भाक देऊन देहू क्षेत्र वसविलें. या आणभाकेची कसोटी तात्काळ पुढच्या पिढींतच लागली. महिपतीच्या वृत्तांताप्रमाणें हरि व मुकुंद या विश्वंभराच्या दोन पुत्रांस देवाचा विसर पडला. घरांत सर्वसिद्धी असतां सुद्धां घोडे पाळल्या असाव्यात अशी त्यांना हांव सुटली, व क्षात्र-वृत्तीनें राजाची सेवा करून संपत्ति मिळविण्याचा त्यांनीं निश्चय केला. तुकारामाच्या घराण्यांतील स्त्रिया परंपरा संभाळण्यांत फार दक्ष होत्या असें दिसतें. हरि-मुकुंदांची आई अमाई इनें त्यांस गांव सोडून गेल्यास विठ्ठलदेवाच्या पूजेंत खंड पडेल, व बापानें दिलेलें वचन मोडेल याची आठवण करून दिली. परंतु तिच्या उपदेशाचा अनादर करून देहू गांव सोडून, ते कोणा एका राजाच्या सैन्यांत दाखल झाले, व 'शूरत्वीं दक्ष' असल्यामुळें मोठ्या हुद्द्यावर चढले. कुळाचें व्रत चालविण्यासाठीं अमाई मागें देहूस राहिली होती. पण कुटुंबासहित आईला आणावें असें मुलांनीं ठरविलें. पुत्रस्नेहाखातर तिनें विठोबाला दूर केला खरा, परंतु त्या कुळदेवतेपाशीं तिचे पंचप्राण घुटमळत होते. आपण विठ्ठलदेवाशीं

१ भक्तलीलामृत, अध्याय २५, ओवी ८६.

२ माडगांवकरांच्या गाथेंतील तुकारामाचें चरित्र, पृ. ३.

३ " येथें राहोनि कल्पवर । जड जीव तारावे दर्शनमात्रें । देहु ग्राम पुण्य क्षेत्र । राजीवनेत्रें वसवावं । " भक्तलीलामृत, अध्याय २५, ओवी ११८.

४ पाइअ-सद्द-महण्णवो, पृ. ५९१.

५ परिशिष्ट पहा.

प्रतारणा केली याची तिच्या मनाला स्वप्नांत देखील सारखी जाचणी लागली होती. "आपुले धर्मी जो सादर। तयासी ईश्वर नुपेक्षी।"[१] इत्यादि सोइस्कर तत्त्वज्ञान सांगून मुलांनीं म्हातारीचें समाधान करावयाचा प्रयत्न केला. तिच्या चित्तानें देहूच्या विठ्ठलदेवाचा सारखा ध्यास घेतला होता, तर सत्तासंपत्तीच्या उन्मादांत मुलांस देवाची आठवण देखील होईना. अशा परिस्थितींत एकदा अकस्मात् परचक्र येऊन लढतानां ते धारातीर्थी पतन पावले. देवाला सोडून 'दिवट्याछत्रीघोड्यां'साठीं प्राण टाकणाऱ्या या पूर्वजांकडून तुकारामानें पुढें "हें तों बऱ्यांत न पडे"[२] हा धडा घेतला, व शिवाजीनें पाठविलेलीं तीं सारीं आभरणें परत करून पुरतें प्रायश्चित्त घेतलें! मुकुंदाची पत्नी सती गेली. ज्येष्ठ हरीची बायको गरोदर होती, तिला नवलाख्याच्या उंबरास[३] माहेरीं धाडून अमाई विठ्ठलापाशीं परत आली. तिचा सांभाळ करावयास जवळपास कोणी नव्हतें. तशांत वृद्धापकाळीं तिची दृष्टी गेली. अशा सर्वस्वीं असहाय परिस्थितींत खुद्द विठ्ठलानें तिची पुत्रवत् सेवाशुश्रूषा केली व अंतीं तिचे सर्व संस्कारही केले अशी अद्भुत वार्ता जनांत पसरली. देवाच्या सेवेचें व्रत चालविल्यानें तिचा भार देवास घ्यावा लागला. तिलाच उद्देशून मोरोपंतांनीं आपल्या पंढरीमाहात्म्यांत म्हटलें आहे कीं, "श्रीतुकयाची आजी किंवा पणजी, तिची क्रिया केली। सेवकसेवक होतो हेचि प्रभुची बहुप्रिया केली॥". अमाईच्या मृत्यूनंतर हरीचा मुलगा विठोबा आईसह देहूस आला, व त्यानें कुळाचार चालविला. त्यापुढील वंशावळ महिपतीनें खालीलप्रमाणें दिली आहे:—"त्या विठोबाचा पुत्र जाण। पदाजी त्याचें नामाभिधान। त्यानेंही करोनि सप्रेम भजन। रुक्मिणीरमण आराधिला॥ पदाजीचा पुत्र शंकर। त्यानें पूजिला रुक्मिणीवर। कान्हया शंकराचा कुमर। बोल्होबा पुत्र जयाचा॥ त्या बोल्होबाचे पोटीं परम। वैष्णवभक्त तुकाराम॥".[४] विठोबा-पासून बोल्होबापर्यंतच्या पुरुषांविषयीं विशेष उल्लेख करण्यासारखी कांहीं माहिती नाहीं.

येथवर वर्णिलेली पूर्वपीठिका महिपतीनें कल्पनेनें रचली नसून तिला ऐतिहासिक सत्याचें पुरेसें पाठबळ आहे. विश्वंभरापासून बोल्होबापर्यंतची वंशावळ सर्व संबंधी जनांस मान्य आहे. भारदे-पांगारकरादि संशोधकांना तुकारामाच्या घराण्यांत ज्या वंशावळी[५] आतांपर्यंत मिळाल्या आहेत त्या सर्व महिपतीशीं जुळतात. तुकारामाच्या निर्याणानंतर सवाशें वर्षांनीं भक्तलीलामृत ग्रंथ पुरा होईपर्यंत महाजनकी व सावकारी असलेल्या आणि इनाम गांवें संपादणाऱ्या या प्रतिष्ठित घराण्यानें आपल्या पूर्वजांची नोंद ठेविली नसेल हें संभवत नाहीं. तेव्हां महिपतीनें त्या घराण्यांतील माहिती गोळा करूनच आपला वृत्तांत

---

१ तुलनेदाखल, तुकारामाचा "स्वामिकाज गुरुभक्ति। पितृवचन सेवा पति॥१॥ ॥ध्रु.॥ हे चि विष्णूची महापूजा। अनुभाव नाहीं दुजा॥ छ॥" हा २२६१ अभंग पहावा.

२ अभंग १८८४.

३ परिशिष्टांत दिलेला नकाशा पहा.

४ भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या ४१–४३.

५ श्रीतुकारामचरित्र पृ. २०, आणि पृ. ५९–६१, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर; दुसरी आवृत्ति, मुंबई, सन १९२७. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, एकनाथ-तुकारामांचा काल, पांगारकर, पृ. ६१२–१३.

तयार केला असला पाहिजे. नाशीक व त्र्यंबक येथील उपाध्यायांच्या वह्यांत[१] नामाक्षरांचे दोन फेरफार आढळतात. त्र्यंबक येथील वहींत बोल्होबाचें नांव वाल्होबा असें दिलें आहे. हें बहुमानार्थी रूप वाळा किंवा वाल्हा[२] या नांवाचें असूं शकेल. नाशीक येथील वहींत "पंजे बोल्होबा गोसावी काळोबा गोसावी" अशी एके ठिकाणीं नोंद आहे; तीवरून बोल्होबांच्या वडिलांचें नांव कान्होबा किंवा काळोबा असें रूढ असावेसें वाटतें. हे बारीकसारीक फेरफार सोडले तर महिपतीचीच वंशावळ सर्वसंमत झाली आहे. "तुकोबाची वंशावळ। दास वर्णीतो प्रेमळ॥" या अभंगांत[३] महिपतीचाच क्रम दिला आहे. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांस वाई प्रांतीं करजखोप मुक्कामीं तपास करीत असतां एका पंढरीच्या वारकऱ्याच्या जवळील ज्ञानेश्वरीच्या पोथींत तुकारामाची वंशावळ सांपडली. हा वारकरी पंढरींत जो तुकारामाचा वंश आहे त्यांचा शिष्य होता अशी राजवाड्यांनीं नोंद करून ठेविली आहे. ती वंशावळ ग्रंथमालेंत राजवाड्यांनीं छापली होती;[४] व "ती पोथी व तिच्या मलपृष्ठावरील तुकारामाची वंशावलि" प्रत्यक्ष पाहिल्याची ग्वाही नारायण कृष्ण गद्रे यांनीं दिली आहे.[५] "श्रीगुरु तुकोबाराय देऊकरांच्या संस्थानीं मूळपुरुष" असें शीर्षक असलेल्या त्या वंशावळींत विश्वंभरापासून झालेल्या सर्व शाखांची मुलांमुलींसह माहिती दिली आहे. मुख्य वंशवृक्षांत शंकर आणि कान्होबा यांच्याऐवजीं सोमाजी व रंगनाथ हीं नांवें दिलीं आहेत; बाकी फेरफार नाहीं. "शंकराचेंच सोम हें नांव पर्याय असून, कान्हा कृष्ण ह्याचेंच रंगनाथ हें पर्याय होय ही गोष्ट विचारवंत सुज्ञांस सहज पटण्यासारखी आहे,"[५] असें समाधान कांहींनीं मानून घेतलें आहे. पोथींतील हा लेख कितपत प्रमाणभूत मानावयाचा याचा मागाहून विचार करूं; सध्यां इतकेंच ध्यानांत घ्यावयाचें कीं, या लेखांतील वंशावळसुद्धां बहुतांशीं महिपतीहून भिन्न नाहीं. सारांश, महिपतीनें दिलेली वंशावळ कुळाच्या इतिहासाशीं सर्वस्वीं जुळती आहे.

या वंशावळींतील व्यक्तींविषयीं तुकारामाच्या चरित्राव्यतिरिक्त निराळी अशी ऐतिहासिक माहिती मिळत नाहीं. स्वर्गस्थ संतवृंदांच्या मेळाव्यांत केशवचैतन्यराघवचैतन्यांसमवेत

---

१ पांगारकरांनी वरील श्रीतुकारामचरित्राच्या पृ. ४८–४९ वर ज्यांचा उल्लेख केला आहे त्याच ह्या वह्या. नाशीक येथील वही आज नानाजी लक्ष्मण गायधनी, १९८३, पेठ तिवंधा, नाशीक यांजकडे आहे. त्या वहींतील उतारे मी स्वतः तपासून घेतले आहेत. त्र्यंबक येथील वही मी स्वतः पाहिली नाहीं; उतारा करवून आणला.

२ वाल्हा हें वाल्या (कोळी) चें रूप; किंवा वाल्हा म्हणजे आवडता. ह्या दोनही अर्थीं तुकारामानें हा शब्द वापरला आहे. पहा अभंग (अनुक्रमें) २५७, ३७२५, ४५४९.

३ पांगारकरांना देहूस ह. भ. प. वासुदेवबुवांच्या एका जुन्या बाडांत हा अभंग मिळाला; पण तुकारामतात्यांचे गाथेंत (सन १८८९) भाग १, पृ. ९० वर तो आधींच छापला गेला होता. हा अभंग रचणारा 'दास' कोण होता याची माहिती मिळत नाहीं.

४ परिशिष्टांत ही वंशावळ उल्लेखाच्या सोईसाठीं पुनः छापली आहे.

५ साधुकविश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या चरित्राची कालव्याप्ति, नारायण कृष्ण गद्रे, विविधज्ञान-विस्तार, सप्टेंबर १९२०, पृ. १०५–१०६.

विश्वंभरास महिपतीनें बसविलें आहे खरें;[१] पण तें केवळ तुकारामकथेच्या प्रसंगीं. संतमंडळींत विश्वंभराचें स्वतंत्र स्थान होतें कीं कसें हें निश्चित सांगतां येत नाहीं. बहिणाबाईनें आदिपरंपरेच्या अभंगांत विश्वंभराचा उल्लेख केला आहे, तो असा :—" 'सच्चिदानंद बाबा' भक्तीचा आगरू । त्यासी अभयवरू 'ज्ञानें' केला ॥ ६ ॥ पुढें विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणें राघवीं विचार ठेविलासे ॥ ७ ॥ केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । झालेसे प्रसन्न 'तुकोबासी' ॥ ८ ॥".[२] १६९२ शकेंत लिहिलेल्या आपल्या 'पंचीकरण' नामक ग्रंथांत बहिणाबाईचा शिष्य दीनकवि यानें वरील परंपरेंत विश्वंभराऐवजीं 'वीस्वनाथ योगीराय' असें नांव दिलें आहे.[३] खुद्द निळोबाचा गुरुपरंपरेचा जो अभंग आहे त्यांत राघवचैतन्याच्या आधींची निराळीच परंपरा दिली असून तींत विश्वंभराचा उल्लेख नाहीं.[४] तथापि निळोबाचे शिष्य शंकरस्वामी शिऊरकर यांच्या शिऊर येथील घरांत मिळालेल्या गुरुमालिकेच्या श्लोकांत सच्चिदानंदबाबाचा शिष्य विश्वंभर असाच क्रम दिला आहे.[५] असो. हा विश्वंभर कोण होता याचा अद्यापि विचार झालेला नाहीं. केवळ काळगणनेनें पाहतां तुकारामाचा मूळपुरुष विश्वंभर यास सच्चिदानंदबाबानें उपदेश देणें असंभवनीय नसलें, तरी वरील परंपरेंतील विश्वंभर हाच तुकारामाचा मूळ पुरुष असें आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून नक्की ठरवितां येत नाहीं.

तसेंच, हरि-मुकुंदांचे इतिहासाशीं स्वतंत्र संबंध जोडण्याचे प्रयत्न हे केवळ अप्रतिष्ठ तर्कच आहेत असें म्हटलें पाहिजे. राजवाड्यांनीं ग्रंथमालेंत तर्कमाला गुंफिली आहे, ती अशी :—"तुकाराम शक १४९० त जन्मला. त्याच्यामागून आठवा पूर्वज विश्वंभर. त्या विश्वंभराला मुकुंद व हरि असे दोन मुलगे होते. पैकीं मुकुंदराव आपल्या राजाकरितां राजधानीवर म्लेच्छांचें परचक्र आलें असतां लढून मेला, अशी आख्यायिका आहे. तुकाराम व त्याचा मुलगा ह्या दोघांची हयात १४९० पासून १६४५ पर्यंत, म्हणजे १५५ वर्षांची होती. तुकारामाचे पूर्वज त्याच्यासारखेच शांत व नियमबद्ध असल्यामुळें, तेहि वयातीत होऊन वारले असावे, असें म्हणावें लागतें. तेव्हां तुकारामाच्या घराण्याची दर पिढी ३०-३५ वर्षांची धरली असतां अशास्त्र होणार नाहीं. दर पिढीस ३५ वर्षें धरून १४९० पासून आठ पिढ्या मोजल्या तर विश्वंभर शक १२१० त व त्याचा मुलगा

१ भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या ७८–७९.

२ श्री संत बहिणाबाईचा गाथा, अभंग १, विश्वनाथ नारायण कोल्हारकर, शके १८४८.

३ बहिणाबाईची गुरुपरंपरा, दत्तो वामन पोतदार, भा. इ. सं. मंडळ, १८३७ शकेचें इतिवृत्त, पृ. २७१.

४ मुख्य महाविष्णु चैतन्याचें मूळ । सांप्रदायफळ तेथोनियां ॥ १ ॥
हंसरूपी ब्रह्मा उपदेशी श्रीहरि । चतुःश्लोक चारी भागवत ॥ २ ॥
हें गूज विधाता सांगे नारदासी । नारदें व्यासासी उपदेशिलें ॥ ३ ॥
राघवचैतन्यें केलें अनुष्ठान । त्यासी द्वैपायनें कृपा केली ॥ ४ ॥ श्रीतुकारामचरित्र, पांगारकर. पृ. २२३. श्रीनिळोबाराय महाराज चरित्र, परदेशी व देसाई......कोल्हापूर, १९४२. प्रकरण १९.

५ हे श्लोक पांगारकरांनीं तुकारामचरित्रांत पृ. २४७–४८ वर दिले आहेत.

शक १२४५ त हयात होता असें दिसतें. शक १२४० त मुबारिकानें हरपाळास मारून देवगिरीचें राज्य घेतलें अशी इतिहासांतरीं माहिती आहे. तिशीं वरील हकीकतीचा मेळ घालतां असें दिसतें कीं, विश्वंभराचा मुलगा मुकुंदराव शक १२४० तील लढाईंत देवगिरीजवळ लढून मेला." या अनुमानाच्या सांखळींत कांहीं दुवे सांधत नाहींत, तर एखादा पदरचा घातला आहे. परचक्र म्लेच्छांचें आलें होतें असें महिपतीनें किंवा दुसऱ्या कोणी लिहिलेलें नाहीं. विश्वंभर हा तुकाराम धरून आठवा पुरुष; म्हणजे तुकारामाच्या जन्मशकांतून सात पिढ्यांचा काल उणें करावयाचा, आठ पिढ्यांचा नव्हे. आणि तुकारामाचा जन्मशक १४९० न धरतां १५३० च धरावा लागेल. या दुरुस्त्या केल्या तर हरि-मुकुंद हे शके १२४० च्या हरपाळ-मुबारिकांच्या लढाईंत देवगिरीजवळ लढून मेले हें नुसतें कल्पनेचें अनुमान ठरतें.. बाळकृष्ण अनंत भिडे[१] यांनीं पिढी २०-२५ वर्षांची धरून विश्वंभराचा काल शके १३१५ त येतो असें मानिलें, व हरि-मुकुंद यांची हयात शालिवाहन शकाच्या चवदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत पडते असें ठरविलें; त्यावरून त्यांस असें वाटलें कीं हे दोघेजण विजयानगरच्या कोणातरी राजाच्या पदरीं त्या सुमारास असावेत. हा सुद्धां तर्कच आहे. चैतन्य-विजयकल्पतरु या आधुनिक ग्रंथांत निरंजन-रघुनाथानें हरि-मुकुंदांस चंदीचंदावरकरांचे पदरीं महापराक्रमी शूर सरदार करून टाकलें हें एकंदरींत त्या ग्रंथाच्या गौण व दंतकथात्मक पुराव्यास साजेसें आहे. तुकारामानें किंवा तुकयाबंधु कान्होबानें हरि-मुकुंदांचा नांवानें उल्लेख केला नाहीं; व महिपतीनें दिलेल्या त्यांच्या वृत्तांतापलीकडे ऐतिहासिक सत्य शोधण्यास वाव नाहीं.

तसें पाहतां, कुळपुरुष म्हणून विश्वंभराचाही त्यांनीं कोठें उल्लेख केला नाहीं. विश्वंभराचें नांव मात्र तुकारामाच्या मुखांत वारंवार येत असे. "विश्वीं विश्वंभर" हा त्याच्या हृदयाचा साक्षात्कार होता. "मज विश्वंभर बोलवितो", "तुका ह्मणे ज्याचें नांव विश्वंभर। त्याचें निरंतर ध्यान करीं ॥", "काय न करी विश्वंभर। सत्य करितां निर्धार ॥" इत्यादि उद्गारांत कुळपुरुष विश्वंभराची स्मृति मनामागें दडली आहे कीं काय अशी भावना सहज डोकावते. यापेक्षां उघड उल्लेख तुकारामानें केला असता हें संभवत नाहीं; कारण वडिलांची कीर्ति सांगण्याइतका अभिमानी त्याचा स्वभाव नव्हता.[२] त्यानें जे वडिलांचे

---

१ तुकारामबोवा, पृ. ७, आवृत्ति दुसरी, सन १९१५. संत तुकाराम. हरि रामचंद्र दिवेकर. पृ. २०.

२ "हे माझी मिराशी। ठाव तुझ्या पायांपाशीं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ याचा धरीन अभिमान। करीन आपुलें जतन ॥ छ ॥ देऊनियां जीव। वळी साधिला हा ठाव ॥ २ ॥ तुका ह्मणे देवा। जुन्हाट हे माझी सेवा ॥ ३ ॥" (१६४३) या अभंगांत "वळी" याच्या ठिकाणीं देहूप्रतींत "वाडलीं" असें मागून केलें आहे अशी या अभंगावर संपादकांनीं टीप दिली आहे. आर्यभूषण व जोग हे 'वाडलीं' हा पाठ स्वीकारतात. गंगुनाल्यांनीं जी नक्कल संपादकांस दिली होती तींत हा पाठ नसावा; नाहीतर त्याची "पं" या संज्ञेनें संपादकांनीं नोंद केली असती. देहूप्रतींत 'वडिलीं' ही सुधारणा करावी हें साहजिक आहे. परंतु ४२७० व ४२७६ हे अभंग वाचले म्हणजे जुन्हाट मिराशी भक्तिपरंपरेची तुकारामास अभिप्रेत होती, कुळाची नव्हे, हें स्पष्ट होतें.

उल्लेख केले आहेत ते आपणाकडे कमीपणा घेण्यासाठीं. वास्तविक एकनाथ-रामदासांप्रमाणें त्यालाही म्हणतां आलें असतें कीं आपण धन्य वंशांत जन्माला आलों व विशेषतः विश्वंभरामुळें भगवंताला वंश सर्वथा प्रियकर झाला. परंतु अशी धन्यता त्यानें प्रदर्शित केली नाहीं; इतकेंच नव्हे तर आपल्या हरिभक्तीचें समर्थन वडिलांवर हवाला देऊन केलें आहे. या दोन वृत्तींतील फरक केवळ यातीमुळें पडला असावा हें सहज समजण्यासारखें आहे. वडिलांनीं केलेल्या उपासनेच्या धनाला आपण लाधलों हें रामदासापेक्षां निराळ्या मार्गानें तुकारामानें जाहीर केलें. "विठ्ठल कुळींचें दैवत," "आदि तो हा देव कुळपूज्य," "सहज वडिलां होती सेवा। ह्मणोनि पूजितों या देवा॥" असें सांगून त्यानें सारें श्रेय वडिलांस देऊन टाकलें. "पंढरीची वारी आहे माझे घरीं। (म्हणून) आणीक न करीं तीर्थव्रत॥" असा खुलासा केला.[१] संतसेवेचा आपणास अधिकार आहे असें त्यानें "तुका ह्मणे संतसेवा। माझ्या पूर्वजांचा ठेवा।"[२] या वचनानें सुचविलें. पंढरपूरच्या प्रतींत देवाच्या दास्याचा आपणास हक्क आहे असा दावा मांडणारा आणखी एक अभंग[३] मिळतो; तो असा:—"माझ्या वडिलांची मिराशी देवा। तुझी चरणसेवा पांडुरंगा॥ १॥ उपास पारणीं राखिला दारवंटा। केला भोगवटा आह्मांलागीं॥ २॥ वंशपरंपरा दास मी अंकित। तुका मोकलितां लाज कोणा॥ ३॥." या आनुवंशिक हक्काबरोबर येणाऱ्या जबाबदारीचीही तुकारामाला पुरी जाणीव होती हें त्याच्या आयुष्यांतील अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं सहज दिसून आलें. कुळांतील सदाचाराची खरी कसोटी संकटसमयीं लागते. आधीं स्वतः प्रपंच बुडविला; पुढें जेव्हां वह्या उदकांत टाकून परमार्थही बुडविला तेव्हां निर्ममत्वाप्रत जाणाऱ्या तुकारामाच्या मनाला प्रथम विशेष विषाद वाटला नव्हता. तो पांच दिवस उगाच बसून राहिला. पण जनांच्या बोलांनीं हिणवून पुनः त्याचा चित्तक्षोभ केला व मनांत तरंगांचें वादळ उठलें. धरणें बसून प्राणांतिक उपोषणानें देवाला सांकडें घालावें कीं नाहीं याची मनांत विलक्षण चलबिचल चालू असतां त्याच्या तोंडून सहज उद्गार निघाले कीं—"कांहीं मागणें हें आह्मां अनुचित। वडिलांची रीत जाणतसों॥."[४] आकांत आला असतां वडिलांच्या रीतीचा हा औचित्यविवेक तुकारामास आठवला यांतच त्याच्या कुळांतील निष्काम भक्तीच्या परंपरेचें सारें सार्थक सांठविलें आहे.

---

१ हे उतारे अनुक्रमें ६११, १३३३, १३३४ आणि २३५१ या अभंगांतील आहेत.

२ अभंग २८११.

३ (४६०७ च्या पुढें दिलेल्या अभंगांपैकीं) अभंग ७.

४ अभंग २२३२. "ऐकोनि विश्वंभराची स्तुती। काय म्हणतसे रुक्मिणीपती। काय कामना असेल चित्तीं। ते मजप्रती निवेदीं॥ ऐकोनि म्हणे प्रेमळ भक्त। तुझ्या भजनीं असावी प्रीत। घडावी साधूंची संगत। जाणसी मनोरथ विठ्ठला॥ पुढें वंशपरंपरा होती। तयासि असावी तुझी भक्ती। हेंचि मागणें रुक्मिणीपती। मनोरथ पुरती तें करीं॥" भक्तलीलामृत, अध्याय २५, ओव्या ११५–११७. महिपतीनें वर्णिलेली ही वडिलांची रीत खुद्द तुकारामास एकंदरींत मान्य होती.

तुकारामापेक्षां त्याच्या धाकट्या भावाला—कान्होबाला—कुळांतील हरिभक्तीचा अधिक अभिमान होता असें दिसतें. "देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ऋण । आहे तें कां नेदिसी अझून ॥"[१] असा त्यानें देवाला रोकडा सवालच टाकला आहे. देवापायीं भावाप्रमाणें पूर्वजांच्याही संसाराची अशीच अवस्था झाली होती हें ज्ञान त्याला होतें. "पूर्वी पूर्वजांची गती । हे चि आईकिली होती । सेवे लावूनि श्रीपती । निश्चिंती केली तयांची ॥ १ ॥...... तुकयाबंधु ह्मणे अदेखणा । किती होसी नारायणा । देखों सकवेना । खातयासी न खात्या ॥ ३ ॥"[२] हा टोमणा हरि-मुकुंदांच्या गतीला उद्देशून असावा. आपला भाऊ तुकाराम हा या पावन वंशवृक्षाचें सुवासिक फूल होय हें त्यानें ओळखिलें होतें. तुकारामाच्या निर्याणप्रसंगीं त्यानें केलेल्या विलापांतील शेवटचा अभंग या दृष्टीनें स्मरणीय आहे:—

"सांपडलें जुनें । आमुच्या वडिलांचें ठेवणें ।
केली नारायणें । कृपा पुण्यें पूर्वीचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखें आनंदरूप आतां । आह्मी आहों याकरितां ।
निवारली चिंता । देणें घेणें चुकलें ॥ छ ॥
जालें भांडवल घरिंचें । अमुप नाम विठ्ठलाचें ।
सुकृत भावाचें । हें तयानें दाविलें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे फिटला । पांग नाहीं बोलायाला ।
चाड दुसरी विठ्ठला । वांचूनियां आणिक ॥ ३ ॥"[३]

असो. ज्ञानेश्वराच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे विठ्ठलभक्तीच्या माहेरीं, हरिनामाच्या आगरीं तुकाराम हा 'लांवा' उगवला; पिढ्यानूपिढ्या पडलेले दाणे उगवून हें जोराचें पीक आलें.

---

१ अभंग ३०१२.

२ अभंग ३००८. अभंगाचा एकंदर रोख पाहतां पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें हे उद्गार अमाईच्या चरित्राला उद्देशून असतील असें वाटत नाहीं.

३ अभंग ३०२४.

## आडनांव व जात

तुकारामाच्या कुळाचे आध्यात्मिक संस्कार जसे 'शुचि' होते, तशी त्या कुळाची लौकिक पदवी 'श्रीमतांची' होती. खुद्द तुकारामाला याची जाणीव होती. 'शुचीनां श्रीमतां...' या भगवद्गीतेंतील श्लोकाच्या अभंगटीकेंत "शुचि श्रीमंत वरांत । योगभ्रष्ट तुका मुक्त ॥" या अंत्यचरणांत त्यानें या जाणीवेची मोठ्या कुशलतेनें ओंवण केली आहे. त्या कुळाच्या नांवनिशाणाची, जातगोताची थोड्या बारकाईनें चौकशी केली पाहिजे. महिपतीनें भक्तविजयांत (शके १६८४ = इ. स. १७६२) "दीडयोजन अलकापुरीहूनी । देहूगांव धरणीं पुण्यक्षेत्र ॥ तेथील निजभक्त तुकावाणी । आंबळे उपनाम त्यालागोनी । व्यवसाय करीत असतां जनीं । असत्य सर्वथा न बोले ॥" असें तुकारामाचें वर्णन केलें आहे.[१] आंबले(ळे) हें आडनांव रूढ होतें, याचे दोन प्रत्यंतर पुरावे मिळतात. (१) इ. स. १६८९ मध्यें तुकारामाचे पुत्र महादेव, विठोबा व नारायणबोवा या तिघांत झालेल्या फारकतीच्या निवाड्याच्या लेखांत 'आंबले' हेंच आडनांव दिलें आहे.[२] (२) नाशीक येथील उपाध्यायांच्या वहींत[३] खालीलप्रमाणें नोंद आहे :—"ली. नारोबा गोसावी पीते तुकोबा गोसावी आजे बोल्होबा भाउ विठोबा गोसावी माहादजी विठोबाचे पुत्र उधोबा रामजी गणेश गो गोवींद गो. माहादजीचे पुत्र आबाजी चु. कान्हाबा गो. त्याचे पुत्र गंगाजी खंडोबा माता अवळिबाई कुणबवाणी अडनांव आंबीले गांव देहु प्र. पुणे, कुळी मोरे." ही नोंद नारायणबोवांनीं स्वहस्तें केलेली नाहीं; गायधनीकुळांतील त्या काळच्या व्यक्तीच्या हातची आहे. वह्या शकवार आहेत; व या लेखाच्या मागच्या पानावर शके १६४१ ची नोंद आहे. शके १६४१ त सिंहस्थाची पर्वणी येते, त्या वेळीं नारायणबोवा नाशिकास गेले असावेत. शके १६७७ त तुकारामाचा पणतु खंडोबा उधव आजे नारोबा ह्यानें सुद्धां 'मोरे आंबले' असेंच आडनांव गायधनी यांच्या वहींत नोंदलें आहे. त्र्यंबक येथील उपाध्यायांच्या वहींतील[३] नारोबाची सही असलेला म्हणून मजकडे जो उतारा आला त्यांत 'ज्ञा (त) कुनबी आब (ळे) वास देहु प्र. पुने.' हीं पांगारकरांनीं दिलेलीं अक्षरें[४] नाहींत. आंबले हें नांव कसें पडलें असेल याजविषयीं दोन उपपत्त्या सुचविल्या गेल्या आहेत. आंबले या नांवाचें गांव पुणें जिल्ह्याच्या मावळ, पुरंदर आणि सिरूर तालुक्यांत आहे. गांवांशीं जर आडनांवाचा संबंध लावावयाचा असेल तर हें घराणें

१ भक्तविजय अध्याय ४८, ओव्या २२–२३. लक्ष्मण बाबू गोखले यांनीं मुंबईंत छापलेला, सन १८८८. अलकापुरीहून म्हणजे आळंदीहून देहू पश्चिमेस ११ मैलांवर, व पुण्याहून वायव्येस १८ मैलांवर आहे. परिशिष्टांत दिलेला नकाशा पहा.

२ परिशिष्ट पहा.

३ पृ. ४ टीप १.

४ श्रीतुकारामचरित्र. पृ. ४९.

मूळचें या कोणत्याही गांवचें—विशेषत: मावळ भागांतील आंबले या गांवचें—असावें असें अनुमान संभवतें. दुसरी उपपत्ति नुसती शब्दखेळाची आख्यायिका आहे. "अशी आख्यायिका आहे कीं, या कुळांतील एका पुरुषानें—कोणी म्हणतात विश्वंभरानें—विठोबास आंबील पाजिली होती त्यापासून 'आंबल्ये' अथवा 'आंबले' हें नांव पडलें."[१] ही आंबील खुद्द तुकारामानेंच पाजिली असा ज्यांचा समज आहे ते "पाहुणे घरासी। आजि आले हृषीकेशी ॥......कण्या दरदर। पाण्यामाजी रांधिल्या ॥" व "हे हरि नामाची आंबिली। जगा पोटभरी केली।" या वचनांचा[२] आधार घेतात. या वचनांचा आंबले नांवाशीं अर्थाअर्थी कांहींच संबंध नाहीं.

सध्यां तुकारामाच्या घराण्यांतील मंडळी 'मोरे' हें आडनांव लावतात. वर उल्लेखिलेल्या नाशीक येथील वहींत आडनांव आंबीले कुळी मोरे असें नारायणबोवांचें वर्णन आहे. एका कुळींत अनेक घराण्यांचा अंतर्भाव होतो. "मराठ्यांचे मुख्य चार वंश आहेत. त्यांची नांवें येणेंप्रमाणें:—सूर्यवंश, सोम किंवा चंद्रवंश, ब्रह्म किंवा यदुवंश, आणि शेषवंश. या चार वंशांमध्यें मराठ्यांच्या शाण्णव कुळांचा ऊर्फ कुळ्यांचा समावेश होतो. मराठ्यांचीं चालू नांवें म्हणजे आडनांवें हजारों आढळून येतात, तथापि सर्वांचा समावेश वरील चार वंश व शाण्णव कुळांमध्येंच बहुधा झालेला आढळून येतो. कोणत्याही स्थितींतील कोणत्याही मराठ्याचें कोणतेंही नांव असलें तथापि त्याला आपली 'कुळी' चांगल्या प्रकारें माहीत असते, व त्या माहितीचा तो शरीरसंबंधाच्या वेळीं मुख्यत्वें उपयोग करीत असतो. मराठ्यांचीं आडनांवें अगर पडनांव हीं मुख्यत्वें त्यांच्या राहण्याच्या गांवावरून, त्यांच्या धंद्यावरून, त्यांच्या पराक्रमादि विशेष कामगिऱ्यांवरून, त्यांनीं संपादन केलेल्या किताबावरून वगैरे पडलेलीं असल्याचें आढळून येतें. सारांश, व्यवहारांत मराठ्यांचीं कितीहि व कसलींहि आडनांवें किंवा पडनांवें असलीं, तरी त्यांचा समावेश चार वंश व शाण्णव कुळ्यांमध्येंच बहुधा होत असतो ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे."[३] यावरून आंबले कुटुंबाचा मोरे कुळींत समावेश व्हावा यांत परस्परविरोधी कांहींच नाहीं. तुकारामाच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "उपनांवें मूळ न पालटे."[४] नाशिकच्या वहीवरून असें दिसतें कीं या घराण्यांतील मंडळी पूर्वीपासून मोरे कुळी लावीत आले आहेत. शके १६७७ त तुकारामाच्या पणतवानें आपलें नांव 'मोरे आंबले' असें दिलें आहे. शके १७१९ त प्रथम पुऱ्या केलेल्या व शके १७४० त प्रस्तुतचें स्वरूप पावलेल्या हनुमंतस्वामीच्या बखरींत तुकारामाचें मोरे हेंच आडनांव दिलें आहे. यावरून असें दिसतें कीं अठराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं आंबले हें आडनांव मागें पडून कुळीचें मोरे हें नांव रूढ होऊं लागलें. देहूचे खंडोपंत कुळकर्णी यांनीं "विश्वंभराच्या पूर्वीच्या आठ पुरुषांचा वंशवृक्ष आपल्याकडेस आहे, त्यांत विश्वंभराचा आठवा पूर्वज चंद्रराव मोरे नांवाचा पुरुष होता असा

१ माडगावकराच्या गाथेंतील तुकारामाचें चरित्र. पृ. १.

२ अभंग १६०० व ४५१.

३ क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व, पृ. ३१७–८. वा. लिं. बिर्जे, द्वितीयावृत्ति (१९१२), बा. रा. आवटे.

४ अभंग २४२७.

लेख आहे" असें माडगांवकरांस सांगितलें होतें. हा पुरुष मोंगलाईंत सरदार होता, जावली येथें राहत असे व अधिकाऱ्यांची इतराजी झाल्यामुळें तो देहूस पळून येऊन कांहीं वष छपून राहिला आणि नंतर तेथेंच स्थाईक झाला, असाही वृत्तांत खंडोपंतांनीं माडगांवकरांस सांगितला हाता. परतु तो वंशवृक्ष माडगांवकरांस किंवा इतर कोणास प्रत्यक्ष उपलब्ध झालेला दिसत नाहीं; व पूर्वी सांगितल्याप्रमाणें विश्वंभराच्या पूर्वजांची माहिती आजवर कोठें सांपडली नाहीं. चंद्रराव मोरे जावळकर किंवा त्याचा कोणी भाऊबंद हा विश्वंभराचा आठवा पूर्वज असून तो जावलीहून देहूस आला ही गोष्ट इतिहासाशीं जुळत नाहीं हें माडगांवकरांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे.[१] या दंतकथेचा तथ्यांश इतकाच कीं, तुकारामाच्या काळापासून हें घराणें आपली कुळी मोरे मानीत आलें आहे, व कालांतरानें मोरे हेंच आडनांव रूढ झालें आहे.

या घराण्याकडे पूर्वापार महाजनकीची वृत्ति होती हें निर्विवादपणें शाबीत करणारे दोन लेख उपलब्ध आहेत. राजशक ५ काल्युक्त संवत्सर शके १६०० = (इ. स. १६७८) फाल्गुनांत शिवाजीमहाराजांनीं दिलेल्या आज्ञापत्रांत खालील मजकूर आहे :—"तुकोबा गोसावी यांचे पुत्र नारायण गोसावी याणीं सांगितलें कीं मौजे देहू परगणे मजकुर येथील महाजनकी आपले वडिलांची मिरास आहे. वडील गोसावी झाले याकरितां महाजनकी चालवायाची उपेक्षा करीत गेले...आपण न चालवावें तरी वृत्तीचा लोप होतो. याकरितां महाजनकी आपली मिरास आहे ते चालवूं पहातों, तरी पुरातन चालत आल्याप्रमाणें चालवीन ऐसें आज्ञापत्र करून देविलें पाहिजे." महाराजांनीं "यांची महाजनकी मिरासी पहिलेपासून चालत आली आहे तेणेंप्रमाणें चालविणें" अशी पुणें परगण्याच्या देशाधिकाऱ्यास आज्ञा केली.[२] दुसरा लेख म्हणजे तुकारामाचे पुत्र महादेव, विठोबा व नारायण यांजमध्यें शके १६११ शुक्ल नाम संवत्सरे माघ शुद्ध पंचमी गुरुवार रोजीं झालेली फारखती. या फारखतीच्या लेखांत "आपले मिरासीचीं घरें दोन येक श्रीसनीध येक पेठेंत माहजणकीचे घर त्यास माहजणकीचा वाडा व माहजणकी घेतली"..."तुजला माहजणकीमुळें प्राप्त होती त्यामुळें माहजनकी तुम्ही आपणाकडे घेऊन"... व "आम्ही माहजनकी करून माहजनकीच्या वाड्यांत बाजारांत राहोन माहजनकीचें उत्पन्न होईल तें घेऊन" अशीं वाक्यें आहेत.[३] तुकारामाच्या एका नातवानें लिहिलेल्या यादींतही "श्रीतुकारामबावा वास्तव्य क्षेत्र देहू यांची वृत्ति मूळची क्षेत्रमजकूरची माहजनकी" असें लिहिलेलें आहे.[४] माहजनकी ही उत्पन्नाची चांगलीच बाब होती, व ती या घराण्याची वंशपरंपरेनें चालत आलेली मिरास होती हें या सर्व लेखांवरून स्पष्ट होतें. गांवांतील व्यापाराला नियम व शिस्त घालून त्याजवर देखरेख ठेवणें, तसेंच विशिष्ट व्यापारी वर्गाकडून कर वसूल करण्यांत मदत

१ माडगांवकरांच्या गाथेंतील तुकारामाचें चरित्र, पृ. २–३.

२ परिशिष्ट पहा.

३-४ परिशिष्ट पहा.

करणें, पेठेंतील तंट्यांचे निवाडे करणें, हीं महाजनाचीं कामें होत.[१] तुकारामाच्या लिखाणांत वजनमापाचा खरेपणा,[२] जकातीचा धंदा,[३] व व्यापारउदीमाचा सर्वसाधारण व्यवहार[४] यांजविषयींचे उल्लेख ठिकठिकाणीं सांपडतात; महाजनकीची वृत्ति बापानें केलेली बघून व स्वतः कांहीं काळ करून प्रत्यक्ष आलेल्या अनुभवावरून तीं वचनें आधारलेलीं आहेत. तसेंच तुकारामाच्या घराण्यांत सावकारीचाही धंदा होता; त्याच्या वचनांत सावकारीचे अनेक आडाखे आढळतात.[५] या घराण्याची स्वतःची शेती तर होतीच; शिवाय त्यांच्या कुळदेवास जें विठलटींकें "पुरातन इनाम" होतें त्याचीही कीर्द करून ते उपभोग घेत असत व त्याचा खर्च देवाच्या महोत्सवासाठीं करीत असत.[६] एकंदरींत स्वतःची शेती, इनामाची शेती, महाजनकी, सावकारी, व्यापार-उदीम इत्यादि सर्व बाजूंनीं समृद्ध असलेलें हे प्रतिष्ठित घराणें नुसतेंच सुखवस्तु नसून, चांगलेंच श्रीमंत होतें. तुकारामाच्या पूर्वाश्रमीं तरी मद चढण्याइतकी लक्ष्मी त्या घराण्यांत नांदत होती.[७]

या घराण्याची जात कोणती या वास्तविक क्षुल्लक वाटणाऱ्या प्रश्नाला आतांपर्यंत अवास्तव महत्त्व मिळून त्याचा व्यवस्थित काथ्याकूटही झालेला आहे. याचें एक कारण असें दिसतें कीं, जातीजातींतील प्रचलित अमंगळ भेदांच्या भ्रमांतून आम्ही अद्यापि सुटलों नाहीं. विद्वानांच्या वादांस सुद्धां वर्णाभिमानाचा वास कसा येतो याचे मजेदार मासले या चर्चेत पाहावयास मिळतात. विष्णुशास्त्री चिपळूणकर आपल्या नित्याच्या पंडिती लालित्यांत तुकारामाचा नेहेमीं 'शूद्रकवि' म्हणून उल्लेख करीत असत. त्याला प्रत्युत्तर म्हणूनच कीं काय, राजारामशास्त्री भागवत तुकारामाला क्षत्रिय कवि म्हणत असत![८] निबंधमालाकारांनीं तुकोबाचा शूद्रकवि असा उल्लेख "कौतुकानें" केला आहे असा खुलासा करतांना पांगारकरांनीं अशी टीका केली कीं, "अलीकडे कित्येक जात्यभिमानी विद्वान् तुकारामाला 'मराठा क्षत्रिय' ठरविण्याच्या प्रयत्नांत आहेत."[९] या विषयावरील पांगारकरांच्या लिखाणाचा परामर्श घेऊन तुकारामाच्या एका आधुनिक चरित्रकारानें असा निष्कर्ष काढला कीं "पांगारकरांसारखे शुचिर्भूत चरित्रकार तुकारामाच्या जातीविषयीं अजून लपंडाव खेळत आहेत, ह्यावरून ज्ञातींज्ञातींतील द्वेष व मत्सर अद्यापि धुमसत आहे, हेंच सिद्ध होतें."[१०] खरें पाहतां संत आणि कवि म्हणून तुकारामाची श्रेष्ठता त्याच्या

---

१ मोल्स्वर्थचा कोश. अभंग १०९०.

२–५ प्रकरण सहावें पहा.

६ परिशिष्ट पहा.

७ अभंग २८३५.

८ "आमची देशी भाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी आहे कीं नाहीं" (१८९२). पृ. ११.

९ श्रीतुकारामचरित्र, पृ. ४७.

१० तुकारामचरित्र, पृ. २४, लक्ष्मण विनायक परळकर (१९४६).

जाति-वर्णामुळें यत्किंचितही कमीजास्त होणार नाहीं.[१] "आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ। त्याचे याति कुळ काय कीजे ॥"[२]. आणि तुकारामाच्या घरचा गूळ इतक्या शुद्ध चवीचा व अवीट गोडीचा आहे कीं, त्याजविषयीं "अवघा गोड अवघा गोड। तुका माझा पांचवा वेद।" असेंच लोक म्हणूं लागले ! तुकारामाचा शूद्रवर्ण आणि कुणब्याची जात यांजवर जे विशेष भर देतात त्यांच्या मनांत या गुळांत माती मिसळून त्याचें मोल कमी करण्याचें पाप वसत असावें असा तुकारामभक्तांस साहजिकच संशय येतो व प्रतिक्रिया म्हणून त्याच्या उजळ वर्णाचें वर्णन करून तुकारामाचें "द्विजत्व" प्रस्थापित करण्याचा ते प्रयत्न करितात. हिंदुसमाजाची ही जातीची माया कांहीं केल्या जात नाहीं ! "तोडितां न तुटे सारितां निराळी।"[३]. ज्ञानसूर्य माथ्यावर तळपूं लागला तरच जातीची छाया लोटांगणातळीं हारपेल !

तें कसेंही असो, तुकारामाच्या चरित्रकाराला हें फोल भूस उपणून त्यांतील सत्याचें बीज निवडून काढण्याचा प्रयत्न अवश्य करावा लागेल. तुकारामाच्या भावनांचें विश्लेषण करतांना त्यांच्या मुळाशीं हीं असलीं बीजें किती खोल रुजलीं होतीं हें शोधणें चरित्रकाराचें एक प्रमुख कर्तव्य आहे; त्याशिवाय त्याच्या बोलांमागील अबोलण्या खुणा पटणार नाहींत. आजच्या कल्पनांप्रमाणें तुकारामाचे याति-वर्ण कोणते होते हें ठरविण्यापेक्षां स्वतःच्या याति-वर्णाविषयीं खुद्द तुकारामाच्या काय कल्पना होत्या हें या शोधास केव्हांही अधिक मार्गदर्शक होईल. त्या कल्पनांचे त्याच्या चरित्रावर व कार्यावर काय परिणाम झाले हें पुढें पाहतां येईल. तूर्त त्याच्या स्वतःच्या लिखाणांत याविषयीं काय माहिती मिळते तें पाहूं.

संतांनीं प्रश्न केला असतां केवळ त्यांचें वचन पाळण्याकरितां तुकारामानें जें आत्मचरित्र वर्णिलें त्यांतील पहिलीच ओळ "याती शूद्र वंश केला वेवसाव।"[४] अशी आहे. तळेगांवच्या प्रतींत "याति शुद्र वौंश", देहूच्या प्रतींत "याति शूद्र वैश", आणि गंगुतात्यांनींच दिलेल्या पंढरपूरच्या प्रतींत "याति शुद्र वैश्य" असे पाठ होते असें

---

१ रामेश्वरभटानें हें आपल्या अधिकारवाणीनें आधींच सांगून टाकलें आहे (१०७८ अभंगाची टीप):—

"वैष्णवांची याती वाणी जो आपण। भोगी तो पतन कुंभपाकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐशी वेद श्रुति बोलती पुराणें। नाहीं तें दुषण हरिभक्ता ॥ छ. ॥
उंच निंच वर्ण न ह्मणावा कोणी। जें कां नारायणीं प्रिय जालें ॥ २ ॥
चहूं वर्णासी हा असे अधिकार। करितां नमस्कार दोष नाहीं ॥ ३ ॥
जैसा शालिग्राम न- ह्मणावा पाषाण। होय पूज्यमान सर्वत्रासी ॥ ४ ॥
गुरु परब्रह्म देवाचा तो देव। त्यासी तो मानव ह्मणूं नये ॥ ५ ॥
ह्मणे रामेश्वर नामीं जे रंगले। स्वयें चि ते जाले देवरूप ॥ ६ ॥"

२ अभंग ३८६९.

३ अभंग ६५.

४ अभंग १३३३.

तळटीपेवरून दिसतें. गंगुतात्याच्या प्रतीबरहुकुम आर्यभूषण प्रेसनें जी गाथा छापिली आहे तींत "याति शूद्र वैश्य" असाच पाठ स्वीकारला आहे.[१] सांप्रदायिक ओळीच्या गाथेंतही हाच पाठ घेतला आहे.[२] इतर वचनें पाहिलीं म्हणजे "शुद्ध वैश्य" हा पाठ असंभवनीयच ठरतो; तुकाराम वैश्यवाणी होता का कसें याची चर्चा करितांना त्या अपपाठाचा अधिक विचार करितां येईल. आपला शूद्र वंश आहे हें सांगणारा तुकारामाचा दुसरा एक अभंग आहे; तो समग्र उद्धृत केला पाहिजे, कारण त्या अभंगांत तुकारामाच्या स्वतःच्या याति-वर्णाविषयींच्या सर्व कल्पना थोडक्यांत एकत्र आल्या आहेत.

"शूद्रवंशीं जन्मलों । ह्मणोनि दंभें मोकलिलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अरे तूं चि माझा आतां । मायबाप पंढरीनाथा ॥ छ ॥
घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ॥ २ ॥
सर्वभावें दीन । तुका ह्मणे यातिहीन ॥ ३ ॥ "[३]

या अभंगांतील 'शूद्रवंशीं' या शब्दप्रयोगावरून "याति शूद्रवंश केला वेवसाव" या चरणांत देखील शूद्रवंश हाच मूळचा पाठ असला पाहिजे असें स्पष्ट दिसतें.[४] शूद्र वंशांत जन्माला आल्यामुळें आपली याति हीन असें तुकाराम मानीत असे हें उघड आहे. मी हीन यातीचा आहें हें तर त्याच्या अभंगांतलें एक पालुपदच आहे. "काय माझी याति नेणां हा विचार", "काय याती शुद्ध आहे कुळ कर्म" असें त्याला वारंवार विचारावेंसें वाटतें. "याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां । ", "तूं श्रीयेचा पति । माझी बहु हीन याती । " अशी तो देवाला आठवण करून देतो; आणि "याती हीन मति हीन कर्म हीन माझें । " असें जाहीर करून "सांडोनियां सर्व लज्जा शरण आलों तुज ॥"[५] असें शेवटीं विनवितो. स्वतःकडे कमीपणा घेण्याची तुकारामाची नम्रत्वाची प्रवृत्ति जमेला धरून सुद्धां असें उघड दिसतें कीं, आपली जात हीन मानिली जात होती याची जाणीव त्याच्या चित्तांत नित्य जागृत होती.

त्या जातीची शूद्र आणि हीन याहूनही निश्चित नामनिर्देशाची माहिती तुकारामानें दिली आहे. आपण कुणबी आहों असें त्यानें स्वच्छ सांगून टाकलें आहे. याला आधार म्हणून खालील वचनें देतां येतील :—"बरा कुणबी केलों । नाहीं तरि दंभेंचि असतों मेलों ॥", "आळस न करीं या लाभाचा । तुका विनवी कुणबियाचा ॥", "तुका

---

१ देवडीकरकृत श्री तुकाराममहाराजांची सांप्रदायिक गाथा, अभंग ७६७; आर्यभूषण मुद्रणालय, आवृत्ति पांचवी (१९५०).

२ तुकाराममहाराजांच्या अभंगांची सांप्रदायिक ओळीची गाथा, अभंग १६८६; केमकर आणि मंडळी (१९५०).

३ अभंग २७६६.

४ पृ. ३६-३७ वर चर्चिलेल्या शिवजी कासाराच्या शिलालेखावरून, वंश देण्याचा त्या काळीं प्रघात होता असें दिसतें.

५ हे उतारे अनुक्रमें ९१९; १०१४; १२१९; २०५५; २७५२ या अभंगांतील आहेत.

कुणबियाचा नेणे शास्त्रमत । एक पंढरीनाथ विसंबेना ॥". यांच्याच जोडीला तुकारामाचा भाऊ कान्होबा याचें "आतां निदसुर नसावें । गाठ पडली कुणब्यासवें ॥" हें वचन वाचलें म्हणजे हें कुटुंब आपल्याला कुणबी म्हणवीत असे याविषयीं संदेह राहत नाहीं.[१]

तुकाराम स्वतःला वाणी देखील म्हणवीत असे व त्याच्या हयातींतच त्याला लोक वाणी म्हणून ओळखूं लागले होते तें केवळ त्याच्या धंद्यावरून, जातीवरून नव्हे. "याती शूद्र वैश्य केला व्यवसाय" असा जरी पाठ घेतला तरी "वैश्य व्यवसाय" म्हणजे वाण्याचा धंदा केला असाच सरळ अन्वय लावावा लागतो. "तैसा नव्हे तुका वाणी व्यवसाई"[२] या वर्णनांत रामेश्वरभटानें हें विशद करून सांगितलें आहे. व्यवसाय आणि याति यांतील फरक रामेश्वरभटाच्या डोळ्यांपुढें होता; म्हणूनच त्यानें दुसऱ्या अभंगांत तुकारामाच्या शूद्र यातीला अनुलक्षून "वैष्णवांची याती वाणी जो आपण । भोगी तो पतन कुंभपाकीं ॥" असें म्हटलें आहे.[२] वाण्याचे आनुवंशिक संस्कार माझ्या वृत्तींत पुरे बाणले आहेत व मी सहसा फसला जाणार नाहीं हें देवावर ठसविण्यासाठीं तुकारामानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं "जातीचें वाणी मी पोटींचें कुडें । नका मजपुढें ठकाठकी ॥".[३] या वचनाचा भावार्थ ध्यानांत घेतां, जात या शब्दाचा वाच्यार्थ या ठिकाणीं अभिप्रेत नाहीं. वाणी असा स्वतःविषयीं तुकारामानें केलेला एवढाच काय तो उल्लेख अभंगांत आढळतो. भगवद्गीतेवरील अभंगटीकेंत[४] जे उल्लेख सांपडतात ते सुद्धां शूद्र वर्ण व वैश्य व्यवसाय याच भूमिकेला पोषक आहेत. प्रत्यक्ष तुका वाणी हे शब्द त्या टीकेंत दोनच ठिकाणीं आले आहेत :—(१) सासरे सोयरे तेही । निःसंदेही जे उभे ॥ १ ॥ त्या दोही फौजे आंत । युद्धीं ख्यात लाविते ॥ २ ॥ कौंतेयें देखोनियां । जीवीं माया झळंबे ॥ ३ ॥ बंधूंतेंही रणांगणीं । तुका वाणी ज्या लागीं ॥ ४ ॥ (२) अहो जें कां कर्मातीत । सिद्ध प्राप्त चोखट ॥ १ ॥ परि कर्म केल्याविण । कोण सीण मुकला ॥ २ ॥ कर्मसंन्याससमात्रें । सिद्धि वक्रे न पाहे ॥ ३ ॥ ययालागीं तुका वाणी । हे निशाणी कर्माची ॥ ४ ॥[५]. या दोनही स्थळीं वाणी शब्दाचा अर्थ, जातीचा किंवा धंद्यानें वाणी असा नसून, वाणितो म्हणजे (पहिल्या अभंगांत) वर्णन करितो व (दुसऱ्या अभंगांत) स्तुति करितो असाच आहे. "तुका वर्णी" असा शब्दप्रयोग निदान दोन स्थळीं तरी अभंगटीकेंत

---

१ हे उतारे अनुक्रमें ३२०; ३७५२ = ३९५६; ४३९२; ३०१५ या अभंगांतील आहेत. तुकारामतात्यांच्या गाथेंत "आम्ही कुळंबियाचीं पोरें । आम्हां ज्ञान कैचें खरें ॥" असे दोन, आणि "कुणबियांचे वंशीं जन्मलों जगदिशा । संस्कृत ही भाषा आम्हां कैची ॥" असे (२५–२७) अभंग सांपडतात. हे तुकारामाचेच आहेत कीं काय हें शंकास्पद आहे.

२ अभंग १०७८ च्या टीपेंतील रामेश्वरभटाचे अभंग.

३ अभंग १८५९.

४ उल्लेखाकरितां वा. सी. बेंद्रे यांनीं संपादिलेलें 'श्रीमद्भगवद्गीतेचा अभंगात्मक अनुवाद' हें पुस्तक वापरिलें आहे. या मुद्द्यावर त्या पुस्तकाचें प्रास्ताविक पृ. ७४ पहावें. अभंगाचे आंकडे त्या पुस्तकांतील आहेत. यापुढें 'बेंद्रे' या संज्ञेनें या पुस्तकाचा उल्लेख केला आहे.

५ अभंग २५; १२१. (बेंद्रे).

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आला आहे :—(१) बद्ध शुभाशुभीं नव्हे । तुका वर्णी त्या गौरवें ॥, व (२) बोलला हे जो त्रिविध । वर्णी तुका पूर्ण बोध ॥[१]. वाणणें हा धातु “ कृतांजुली कृपाळुवा । तेही वाणिती तुज देवा ॥”[२] या चरणांत अभंगटीकेंत वापरलेला उदाहरणार्थ देतां येईल. वाणणें हा धातु व वाणी हें त्याचें रूप मराठी काव्यांत सर्वसाधारण वापरांत आहे हें सुपरिचित आहे. अभंगटीकेंतील आणखी एका उल्लेखाची दखलगिरी घेतली पाहिजे ; तो[३] येणेंप्रमाणें :— “.........परब्रह्म अधिष्ठान । तुझें अत्यंत पावन । आत्मा शाश्वत निधान । आलें येथें कळोनी ॥ ३ ॥ आदिदेव दिव्य मूर्ती । अज प्रभुवरा कीर्ती । मातें समजली धृती । तुक्या वैश्यासारिखी ॥ ४ ॥. ” मातें म्हणजे मला ( अर्जुनाला ) तुक्या वैश्यासारखी धृती म्हणजे धारणा कळली असा या शेवटच्या चरणाचा अर्थ आहे. या ठिकाणीं तुकारामानें स्वतःस वैश्य म्हणवून घेतलें आहे खरें, पण तेवढ्यावरूनच तो जातीचा वैश्यवाणी होता असें अनुमान युक्तिवादाला धरून काढतां येणार नाहीं. “ याति शूद्र ” इत्यादि अभंगांतील वचनाप्रमाणें या स्थळीं सुद्धां वैश्य शब्द व्यवसायवाचकच आहे. याला उत्तम प्रमाण म्हणून अभंगटीकेंतील दुसरें एक वचन पुरेसें आहे. “ समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः ” या (चवदाव्या अध्यायांतील चोविसाव्या) श्लोकावरील टीकेंत शेवटच्या चरणांत तुकारामानें सहज जातां जातां आपण “ अवर्ण ” आहों हें सांगितलें आहे :—“ भेंडा धोंडा कीं सुवर्ण । परिक्षु नेणें वर्णावर्ण । तो गा झाला जरी अवर्ण । तुका तरी मत्प्रिय ॥”[४]. सारांश, तुकाराम जेव्हां स्वतःला वैश्य किंवा वाणी म्हणवितो, तेव्हां तो आपल्या जातीचें किंवा वर्णाचें वर्णन करीत नसून धंद्याचें करीत आहे हें निश्चित. त्याचें घराणें व खुद्द तो, वाण्याचा धंदा करीत असे हें निर्विवाद ; त्यावांचून महाजनकीची वृत्ति मिळाली नसती.

तुकाराम स्वतः आपण वर्णानें शूद्र, जातीनें कुणबी व व्यवसायानें वाणी असें सांगत असे. रामेश्वरभटानेंही त्याच प्रकारचें वर्णन दिलें आहे. रामेश्वरभटाप्रमाणें तुकारामाची दुसरी समकालीन व्यक्ति बहिणाबाई, आपल्या गुरुविषयीं तो शूद्र कुणबी असून वाणी होता असेंच म्हणते. तिचें निवेदन तिच्याच शब्दांत देणें बरें[५]. “ ४६.—मंबाजी गोसावी भ्रतारासी म्हणे । तुम्ही शिष्य होणें क्रियायुक्त ॥ १ ॥ माझा हेत आहे तुम्हीही हरिभक्त । दिसतां विरक्त उभय वर्गें ॥ २ ॥ ऐकोनी ते गोष्टी दोनचार वेळां । मग त्या प्रांजळा सांगितलें ॥ ३ ॥ आम्ही अनुग्रही आहों जी पूर्वींच । न वाटे त्या सत्य गोष्ट कांहीं ॥ ४ ॥ भ्रतारें त्याप्रती सांगितलें सर्व । कोल्हापुरीं पूर्व वर्तलें जें ॥ ५ ॥ ऐकोनीया द्वेष संचरला मनीं । म्हणे काय स्वप्नीं समाधान ॥ ६ ॥ नाहीं गुरुसेवा घडली जोंवरी । हस्तक हा शिरीं

१ अभंग १७४ ; ६४६.
२ अभंग ४३९.
३ अभंग ३८५.
४ अभंग ५५९.
(बेंद्रे).

५ श्री संत बहिणाबाईची गाथा, कोल्हारकर ( शके १८४८ ).

सद्गुरूचा ॥ ७ ॥ तोंवरी तो गुरू कासयाचा खरा । शुद्राचीया अंतरा ज्ञान कैचें ॥ ८ ॥ स्वप्नींचा अनुग्रह गुरू केला शुद्र । तोही बळीभद्र ज्ञानहीन ॥ ९ ॥...४८.—म्हणे हे ब्राह्मण तरी गुरू शुद्र । हेंचि तया छिद्र सांपडलें ॥...४९.—आपाजी गोसावी पुण्यांत रहात । तो अति विख्यात राजयोगी ॥ १ ॥ तयाप्रती पत्र मंबाजी पाठवी । तुकोबा गोसावी शुद्र वाणी ॥ २ ॥ कथा करितसे देऊळीं सर्वदा । द्विज त्याच्या पदा लागताती ।...५०.—आपाजी गोसावी वाचोनीया पत्र । क्रोधें फार नेत्र भोवंडीत ॥ १ ॥ शुद्र होवोनीया नमस्कार घेत । पाप हें अद्भुत होत असे ॥ २ ॥...शुद्राचा अनुग्रह घेताती ब्राह्मण । भ्रष्टाकार पूर्ण होत असे ॥ ८ ॥." या निवेदनाचा इत्यर्थ हा कीं, तुकाराम शूद्र गणिला जात असे, यावर मंबाजीचा खरा कटाक्ष होता. बहिणाबाईनें मंबाजीच्या तोंडी जें तुकारामाचें वर्णन घातलें आहे त्यांतहि शूद्र, बळिभद्र म्हणजे[१] कुणबी, आणि वाणी, हें त्रिसूत्र त्याला अर्पण केलें आहे.

कुणब्याच्या जातीनें वाण्याचा धंदा केला असतां जो पोटभेद निर्माण होतो त्याला कुणबवाणी म्हणत असले पाहिजेत. नारायणबोवांनीं नाशिक येथील वहींत कुणबवाणी म्हणून जी जात दिली आहे ती या उपपत्तीप्रमाणें अन्वर्थक वाटते. त्या वहींत इतर कुणबवाण्यांचीही नोंद आहे ; त्यांत सेटे जगताप राहणार चाकण यांचेंही नांव आहे हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. कुणबवाणी हें जोडनांव त्या काळींही प्रचारांत असलें पाहिजे. स्वहिताचा धंदा साधण्यांत कुणबवाणी कसे तत्पर होते याचें खुद्द तुकारामानें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे.[२] "मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ॥ छ ॥". कुणबीवाणी नांवाची पोटजात मुंबई प्रांतांतील जातींत आजही आढळते. ती कुळुनी किंवा मराठा वाणी या नांवानेंही ओळखिली जाते. व्यापारउदीम करणाऱ्या मराठा कुणब्यांतून ती उद्भवली आहे. तिचे आचार व संस्कार मराठा कुणब्याचेच आहेत.[३] 'मराठा-वाणी' असा उल्लेख पेशवे दप्तरांतील कागदांत मिळतो ( खंड ३२ ले. ४६२). तो असा आहे :— "बाबू सावंत म [illegible] वाणी.........त्याचा लेक गोव्यास फिरंगीयाकडेस चाकर आहे". या पत्राचा सन रियासतकार सरदेसाई यांनीं १७३८ (म्हणजे तुकारामानंतर ८८ वर्षें) घातला आहे.[४]

कुणबवाणी, कुणबीवाणी किंवा मराठावाणी हे खरे मराठेच, वैश्यवाणी हे त्यांहून अगदीं भिन्न, आणि तुकाराम हा वैश्यवाणी नव्हता, या प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी थेट मोरोपंतापर्यंत तुकारामाचीं जीं वर्णनें सांपडतात त्यांतील या मुद्द्याला लागू तेवढ्या

१ बळिभद्र म्हणजे नांगऱ्या कुणबी किंवा बळिराजाचा वंशज ( कुणबी ).

२ अभंग ८२३.

३ Tribes and Castes of Bombay, R. E. Enthoven, Vol. III (1922), p. 439.

४ गोमंतकीय हिंदूच्या सामाजिक इतिहासांतील कांहीं प्रसंग, प्रो. पां. स. पिसुर्लेकर, भारतमित्र, जून १९४३, वर्ष १५ अंक ६.

विधानांचा गोषवारा दिला पाहिजे. तुकारामाचे समकालीन रंगनाथस्वामी निगडीकर यांचें "जडदेहा घेउनि वाणी गेला ती ऐका वाणी" हें पद प्रख्यात आहे. याचीच री ओढून विठ्ठलनाथानें "जडदेह कसा घेउनि गेला तुकाराम वाणी" हें आपलें पद रचिलें. वामनाच्या नांवावर मोडणाऱ्या तुकारामाष्टकाचा आरंभ "जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी। कसें हो म्हणावें तयालागिं वाणी।" या चरणांनीं होतो. हा वाणी-प्रास विशेषतः विप्रांस विनाप्रयास सुचणारा होता. तुकारामवाणी वाणीशीं इतका 'संपृक्त' झाला होता कीं, त्या संबंधाचें गमक म्हणून हें यमक योजावयाचा कवींचा नियमच ठरून गेला होता. मोरोपंत तरी त्या नियमाला अपवाद होण्याचा संभवच नव्हता. तथापि त्या आर्याप्रभूनें "आर्यकौतुकाराम" म्हणून तुकारामाचा गौरव करतांना "भक्तिरसिक शूद्रकवन म्हणवूनि कशास नाक वाहेल?" असा खोंचक प्रश्न विचारला. या सर्व कवींच्यापेक्षां[1] चरित्रकारांच्या वर्णनांस अर्थात् अधिक महत्त्व दिलें पाहिजे. तुकारामाचा वंशज गोपाळबावा यानें "शूद्र यातीप्रती जन्मला तुकया। व्यापार खाणयाचाची करी॥" असें जें लिहून टेविलें आहे,[2] त्याला चरित्रकारानें व वंशजानें केलेलें वर्णन म्हणून दुहेरी महत्त्व आहे. तुकारामाचा सर्वश्रेष्ठ चरित्रकार महीपति हा तुकारामाला आपला गुरु मानीत असे; आणि त्यानेंही भक्तलीलामृतांतील तुकारामचरित्राच्या आरंभीं असें वर्णन केलें आहे कीं, "शूद्र यातीमाजी निश्चित। जन्मला तुकाराम वैष्णवभक्त। जो जगद्गुरु मूर्तिमंत। विश्वोद्धारार्थ अवतरला॥."[3] हा 'निश्चित' शब्द हेतुगर्भ आहे हें निश्चित! त्या चरित्रांत इतरत्र विखुरलेल्या उल्लेखांवरून हें स्पष्ट दिसतें कीं, तुकाराम हा जातीनें शूद्र व व्यवसायानें म्हणजे धंद्यानें वाणी होता असाच महिपतीचा समज होता. ते सर्व उल्लेख या स्थळीं संकलित केले पाहिजेत. सत्ताविसाव्या अध्यायांत खुद्द तुकारामाच्याच तोंडीं "म्हणे मी वाणी व्यवसायीं" (ओवी ७८) असे शब्द घातले आहेत. बत्तिसाव्या अध्यायांत (ओवी ६२) मंबाजीच्या तोंडची "तुका तो शूद्र जातीचा वाणी" अशी तक्रार सांपडते.[4] अडतिसाव्या अध्यायांत दादोजी कोंडदेवाकडे संन्यासी अशीच तक्रार करतात कीं, "तुका शूद्र जातीचा वाणी।" (ओवी १०१). 'वाण्याचा धंदा करणारा शूद्र जातीचा' हें महिपतीनें केलेलें वर्णन त्या काळच्या प्रचलित लोकसमजावरच

---

१ ही कविकुसुमांजलि परिशिष्टांत पहावी.

२ तुकारामतात्यांची गाथा, भाग १, पृ. ३३.

३ अध्याय २५, ओवी १२.

४ दामोदर सावळाराम आणि मंडळीच्या मी वापरलेल्या प्रतींत "तुका तो शुद्ध जातीचा वाणी" असें या ओवींत छापलें आहे. ती छपाईची चूक दिसते, हें अडतिसाव्या अध्यायांतील पुढें दिलेल्या अवतरणावरून स्पष्ट होतें. मजपाशीं महिपतीच्या तुकारामचरित्राचें एक हस्तलिखित आहे, त्यांत "शूद्र जातीचा वाणी" असाच या ओवींत लेख आहे. "शुद्ध जातीचा वाणी" या शब्दप्रयोगाचा या संदर्भांत कांहीं अर्थही लागत नाहीं. पृ. १३–१४ वर चर्चिलेला "याति शुद्ध वैश्य" हा अपपाठ असाच हस्तदोषानें उद्भवला असला पाहिजे.

आधारलें असलें पाहिजे. तुकाराम हा जर वर्णानें वैश्य असता तर त्याचें शूद्र असें वर्णन महिपतीनें स्वमतीनें खचित केलें नसतें. गुरुद्रोहाचें पाप करण्याइतका वर्णाभिमान महिपतीच्या माथीं मारण्याचा अन्याय आपण करितां कामा नये.

तुकाराम जातीनें मूळचा वैश्यवाणी म्हणजे द्विज होता,[१] नंतर तो कुणबी म्हणजे शेतकरी झाला, व त्याला शूद्रवंशीय मानण्याचें मुख्य कारण म्हणजे त्याच्या घराण्यांतील गोसावी पंथाची दीक्षा होय असें एक नवीनच मत मांडण्यांत आलें आहे.[२] त्यांत नाविन्याचें कांहींसें आकर्षण दिसलें तरी तें सत्यापासून अपाकृष्ट आहे हें आतांपर्यंत दिलेल्या आधारांवरून स्पष्ट होईल. वैश्यवाणी या नांवानें ओळखिली जाणारी जात कुणबवाणी, कुणबीवाणी किंवा मराठावाणी या जातीपासून साफ निराळी आहे. वैश्यवाण्यांतील प्रमुख पोटभेद कुडाळे वाणी किंवा संगमेश्वरी वाणी हे आपणांस आर्य वैश्य किंवा आर्य दक्षिणी वैश्य म्हणवितात.[३] दक्षिणी वैश्यांच्या नांवांत मोरे, आंबले हीं तुकारामाच्या कुटुंबाचीं किंवा गाडे, मोझे, गुंळवे हीं तुकारामाच्या नातलगांचीं नांवें नाहींत.[४] तुकारामाला वैश्य व शूद्र यांतील भेद खचित अवगत होता. चार वर्ण व अटरा याती ही संख्यागणना त्या काळीं रूढ होती ; अभंगांत तिचा एकदोन ठिकाणीं उल्लेख आला आहे.[५] "ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चांडाळां आहे अधिकार" अशी सर्व वर्णांची तुकारामानेंच यादी दिली आहे.[६] तेव्हां वैश्य-शूद्रांची स्वतःच्या बाबतींत तुकाराम गल्लत करील हें संभवत नाहीं. भगवद्गीतेंतील "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।" या वचनाचें स्मरण ठेऊन कलियुगांतील धर्मव्यवस्थेचें वर्णन करितांना "वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक ॥"[७] असें त्या काळचें रूढ मत तुकारामानें सांगितलें खरें. तो जर वर्णानें वैश्य म्हणजे द्विज असता तर त्यानें तसें सरळ म्हटलें असतें ; स्वतःला हीन जातीचा म्हणवून घेतांना शूद्रत्वाची

---

१ सर अलेक्झांडर ग्रँट साहेबानें तुकारामास "by caste and profession a Wani or shop-keeper" असें म्हटलें आहे. Tukaram—A Study of Hinduism : Fortnightly Review—reproduced in the Bombay Educational Record, Vol. III (1867), p. 52. गॅझेटिअरमध्यें (Part III, p. 129) सुद्धां "Tukaram was Vaishya Vani by caste" असें म्हटलें आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्रजांनीं दिलेली ही माहिती तुकारामाच्या "वाणी" या कविवर्णनावर आधारलेली दिसते. तिला अन्य कांहीं आधार होता असें त्यांनीं कोठें सुचविलें नाहीं.

२ बेंद्रे, प्रास्ताविक, पृ. २१.

३ Tribes and Castes of Bombay—R. E. Enthoven, Vol. III (1922), p. 439.

४ गोमंतकीय ब्राह्मणेतर सर्व शूद्र आहेत काय ? डॉ. ना. द. वेरेकर (१९३७) या पुस्तकांत दिलेल्या याद्या पहाव्यात.

५ अभंग ३०३५, ४४२७.

६ अभंग ११४२.

७ अभंग २६७.

उपाधि नाहक चिकटवून घेतली नसती. तुकारामापूर्वीच त्याच्या घराण्यानें गोसावी पंथाची दीक्षा घेतली होती याला कांहींच आधार नाहीं. उलट वर उल्लेखिलेल्या शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रांत नारायण गोसावी यांनीं जें सांगितलें कीं, वडील गोसावी झाले याकरितां महाजनकी चालवावयाची उपेक्षा करीत गेले, तेंच वस्तुस्थितीला अनुसरून आहे. तुकारामानें आपल्या घराण्याचा गोसावी म्हणून कोठेंच निर्देश केला नाहीं. तुकारामानंतर, विशेषत: देवस्थान संस्थान होण्याच्या मार्गास लागल्यानंतर, त्याच्या वंशजांनीं स्वत:स व घराण्यांतील पुरुषांस गोसावी म्हणवून घेणें हें साहजिकच होतें. "जगीं कीर्ति व्हावी। म्हणोनी जालासी गोसावी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ बहुत केलें पाठांतर। वर्म राहिलेसें दूर ॥ छ ॥ चित्तीं नाहीं अनुताप। लटिकें भगवें स्वरूप ॥ तुका म्हणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा ॥"[१] हा अभंग वाचला असतां खुद्द तुकारामानें गोसावीपंथाची अशी दीक्षा घेतली होती असें वाटत नाहीं. त्यानें भगवें धारण केल्याचा उल्लेख मिळत नाहीं; व तशी परंपराही नाहीं. तो वैष्णव असून हरिकीर्तन करीत असे म्हणून लोक त्याला गोसावी म्हणत. गोसावी शब्दाची त्याची कल्पना उदात्त होती; पंथवाचक म्हणून त्यानें तो शब्द क्वचितच वापरला आहे.[२] तसेंच, गोसावी म्हटला गेला म्हणजे तो शूद्र होत असे यालाही कांहीं आधार नाहीं. वर उद्धृत केलेल्या बहिणाबाईच्या आत्मचरित्रपर निवेदनावरून असें स्पष्ट दिसतें कीं, गोसावी गणलीं जाणारीं माणसें आपली जात विसरत नसत. मंबाजी गोसावी व आपाजी गोसावी यांचा उच्चनीच भाव जन्मावर आधारला होता; पंथानें त्यांत समता आली नव्हती. आश्रमधर्म चालवून वेदपठन करणारे भिक्षुक ब्राह्मण आणि नामसंकीर्तन व हरिकथा करणारे गोसावी ब्राह्मण यांच्यांत तेढ होती;[३] पण दोघांचाही ब्रह्मत्वाचा पीळ गेलेला नव्हता. तुकारामाला गोसावी म्हणत असत; पण तो शूद्र असल्यामुळें ब्राह्मणांनीं त्याचा अनुग्रह घ्यावयाचा नाहीं व त्याला नमस्कार करावयाचा नाहीं हा तर या ब्राह्मण गोसाव्यांचा खरा दावा होता. तेव्हां गोसाव्याची दीक्षा घेतल्यामुळें जातिभ्रष्ट होऊन तुकाराम शूद्रत्व पावला ही कल्पनाच सर्वस्वीं निराधार आहे. तुकारामाच्या स्वभावाची ज्याला खरी पारख झाली आहे तो हें सहज मान्य करील कीं, हरिभक्तीमुळें आपली जात कमी लेखितात याची वाच्यताच काय, पण तीव्र प्रतीकार केल्याशिवाय तो वैष्णववीर राहता ना! तथापि त्याच्या लिखाणांत असें कोठेंच सुचविलेलें नाहीं कीं, केवळ गोसावीपंथाची दीक्षा घेतल्यामुळें त्याचें कुळ किंवा तो शूद्र गणिला गेला. 'कुणबियाचा,' 'कुणबी केलों,' हे शब्दप्रयोग तुकाराम स्वत: पुढें शेती करूं लागल्यामुळें धंद्यानें कुणबी झाला असें दर्शवीत नसून कुणब्याच्या घराण्यांत त्याचा जन्म झाला असेंच सांगतात. कृषिगौरक्ष्यवाणिज्य हीं वैश्यकर्मे या भगवद्गीतेंतील व्याख्येचा[४] शिवकालीन

१ अभंग ४११६.

२ पहा अभंग ७२१, १४३६, २३०२, २८५६, ३२१४, ३७७१.

३ श्री संत बहिणाबाईचा गाथा, अभंग ३२–३३; कचेश्वरकृत आत्मचरित्र. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त. श. १८३५. पृ. २४१.

४ बेंद्रे, प्रास्ताविक, पृ. २१.

समाजव्यवस्थेशीं दूरचाही संबंध नाहीं. या श्लोकाचें अभंगटीकेंत भाषांतर करितानां तुकाराम केवळ त्या व्याख्येचा पुनरुद्धार करीत होता, रूढ वर्णव्यवस्थेचें वर्णन करीत नव्हता हें उघड आहे. तुकारामाच्या काळांत ही व्याख्या जर सर्रास लाविली असती तर महाराष्ट्रांतील सगळे शेतकरी तेव्हां वैश्य गणिले जात होते असें म्हणण्याची पाळी येईल! तुकारामास वैश्य किंवा वाणी कां म्हणत असत याचीं कारणें मागें सांगितलीं आहेतच. वाणी म्हणजे जातीनें वैश्यवाणी असें समीकरण करतां येणार नाहीं. (वाण्याचें) "याति कुळ काय कीजे" या तुकारामाच्याच वचनावरून हें प्रतीत होतें कीं वाणी हें धंद्याचें वाचक नांव होतें व आजच्याप्रमाणेंच निरनिराळ्या यातिकुळांचे लोक वाण्याचा धंदा करीत असत. बहिणाबाईच्या आत्मचरित्रांत मंबाजीनें तुकारामास शूद्र वाणी म्हटलें आहे त्यांतील श्लेषही जातीला अनुलक्षून आहे.[१] जे वाण्याचा धंदा करीत ते साहजिकच तागडीची निशाणी लावीत असत; ती निशाणी केवळ वाणीजातीचेंच चिन्ह नव्हतें. याचप्रकारें चाकणचे कुणबवाणी सेटे जगताप यांनीं नाशिकच्या वहींत तागडीची निशाणी लाविली आहे. कासार जातीच्या लोहगांवच्या सिवजीनें सुद्धां तागडीची निशाणी शिलालेखांत लावली आहे. महाजनकीची वृत्ति करणाऱ्या तुकारामाच्या वंशांत ती निशाणी लावली यांत कांहींच नवल नाहीं. सेटे किंवा महाजन हीं वतनेंही कुणबी जातीच्या घराण्यांत होतीं.

चरित्रकाराच्या दृष्टीनें तुकाराम स्वतःला जातीनें कुणबी, वर्णानें शूद्र व धंद्यानें वाणी म्हणवीत असे, व त्या काळचे लोकही त्याला तसाच ओळखीत असत इतकी माहिती येथें पुरेशी आहे. वर्तमान वर्णविमर्शाच्या चौकटींत वरील चर्चेचा हा निष्कर्ष कसा बसतो हें दर्शविण्याची तुकारामचरित्राला तादृश आवश्यकता नाहीं. भूतकालाचा वर्तमानाशीं संदर्भ लावावयाचाच असेल तर तो विकासाच्या प्रमाणानें लावला पाहिजे, विकाराच्या अभिमानानें नव्हे, इतका विवेक राखला असतां, आजच्या भाषेंत तुकाराम शुद्ध मराठा होता असेंच आपण म्हणूं. कारण "महाराष्ट्रांतील मराठे कुणबी व मराठे हे मूळचे अभिन्न होत. सांप्रतही त्यांच्यामध्यें त्यांच्या धंद्यापलीकडे दुसरा फरक आढळून येत नाहीं. निदान देशावर व घाटमाथ्यावर मराठे व कुणबी यांत मुळींच भेद असलेला आढळत नाहीं."[२] माडगांवकर म्हणतात त्याप्रमाणें "मोरे हे शुद्ध मराठे. तुकारामाची आई मोझे आडनांवाच्या मराठे घराण्यांतली. आणखीही अवचरींचे हिंगे, वाघोलीचे जाधव, पुण्याचे शितोळे देशमुख, टांकव्याचे गरुड, महाळुंग्याचे इंगळे, चऱ्होलीचे तापकीर, एलवाडीचे गाडे या प्रसिद्ध मराठे घराण्यांशीं तुकारामाच्या कुटुंबाचा संबंध चालत आलेला आहे."[३] हा संबंध पूर्वापारचा आहे, गेल्या शतकावधींतला नव्हे.[४]

---

१ महिपतीही शूद्र वाणी असेंच वर्णन करितो—पृ. १८ पहा.

२ क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व—विर्जे, पृ. ३२६ टीप.

३ माडगांवकराच्या गाथेंतील तुकारामाचें चरित्र, पृ. १.

४ बेंद्रे, पृ. २२.

सारांश, या बाबतींत डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकरांसारख्या परंपराप्रिय पण सत्यशोधक विद्वानानें यातिवर्णाचा समतोल विचार करून जें मत बनविलें तेंच सर्वांस ग्राह्य वाटेल. "तुकारामाचें घराणें हें मराठा जातीचें होतें; ही जात जुन्या क्षत्रिय वर्णांतून उद्भवली असावी, परंतु शूद्र वर्णाची समजली जाते."[१] "जाते"च्या ऐवजीं "जात होती" इतकाच फेरबदल जातां जातां करून ह्या जातीच्या जंजाळांतून मोकळें व्हावें असेंच आज अभिजात वृत्तीच्या उदार मनाला वाटेल.

---

१ Vaiṣṇavism, Śaivism and minor religious systems. Sir R. G. Bhandarkar, Strassburg, 1913, pp 92-93.

प्रकरण तिसरें

## आईबाप व नांव

जन्मानें यातीची यातायात तुकारामाच्या मागें लागली हें खरें ; पण ज्या आईबापांच्या पोटीं त्याला जन्म मिळाला त्यांपासून त्याला सदाचार, संपत्ति आणि सुख ह्यांचा थोर लाभ झाला. तुकारामाचा पिता बोल्होबा याची माहिती महिपतीनें दिलेली तेवढीच काय ती मुख्यत्वें मिळते. व्यापारउदीम व शेतीसावकारी करीत असतां कुळांतील विठ्ठलाच्या उपासनेला बोल्होबा विसरला नव्हता. महिपतीनें त्याच्या भक्तीचें आणि सात्विक तपाचें असें काव्यमय वर्णन केलें आहे[१]:—" बोल्होबा सप्रेम होऊनि अंतरीं । एकांतीं नित्य भजन करी । आषाढी कार्तिकीसि निर्धारीं । चालविती वारी पंढरीची ॥ क्षुधार्थितासि घालीत अन्न । तृषाक्रांतासी देत जीवन । साधुसंत वैष्णवजन । त्यांचें पूजन करावें ॥ प्रपंच व्यवहार कांहीं करितां । तेथें न बोले असत्य वार्ता । सर्वभूतीं निजात्मता । द्वैत सर्वथा न देखे ॥ ". बोल्होबाची वृत्ति धार्मिक होती, व त्याला मेळाव्यांतील सामुदायिक भजनापेक्षां एकांतांतील भजन अधिक प्रिय असावें याचा प्रत्यंतर पुरावा मिळतो. देवस्थानाच्या उत्पन्नाबाबत गुरवांत आणि तुकारामाच्या वंशजांत पुढें निर्माण झालेल्या वादासंबंधीं तुकारामाचा पणतु खंडोबा याचें एक पत्र उपलब्ध आहे.[२] त्या पत्रांत अशी माहिती दिली आहे कीं विठोबाची मूळची मूर्ति वाड्यांत देवघरांत सिंहासनावर ठेवीत असत. त्यामुळें यात्रेकरूंची गर्दी वाड्यांत होऊं लागली, म्हणून तुकारामाच्या बापानें वाड्यानजीक इंद्रायणीच्या कांठीं थोड्या खर्चांत एक देऊळ बांधलें ; व आषाढी-कार्तिकी एकादशीच्या दिवशीं त्या देवळांत तो मूर्ति ठेवूं लागला ; व बाकी दिवस वाड्यांतील देवघरांत तो मूर्ति ठेवीत असे. हेंच देऊळ पुढें मोडकळीला आलें, व तुकारामानें दुरुस्त केलें. बोल्होबा पंढरीची वारी करीत असे हें " पंढरीची वारी आहे माझे घरीं " या मागें उद्धृत केलेल्या वचनानें सिद्ध होतें.

---

१ भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या ४६–८.

२ परिशिष्ट पहा.

तुकारामाची आई कनकाई ही लोहगांवच्या मोझे घराण्यांतली. या दंपतीला पुष्कळ वर्षें मूल नव्हतें. संतानाची कामना त्यांच्या मनांत वसत होती, व चोवीस वर्षें पंढरीची वारी केली आणि मग श्रीहरी प्रसन्न झाल्यामुळें या दंपतीला पुत्रप्राप्ति झाली असा महिपतीनें वृत्तांत सांगितला आहे. तीन मुलगे झाल्यामुळें महिपतीला साहजिकच हा त्रिमूर्तीचा प्रसाद वाटला. मुलांस व विशेषतः तुकारामास जें नांव ठेवलें त्यावरून ही संतति केवळ पांडुरंगाच्या कृपेनें झाली असें बोल्होबास वाटलें नसावें; कारण ज्येष्ठ पुत्राचें नांव सावजी[1] हें शंकराचें आहे व तुकारामाचें नांव देवीचें आहे. कनिष्ठास आजोबाचें कान्होबा नांव ठेवलें यावरून तुकारामाच्या जन्मापर्यंत आजोबा हयात असावेत असें सर्वसाधारण अनुमान निघतें. चोवीस वर्षें वारी केली असें मानिलें तर हीं मुलें बोल्होबाची चाळिशी उलटून गेल्यावर झालीं असावींत. तुकारामाला एक बहिण असावी असें तुकारामाचे मायबाप वैकुंठास गेले असतां "बंधुबहीण शोक करी" या महिपतीच्या वर्णनावरून दिसतें. बहिणीचा किंवा भाऊबहिणीच्या प्रेमळ नात्याचा खास उल्लेख तुकारामाच्या लिखाणांत आढळला नाहीं. तसें पाहूं जातां ज्येष्ठ बंधु सावजी याचाही उल्लेख तुकारामाच्या किंवा कान्होबाच्या अभंगांत मिळत नाहीं.

तुकारामाचें नांव देवीचें आहे असें जें वर विधान केलें त्याचा थोडासा विस्तृत खुलासा केला पाहिजे. आतांपर्यंत तुकाराम नांवाची व्युत्पत्ति शब्दशास्त्रानें किंवा शाब्दिक कोट्यांनींच लावावयाचे नवेजुने प्रयत्न झाले आहेत. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं खालील शास्त्रीय व्युत्पत्ति मांडली आहे.[2] "तुकाराम हा शब्द तुकणें = तोलणें ह्या धातूंतील तुका व राम या दोन पदांचा बनला असावा असा कित्येकांचा समज आहे; परंतु ह्या शब्दाची तुका आणि राम अशीं पदें पाडणें रास्त नाहीं. कारण तुका ह्या पदाचा कांहीं अर्थ देतां येत नाहीं. मूळ शब्द तोषाराम (तोषा + आराम), त्याचें प्राकृत तोखाराम; त्याचा अपभ्रंश तुकाराम. आत्मन् + आराम = आत्माराम. शांत + आराम = शांताराम. कृपा + आराम = कृपाराम. दया + आराम = दयाराम. परंतु सीता + राम = सीताराम." शब्दशास्त्र जरी अनंतपार असलें तरी तुकाराम या साध्या नामाचा पार गांठण्यासाठीं व्युत्पत्ति-मार्गें इतका आरामशीर प्रवास करावयास नको! तुका या पदाचा कांहीं अर्थ देतां येत नाहीं हा समज निराधार आहे. महाराष्ट्रांत प्रख्यात असलेल्या तुळजापूरच्या देवीला तुकाई

१ "सावजी के जन्म से बोल्होबा और कनकाई दोनों बड़े आनंदित हुए। सूने घर में दीप जला। किसी ने कहा 'देखो बच्चा कैसी चोर की सी नज़र से देखता है।' लड़के-संबंधी ये शब्द सुन माँ-बाप दोनों बोल उठे 'नहीं, नहीं। चोर न कहो। हमारा लाल तो साव है।' बस, लड़के का नाम सावजी पड़ गया।" संत तुकाराम, दिवेकर. पृ. २४. हा केवळ शब्दांचा काल्पनिक खेळ आहे.

२ नामादिव्युत्पत्तिकोश—राजवाडे, धुळें, शके १८६४, पृ. २१९.

श्री तुकारामाचे चरित्र - पु. म. लाड.



८-६-६३

म्हणतात.[१] या देवीवरून ठेवलेलें नांव तुका हें तुकारामापूर्वी महाराष्ट्रांतील सर्वसाधारण व्यक्तिनांवांतील स्त्रीपुरुषांचें एक सुपरिचित नांव होतें. शके १४६३ (=इ. स. १५४१) चा एक लेख, मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या आठव्या खंडाच्या प्रस्तावनेंत खुद्द राजवाड्यांनींच छापला आहे त्यांत तुकसेटी हें नांव आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या तृतीय (शके १८३७) वृत्तांत राजवाड्यांनींच (पा. १३) दोन जुनीं मोडी पत्रें छापलीं आहेत. त्यांतील शके १४२९ च्या पत्रांत "राघो तुक देऊ प ॥ सेडे तळ घाटू" अशी "गोही" आहे. शके १४६४ च्या पत्रांत "तुका बीन साया गव्हर करुवें" अशी "गोही" आहे. तुका हें नांव चाकण भागांतील लोकांचें आवडतें नांव होतेंसें दिसतें. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १९ (शिवकालीन पत्रव्यवहार) मध्यें चाकण-चक्के लेखसंग्रहांत शके १५४१ ज्येष्ठ वद्य ९ चा लेख (लेखांक ४३२) छापला आहे. त्या लेखांत "हे लिहिले बरवायि तुकोबा नायक दाढे त्याचिये पत्नीचे लिहिले" व साक्षींत "नरहरि तुकदेव कर्ता कुळकर्णी का कड्स" अशा दोन स्थळीं नोंदी आहेत. ह्या दोनही लेखांतील नांवें तुकारामावरून पडणें संभवनीय नाहीं. तुका, तुकोबा व तुकदेव हीं रूपें ध्यानांत घेण्यासारखीं आहेत. सुप्रसिद्ध कवी रमावल्लभदास यानें गीतेवरील आपल्या चमत्कारी टीकेचा रचनाकाल शके १५५० असा दिला आहे; त्यावरून त्याचा जन्मकाल शके १५१० च्या सुमाराचा असावा. म्हणजे त्याचेंही नांव तुकारामावरून पडणें शक्य नाहीं. पण त्याचें नांव पूर्वाश्रमीं तुकोपंत होतें व जगदंबेच्या कृपेनें हें एकच पुत्ररत्न झालें म्हणून हें नांव ठेवलें होतें.[२] स्त्रियांत शहाजीची दुसरी बायको, संभाजी मोहित्याची बहिण तुकाबाई, हिचा उल्लेख केला म्हणजे पुरे; तिचा जन्म इ. स. १६१९ च्या सुमारास झाला असावा. तुकारामकालांत तुकोजी हें नांव फार प्रचारांत होतें. कृष्णाजी अनंत सभासद विरचित बखरींत सरदार सुभेदारांची नांवें दिलीं आहेत त्यांत तुकोजी निंबाळकर, गणेश तुकदेव, तुकोजी कड्ड अशीं नांवें आढळतात. इ. स. १६४७ त शिवाजीनें तुकोजी चोर मराठा यास सर-इ-नौबत नेमलें. एकोजी राजे यांच्या एका पुत्राचें नांव तुकोजी होतें. हीं सर्व जातींतील नांवें व पुढें सुद्धां मराठ्यांत वारंवार आढळणारें तुकोजी हें नांव ठेवण्याचा प्रघात तुकारामावरून पडला नसून तुकाई देवीवरूनच पडला आहे. भवान आणि तुका हीं महाराष्ट्रांतील आवडतीं नांवें आहेत; व तीं भवानीवरून पडलीं आहेत. महाराष्ट्रांतील कुणबी तुकाईची पूजा करितात.[३] इतकेंच नव्हे तर दादाजी

---

१ 'तुकाई तुळजापुरीं नायटे मुलखांत' ही म्हण व्यवहारांत आहे. तुकाई शब्दाच्या "लौकिक" व्युत्पत्तिसाठीं "चमत्कारिक लोकसमजुती वगैरे" हा कालगांवकरांचा लेख पहा. भा. इ. सं. मं. षष्ठ संमेलनवृत्त, (शके १८४०), पृ. ४५. "प्रभापाणि नारायण श्री तुकाई । असी पूजिल्या ये भवा हेतु काई ॥" (शके १५८० च्या सुमारास संपूर्ण झालेल्या जयरामपिंड्येकृत राधामाधवविलासचंपू या काव्यांतील एकादश उल्लासांतील १०० वा श्लोक. राजवाडेप्रत, पृ. २६६). क्र. ९५२० / २६३८९ / १९३६

२ मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा. एकनाथ-तुकारामाचा काल, पांगारकर, पृ. ५४५-४६.

३ Tribes and Castes of Bombay, Enthoven, Vol. II, p 302. कि. १-००

कोंडदेवाच्या थलझाड्याप्रमाणें खुद्द देहूला 'तुकाईथल' नांवाचें 'थळ' होतें;[१] त्यावरून गांवांत पूर्वी तुकाईचें देऊळ असलें पाहिजे असें वाटतें. सारांश, ज्या नांवानें अभंग कीर्ति संपादन केली तें तुका नांव महाराष्ट्राच्या देवी भवानीचें आहे. तुकारामाची जात, धंदा, नांव हीं सारीं सामान्य होतीं. सामान्य माणसांत जन्मून व वावरून तो असामान्य पद पावला यांतच त्याचें मोठेपण आहे.

तुका भावानें देवाशीं एकजीव होऊन रामनामांकित झाला; पण नांवानें रामाशीं एकरूप होऊन तुकाराम म्हणून नामांकित कधीं झाला हें सांगणें कठीण आहे. अभंगांत त्यानें आपल्याला कोठेंच तुकाराम म्हणवून घेतलेलें नाहीं. भगवद्गीतेवरील अभंगटीकेंत मात्र पांच ठिकाणीं तुकाराम हें नांव आलें आहे. रामेश्वरभट व बहिणाबाई यांनीं त्याला तुकाराम या नांवानें संबोधिलें आहे. तथापि आरंभीं बहुशः तो एकेरी तुका आणि मानार्थी तुकोबा या नांवांनींच ओळखला जात असे. पुढें आदर दर्शविण्यासाठीं त्याच्या तुका नांवाला राम जोडून त्याचा तुकाराम असा लोक उल्लेख करूं लागले, व भगवद्गीतेवरील अभंगटीका ज्या काळीं रचिली गेली त्या काळीं—आयुष्याच्या शेवटच्या दहाबारा वर्षांत—तें नांव रूढ झालें. गंगा, दुर्गा, शांता, अंबा इत्यादि नांवें पुरुषांस ठेविलीं म्हणजे त्यांस राम जोडण्याचा महाराष्ट्रांतच काय पण इतरत्रही प्रघात आहे. त्या बाबतींत राजवाड्यांची शांताराम, दयाराम या नांवांची व्युत्पत्ति शास्त्रशुद्ध नाहीं. तुका या नांवाला राम जोडल्याचें बहुधा हें पहिलेंच उदाहरण असावें. या संयोगानें तुका-राम हा ज्ञान-देव, नाम-देव, एक-नाथ यांच्यासारखी पदवी पावून त्या कोटींत जाऊन बसला.

हें रामार्पण कसें झालें याविषयीं ज्याला 'रामदासी विश्वकोश' म्हणतात त्या दासविश्रामधामांत एक कथा सांगितली आहे. रामदास देहूस गेले असतां त्यांनीं तुकारामास त्रयोदशाक्षरी राममंत्र दिला, आणि त्याचें तुकाराम हें नांव ठेविलें. दासविश्रामधामकर्ते आत्माराम म्हणतात :—"त्रयोदश मात्रा मंत्रपठण। म्हणतिला गतीस जालें कारण। तरी संशयात्मिकीं न घालितां मन। करा हो श्रवण आदरें॥ तुका तुकोबा तुकप्पा वाणी। बाहत होते या अभिधान जनीं। सांगोनि विठ्ठला रामदासांनीं। तुकाराम नांव ठेविलें॥ तुकीं कीं तुकला रामा म्हणोन। तुकाराम पडिलें नामाभिधान। राम चि तुका तो न दिसे भिन्न। तुकाराम नाम या हेतु॥".[२] हेतु ठीक आहे; पण बाकी आभास आहे असेंच त्याकाळच्यापेक्षांही आजच्या "संशयात्मिकांस" वाटेल. आत्मारामबोवास तुकारामचरित्राची चांगली माहिती होती व तुकारामवाङ्मयाचा त्यानें खोल अभ्यास केला होता असें त्याच्या लिखाणावरून दिसतें. परंतु या वरील प्रसंगाचा इतर कोणी उल्लेख केलेला दिसत नाहीं. तुकाराम-रामदास भेटीचीं ज्यांत वर्णनें आहेत त्या ( महिपतीच्या नांवावर मोडणाऱ्या ) संतविजयांतही ही कथा आली नाहीं इतकें सांगितलें म्हणजे पुरे. तुका रामाबरोबर तुकला, राम आणि तुका हे भिन्न

१ परिशिष्ट पहा.

२ दासविश्रामधाम (धुळें), विसावा ३९, ओव्या ९५-९७.

नाहींत, असा तुकारामाचा मोठेपणा वर्णितानां संप्रदायाचेंही महत्त्व वाढविलें तर एक पंथ व दो काज साध्य होतील असें आत्मारामबोवास वाटलें असावें. रामदासाला सुद्धां तुक्यास तुकाराम म्हणावेंसें वाटलें ह्या आदराच्या भागापुरताच या कथेंत राम आहे इतकाच तथ्यांश सुज्ञांस ग्राह्य वाटेल.[१]

श्री तुकारामाचे चरित्र / लाड पु. म.

१ तुकाराम या नांवाची दुसऱ्या एका शाब्दिक कोटीनें बनविलेली व्युत्पत्ति सुचविण्यांत आली आहे. "श्रीतुकोबारायांचे अभंग" (१९५०) या आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत (पृ. ४७-४८) श्रीयुत बाबाजी गणेश परांजपे लिहितात :—"तुकोबांस कवित्वस्फूर्ती स्वप्नांत दृष्टांत होऊन झालेली आहे. त्याबद्दलचा खालील अभंग स्पष्ट आहे—'नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें। सवें पांडुरंगें येऊनियां ॥......प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी। उरले शेवटीं लावी तुका ॥'......एवढें नामदेवरायांचें भाषण होतांच "उरले शेवटीं लावी तु कां"? हे शब्द पांडुरंगरायांनीं उच्चारिले असावेत व देवाच्या तोंडचा तुका हा शब्द आपलें नाम असें सदरहू भक्तांनीं मानलें असावें असें मला वाटतें. ज्ञानेश्वर महाराजांचें "ज्ञानदेव" हें नाम गुरुकृपेनेंच साधलेलें आहे...... कोणत्याहि घराण्यांतील पुरुषांचीं व बायकांचीं नांवें—मागील बायकापुरुषांचीं—पुनः पुनः येतात. मोरे यांच्या घराण्यांतील पूर्वींचीं नांवें पाहावींत तर त्यांत तुकाराम असें नांव नाहीं...... (तुकारामाचें) नांव राम असें ठेविलेलें असावें. व या व्यक्तीनें त्यास तुका जोडून उत्तम नांव बनविलें......मला सुचलेला (हा) नवा विचार येथें प्रथमच मांडला आहे." तुका शब्दाचें 'तूं का' या शब्दांशीं सादृश्य सामान्य लोकसमजांत आधींच दाखल झालें आहे. अशाच एका संवादांतील 'तूं का आई ?' या शब्दांवरून देवी तुकाईचें नांव पडलें हा लोकसमज जुनाच आहे (पृ. २५, टीप १). आपलें 'राम' नाम सोडून शब्दकौतुकाचें तुका नांव अभंगांत घातलें व मग रामाच्या मागें ही तुकाची उपाधि लागली हा सारा शब्दचमत्कार व्युत्पत्तींत बसणें कठिण.

ग्रंथालय सातारा
पाने ११६
२६३८१
१७५२०
कि.

प्रकरण चौथें

## जन्मशक

तुकारामाचा जन्म, जेथें त्याचें घर आहे त्या देहू गांवीं झाला याबद्दल वाद नाहीं; परंतु जन्म कोणत्या शकांत झाला, हें अद्यापि निर्विवाद प्रस्थापित झालेलें नाहीं. तुकारामाच्या आयुष्यांतील शक-मित्यांचे ऐतिहासिक सत्यलेख कोठेंच सांपडत नाहींत. कांहीं शक-मित्या ऐतिहासिक साधनांच्या आधारें निःशंक ठरवितां येतात; व बाकीच्या त्यांच्या अनुरोधानें व इतर परिस्थितीचा समग्र विचार करून निश्चितीच्या आसपास नेतां येतात. तुकारामाचा जन्मशक या बाकीच्यांपैकीं होय. तो मुक्रर करण्यापुरते दुसरे दोन शक गृहीत धरले पाहिजेत; त्यांचा पुढें अधिक ऊहापोह केला आहे. त्यांतील एक तुकारामाच्या निर्याणाचा. फाल्गुन वद्य पंचमी, शके १५७१, हीच निर्याणमिति बहुमान्य आहे; व वादाचा प्रांत कितीही ऐसपैस पसरला तरी निर्याणशक १५७० ते १५७२ या दोन मर्यादांपलीकडे जाऊं शकत नाहीं. दुसरा शक दुष्काळाचा. दुष्काळ हा तुकारामाच्या जीवनांतील परिवर्तनाचा काळ होता याविषयीं कोणालाच संदेह नाहीं. हा दुष्काळ म्हणजे महाराष्ट्रांतील कोरड्या भागाच्या राशीला लागलेलें एखादें सामान्य अवर्षण नसून शके १५५१–५३, इ. स. १६२९-१६३१ सालचा इतिहासप्रसिद्ध दुष्काळ होता हें पुढें आधारानिशीं दाखविलें आहे.[1] निर्याणसमयीं व दुष्काळसमयीं तुकारामाचें वय काय होतें हें जर निश्चित ठरवितां येईल तर त्याचा जन्मशक अनायासेंच सिद्ध होईल. निदान, जे चार जन्मशक आतांपर्यंत पुढें मांडण्यांत आले आहेत त्यांची ग्राह्याग्राह्यता पारखून घेतां येईल. ते चार जन्मशक येणेंप्रमाणें :—(१) १४९० :—हा शक राजवाड्यांस करजखोप येथें सांपडलेल्या वंशावळींत दिला आहे. (२) १५१० :—ह्या ‘कविचरित्रां’त जनार्दन रामचंद्रजी यांनीं दिला आहे.[2] (३) देहू व पंढरपूर येथील तुकारामाच्या वंशावळींत जन्मशक मिति १५२० माघ शुद्ध ५ गुरुवार अशी दिली आहे. “भारद्वाज” यांनीं या मितीचा पुरस्कार केला होता.[3] (४) महिपतीच्या आधारें ठरविलेला शक १५३०. पंडितांच्या गाथेच्या मूळ आवृत्तीस जोडलेल्या चरित्रांत हाच शक खरा मानला आहे; व पांगारकरांनीं हाच स्वीकारिला आहे.

---

१ प्रकरण नववें पहा.

२ हिंदुस्थानकथारसांत (द्वितीय आवृत्ति, १८८१) विनायक कोंडदेव ओक यांनीं जन्माचें वर्ष इ.स. १५८८ (= शके १५१०) व निर्याणाचें वर्ष इ.स. १६२८ दिलें आहे. नवनीताच्या दुसऱ्या (१८५८) आवृत्तींत भास्कर दामोदर पाळंदे यांनीं हींच वर्षें दिलीं आहेत. दोघांनींही आधार दिलेले नाहींत. निर्याणाचें वर्ष निखालस चूक आहे.

३ सुधारक, २१ ऑगस्ट १९०५. पहा—महाराष्ट्रवेदग्रंथमाला, तुकाराम, गो. गो. टिपनीस.

या प्रत्येक शकाच्या अनुसारें निर्याणकाळीं तुकारामाचें वय अनुक्रमें ८०–८२, ६०–६२, ५०–५२ किंवा ४०–४२ होतें असें म्हणावें लागेल. निर्याणकाळच्या परिस्थितीवरून तेव्हां तुकारामाचें वय अदमासें काय होतें याचा कयास बांधतां येतो. तें वय दर्शविणाऱ्या ज्या ठळक गोष्टींची निर्विवाद माहिती उपलब्ध आहे त्या आधीं नीट ध्यानांत घेतल्या पाहिजेत. त्यांतील पहिली व मुख्य ही कीं तुकारामाची पत्नी जिजाबाई ही तेव्हां पांच महिन्यांची गरोदर होती. तुकारामाला दुष्काळापूर्वी दोन बायका होत्या ; व त्याच्या व जिजाबाईच्या वयांत दहा वर्षांपेक्षां अधिक अंतर असणें असंभवनीय होतें असें आपणांस पुढें दिसेल. निर्याणकाळीं तुकारामाचीं मुलें "बाळें" "लेंकरें" होतीं असें कान्होबाच्या विलापांतील वचनांवरून दिसतें. तुकारामाला उद्देशून कान्होबा म्हणतोः– "॥ ध्रु. ॥ ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें टाकोनियां वनामाजी ॥ छ ॥ आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ॥ २ ॥";[1] व पुढें तो देवाला दोष देतो कीं :–"॥ ध्रु. ॥ माझें बुडविलें घर । लेंकरें बाळें दारोदार । लाविलीं काहार । तारातीर करोनि ॥ छ ॥."[2] तसेंच, भावाशीं सख्यत्वानें वागण्याइतकें तुकारामाचें वय होतें असें "सख्यत्वासी गेलों करीत सलगी" या कान्होबाच्या उक्तीवरून म्हणतां येईल.[3] "जोडा माझा विखंडिला," "नांदतें विध्वंसिलें घर," "माझें नेलें पांघरुण," हीं[4] कान्होबाचीं वचनें असें सुचवितात कीं तुकाराम आयुष्याच्या प्रौढावस्थेंत होता. कान्होबाच्या आणि तुकारामाच्या वयांत दोन-चार वर्षांपेक्षां अधिक अंतर नसावें; महिपतीच्या वर्णनावरून कान्होबा हा तुकारामाच्या पाठीवरचा होता. रामेश्वरभट शके १५७८ त निधन पावले त्या प्रसंगीं कान्होबास त्यांनीं बोलवून घेतलें होतें हेंही या स्थळीं नमूद केलें पाहिजे. निर्याणाऱ्या दहाच वर्षे पूर्वीं[5] बहिणाबाईनें तुकारामास देहूस प्रत्यक्ष पाहिलें होतें; पण त्या काळीं तो वृद्ध होता असें तिनें कोठेंच म्हटलें नाहीं. "वर्तूळ दोंद पोट, नेत्र नासिका नीट, देखिल्या दंत-पंक्ती, लघु आरक्त वोट" असें, स्वप्नांत घडलेल्या तुकारामाच्या दर्शनाचें वर्णन कचेश्वरानें केलें आहे.[6] निर्याणाच्या सुमारास कीर्तन करतांना तुकारामाला आपल्या बाळपणीं बघून झालेल्या संस्कारांच्या स्मृतीवरून कचेश्वरानें तें वर्णन केलें असावें; किंवा लोकास परिचित असलेल्या तुकारामाच्या रूपाचें तें रेखाचित्र असावें. कसेंही असो, तें वर्णन परिणत वयाचें नसून प्रौढ वयाचेंच आहे.

निर्याणकाळचें तुकारामाचें वय ठरविण्याला ज्यांची थोडीबहुत मदत होईल असे कांहीं उल्लेख तुकारामाच्या अभंगांत सांपडतात. नाटाचे अभंग या प्रकरणांत आत्मावमाननेचे अनेक उद्गार आहेत. त्यांतील कांहींत आयुष्याच्या ढळत्या दिनाची

१ अभंग २९८८.
२ अभंग ३००६.
३ अभंग २९८९.
४ अभंग अनुक्रमें ३००४, ३००७, ३००३.
५ "बहिणाबाई व मंबाजी" हें प्रकरण पहा.
६ कचेश्वराच्या तुकारामावर आरत्या, भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३५, पृ. २५३.

नगर वाचनालय सातारा
संशोधित

आगामी संध्याछाया पडलेली दिसते. "मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें । नेणें आयुष्य जालें उणें । पुढील पेणें अंतरलें ॥ २ ॥ आतां मज वाटतसे भय । दिवसें-दिवस चालत जाय । येथें म्या येउनि केलें काय । नाहीं तुझे पाय आठविले ॥ ३ ॥" या उद्गारांवरून[१] आयुष्याचे दिवस डोळ्यांदेखत जात चालले ही जाणीव तीव्रतेनें जाचण्याचें तें वय होतें असें दिसतें. हें वय थेट वृद्धापकाळाचें नसून, अजून देवाच्या भक्तीस अर्पण करण्यास उर्वरित काळ पुढें होता इतक्या पोक्तपणाचें असलें पाहिजे. ह्या अनुमानास याच प्रकरणांत आलेल्या दुसऱ्या एका अभंगानें पुष्टि मिळते. तें वचन येणेंप्रमाणें[२]:—"बरें जालें आजिवरी । नाहीं पडिलों मृत्याचे आहारीं । वांचोन आलों एथवरी । उरलें तें हरी तुह्मां समर्पण ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ दिला या काळें अवकाश । नाहीं पावलें आयुष्य नाश । कार्या कारण उरलें शेष । गेलें तें भूस जावों परतें ॥ छ ॥."[३] शिवाजीस पाठविलेल्या पत्रांतील म्हणून जो एक अभंग मानतात त्यांत "वेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले" असें एक वाक्य आहे. हा अभंग[४] आणि त्याच्या जोडीचे इतर चार हे तुकारामाचे नाहींत हें पुढें आपणांस कळेल.[४] आणखी एक उल्लेख खालील अभंगांत मिळतो[५]:—"जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ आतां माझ्या मना होईं सावधान । ॐ पुण्याची जाण कार्यसिद्धि ॥ छ ॥ शेवटील घडी बुडतां न लगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥ २ ॥ तुका ह्मणे चिंतीं कुळींची देवता । वाराव्या भोंवता शब्द मिथ्या ॥ ३ ॥." पहिल्या चरणाच्या अर्थाची चिकित्सा करण्यापूर्वी अभंगाचा समग्र अर्थ समजून घेतला पाहिजे. हें एक लग्नाच्या घटिकेवरील रूपक आहे; पुढच्याच (२६८७) अभंगांतील पहिल्या दोन ओळींवरून हें आणखी सुस्पष्ट होतें. ॐ पुण्याहम् असें ब्राह्मणांकडून वदवून ज्या पवित्र कार्याचें पुण्याहवाचन केलें त्याच्या समाप्तीची, सिद्धीची, घटिका जवळ आली. त्या कार्याची सिद्धि म्हणजेच परमेश्वराशीं मीलन "सावधान" म्हणावयाची वेळ आली आहे; आतां पुढें पाणिग्रहणाचा मंगल क्षण येईल तो साधला पाहिजे. हेच विचार निर्याणाच्या अभंगांत[६] खालील भाषेंत सांगितले आहेत "॥ ध्रु. ॥ सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥ छ ॥ जोंवरि ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥ २ ॥ मंगळाचे वेळे

१ अभंग ६१७.

२ अभंग ६४०.

३ नाटाचे अभंग या प्रकरणांतील ६३१ हा अभंग वरील विवेचनास पोषक आहे. त्याच प्रकरणांतील दुसरें एक वचन म्हणजे "बालपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा । वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरीं ॥" (अभंग ६२८). हें स्वतःच्या वृद्धापकाळाला उद्देशून नसून, एकंदर अभंगांतील मांडणीवरून सर्वसाधारण अनुभवावर आधारलेलें आहे. त्याचप्रमाणें "काळें पुरविली पाठी । वरुषें जालीं तरी साठी ।" हा २०३७ अभंगांतील उल्लेख आत्मचरित्रपर नाहीं.

४ अभंग १८८९. "शिवाजीचा अव्हेर" हें प्रकरण पहा.

५ अभंग २६८६.

६ अभंग १६०२ व १६०३.

उभे। असों शोभे सावध ॥ ३ ॥" "आतां मज जाणें प्राणेश्वरासवें। माझिया भावें अनुसरलों ॥ ३ ॥ ......धर्म अर्थ काम जाला एके ठायीं। मेळविला जिहीं हाता हात ॥ ९ ॥." काया ब्रह्मीभूत करावयाचा म्हणजेच निर्याणाचा समय आतां जवळ आला, एवढेंच "जरा कर्णमूळीं" इत्यादि अभंगानें तुकारामास सुचवावयाचें होतें; वार्धक्यानें जर्जर झालेल्या देहाचा अंतकाळ पातला हें सांगण्याचा त्याचा हेतु नव्हता. या आशयाच्या अनुरोधानें पहिल्या चरणाचा अर्थ लावला पाहिजे; व तो तसा लावतांना ज्या संस्कृत वचनांवरून ही भाषा सुचली तीं वचनें व "कर्णमूळीं" या शब्दप्रयोगांतील "मूळ" ह्या शब्दाची अर्थच्छटा यांचा विशेष विचार केला पाहिजे. संस्कृत वचनांसाठीं कथासरित्सागरापर्यंत[1] जाण्याची जरूरी नाहीं. परधन आणि परकांता यांच्या अभिलाषानें चित्त विटाळूं देऊं नये ही ज्याच्या शिकवणीची भूमिका होती त्या वैष्णवभक्ताच्या कर्णपथावर हें सुभाषित पुष्कळदां आलें असलें पाहिजे कीं :—"कृतांतस्य दूती जरा कर्णमूले समागत्य वक्तीति लोकाः शृणुध्वम्। परस्त्रीपरद्रव्यवांछां त्यजध्वं भजध्वं रमानाथपादारविंदम् ॥." जरेनें कर्णमूलाशीं लागून कुजबुज करावी ही कल्पना रघुवंशासारख्या लोकप्रिय महाकाव्यांत देखील आली असून[2] तुकारामाच्या कानापर्यंत पोंचणें अशक्य नव्हतें. केंस पिकतात ते प्रथम कानांच्या मूळाशीं, या नित्याच्या अनुभवावर ही कल्पना रंगली आहे. कानांच्या मूळाशीं केस चाळीस ते पन्नासच्या दरम्यान पांढरे होऊं लागतात हें सर्वांच्या अवलोकनांत आहे; आणि पांगारकर सांगतात त्याप्रमाणें[3] "सांगों आली गोष्टी" यावरून केंस पांढरे होण्याचा हा आरंभच दिसतो. यावरून असें दिसतें कीं आपला निर्याणकाळ समीप येत चालला अशी जेव्हां तुकारामाची भावना झाली तेव्हां त्याच्या वयाची नुकतीच चाळिशी उलटली असावी. मागच्या परिच्छेदांत वर्णिलेली इतर परिस्थिति त्याच प्रौढ वयाची द्योतक आहे. जरेच्या शिशिराची झुळुक लागण्यापूर्वींच्या उत्साहाच्या उष्णतेचा तो काळ होता.

चाळीस-बेचाळिसाच्या ऐन उमेदींत तुकारामाचें निर्याण झालें नसून निर्याणसमयीं तो ८१ वर्षांचा "जख्ख म्हातारा" झाला होता हें आपलें मत राजवाड्यांनीं[4] त्याना सांपडलेल्या वंशावळींतील "जन्म सके १४९०" या टिपणावर आधारिलें होतें. ही वंशावळ

---

१ "अथ तस्य जरां प्रशान्तिदूतीमुपयातां क्षितिपस्य कर्णमूलम्। सहसैव विलोक्य जातकोपा बत दूरे विषयस्पृहा बभूव ॥" कथासरित्सागर, द्वितीय लम्बक, द्वितीय तरंग, श्लोक २१६. पांगारकरांनीं श्रीतुकारामचरित्र, पृ. २६ वर हा श्लोक दिला आहे.

२ तं कर्णमूलमागत्य रामे श्रीर्न्यस्यतामिति। कैकेयीशङ्कयेवाह पलितच्छद्मना जरा ॥—रघुवंश, द्वादश सर्ग, श्लोक २.

३ पांगारकर, श्रीतुकारामचरित्र, पृ. २६.

४ या व पुढील चार परिच्छेदांत दिलेलीं वि. का. राजवाडे यांचीं अवतरणें "संकीर्णलेखसंग्रह" पुस्तकांत छापलेल्या त्यांच्या 'तुकाराम' व 'तुकोब्बाराय देहूकर' या ग्रंथमालेंतील दोन लेखांतून घेतलीं आहेत. गद्रे यांचीं अवतरणें "साधुकविश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या चरित्राची कालव्याप्ति", विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९२०, पृ. १०५-१०६ या लेखांतून घेतलीं आहेत.

वाई प्रांतीं करजखोप मुक्कामीं तपास करीत असतां, एका पंढरीच्या वारकऱ्याच्या जवळील ज्ञानेश्वरीच्या पोथींत राजवाड्यांना सांपडली, व हा वारकरी पंढरींत जो तुकारामाचा वंश आहे त्यांचा शिष्य आहे असें राजवाड्यांनीं नमूदही करून ठेविलें आहे हें मागेंच सांगितलें आहे. आज ही मूळ वंशावळ[१] पाहावयास मिळत नाहीं; पण ती पोथी व तिच्या "मलपृष्ठावरील" वंशावळी व १४९० हा शकांक आपण प्रत्यक्ष पाहिल्याविषयीं नारायण कृष्ण गद्रे यांनीं दिलेल्या ग्वाहीचाही मागें उल्लेख आलाच आहे. आधीं असा प्रश्न उद्भवतो कीं ही वंशावळ कितपत विश्वसनीय आहे? ती किती जुनी होती अगर जुनी दिसत होती यासंबंधीं राजवाडे किंवा गद्रे यांनीं कांहींच माहिती दिली नाहीं. पोथीच्या लेखकानें लेखनकाल दिला होता कीं कसें, त्याच्याच हस्ताक्षरांत वंशावळ होती कीं काय, याची माहिती सहज देतां आली असती. गद्रे म्हणतात कीं "पोथी लिहून शेंकड्यावर वर्षें निःसंशय झालीं आहेत." पण तुकारामाची शाखा पंढरपुरास गेल्यास शेंकड्यावर वर्षें खचित झालीं नाहींत. ही शाखा पेशवाईच्या उत्तरकाळांत, म्हणजे तुकारामाच्या निर्याणानंतर शंभरदीडशें वर्षांनीं पंढरपुरास गेली असें समजतें[२]; वंशावळीचा लेखक कोण होता यावरूनच ती पोथीइतकी तरी जुनी होती कीं नाहीं हें ठरवितां येईल. ती वंशावळ नारायणबोवाच्या निधनानंतर म्हणजे १६४५ शकेनंतर लिहिली गेली असली पाहिजे हें उघड आहे; म्हणजे तुकारामाच्या नियाणानंतर कमीतकमी पाउणशें ते शंभर वर्षांनंतरचीच ती असली पाहिजे. खुद्द वारकऱ्यानेंच लिहून ठेविली असेल तर ती अर्थात् अगदीं आधुनिक असली पाहिजे. तुकारामाचा पंढरपुरास जो वंश आहे त्यांचा तो वारकरी शिष्य होता असें राजवाडे म्हणतात; तर गद्रे असें सांगतात कीं पोथी "पंढरपुराकडील तुकारामशिष्यशाखेंतीलच आहे." वंशावळींतील माहिती लेखकानें कुठून तरी मिळविली असली पाहिजे, कारण नऊ पिढ्यांतील मुलांमुलींची, स्त्री-पुरुषांची माहिती स्वकपोलकल्पित असणें अशक्य आहे. ही वंशावळ महिपतीची नुसती नक्कल नाहीं; कारण महिपतीनें, इतकेंच नव्हे तर अन्यत्र कोठेंही, न दिलेलीं नांवेंच तींत विपुल आहेत. मात्र शक-मित्या काय त्या दोघांच्याच दिल्या आहेत. तुकारामाची "जन्म सके १४९०, समाप्ति सके १५७१" अशी, व नारायणबोवाची "जन्म १५७२, समाप्ति सके १६४५ श्रावण शुद्ध ४" अशी. ज्या शाखेचा वारकरी शिष्य होता त्या शाखेपर्यंत ही वंशावळ आणलेली दिसत नाहीं. विश्वंभरापासून तुकारामापर्यंत मुख्य शाखेशिवाय इतरांची जी माहिती वंशावळींत दिली आहे ती पडताळून पाहण्यास मार्ग नाहीं. मुख्य शाखेंत सुद्धां महिपतीनें रूढ केलेल्या माहितींत कांहीं फेरफार आढळतात. महिपतीप्रमाणें मुकुंद हा विश्वंभराचा धाकटा मुलगा होता, तर वंशावळींत तो ज्येष्ठ दाखविला आहे. तुकारामाच्या पणजाचें सोमाजी व आजाचें रंगनाथ अशीं नांवें वंशावळींत दिलीं आहेत. "शंकराचेंच सोम हें नांव पर्याय असून, कान्हा कृष्ण ह्याचेंच रंगनाथ हें पर्याय होय ही गोष्ट विचारवंत सुज्ञांस सहज पटण्यासारखी

१ परिशिष्ट पहा.

२ तुकाराममहाराजांच्या अभंगांची सांप्रदायिक ओळीची गाथा. (केमकर आणि मंडळी) १९५०. श्री. प्रियोळकर यांचा पुरस्कार, पृ. १०.

आहे" असें गद्र्यांस वाटतें. यावर एवढेंच म्हणतां येईल कीं वंशावळी म्हणजे कांहीं पर्यायवाचक शब्दांचा अमरकोश नव्हे. कान्हा याचें नाशकाच्या वहींत खापरपणतवानें काळांतरानें काळा असें सहज होणारें रूपांतर केलेलें आपण पाहिलें आहे. परंतु त्याचें रंगनाथ हें रूप सहज रंगणारें नाहीं! या वंशावळींत दोन उघड दिसणाऱ्या उणीवा आहेत. तुकारामाच्या थोरल्या भावाचें, सावजीचें व काशी या मुलीचें नांव तींत सांपडत नाहीं. धाकट्या भावाचें 'कान्हा' हें नांव अभंगांत अनेकवार आलें असतां तें 'कोनोबा' असें दिलें आहे. अशा परिस्थितींत ही वंशावळ जुन्या विश्वसनीय माहितीवरून तयार केली आहे व म्हणून ती प्रमाणभूत मानिली पाहिजे, असें म्हणतां येत नाहीं. विशेषतः तुकारामाचा जो जन्मशक तींत दिला आहे त्याला इतरत्र कोठेंच आधार मिळत नसल्यानें व त्याचा उगमही सांपडत नसल्यानें त्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं.

या जन्मशकानें तुकारामाचा गुरु जो बाबाजी त्याच्या समाधिकालाचा व त्यानें तुकारामाला दिलेल्या उपदेशाच्या कालाचा यथास्थित जम बसला असें राजवाड्यांस वाटलें; व या प्रमाणाकरितां निबंधमालेच्या चौसष्टाव्या अंकांत छापलेल्या एका अभंगाचा त्यांनीं आधार घेतला. तो अभंग महिपतीच्या नांवावर मोडतो. बाबाजी चैतन्य योगिराज शालिवाहन शके १४९३ त समाधिस्थ झाले, व तेथून तीस वर्षांनीं ते तुकारामास भेटून त्यांनीं त्यास पूर्णपण दिलें असें त्या अभंगांत वर्णन आहे. त्या अभंगाची विशेष चर्चा पुढें गुरूपदेशाच्या प्रकरणांत केली आहे. तीवरून असें दिसेल कीं तो अभंग महिपतीचा असणें शक्य नाहीं; व दुष्काळाचा काळ वर सांगितल्याप्रमाणें गृहीत धरला असतां गुरूपदेश शके १५६१ च्या पूर्वी होणेंही शक्य नाहीं. शके १४९० हा तुकारामाचा जन्मशक कल्पिल्यास गुरूपदेशाचें कोडें सुटण्याऐवजीं अधिकच बिकट होतें.

१४९० जन्मशकाच्या साध्या दिसणाऱ्या पण राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें "मोठ्या उपद्व्यापी" कोड्यानें दुसरीं अनेक कोडीं उद्भवतात. त्यांतील सर्वांत असाध्य हें कीं तुकाराम ७० ते ८१ वर्षांचा व जिजाबाई ६० ते ७० वर्षांची असतांना इतक्या वार्धक्यांत त्यांना मुलें कशीं व्हावींत. राजवाड्यांना या अडचणीची आरंभापासून कल्पना होती. म्हणून १४९० या जन्मशकाचें संशोधन जाहीर करणाऱ्या लेखाच्या शेवटीं त्यांनीं असें लिहिलें कीं "तुकारामाची बायको त्याच्या ८१ व्या वर्षी गरोदर राहिली. त्यावेळीं तीहि सुमारें पाऊणशें वर्षांची असावी. ह्यावरून एवढेंच म्हणणें प्राप्त होतें कीं, ह्या नवराबायकोची शरीराची काठी उत्तर वयांतहि कणखर होती. प्रसिद्ध जर्मन कवी गेटी ह्यानें साठीच्यापुढें लग्न केलें, व पंधरा वीस वर्षें मरेपर्यंत संसार केला. तोच प्रकार तुकारामाचाहि होता." पुढें जेव्हां प्र. रा. भांडारकरांनीं असें निदर्शनास आणलें[१] कीं ८१ वर्षांच्या म्हाताऱ्याला व निदान ७० वर्षांच्या म्हातारीला मुलें होणें शक्य नाहीं, तेव्हां राजवाड्यांनीं दुसरे दोन दाखले दाखविले. एक निजामुन्मुलुखाचा. राजवाड्यांनीं

१ साधुवर्य तुकाराम यांचें निधन. प्र. रा. भांडारकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ३५, अंक ५, मे १९०४, पृ. ११७.

अनुमानानें असा हिशेब केला कीं निजामअल्ली हा निजामुन्मुल्खाला त्याच्या ७९-८० व्या वर्षी झाला असावा. राजवाडे म्हणतात :–"ह्यावरून एवढें सिद्ध होतें कीं, कित्येक पुरुषांना ऐंशीच्या सुमारास संतति होते. आतां, आधीं ऐंशीं वर्षे जगणारे पुरुष विरळा असतात. ही बाब लक्षांत घेतली तर संतति होणारे पुरुष त्याहून विरळा असणार हें उघड आहे. असल्याच विरळा पुरुषांपैकीं तुकाराम होता, असें माझें म्हणणें आहे." दुसरा दाखला तर याहूनही अद्भुत होता; व त्याचें संशोधन राजवाड्यांच्याच उद्बोधक शब्दांत सांगणें योग्य होईल. "आतां, सत्तर वर्षांच्या स्त्रीचें एखादें ऐतिहासिक उदाहरण मिळतें कीं काय, तें पाहूं. प्रसिद्ध गुरुचरित्र ह्या चरित्रग्रंथांत, विटाळ जाऊन पांचपंचवीस वर्षे लोटलेल्या एका वृद्ध स्त्रीला संतति झाल्याचें लिहिलें आहे. विटाळ जाण्याची सामान्य मर्यादा जर पन्नाशीची धरली, तर, ती गुरुचरित्रांतील बाई प्रसूतिसमयीं ७०-७५ वर्षांची असावी. पाऊणशें वर्षांच्या म्हातारीला मूल विरळा होतें, हे खरें; परंतु होतें, असें म्हणण्याला हा एक आधार आहे." महिपतीचीं चरित्रें ज्या ऐतिहासिक किंमतीची आहेत, त्याच ऐतिहासिक किंमतीचें गुरुचरित्र आहे, असें आपलें मत सांगून, त्याचा कर्ता जो गंगाधरसरस्वती तो परमभगवद्भक्त असून लोकांना फसविण्यांत त्याचा कांहीं एक मतलब साधावयाचा नव्हता, कारण तो पूर्ण विरक्त पुरुष होता असें प्रतिपादून राजवाडे म्हणतात :—"तेव्हां पाऊणशाव्या वर्षी पोर झालेल्या ह्या गुरुचरित्रांतील म्हातारीच्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां अशा बाया अत्यंत विरळा असतात, हें स्पष्टच आहे. नाहीं तर श्रीपादस्वामीच्या कृपेचें कांहींएक कारण नव्हतें. ह्या शेवटल्या वाक्यावर कोणी अशी शंका घेईल कीं, योगिजनांच्या कृपेनें जी गोष्ट झाली ती इतिहासांत जमेस धरूं नये. परंतु, गोष्ट जर साक्षात् घडली असली, तर ती जमेस धरली पाहिजे, मग ती वाटेल त्या कारणानें होवो. सांगण्याचें तात्पर्य काय कीं, कधीं कधीं ७०-७५ वर्षांच्या वयांत स्त्रियांना क्वचित् संतति होते, ह्या विरळा अपवादात्मक बायांपैकींच तुकारामाची स्त्री होती."

या येथूनतेथून विरळा वातावरणांत विवेकाचा तग लागणें कठीण! तथापि केवळ राजवाडे वादी आहेत म्हणूनच त्यांनीं उपस्थित केलेल्या या मुद्द्यांचा निवाडा देण्याचा मोह होतो; वास्तविक राजवाडेकृत मंडन हेंच त्यांचें पुरेसें खंडन आहे. गटेनें विवाहाचें बंधन कोणत्या वर्षी स्वीकारिलें हें सांगण्यापेक्षां जी त्याची पुढें धर्मपत्नी झाली तिच्याशीं त्याचा संबंध केव्हां सुरू झाला व तिला पुत्रप्राप्ति कोणत्या वर्षी झाली हें सांगणें वादाच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें होतें. त्या बाबतींतील सत्य हें कीं, गटेच्या चाळिसाव्या वर्षी व पत्नीच्या ऐन तारुण्याच्या नवतींत तो पुत्र झाला होता व साठी उलटून गेल्यावर गटेला या सहचारिणीपासून संतति झाल्याचा उल्लेख त्याच्या चरित्रांत सांपडत नाहीं![१] निजामअल्लीच्या वयाचें राजवाड्यांनीं केलेलें गणित जरी बिनचूक मानिलें तरी निजामअल्लीच्या आईचें प्रसूतिसमयीं वय काय होतें हें बीजगणित जननाचें कोडें सोडविण्याला जास्त उपयुक्त ठरलें असतें. आणि गुरुचरित्रांतील आख्यायिकेला इतिहास

१ पहा—Life and Works of Goethe. G. A. Lewes, Everyman's Library. p. 327. Goethe, Emil Ludwig, Vol. III, p. 115.

करून टाकण्याची सिद्धि इतिहासाचार्यांनाच जुळेल! गुरुचरित्रांत त्या वंध्येचें वय ६० वर्षांचें सांगितलें असतां इतिहासाच्या रूपांतराकरितां तें साहजिकच ७०-७५ वर्षांचें करावें लागलें! असो; या वंध्यापुत्र आख्यानाविषयीं चिकित्सकाला मौन हेंच व्याख्यान पुरेसें वाटेल!

ह्या सर्व ऐतिहासिक ज्ञानाची विज्ञानाशीं संगति घातली पाहिजे हें राजवाड्यांनींही जाणलें होतें; कारण शेवटीं त्यांनीं हें कबूल केलें कीं, वस्तुत: पहातां ह्या बाबीचा निकाल करण्याचें काम आपलें नसून वैद्यकाच्या इतिहासज्ञाचें आहे. वैद्यकशास्त्राच्या दृष्टीनें ८० वर्षांच्या वृद्ध पुरुषाला ७०-७५ वर्षांच्या पत्नीपासून मूल होणें संभाव्य आहे किंवा नाहीं इतकाच काय तो तुकारामचरित्रांतील कूटप्रश्न नाहीं. तुकारामाच्या निर्याणकाळीं जिजाबाई सुमारें पाउणशें वर्षांची असावी हें राजवाड्यांस मान्य आहे. त्या काळीं तिचीं सर्व मुलें लेंकुरेंबाळें होतीं; म्हणजे तुकारामाच्या ७० ते ८० वर्षांच्या उमरींत व जिजाबाईच्या ६५ ते ७५ वर्षांच्या दरम्यान सर्व मुलें झालीं असें म्हणावें लागतें; आणि तशांत जिजाबाईशीं तुकारामाचें लग्न चवदाव्या वर्षी झालें असें खुद्द राजवाडेच मानतात. म्हणजे ५० वर्षांच्या वैवाहिक जीवनांत मूल न होतां त्यानंतर आईची साठी व बापाची सत्तरी उलटल्यानंतर लागोपाठ सहा मुलें व्हावी याला वैद्यकाच्या इतिहासांत विरळा देखील दाखला खचित मिळणार नाहीं! या वादांतील राजवाड्यांचे जोडीदार व त्यांचे कट्टे पुरस्कर्ते नारायण कृष्ण गद्रे यांना ही शास्त्रीय अडचण फारच जाणवली; व नाइलाजानें त्यांनीं, चांचरत कां होईना, कबूल केलें कीं, "शकाब्द १४९० हा जन्मशक धरिल्यास तुकोबाचें मरणसमयींचें वय ८१ वर्षांचें येतें. तें जरी असंभाव्य किंवा अश्रद्धेय दिसत नाहीं तरी त्यामागील १५-२० वर्षांतीलच त्यांची सर्व संतति मानावी लागते. म्हणजे तुकोबांच्या वयाच्या ६०-६५ पासून द्वितीय संबंधाच्या कुटुंबाकडून त्यांना संतति व्हावयास लागली, व ती मरणसमयींच्या ८१ व्या वर्षीहि होऊं शकली. ही गोष्ट बरीचशी अश्रद्धेय खरी!" या प्रकार विज्ञानानें श्रद्धा ढांसळल्यामुळें गद्र्यांनीं १४९० शकाचा पुरस्कार टाकून शेवटीं १५१० हा शक निश्चित मानला.

१४९० शकाच्या पुष्ट्यर्थ दुसरें एक प्रमाण दिलें जातें. त्यांत दंतकथा व सत्यकथा यांचा घोटाळा झालेला दिसतो. दंतकथा महिपतीनें सांगितली आहे; तिचा गोषवारा त्याच्याच शब्दांत दिलेला बरा.[१] उदकांत वह्या कोरड्या राहिल्या या चमत्कारानंतर लोहगांवचे लोक बहुत प्रयत्नें तुकारामास आपल्या गांवास घेऊन गेले. लोहगांवांत तुकारामाचीं घरोघरीं कीर्तनें झालीं. "गांवांत भाविक जाहले सकळ। परी एक शिवजी कासार महाखळ। तो निंदक कुटिल कृपण केवळ। याहीवरी दुर्बळ संसारीं॥ तुका सांगतसे सकळ जनां। शिवजीस कीर्तनीं बोलावूनि आणा। परी तो सर्वथा नयेचि जाणा। अपशब्द हेळणा करीतसे॥." पुढें ब्रह्मस्व वारण्याकरितां एक ब्राह्मण ज्ञानेश्वराच्या दृष्टांतावरून लोहगांवास तुकारामाकडे आला असतां शिवजी कासाराकडून भीड खर्चून कांहींतरी आणा

१ भक्तलीलामृत, अध्याय ३६, ओव्या ५३-९०.

असें लोकांस तुकारामानें सांगितलें. शिवजीनें परम बळात्कारें दोन ढबू पैसे दिले. त्यांचें तुकारामानें खडा घासून सोनें केलें. धरणेकरी ब्राह्मण परत गेला, व "तुकयानें खडा उचलोनि सत्वरी। बारवे माझारी टाकिला।." तेव्हांपासून तुकारामाजवळ परीस आहे या समजुतीनें शिवजी कासार त्याच्या भक्तीस लागला. "म्हणे याचे सेवेसि लागोनि तत्त्वतां। दरिद्र विच्छिन्न करावें आतां। यास्तव ऐके कथावार्ता। परी चित्तीं आस्था आणिकची ॥." एक वर्षभर त्यानें हरिकीर्तन ऐकिलें. "तों प्रसन्न जाहला रुक्मिणीरमण। तेंही कारण अवधारा ॥ कथील आणावया मुंबईतें । छत्तीस बैल धाडिले होते। गुमास्ते खेप भरोनि येत। तों रुपें समस्त तें झालें ॥ ज्याजपासीं खरीद केलें होतें। परतोनि बैल पाठविले तेथें। सावकार आपला हिशोब पाहत। ह्मणे आमुचें निश्चित हें नोहे ॥ तैसेच बैल भरिले पाहीं। परतोनि आणिले लोहगांवीं। शिवजीस आश्चर्य वाटलें जीवीं। मग तुकयासि लवलाहीं पुसतसे ॥ सद्गुरु ह्मणती तये क्षणीं। तुझ्या दैवें आलें घडोनी। तुज पावले चक्रपाणी। तरी सत्कारणीं लावीं कां ॥ बारव त्यानें बांधिली थोर। तिजला ह्मणती कांसारविहीर। अन्नदानें केलीं फार। दानें द्विजवर तोषविले ॥ तैंपासोनि तो कांसार। चित्तीं विरक्त जाहला फार। त्यजिलें घरदार आणि संसार। निरंतर तुकयापासीं ॥." त्यामुळें चिडून जाऊन शिवजी कासाराच्या बायकोनें कपटानें तुकारामाच्या अंगावर उकळतें पाणी ओतलें. महिपतीच्या या वृत्तांतावरून असें दिसतें कीं, लोहगांवाला पूर्वी एक बारव होती; शिवजी कासार प्रथम दरिद्री होता व नंतर दैवगतीनें त्याला धन मिळालें असतां त्यानें बारव थोर बांधिली, जिला महिपतीच्या काळींही कासारविहीर म्हणत असत. ही झाली दंतकथा.

सत्यकथेचा लेखच उपलब्ध आहे. पांगारकरांनीं स्वतः पुण्यानजीक येरवड्याच्या पलीकडे नऊ मैलांवर असलेल्या लोहगांवाला जाऊन चौकशी करून कासारविहिरीची व इतर माहिती प्रसिद्ध केली आहे. कासारविहिरीची माहिती त्यांच्या लेखांत[१] खालीलप्रमाणें दिली आहे :—"पुणवाडीच्या बाजूनें गांवांत शिरतांच कासारविहीर लागते. ती मोठी भव्य असून रमणीय आहे. तिचें पाणी आज पिण्यासारखें गांवकऱ्यांनीं ठेविलें नाहीं. पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या तीनही बाजूस तीन तीन कोनाडे असून ४०-५० ब्राह्मण संध्या करावयास बसतील अशी सुंदर चौफेर जागा विहिरींतच आहे. विहिरींत दक्षिणच्या बाजूस शिलालेख कोरला आहे. तो शके १५३४ मधील आहे. शिलालेखावर तागडीचें निशाण आहे. मुख्य मधला लेख सुवाच्य आहे. बाजूचीं कांहीं अक्षरें लागत नाहींत.

॥ श्रीगणेशायनमाप्रकाळीकायेन्म (फुटले)
श्रीशाळीवाहन शके १५३४ परीध"
वीशंवशरे कारतीक वदी तीज आत"
र तदीनी सीउजी व काळोजी पीता केशो
जी माता रंभाई वंश थीटे शोमवंशी
कासार कसभे लोहोगांव श्रीरस्तु :"

१ "तुकोबाचें लोहगांव कोणतें?" पांगारकर, भा. इ. सं. मं. तृतीय संमेलनवृत्त (शके १८३७), पृ. १४१.

या लेखांतील माहितीचा अवलंब करून अनुमानाचीं दोन टोकें गांठलीं गेलीं आहेत. एक अनुमान असें कीं, "वरील सारखें (विहिरीचें) काम करण्याचा उद्देश उत्पन्न होण्यास व तें पार पाडण्याची उमेद बाळगून पार पडलेलें पाहणारा गृहस्थ सहज ३०–३५ चा असलाच पाहिजे. म्हणजे सीउजीचें जनन शकाब्द १५०० च्या आसपासचें असलें पाहिजे, आणि तुकारामाचेंही त्याच्याच जवळच्या किंवा दहाबारा वर्षें आधींच्याही काळचें असण्याचा संभव विशेष बलवत्तर!"[१] दुसरें अनुमान असें कीं, कथिलाची चांदी झाल्यानें जो फायदा झाला तो शिवजीनें तुकारामाच्या आज्ञेनें कासारविहिरीकडे लाविला. विहीर शके १५३४ मध्यें बांधिली व तुकारामाचा जन्म १५३० शकांत झाला, अर्थात् "जो संबंध जोडला जातो तो कल्पित आहे हें सांगावयास नकोच." "शिलालेखावरून पाहतां शिवजी कासार इ. स. १६१२ त चांगला वयांत आलेला गृहस्थ असावा. म्हणजे तुकारामापेक्षां पुष्कळच वडील. त्याची बायको तुकाराम महाराज लोहगांवीं भजनास गेले असतील त्यावेळीं म्हातारीच असली पाहिजे. ती आपला नवरा रात्रीं एक महिनाभर भजनास गेला म्हणून मोझेच्या आवारांतील शिळेवर तुकारामाला उकळत्या पाण्यानें स्नान घालण्याइतकी भावनावश झाली असेल, हें नेहमीच्या हरदासी बाष्कळपणाच्या कोटींतील होय."[२]

चमत्काराचा इतिहासाशीं संबंध जोडला म्हणजे साहजिकच चमत्कारिक इतिहास बनावयाचा. तसेंच, इतिहासाच्या जाड कांचेतून चमत्कारावर प्रकाश पाडला कीं त्याचा सर्वस्वीं नाशच व्हावयाचा! महिपतीनें वर्णिलेल्या अगदीं सामान्य चमत्कारांतील शब्दानुशब्द ऐतिहासिक सत्य मानतां येणार नाहीं. कथिलाची चांदी झाली किंवा तांब्याचें सोनें झालें या चमत्काराला तुकारामाच्या अभंगांत परिस शब्द अनेकदां आला आहे, याखेरीज एखाद्या शब्दाचाही आधार मिळणार नाहीं. शिवजी कासाराशीं तुकारामाचा संबंध सुचविणारा एकच अभंग दाखवितां येईल. तोही सोन्याचांदीच्या भट्टींतला नसून, शिवजीच्या बायकोनें गरम होऊन तुकारामाच्या अंगावर कपटानें उकळतें पाणी ओतलें या प्रसंगाला अनुलक्षून आहे अशी परंपरा आहे. "लोहागांवीं स्वामींच्या अंगावर ऊन पाणी घातलें" तो अभंग असा :—"जळे माझी काया लागला वोणवा। धांव रे केशवा मायबापा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ पेटली सकळ कांति रोमावळी। नावरे हे होळी दहन जालें ॥ ध्रु ॥ फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे। पाहातोसी काय हृदय माझें ॥ २ ॥ घेऊनि जीवन धावें लवलाहीं। कवणाचें कांहीं न चले येथें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी तूं होसी जननी। आणीक निर्वाणीं कोण राखे ॥ ४ ॥." या[३] अभंगांतील वर्णनावरून व शब्दप्रयोगांवरून हा अनुभव जर शारीरिक संवेदनेचा असेल तर ती संवेदना कढत पाण्यानें पोळण्याची नसून आगीनें भाजण्याची आहे. शिवजी कासाराच्या बायकोनें घेतलेल्या तामसी सूडाच्या प्रसंगाचा हा अभंग आहे असें महिपतीप्रमाणें परंपरेनें मानिलें तरी शिवजी

१ साधु कविश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या चरित्राची कालव्याप्ति —गद्रे, पृ. ११३.

२ संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज. वा. सी. बेंद्रे, सह्याद्रि, मार्च १९५०, पृ. १२१.

३ अभंग १३१८.

कासाराविषयींची महिपतीनें दिलेली बाकीची माहिती सुमारें दीडशें वर्षांनंतरची आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. विहिरीवरील शिलालेख इतरांप्रमाणें महिपतीलाही अर्थातच उपलब्ध असला पाहिजे ; परंतु शिवजी कासार तुकारामाचा भक्त होता, कासारविहीर म्हणून प्रसिद्ध असलेली विहीर शिवजीनें बांधली किंवा आधीं होती ती बांधून थोर केली, त्याच्या बायकोनें तुकारामाचा छळ केला, व त्या प्रसंगीं तुकारामानें वरील अभंग रचिला, इतकी तात्पर्याची माहिती तारखांच्या मेळापेक्षां महिपतीला कथा रंगविण्यासाठीं पुरेशी होती. सत्याचा अंश इतकाच आहे. त्याच्या प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर अद्भुताच्या अभ्रांत इंद्रधनुष्याचे बाकी सारे रंग भरले आहेत ; म्हणून तर महिपतीचें चरित्र 'लीला'मृत आहे ; तें कांहीं इतिहासलवणांबु नाहीं ! त्या अमृतांतून लीलेचा अंश विवेकानें निवडला म्हणजे तुकारामाचा जन्मशक सहज लीलेनें १४९० शकाच्या आसपास नेण्यास वावच राहात नाहीं. तसेंच अभंगाच्या प्रसंगाची परंपराही लुप्त होत नाहीं. १६१२ इसवींत विहीर बांधणाऱ्या शिवजीची बायको १६४० च्या सुमारास म्हातारी होती असें निश्चित अनुमान निघत नाहीं ; तशांत संसाराचा लोभ म्हातारपणांतच अधिक सुटतो. आमच्या मतें शिलालेखाची या प्रकारें महिपतीच्या वृत्तांताशीं संगति घातलेली बरी. इतिहास व आख्यायिका यांचा मेळ घालण्यासाठीं पांगारकरांनीं केलेल्या प्रयत्नाचा खरा रोख त्याच दिशेनें आहे. पांगारकर म्हणतात[१] :—"विहिरीवरील लेखांत 'शीऊजी' असें नांव आहे खरें, पण हा शीऊजी म्हणजे तुकोबांचा शिष्य शिवबा, कां त्यांचा आजा कां दुसरा कोणी याचा निश्चयानें उलगडा करण्यास साधन नाहीं. मात्र एवढें निश्चित म्हणतां येतें कीं तुकोबांचा शिष्य व टाळकरी शिवबा कासार यानें तुकोबांच्या आज्ञेवरून ही विहीर जर बांधली असती तर त्या शिलालेखांत श्रीगणेश व श्रीकालिका यांना प्रथम जें नमन केलें आहे त्याऐवजीं किंवा त्याच्या मागेंपुढें 'श्रीपांडुरंगाय नमः' 'श्रीरुक्मिणीविठ्ठलाभ्यां नमः' असेंही नमन खास असतें ! तुकोबांचा शिष्य व वारकरी झाल्यावर तो गणेश व कालिका यांचें मात्र स्मरण करील व 'विठोबारखुमाई' यांना विसरेल हें शक्यच नाहीं. यावरून ही विहीर बांधणारा शिवबा एकतर तुकोबांचा शिष्य शिवबा कासार नाहीं, अगर तोच असला तरी विहीर बांधण्याच्या वेळीं तो तुकोबांचा शिष्य तरी खास नव्हता". पांगारकरांनीं आरंभीं म्हटल्याप्रमाणें महिपतीनें लोकप्रवादावरून लिहिलें असलें पाहिजे ; व विहीर बांधण्याच्या वेळीं शिवजी तुकारामाचा भक्त नव्हता हाच प्रकार वर सांगितल्याप्रमाणें खरा दिसतो. असेंही असण्याचा संभव आहे कीं शिलालेख शिवजी व त्याचा भाऊ यांनीं जेव्हां प्रथम मुळांत बारव बांधली त्यावेळचा आहे ; दुरुस्त करून थोर केली किंवा वाढविली त्यावेळचा नव्हे.

असो. १४९० या जन्मशकाची एवढी चर्चा पुरेशी आहे असें आम्हांस वाटतें ; विचारांत घेण्याजोग्या सर्व गोष्टींचा या चर्चेत अंतर्भाव झाला आहे. या शकाचा लेखी आधार विश्वसनीय नसून साधकबाधक सर्व प्रमाणांचा विचार करतां हा शक वस्तुस्थितीशीं सर्वथैव विसंगत असल्यामुळें त्याज्य आहे असाच समंजस माणसाचा अभिप्राय पडेल.

१ श्रीतुकारामचरित्र, पृ. २६-२७.

१५१० या जन्मशकाला लेखी आधार असा कोणींच दिलेला नाहीं. या शकाचे पुरस्कर्ते नारायण कृष्ण गद्रे यांचें या बाबतींत असें म्हणणें[1] आहे कीं :—"शकाब्द १५१० हा प्रथमच्या नवनीतावृत्तींत (शके १७७६) परशुरामपंततात्यांनीं दिलेला आहे. तो चांगला दोन पिढ्या मान्य होता. (शके १७८२) कविचरित्रकारांनीं आपण तो परशुरामपंतांच्या संशोधकत्वावर विश्वासूनच घेतला असल्याचें लिहिलें आहे. महिपतीचा ग्रंथ ह्यानंतर[2] प्रसिद्ध झाला—म्हणजे मुद्रित होऊन आधुनिकांच्या वाचनांत आला. तेव्हां तदभावीं परशुरामपंततात्यांनीं दिलेला शक निःसंशय देहू, पुणें येथीलच एखाद्या जुन्या लेखी आधारानेंच दिला असला पाहिजे असें म्हणण्यास बाध नाहीं." हा शुद्ध अनुमानाचा डोलारा आहे. नवनीताच्या पहिल्या आवृत्तींत परशुरामपंत गोडबोल्यांनीं तुकारामाचा जन्मशक दिला नाहीं. शक-कालासंबंधीं एवढेंच म्हटलें आहे कीं, "शिवाजीराजाचे कारकीर्दींत…तुकाराम म्हणून साधु होता…तो चाळीस वर्षांच्या वयांत हा लोक सोडून परलोकास गेला असें म्हणतात."[3] हें मत गद्र्यांच्या निर्णयाच्या विरुद्ध जातें. कविचरित्र हा ग्रंथ[4] "अनेक संस्कृत, प्राकृत व इंग्रेजी ग्रंथ यांच्या आधारानें" लिहिला असल्याचें जरी कविचरित्रकार जनार्दन रामचंद्रजी यांनीं आरंभींच जाहीर केलें आहे तरी १५१० हा तुकारामाचा जन्मशक परशुरामपंतांच्या संशोधकत्वावर विश्वासूनच आपण घेतला असें त्यांनीं ग्रंथांत नमूद केल्याचें आढळत नाहीं. गद्रेच स्वतः आधीं कबूल करतात कीं, कविचरित्रकार जो १५१० शकांक देतात तो कशाच्या आधारावर हें समजण्यास आज कांहींच मार्ग नाहीं.[5] परशुरामपंतांना देहू येथें कांहीं जुना लेख मिळाला असता तर त्याचा त्यांनीं किंवा इतर कोणींतरी कधींतरी उल्लेख खचित केला असता; उलट देहू येथील वंशावळींत १५२० हा शक दिला आहे असा संशोधकांचा वृत्तांत आहे. पुण्याला तुकारामाच्या जन्मशकाचा लेखी आधार मिळण्याचा तादृश संभव नव्हता व तो तसा मिळाल्याचें कोणाच्या ऐकिवांतही नाहीं. एकंदरींत १५१० ह्या शकाला कांहींच लेखी आधार नसून तो केवळ अदमासानें रूढ झालेला दिसतो.

१५१० या जन्मशकांत थोडीबहुत ऐतिहासिक निश्चिति आणण्याकरितां त्या वर्षी (म्हणजे शकाब्द १५१० त) माघ शुक्ल पंचमीस गुरुवार आहे हें एक प्रमाण पुढें करण्यांत येतें. माघ शुक्ल पंचमी गुरुवार या तिथीचा मूळ आधार असा कीं, देहू व पंढरपूर येथील वंशावळींत तुकारामाचा जन्मशक १५२० माघ शुद्ध पंचमी गुरुवार असा दिला आहे. या वंशावळी माझ्या पाहण्यांत आल्या नाहींत. परंतु त्या पांगारकरांनीं पाहिल्या होत्या

१ साधुकविश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या चरित्राची कालव्याप्ति. ना. कृ. गद्रे, विविधज्ञानविस्तार, वर्ष ५१, अंक ९. सप्टेंबर १९२०, पृ. ११४.

२ हें बरोबर नाहीं. भक्तलीलामृत हा ग्रंथ प्रथम गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत शके १७६८ मध्यें प्रसिद्ध झाला होता.

३ नवनीत (१८५४). पृ. १.

४ कविचरित्र—जनार्दन रामचंद्रजी (१८६०) मुंबई. गणपत कृष्णाजीचा छापखाना.

५ गद्रे (पूर्वोल्लिखित लेख). पृ. ११३.

व पांगारकरांच्या या बाबतींतल्या अभिप्रायाला अद्यापि कोणीच हरकत घेतली नसल्यामुळें तो त्यांच्या शब्दांत समग्र उद्धृत केलेला बरा. "शक १५२० हा देहू व पंढरपूर येथील वंशावळींत दिला आहे, व या वंशावळी मी पाहिल्या आहेत. त्या शेंपन्नास वर्षांमागच्या नाहींत. त्यांना अधिक मागचा आधार असण्याचा संभव आहे पण तो उपलब्ध झाला नाहीं. या वंशावळींत 'माघ शुद्ध ५ गुरुवार' ही जन्मतिथ दिली आहे. पण १५२० च्या माघ शुद्ध पंचमीला गुरुवार ही जन्मतिथी येत नाहीं. देहू येथील तुकोबांचे वंशज रामभाऊ देहूकर यांजकडून तुकोबांचा 'जन्मकाळ १५२० माघ शुद्ध ५ गुरुवार' हा नगरचे "भारद्वाज" यांस कळून त्यांनीं (सुधारक २१ ऑगष्ट १९०५) याची चर्चा केली आहे. माघ शुद्ध ५ स गुरुवार येत नाहीं हें त्यांस कळून आलें, पण ते लिहितात, "जालनापूर प्रांतीं राहणारा एक वृद्ध वारकरी मला पैठणास भेटला, व त्यानें माघ वद्य ५ शके १५२० हा तुकोबाचा जन्मकाल मला सांगितला. माझे मतें हाच बरोबर आहे." पण भारद्वाज चुकले आहेत. माघ शुद्ध ५ स गुरुवार येत नाहीं, व वद्य ५ सही गुरुवार येत नाहीं. शके १५२० च्या माघ शुद्ध ५ स रविवार येतो, व माघ वद्य ५ स सोमवार येतो! दिवसाचा विचार सोडून नुसता शक १५२० मान्य करावा असें कोणी म्हणेल तर तो विचार स्वतंत्र आहे."[१] माघ शुक्ल पंचमी गुरुवार ह्या तिथि-वारांचे आधारच मुळीं असे डळमळित आहेत. ही तुकारामाची जन्मतिथि म्हणून परंपरेनें निर्याणतिथीप्रमाणें कोठेंच पाळली जात नाहीं. तेव्हां हे तिथि-वार गृहीत धरून १५१० या शकांत ते बसतात म्हणून तो शक ग्राह्य धरावा हा गद्र्यांचा आग्रह विचारवंतांस स्वीकारावासा वाटणार नाहीं.

१५१० हा जन्मशक इतर कारणांस्तव मानावा ह्या आपल्या आग्रहाकरितां गद्र्यांनीं जे मुद्दे मांडले आहेत ते १५२० या शकाला सारखेच लागू पडतात. त्यांचें निराकरण करण्यासाठीं आधीं त्यांचा गोषवारा दिला पाहिजे.[२] गद्र्यांना मुख्यत्वेंकरून असें प्रतिपादन करावयाचें होतें कीं, निर्याणसमयीं तुकारामाचें वय ४०-४२ वर्षांचें असणें शक्य नाहीं, व राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें तो तेव्हां जरी ८० वर्षांचा वृद्ध नसला तरी बराच पोक्त असावा. या प्रतिपादनास्तव त्यांनीं खालील विचारसरणीचा अवलंब केला आहे. ती शक्यतों त्यांच्याच शब्दांत येथें देतों. (१) महिपतीच्या वृत्तांतानुसार बोल्होबाला चाळिशी उलटल्यावरच मुलें झालीं. तीन मुलगे व एक मुलगी अशीं चार अपत्यें दोन-दोन वर्षांच्या पाळण्यानें झालीं असें मानिलें तरी शेवटच्या (मुलगीच्या) जन्मकालीं बोल्होबाचें वय फार तर ४८ वर्षांचें असेल. बोल्होबानें या सर्व मुलांचीं लग्नें संपादिलीं. मुलांचीं लग्नें त्यांच्या वयाच्या पंधरासोळा वर्षांच्या वयांत केलीं असें म्हटलें तरी पहिला मुलगा जो सावजी त्याच्या लग्नाच्या वेळीं बोल्होबा ५८ वर्षांचा असणार आणि तुकारामाच्या लग्नांत ६० वर्षांचा असणार. महिपतीनें वर्णन केल्याप्रमाणें घरांत नांदूं लागलेल्या तिन्ही सुनांसकट आपले तिन्हीं पुत्र आणि धनधान्यसंपत्ति व सफल होणारा वाढता उदीम ह्या स्थितीचा आतृप्ति अनुभव घेऊन केवळ वार्धक्य प्राप्त झाल्यावर बोल्होबानें आपल्या सुजाण अशा वडील सावजी नामक पुत्राला तूं संसारांत

१ श्रीतुकारामचरित्र. पृ. २०-२१.

२ गद्रे (पूर्वोल्लेखित लेख). पृ. १०९-११२.

मन घाल व देणेंमागणें सांभाळ असें सांगितलें. अर्थात् बोल्होबाचें वय त्यावेळीं पासष्टाच्या आसपासचें असण्यास कांहीं बाध नाहीं. तें त्याहून कमी मानावयाचें म्हणजेच न्यायाविरुद्ध होणार आहे. सावजी तेव्हां पंचविशीच्या घरांत तरी असावयास हवाच; अर्थात्, त्याच्या पाठच्या तुकारामाचें वयही विशी उलटलेलें निःसंशय मानणेंच आलें. तेव्हां महिपती म्हणतो त्याप्रमाणें तेराव्या वर्षींच बापाच्या वार्धक्यातिशयानें तुकारामाच्या खांद्यावर उदीमाचें जोखड पडलें हें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होय. "मी प्रपंचीं न गुंतें सर्वथा" इत्यादि संन्यासप्रवण विचार व भाषा विशीपुढील २२–२३ किंवा २५ हि वर्षांच्या वयाच्या सावजीच्या तोंडांत जशी शोभणें संभवनीय आहे, तशी ती १३+२=१५ वर्षांच्या वयाच्या सावजीच्या तोंडीं निभ्रांत शोभणार नाहीं. उलट, आणखी एका तऱ्हेनें ह्याचा विचार करून पाहिल्यासही अशीच अडचण उपस्थित होते. तुकारामाच्या वयास तेरा वर्षें असतांना सर्व मुलांचीं लग्नकार्यें उलगडून बोल्होबा मोकळा झाला होता असें मानावयाचें म्हणजे कान्होबाचें लग्न दहाव्याच वर्षी झालें असें मानावें लागतें. पंचावन वर्षांच्या वयांत दुखणेंबाणें कांहीं नसतांना पंधरा वर्षांच्या आंतल्या वयाचीं चार मुलें असणारा बोल्होबा 'केवळ वार्धक्यास' पोंचून व्यवहार पाहण्यास असमर्थ झाला होता असें मानतांना सृष्टिक्रमाच्या सामान्य समजुतीस चांगलाच काट द्यावा लागतो. सावकारीचा धंदा म्हणजे बहुतेक गादीवर बसून लोडास टेंकूनच होत असतो. त्यालाही असमर्थ करून सोडणारें असें केवळ वार्धक्य आलें हें म्हणणें शोभण्यास मनुष्याचें वय ७५ च्या घरांतच हवें. तें ५५ चें निःसंशय मानतां कामा नये. (२)-पुढें सृष्टिक्रमाप्रमाणें वार्धक्यातिशयानें तुकारामाचे वडील वारले. तुकारामाची मातृपितृभक्ति उत्तमापैकींच होती. त्याची साक्ष त्याचाच "मायबापें केवळ काशी" हा अभंग देत आहे. हे विचार तेरा वर्षांच्या पोराचे निःसंशय नव्हेत. तेरा वर्षांच्या वयांत ज्याला वरील अभंगांतील विचार सुचतात, म्हणजे ज्याला परब्रह्माचीही कल्पना चित्तांत ठसलेली असते, इतकेंच नव्हे तर जें परब्रह्म तोच नारायण आणि जो नारायण तींच मायबापें असलें अद्वैत ज्ञानही ज्याला झालें असेल, तो मनुष्य लग्नपाशांत निःसंशय पडणार नाहीं. बरें, हें लग्न तरी एकच का? छे! दोन लग्नें वडिलांनींच करून दिलीं होतीं असें सर्व चरित्रकार आणि वाचक मानितात. (३) संसाराला निरुपयोगी करून सोडणारा धापेचा दुर्धर रोग सुनेस जडला आहे असें निदान सासरच्या माणसांचें मत व्हावयास ती मुलगी पदरास येऊन कांहीं वर्षें लोटलीं पाहिजेत. किंवा पदरास येण्याचें वय होऊनही तिला पदर येत नाहीं, नवऱ्यास तिच्या संगतीची अपेक्षा असून तिला पदर न आल्यामुळें त्याची कुचंबणा होत आहे, अशा स्थितींत तिच्या प्रकृतीचें बारकाईनें निरीक्षण करण्याचा सासरच्या माणसांवर प्रसंग येतो. अर्थात् असा प्रसंग येण्याच्या वेळेस तिचें वय चौदाचें पुढें आणि नवऱ्याचें वयही अठराच्या पुढचें अशी स्थिति कल्पावी लागणार. तेव्हां बारा-तेरा वर्षांच्या वयांतच बोल्होबानें बुवांचीं दोन लग्नें लाविलीं होतीं हीही गोष्ट विचारास पटण्यासारखी नाहीं. सारांश काय कीं, तुकारामबोवांच्या शिरीं संसाराचा भार पडला तेव्हां ते तेरा वर्षांचे नसून चांगले पंचविशीच्या आसपास तरी असलेच

पाहिजेत. (४) 'माझिया मीपणावरी पडो पाशाण' या अभंगांत बोवा म्हणतात, "मला लक्ष्मिमदानें महादोष घडले. त्यानें मला दोन बायका आणि त्यांच्यामध्यें आवडनिवड करणें हा दोष जडला. त्यापायींच माझ्याकडून पितृवचनाची अवज्ञा झाली"...वरील अभंगावरून असा बळकट संशय येतो कीं, तुकशेटींनें वडील अगदा जर्जर झाल्यावर त्यांच्या संतोषानें कांहीं द्वितीय संबंध जोडिला नाहीं. तर ते अनुकूल नसतांनाच केवळ दुसरीहि एक विवाहित पत्नी उपभोगास असलेली चांगली अशा कामलालसेनें आपल्या पसंतीवर व चलतीच्या वजनावर दुसरी बायको मिळविली असावी. अर्थात् पहिलीच्या अंगीं कांहीं अपरिहार्य अशी खोड ठेवावी लागणारच हें असलें काम करितांना. तेव्हां तिला कार्यकारण झालेल्या तात्पुरत्या धापेच्या विकृतीचा—ती कायमची आहे, औषधें इत्यादि कितीही उपचार केले तरी बरी होण्यासारखी नाहीं—असा बोभाट करून तिचें आपल्या एवढ्या मोठ्या तोलाच्या संसारास अगदीं निरुपयुक्तत्वच आहे असें सांगून व सांगून तुकशेटींनें हा द्वितीय संबंधाचा बार मोठ्या थाटांत उरकून घेतला असावा. असें नसतें तर पुढें प्रौढ वयांत त्यांची प्रेमळ पत्नी व तिचा ह्यांचा आठदहा वर्षांचा एकुलता एक मुलगा मेला तेव्हां 'बाइल मेली मुक्त झाली। देवें माया सोडविली' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले नसते...अशी स्थिति एकवीस वर्षांच्या वयांत घडणें अगदींच असंभवनीय आहे. सारांश काय, तुकशेटींची पहिली बायको "अन्न अन्न" करून वारली आणि त्यांचा त्या बायकोस झालेला, ज्याच्यावर त्यांचें "गहनप्रेम" होतें असा, आठदहा वर्षे वयाचा मुलगा वारला, तेव्हां ह्या तुकशेटीचें वय तारुण्य संपून प्रौढत्वाप्रत पोंचलेलें असलें पाहिजे असेंच म्हणणें प्राप्त आहे. अर्थात् ह्या तारुण्यांतून पोरबाळ होऊन प्रौढत्वाप्रत पोंचण्याच्या मार्गांत असण्याच्या वयांत 'नलगे सांडावा आश्रम' किंवा 'उपजलिये कुळींचा धर्म' असा कोटिक्रमच त्यांच्या मनाला पटावा...ही स्थिति खरोखरच गृहस्थाश्रमांत चूर असणाऱ्या प्रौढ भाविकाला अगदीं योग्य आहे...तेव्हां अशा पस्तिशीच्या आंतबाहेरील वयानंतरच तुकशेटीचा बाप बोल्होबा वारला असावा व तो वारल्यानंतर कांहीं काळानें त्यांची आई कनकाई परलोकीं गेली असावी. बाप मरण्यापूर्वी किंवा मेल्यानंतर व आई असतांनाच तुकशेटींनीं द्वितीय संबंध केला आणि त्या द्वितीयसंबंधाचें माणूस वयांत येण्याच्या अवधींत म्हणजे सहज सहासात वर्षे तरी सांपडतातच, त्या कालांत तुकशेटीस पहिल्या कुटुंबाचे पातिव्रत्यादि सात्विक गुण, तिच्या पोटीं पुत्रोत्पत्ति आणि त्या पुत्राचेहि बालखेळ आणि कौतुकास्पद सद्गुण इत्यादींचा वाढता अनुभव व म्हातारपणामुळें आधींच जख्ख झालेल्या आपल्या आईस आपल्या द्वितीयसंबंधाच्या कर्कशेकडून होणारा त्रास आणि त्या योगानें त्या दुसऱ्या बायकोच्या आडदांडपणाचाहि वाढता अनुभव अशा परस्परविरोधी गोष्टींशीं झगडावें लागल्यामुळें जेव्हां त्याच्या वयाच्या चाळिशी पंचेचाळिशीच्या काळांत आईचा मृत्यु व पुढें पांचसहा वर्षांच्या अवधींत दुष्काळ, दिवाळें, आणि एका कुटुंबाचा अन्नान्नदशेनें घात होऊन त्यांचा एकुलता एक गुणांचा पुतळा असा मुलगाही वारला तेव्हां त्यांस सहजच तीव्र वैराग्य बाणावें आणि त्यांनीं "माता मेली मजचि देखतां, तुका म्हणे हरिली चिंता" असे उद्गार काढावे हें किती

योग्य आहे तें उघड करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. (९) आतां आणखी एका तऱ्हेनें विचार करावयाचा. तो हा कीं, तुकाराममहाराजांनीं देह ठेविला, तेव्हां त्यांची द्वितीय पत्नी पांच महिन्यांची गरोदर होती. तिला ह्या खेपेच्या आधींचे दोन मुलगे विठोबा व महादेव असे असत. ह्या दोघांही मुलांपैकीं जाणता असा कोणीच नव्हता. अर्थात् ५–६ आणि ३–४ वर्षांच्याच वयाचे ते असले पाहिजेत. ह्या मुलांच्या अगोदरच्या तीन मुली लग्नें होऊन आपापल्या सासरीं नांदत होत्या. आणि त्यांचीं लग्नेंही त्याकाळच्या वहिवाटीप्रमाणें लग्नाला अत्यंत योग्य होण्याच्या वयाआधीं तुकारामबोवांकडून झालीं असतील असा कांहीं फारसा संभव दिसत नाहींच. तर त्यांच्या लग्नाचा काल अतिक्रांत होऊं लागून जेव्हां त्या गळीं लागल्यासारख्या झाल्या असतील, तेव्हांच त्यांचीं लग्नें बोवांनीं केलीं असलीं पाहिजेत. ह्यावरून वडील मुलगी बोवांचे परलोकगमनकाळीं चांगली वीसएक वर्षांची तर खरी. अर्थात् तिच्या पाठोपाठ बहिणी १२-१४—१६-१७ वर्षांच्या वयांच्या असतील. तुकाराममहाराज शके १५७१ त परधामाप्रत गेले. त्यावेळीं त्यांची वडील मुलगी २० वर्षांची धरिल्यास तिचा जन्मकाल शकाब्द १५५१ च्या आसपास पडतो. म्हणजे शकाब्द १५३० च्या आजच्या समजाप्रमाणें बोवांचा जन्मकाल धरिल्यास त्यांचें वय ह्यावेळीं २१ वर्षांचें असणार, आणि ह्या काळीं मुलीला जन्म देणारी त्यांची द्वितीय पत्नी निदान १६ वर्षांची तरी धरली पाहिजेच. म्हणजे तिचा जन्म शकाब्द १५३५ च्या आसपासचा पडतो. दोघांमध्यें अंतर केवळ पांचच वर्षांचें? आणि हें पहिली बायको संसारास निरुपयोगी ठरल्यावर झालेल्या ह्या द्वितीय संबंधाच्या बाबतींत, आणि संसाराला निरुपयोगी ठरलेल्या पहिल्या बायकोसही ह्या काळीं आठदहा वर्षांचा एक मुलगा होता. तेव्हां तिचेंच वय ह्यावेळीं सहज २०–२५ वर्षांचेंही मानावें लागणार. म्हणजे नवराबायको ह्यांच्या वयांत कांहीं अंतरच नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट बायकोच एकदोन वर्षांनीं वडील.

तुकारामाच्या आयुष्यक्रमाची व्याप्ति केवळ ४२ वर्षांची समजण्यांत चारी बाजूंनीं कशी अडचण पडते हें दाखविण्यासाठीं गद्र्यांनीं जे मुद्दे मांडले आहेत ते इतक्या विस्तारानें त्यांच्याच शब्दांत मुद्दामच वर उद्धृत केले आहेत. कारण कांहीं चरित्रकारांनीं विशेष वास्तपुस्त न करितां १५१० किंवा १५२० हा जन्मशक मान्य केला आहे;[1] व तो मुख्यत्वें गद्र्यांच्या लेखाच्या आधारें. तुकारामाच्या ऐहलौकिक आयुर्व्याप्तीचें संशोधन अपुरें राहिलें व राजवाड्यांनीं तें एका पल्ल्यास पोंचविलें असतां जवळजवळ फुकट गेलें याचा गद्र्यांना विषाद वाटला; व राजवाड्यांचा शोध अश्रद्धेय होऊन कायमचाच मागें पडण्याचा संभव वाटल्यामुळें त्यांनीं हा विषय फिरून हातीं घेतला.[2] इतर कोणी गद्र्यांच्या विचारांत पुढें भर टाकलेली दिसत नाहीं. खुद्द गद्र्यांनाच निर्याणसमयीं

---

१ पहा, संतश्रेष्ठ तुकाराम. ज. र. आजगांवकर (१९३५) पृ. १०. पांच संतकवी. शं. गो. तुळपुळे (१९४८) पृ. ३०६-३०९. तुकारामबोवा. बा. अ. भिडे (आवृत्ति तिसरी, १९२५) पृ १४.

२ गद्रे (पूर्वोल्लेखित लेख). पृ. १०५.

तुकारामाचें वय ८१ वर्षांचें होतें हा राजवाड्यांचा शोध शेवटीं अश्रद्धेय कसा वाटला हें वर दाखविलें आहेच. आतां गद्यांचे विचार कितपत ग्राह्य आहेत हें तपासून पाहूं.

बोल्होबानें चोवीस वर्षे पंढरीची वारी केली ही महिपतीची स्थूल कालगणना खरी मानावयाची व तुकारामाच्या चरित्रांतील त्यानें सालवारीनें दिलेला तपशील खोटा ठरवावयाचा, हें सयुक्तिक दिसत नाहीं. महिपतीनें हा तपशील मोठ्या बारकाईनें दिला आहे; व तो केवळ काल्पनिक असण्याचा संभव फारच कमी दिसतो. जन्मापासून तों दुष्काळापर्यंतचा वृत्तांत सांगण्यांत दोन अध्याय खर्ची घातल्यानंतर महिपतीनें कालक्रमाचा फिरून सारांश दिला आहे तो असा :—"तुकयासि जाहली तैसी गती । संसारीं पाहिली नाना विपत्ती । ते सकाळित सांगतों यथामती । तरी सादर श्रोतीं परिसिजे ॥ तेरावे वर्षी पितयानें । संसार गळा घातला जाण । तेथें दक्षता येतां दिसोन । समाधान वडिलांसी ॥ सतरावे वर्षी तत्त्वतां । क्रमोनि गेलीं मातापिता । वडील बंधूची कांता । तेही अवचितां निमाली ॥ अठरावे वर्षी जाणा । सावजी गेला तीर्थाटणा । त्याच्या वियोगें करूनि जाणा । शोक निज मना वाटत ॥ विसाव्यांत पुत्रकांता स्वयमेव । देखोनि संसारीं धरिली हांव । येथूनि मन विटवावें । मग देवाधिदेवें काय केलें ॥ एकविसाव्यांत विपरीत काळ । तुकयासि पातला तत्काळ । तेव्हां निवतांचि दिवाळें । सोइरे सकळ हांसती ॥ अज्ञान प्रकृती ते स्त्री निश्चित । तेही निमाली अन्नअन्न करीत । महामोह पुत्र समस्त । लौकिकीं विपरीत हे वार्ता ॥ पूर्वार्ध संपलें ऐशा रीतीं । दुःखें देखिलीं नानारीतीं । संसाराची आस्था होती । तेही भ्रांती निरसली ॥ ".[१] या प्रकारें महिपतीनें दिलेल्या निश्चित वर्षांच्या क्रमाला केवळ अनुमानानें बाजूला सारतां यावयाचें नाहीं. आणि गद्यांचीं अनुमानें लेचींपेचीं तशींच ऐसपैसही आहेत. बोल्होबाला केवळ वार्धक्य प्राप्त झालें तेव्हां त्याचें वय, एकदां म्हणावयाचें ६५ च्या आसपास असलें पाहिजे, आणि लगेच तें ७५ च्या घरांत न्यावयाचें! बरें, या गणनेला आधार काय, तर हें अनुमान कीं बरोबर चाळिसाव्या वर्षी सुरुवात होऊन बोल्होबास ४८ व्या वर्षापर्यंत चार मुलें झालीं असलीं पाहिजेत; व पंधरा-सोळा वर्षांच्या सुमारास मुलांचीं लग्नें संपादिलीं असलीं पाहिजेत. चोवीस वर्षे वारी केल्यानंतर, म्हणजे अदमासें चाळिशीनंतर, मुलें व्हावयास आरंभ झाला या अनुमानाचें गणित, बरोबर चाळिसाव्या वर्षी पहिला मुलगा होऊन दोन दोन वर्षांच्या पाळण्यानें इतर संतति झाली इतक्या कांटेकोर पद्धतिनें बसवितां येत नाहीं. सावजीच्या व तुकारामाच्या वयांत अवघें दोन वर्षांचें अंतर होतें हा केवळ तर्क आहे. तुकारामाच्या काळांत बालपणाची मर्यादा बाराव्या वर्षावर संपत असे असें मानीत असत. खुद्द तुकारामानें असें म्हटलें आहे कीं, "बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा । खेळतां या पोरा नानामतें ॥ .........तुका ह्मणे ऐसें बाळपण गेलें । मग तारुण्य आलें गर्वमूळ ॥ ;" "बारावर्षे बाळपण । तें ही वेचलें अज्ञानें ॥".[२] आज देखील लग्नाची चवदा-सोळा वर्षांची वयोमर्यादा बहुजनसमाजास पटत नाहीं. तुकारामाच्या काळीं दहा-बारा वर्षांवरच लग्नें होत असत, हें ऐतिहासिक दाखल्यावरून स्पष्ट

१ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओव्या १३१-१३८.

२ अभंग ३०८१; ४२४७.

दिसतें. शहाजीचें जिजाबाईशीं लग्न वयाच्या अकराव्या वर्षी झालें होतें. शिवाजीचें सईबाईशीं लग्न तेराव्या वर्षी झालें ; व सगुणाबाईशीं चौदाव्या वर्षी. तसेंच बाजीरावाचें लग्न तेराव्या वर्षी, नानासाहेब पेशव्याचें नवव्या वर्षी, व सदाशिवरावभाऊचें दहाव्या वर्षी, अशीं ब्राह्मणांतील उदाहरणें देतां येतील. बाराव्या वर्षानंतर तारुण्यदशेची गणना सुरू होई, व त्याच मानानें व्यवहारधंद्याच्या कर्तबगारीला आरंभही लवकरच होत असे. शिवाजीच्या पराक्रमास व बाजीरावाच्या पेशवाईस विशीच्या सुमारास फळें येऊं लागलीं, यांत वयोमानाचें असामान्यत्व नसून तेजाचाच अलौकिक प्रभाव आहे. प्रवृत्तीच्या मोहोराप्रमाणें निवृत्तीचा अंकुरही लहान वयांतच फुटत असे. रामदासांचें उदाहरण अद्वितीय असलें तरी ऐन तारुण्यांत वैराग्याची भगवी छटा दिसूं लागणें हें दृश्य कांहीं समाजाला अपरिचित नव्हतें. बापानें केलेल्या वाऱ्या व पुढें तुकारामाची तशीच कान्होबाची हरिभक्ति ध्यानांत घेतली, म्हणजे या कुटुंबांतील सावजीच्या तारुण्यदशेंतील वैराग्यवृत्तीचें विशेषसें आश्चर्य वाटत नाहीं. एकंदरींत, संसारांत लक्ष घालण्यास नकार देणारा सावजी पंचवीस वर्षांचा तरी असला पाहिजे हा आग्रह तितकासा सबळ दिसत नाहीं. सावजी त्या समयीं १९ वर्षांचाच होता असें निश्चित मानण्यास कांहींच आधार नाहीं ; व ऐन विशींत सावजीस वैराग्य येणें हें असंभवनीय नसून या कुटुंबाची मनोरचना व तारुण्यांतील भावनांची खळबळ यांना अनुरूपच त्याची मनोवृत्ति होती असेंच म्हणावें लागेल. तुकारामाच्या सतऱ्याव्या वर्षी बोल्होबास देवाज्ञा झाली या महिपती या गणनेवर गद्र्यांनीं असंभाव्यतेचा मिथ्यारोप केलेला दिसतो. सावकारानें पाउणशें वर्षांची मर्यादा गांठलीच पाहिजे असा कांहीं आयुष्य-शास्त्राचा अबाधित सिद्धांत बांधलेला नाहीं. व्याजाच्या प्रमाणांत आयुष्य वाढतें असा व्यवहाराचा अनुभवही नाहीं ! किंबहुना, लोडास टेंकून गादीवर बसून राहणाऱ्या आइतखाऊचा ऐदी देह जराव्याधींशीं टक्कर देऊं शकत नाहीं अशीच नेहमीं प्रचीति येते. तेव्हां, साठ-पांसष्टच्या सुमारास बोल्होबा मृत्यु पावला असेल, व त्या वेळीं तुकारामाचें वय सतरा वर्षांचें होतें असें मानल्यास बोल्होबाच्या पंचेचाळीसच्या सुमारास तुकारामाचा जन्म झाला असेल, हा महिपतीच्या गणनेंतून निघणारा हिशेब सहज पटण्यासारखा आहे. " मायबापें केवळ काशी " हा अभंग तुकारामानें तेराव्या वर्षी लिहिला असा आपला समज गद्र्यांनीं कां करून घेतला कोण जाणे ! तेराव्या वर्षी तुकाराम कवित्व करीत असे असें कोणीच म्हटलें नाहीं. अर्थात् या अभंगांतील विचारावरून तुकाराम लग्नपाशांत पडणें शक्यच नव्हतें हें अनुमान हास्यास्पद वाटतें ; व त्या अनुमानावर बसविलेला आक्षेपांचा डोलारा समूळच ढांसळतो. मुलाचें दुसरें लग्न करून देण्यापूर्वी पहिल्या बायकोस पूर्ण न्याय मिळेल इतका अवधि द्यावयाचा ही आधुनिक सुधारकांची स्त्रीदाक्षिण्याची कल्पना सतराव्या शतकांतील तुकारामाच्या घराण्यास लावणेंच मुळीं चुकीचें आहे. पहिल्या बायकोस धापेची व्यथा होती हा कांहीं महिपतीचा स्वकपोलकल्पित शोध नाहीं ; गद्रेही ती गोष्ट गृहीत धरतात. धापेची व्यथा बाल्यावस्थेंतच विशेष त्रास देते ; व दोन लग्नें करण्यांत कांहीं पाप आहे अशी त्या काळीं सधन कुणबी समाजाची तरी खात्रीनें भावना नव्हती. तेव्हां सवत आणण्यापूर्वी पहिल्या बायकोच्या वयास कमींतकमी अठरा वर्षें तरी

लोटलीं पाहिजेत हाही आग्रह पटण्यासारखा नाहीं. "माझिया मीपणावर पडो पाषाण" या अभंगाचा[१] गद्यांनीं विपर्यास करून तुकारामाचा थोर अन्याय केला आहे. "लक्ष्मीमदें मातें घडले महा दोष । पत्नी दोनी भेदाभेद ।" "पितृवचन घडली अवज्ञा अविचार । कुटिल कुचर वादी निंद्य ॥" या दोन ओळींच्या मध्यें "त्यापायींच" हा केवळ काल्पनिक संबंध गद्यांनीं कोणत्या आधारावर जोडला हें सांगितलें नाहीं. या खोडसाळ कल्पनेनें त्यांनीं दुष्ट संशयांचें जाळें विणून सत्य गुरफटून टाकलें ! बापाच्या इच्छेविरुद्ध, पहिल्या बायकोस खोटीच खोड लावून तिचा नाहक बोभाट करून केवळ कामलालसेनें उपभोगासाठीं तुकारामानें द्वितीय संबंधाचा बार मोठ्या थाटानें उरकून घेतला हीं सर्वस्वीं निराधार विधानें अतिवादकास सुद्धां शोभणार नाहींत ! "बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥"[२] असें अंतःकरण पिळवटून जिच्याविषयीं मागाहून उद्गार निघाले त्या प्रथम पत्नीच्या छातीवर सवत नाचविण्यास तुकाराम कधींच तयार झाला नसता ; आणि तेंही तिला पुत्र झाला असतां सर्वथैव असंभवनीय होतें. वस्तुस्थिति अशी दिसते कीं, या कर्त्यासवरत्या मुलाचा संसार दमेकरी सहचारिणीबरोबर सुखाचा होणार नाहीं या भीतीनें व श्रीमंत घराण्याशीं संबंध जोडावा या हेतूनें, बापानेंच तुकारामाचें लहान वयांत दुसरें लग्न करून दिलें असलें पाहिजे. तेव्हां द्वितीय संबंधाच्या समयीं तुकाराम प्रौढ वयाचा होता हा तर्क चुकीचा आहे. हा तर्क सुचविण्यांत गद्यांनीं चपळाईचे चमत्कार दाखविले आहेत. वृद्ध पित्याची अवज्ञा करून दुसरें लग्न केलें असा बळकट संशय आधीं प्रगट केल्यानंतर ते पुनः म्हणावयास तयार कीं, बाप मरण्यापूर्वी किंवा मेल्यानंतर व आई असतांनाच तुकशेटींनीं द्वितीय संबंध केला ! त्यावेळीं तुकारामाचें वय तीस-पस्तीस वर्षांचें होतें, व सहासात वर्षांनंतर ही दुसरी पत्नी वयांत आली, इत्यादि तर्क रचणें गद्यांस क्रमप्राप्त झालें याचें कारण हें कीं, निर्याणसमयीं दुसरी स्त्री गरोदर असतां तुकारामाचें वय साठीच्या घरांत होतें हें त्यांनीं गृहीत धरलें होतें. त्याच क्रमांत पहिल्या बायकोचा मुलगा दुष्काळांत मेला तेव्हां आठदहा वर्षांचा होता ही माहिती त्यांना घुसडून द्यावी लागली. या माहितीस कोठेंच आधार सांपडत नाहीं ; व गद्यांनींही तो दिला नाहीं. त्या समयीं तुकारामाचें वय प्रौढत्वाप्रत पोचलें असलें पाहिजे असें कल्पून मग "न लगे सांडावा आश्रम" किंवा "उपजले कुळींचे धर्म" असा कोटिक्रमच त्याच्या मनाला पटावा ही स्थिति खरोखरच गृहस्थाश्रमांत चूर असणाऱ्या प्रौढ भाविकाला अगदीं योग्य आहे अशी कुत्सित टीका करण्यांत आपण वस्तुस्थितीचा निव्वळ विपर्यास करीत आहोंत याचें सोइस्कर अज्ञान गद्यांनीं पांघरलें आहे. पहिल्या बायकोच्या दुष्काळांतील मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं तुकारामाच्या कवित्वास प्रारंभ झाला हें उघड आहे. संसारांत स्वतः रमल्याचें समर्थन करण्यासाठीं वरील अभंग[३] तुकारामानें दुष्काळसमयीं लिहिला नव्हता हें ज्ञान गद्यांस खचित असलें पाहिजे. गद्यांच्या शेवटच्या मुद्द्यांत पूर्वानुसार

१ अभंग २८३५.

२ अभंग ७७८.

३ अभंग ६४५.

हातचलाखी आहेच. थोरल्या मुलीचें वय निर्याणसमयीं २० वर्षांचें होतें असें क्षणभर गृहीत धरल्यानें कांहींच अनवस्था ओढवत नाहीं. शके १५५१-५२ म्हणजे इ. स. १६३० च्या सुमारास जिजाबाईस पहिलें मूल झालें असें जर आपण मानिलें तर तुकारामाचें वय त्यावेळीं २१-२२ वर्षांचें होतें असें मानण्यांत कोणती अस्वाभाविकता उद्भवते? नवराबायकोच्या वयांत पांचच वर्षांचें अंतर असणें अस्वाभाविक आहे काय? आणि विशेषतः जेव्हां ती बायको संसारास उपयोगी पडावी म्हणून मुद्दाम केली होती तेव्हां ती बालवधू खात्रीनें नसणार. चौदाव्या वर्षी जिजाबाईचें लग्न तुकारामाशीं झालें होतें हें राजवाड्यांनींच मान्य केलें होतें. हें सर्व जाणूनच गद्यांनीं चपळाईनें पवित्रा बदलून शितार्फानें असें सुचविलें कीं, द्वितीय संबंधाच्या वेळींच पहिल्या बायकोस आठदहा वर्षांचा मुलगा होता. तो दुष्काळांत मेला तेव्हां आठदहा वर्षांचा होता असें आपण पूर्वी केलेलें विधान त्यांनीं बेमालूम बदललें व मग वयोमानाचें अनुमान काढलें कीं, या हिशेबानें तुकारामाची पहिली बायको त्याच्यापेक्षां वडील ठरते!

वास्तविक महिपतीनें दिलेल्या आयुष्यक्रमांतील कोणताच तपशील अस्वाभाविक दिसत नाहीं. तेराव्या वर्षी खर्डाखतावणीची ओळख मुलास सावकारानें करून द्यावी व देण्याघेण्याचा व्यवहार त्यास शिकवावा, यांत अकालप्रौढत्वाची अतिशयोक्ति खचित नाहीं. इतकें मात्र खरें कीं, जेव्हां थोडक्याच अवधींत तुकाराम संसारांत दक्षता दाखवूं लागला तेव्हां 'वयही नसे फार त्याचें' म्हणून सोयरेसंबंधी त्याचें कौतुक करूं लागले. शिवाजीचेंही लोकांनीं असेंच कौतुक केलें असेल. तेरा ते सतराच्या दरम्यान आईबापांनीं तुकारामाचें दुसरें लग्न करून दिलें हेंही त्या काळच्या शिरस्त्यानुरूपच झालें. शिवाजीचा दुसरा विवाह चौदाव्या वर्षी, बाळाजी विश्वनाथ पेशव्याचा एकोणीसाव्या वर्षापूर्वी, व सदाशिव-भाऊचा (पार्वतीबाईशीं) विसाव्या वर्षी झाला, हे तीन दाखले तुलनेला पुरेसे आहेत. तुकारामाच्या सतराव्या वर्षी मातापित्यांचा मृत्यु झाला, म्हणजे बोल्होबाचें वय साठ-पांसष्टच्या आसपास असलें पाहिजे. या वयास वार्धक्य खचित म्हणतां येईल. अठराव्या वर्षी सावजी तीर्थाटनास निघून गेला; त्यावेळीं त्याचें वय वीस ते पंचवीस असावें. तरुणांस बहुधा याच वयांत संसार असार वाटूं लागतो असा मानसशास्त्रज्ञांचाही अनुभव आहे. विसाव्या वर्षी पुत्रप्राप्तीचा आनंद अनेक भाग्यवंतांस लाभला आहे. मालोजी भोसले जन्मले त्यासमयीं त्यांचे वडिलांचें—बाबजीचें—वय सतरा वर्षांचें होतें, व नानासाहेब पेशव्याचा जन्म बाजीरावाच्या एकविसाव्या वर्षी झाला, हे ऐतिहासिक दाखले सहज सुचण्यासारखे आहेत. एकविसाव्यांत म्हणजे मुलगा एक वर्षाचा असतां वारला, व त्याची आईही अन्नान्न करून मेली. या रीतीनें तुकारामाच्या आयुष्याचें "पूर्वार्ध" संपलें.

महिपतीनें "पूर्वार्ध" शब्द संदिग्ध अर्थानें किंवा लाक्षणिक रीतीनें अथवा आलंकारिक भाषेनें वापरला आहे अशी कांहीं चरित्रकारांनीं कल्पना केली आहे. पूर्वार्ध म्हणजे सांसारिक जीवनाचा भाग अशा रीतीनें संपला, व यापुढें उत्तरार्ध म्हणजे आध्यात्मिक जीवनास प्रारंभ झाला असा महिपतीच्या शब्दयोजनेचा आशय असावा असा ते निष्कर्ष

काढतात.[१] परंतु थोडासा विचार केल्यास, पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें २१ व्या वर्षी पूर्वार्ध संपलें हें महिपतीचें म्हणणें "वाच्यार्थ व लक्ष्यार्थ या दोन्ही प्रकारांनीं खरें ठरतें".[२] वर सांगितल्याप्रमाणें दुष्काळ १५५१-५२ शकेंत म्हणजे १६२९-३० इसवींत पडला असें आपण गृहीत धरिलें तर महिपतीनें योजिलेल्या 'पूर्वार्ध' शब्दाचा पुरा उलगडा होतो. तुकारामाच्या एकविसाव्या वर्षी हा दुष्काळ पडला असें महिपतीचें म्हणणें आहे. शके १५७१ त तुकारामाचें निर्याण झालें असें महिपतीनें निःसंदिग्ध रीतीनें नोंदून ठेविलें आहे. पुढें आपणांस असें दिसून येईल कीं, १५७१ हाच खरा निर्याणशक आहे. दुष्काळाचे व निर्याणाचे शक अशा प्रकारें मुक्रर केल्यास, दुष्काळ हाच संधिकाळ ठरतो व तुकारामाच्या आयुष्याचे एकतीस वर्षांचे दोन सारखे भाग पडतात. दुष्काळाच्या 'विपरीत काळानें' तुकारामाच्या आयुष्याचीं दोन अर्धें अशा प्रकारें सांधलीं जातात; आयुष्यांतील पूर्वभागांतील वर्षांचा क्रम व निर्याणशक निश्चित देणाऱ्या महिपतीनें तरी 'पूर्वार्ध' हा शब्द केवळ काव्याची भाषा म्हणून योजिला नसून गणिताच्या हिशेबानेंच योजिला आहे असें स्पष्ट दिसतें.

या हिशेबानें १५३० हाच जन्मशक मुक्रर होतो. १४९० हा जन्मशक सर्वस्वीं असंभवनीय आहे असें कोणाही सुज्ञास वाटेल. १५१० हा शक केवळ अदमासानें सुचविला गेला आहे. १५२० या शकाचा लेखी आधार तितकासा विश्वसनीय नसून, शकमित्यांच्या गणनेशीं त्याची संगति लावतां येत नाहीं. उलट, तुकारामाचा आद्य चरित्रकार महिपति यानें काळजीपूर्वक दिलेल्या कालगणनेप्रमाणें १५३० हा जन्मशक निश्चित ठरतो. मागें वर्णिल्याप्रमाणें निर्याणसमयीं तुकाराम वृद्ध नसून प्रौढ वयाचा होता, म्हणजे त्याचें वय पन्नाशीच्या आंत होतें. निर्याणसमयीं तुकारामाचें वय ४०-४२ वर्षांचें होतें अशीच, राजवाडेप्रभृतींनीं शकाचा वाद सुरू करण्यापूर्वी, महाराष्ट्रांतील विद्वानांची व संतमंडळीची परंपरागत समजूत होती. १८५४ सालीं प्रसिद्ध झालेल्या नवनीताच्या पहिल्या आवृत्तींत "तुकाराम चाळीस वर्षांच्या वयांत हा लोक सोडून परलोकास गेला असें म्हणतात" असें परशुरामपंत गोडबोल्यांनीं लिहून ठेविलें आहे. पंडितांच्या सरकारी गाथेस जनार्दन सखाराम गाडगीळ यांनीं लिहिलेलें जें इंग्रजी चरित्र जोडलें आहे त्यांत तुकाराम वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी गुप्त झाला असा लोकांत सर्वत्र समज आहे व महिपतीच्या पूर्वार्धाच्या उल्लेखानें या समजास पुष्टि मिळते असें म्हटलें आहे. त्याच गाथेस जोडलेल्या मराठी चरित्रांत हें विधान येणेंप्रमाणें सुस्पष्ट केलें आहे:—"तुकाराम गुप्त झाल्याचें साल खेरीजकरून महिपतीनें शक, वर्ष वगैरे काल कोठेंच दाखविला नाहीं. १५३० हें साल, २१ व्या वर्षी तुकारामाच्या आयुष्याचें पूर्वार्ध संपलें अशा अर्थाची ओवी लिहिली आहे तिजवरून, तुकारामाचें वय गुप्त होण्याच्या कालीं ४२ वर्षांचें होतें असें सर्व संतमंडळांत व तुकारामाच्या वंशजांत सर्वत्र प्रसिद्ध आहे त्यावरून, आणि गुप्त झाल्याच्या सालावरून काढलें आहे."

---

१ राजवाडे यांचा पूर्वोल्लेखित 'तुकाराम' हा लेख, पृ. ७, Indian Mysticism: Mysticism in Maharashtra. R. D. Ranade, p 262. तुकारामचरित्र, परळकर, पृ. ३२.

२ श्रीतुकारामचरित्र, पृ. ३४.

सारांश, महिपतीचा निःसंदिग्ध आधार, संतमंडळींत व तुकारामाच्या वंशजांत चालत आलेली परंपरा, निर्याणकाळची तुकारामाच्या संसाराची परिस्थिति, अभंगांतील व समकालीनांच्या लिखाणांतील माहिती,—यांचा साकल्यानें विचार केल्यास तुकारामाचा जन्म १५२९-३० शकेंत म्हणजे इ. स. १६०८ सालीं झाला असला पाहिजे असा निष्कर्ष निघतो. तुकाराम, रामदास, व मिल्टन हे धर्मसंस्थापनेचे तीन कवि—कवींचे कवि—या सालीं जन्मास आले, या अपूर्व योगामुळें वाङ्मयाच्या इतिहासांत ह्या वर्षास सारस्वत संवत्सर हें नांव साजेल !

नगर वाचनालय सातारा
संग्रहाकरितां

नगर वाचनालय सातारा
नं. ७३६५
२६९७
च ७५२०
कि

प्रकरण पांचवें

## बाळपण

आपल्या देशांत, आज विसाव्या शतकांत सुद्धां, बालमनाच्या भावनाशयांत डोकावून पाहण्याचें कुतूहल फारच थोड्या वडिलधाऱ्या माणसांत दिसून येतें. पुढें मोठेपणीं ज्या गुणावगुणांच्या पिळांत मन पकडलेलें दिसतें, त्यांतील कित्येकांचे धागे बालपणांत गुंफिले जातात. आईबापांची वागणूक, घरांत भावंडांशीं व बाहेर संवगड्यांशीं सहवास, नोकरां-चाकरांशीं संबंध, शाळेंतील शिक्षण—या एक ना अनेक संस्कारांनीं मूळ बीजावर पुढें सारखीं पुटें चढत असतात. मोठेपणींच्या जीवनाचें रहस्य उकलण्यासाठीं चरित्रकाराच्या दृष्टीनें बालजीवनाची जितकी माहिती मिळेल तितकी थोडीच. विशेषतः तुकारामासारख्या भावनाप्रधान, परंपराप्रिय, काव्यमय संतमनाचें संपूर्ण ज्ञान करून घेण्यास त्याच्या बालभावनांचा मागोवा काढीत गेलें पाहिजे; व त्याच्या प्रकृतीचा पिंड बालपणांतील संस्कारांनीं कसा पोसला गेला, त्याच्या स्वभावाच्या विकासाला आरंभ कसा झाला, याचा अवश्य विचार केला पाहिजे.

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, या रूढ समजाची जुन्या चरित्रकारांना पुरेशी जाणीव होती. परंतु अद्वैती तुकारामाला शोभणारा एक सुंदर पाळणा[१] रचण्यापलीकडे महिपतीनें पुरःफलांच्या प्रसादचिन्हांचा खास उल्लेख केला नाहीं. कान्होबाकृत म्हणून छापलेल्या 'बाळपण' या प्रकरणांत एका भावी संविधानकाची सूचना केली आहे कीं काय अशी शंका येते.[२] खेळांत रमलेल्या बालतुकारामानें गुरें घरीं आणण्यांत चुकारपणा केल्यामुळें आईनें "मर जा" म्हणून रागानें उच्चारिलेल्या शब्दांची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यानें संवगड्यांकडून मरणाची सिद्धता करविली. मुलांनीं तिरडीवर तुकारामास बांधून नदीच्या वाळूंत पुरलें; इतक्यांत नदीला मोठा पूर आला, व मुलें पळून

१ हा पाळणा उद्धृत करावयाचा मोह आवरत नाहीं. "सुंदर स्त्रीचें रूप धरूनी । हळदीकुंकुमें लेववीत रुक्मिणी । मग बाळकासि तये क्षणीं । जो जो म्हणवोनी हालवित ॥ जें का अक्षर अव्यक्त । असे नामरूपातीत । शब्देंवीण आनंदत । नीज तेथ निज बाळा ॥ जेथें अहंसोहं निश्चित । निमे द्वैत आणि अद्वैत । परादि वाचा कुंठित । नीज तेथ निज बाळा ॥ जेथें ज्ञेयज्ञाता ज्ञान निश्चित । ध्येय ध्यान ध्याता नाठवत । त्रिपुटी कारण नाहीं जेथ । नीज तेथ निज बाळा ॥ जें सिद्धांत ज्ञान बोलती संत । अहेतुक पद निश्चित । त्या निजसुखधामीं लावूनि प्रीत । नीज तेथ निज बाळा ॥ अव्यक्त नाकळे कोणातें । मग सगुण रूप धरी भक्तहेतें । त्या पांडुरंग-चरणीं साक्षात । नीज नीज प्रीत लावुनी ॥ ऐशा रीतीं विश्वजननी । पाळणा गातसे तये क्षणीं । भोंवत्या सकळ सुवासिनी । जो जो म्हणोनि हालविती ॥." भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या १४०–४६.

२ निर्याणाचें प्रकरण पहा.

गेलीं. पुढें आईनें साद घालतांच तुकारामानें हुंकार दिला, पाणी ओसरतांच आईनें वाळू उकरून त्याला बाहेर काढिलें, अशी ती कथा आहे.[१] याच प्रकारची पांडुरंगकृत[२] तुकारामचरित्रांत वर्णिलेली दुसरी कथा भावी सगुणभक्तीच्या गुणवर्णनासाठीं एका सुपरिचित कल्पनेच्या आधारें रंगविलेली दिसते. त्या कथेंत बालतुकारामानें दुधाची वाटी तोंडाला लावतांच विठोबाच्या मूर्तीनें तें दूध प्रेमानें कसें प्राशन केलें याचें वर्णन केलेलें आढळतें. या व्यतिरिक्त, चरित्रकारांच्या परंपरेंत तुकारामाच्या बालपणींच्या भूत किंवा अद्भुत वृत्तांतांचें वर्णन आढळत नाहीं. च. ९५२० / २६३८९ /१३६

तथापि तुकारामाच्या मातापित्यांची व कुटुंबाची महिपतीनें जी माहिती दिली आहे तीवरून, व अभंगांतील प्रासंगिक वचनांवरून, तुकारामाच्या बालजीवनाची कांहींशी कल्पना करतां येते. आईबापांचें प्रेम हा बालकांच्या जीवनाचा प्राणविसावा. तुकारामाला हें प्रेम अमर्याद नसलें तरी मनमुराद मिळालें असलें पाहिजे. उतारवयांत नवसासायासांनीं झालेलीं मुलें विशेष प्रेमानें वाढविलीं जातात ; म्हातारपणीं झालेल्या माणकांचें आस्थेनें संगोपन होतें, या लौकिक अनुभवानुसार तुकाराम व त्याचीं भावंडें हीं मायबापांच्या प्रेमसुखावर पुष्ट झालीं असलीं पाहिजेत. पुढें देवापाशीं केलेल्या लडिवाळपणाची संवय तुकारामाला बालपणापासूनच जडली असली पाहिजे. जर तो कठोर व कर्कश वातावरणांत वाढला असता तर देवाला प्रेमस्वरूप माता मानून हट्ट पुरवून घेण्याच्या कल्पनेनें त्याचें मन मोठेपणीं व्यापिलें नसतें. या भावंडांनीं "आळीचा कोल्हाळ" केला तरी त्यांनीं "जें जें काळीं" मागितलें तें तें देऊन त्यांच्या आळी पुरविल्या गेल्या होत्या ; म्हणूनच पुढें देवाशीं सलगीचे बोल बोलतांना तुकारामाच्या तोंडून सहज अभिमानानें उद्गार निघाले कीं, "आम्ही आळीकरें । प्रेमसुखाचीं लेंकुरें ॥."[३] त्याच्या बालपणाचें हें यथार्थ वर्णन वाटतें. स्वत: तो अत्यंत प्रेमळ पिता असला पाहिजे ; व जिजाई ही तशीच 'मयाळ' माता असली पाहिजे. अभंगांत वर्णिलेल्या आईबापांच्या प्रेमाच्या कल्पना स्वत:वरून त्यानें पारखून घेतल्या असतील ; परंतु त्या प्रेमाच्या आनंदसोहळ्याचा अनुभव त्याला आपल्या बालपणीं आला नसता तर पितापुत्रांच्या व मायलेकरांच्या संबंधांतील जिव्हाळा त्याच्या काव्यांत वारंवार ओसंडता ना. मायबापांचे मुलांशीं संबंध सुखाचे व प्रेमाचेच असावेत असा खास आग्रह धरणारा व मुलांच्या हक्कांच्या सनदेची घोषणा करणारा तुकारामासारखा दुसरा मराठी कवि झाला नाहीं असें म्हटलें तर त्यांत खचित अतिशयोक्ति होणार नाहीं. तुकारामाचा संसार विरक्तीच्या प्रचलित कल्पनांप्रमाणें रुक्ष किंवा नीरस नसून त्याचें सारें जीवन प्रेममय झाल्यामुळें, बायकोस व मुलांस देखील तो प्रेममूर्तीच वाटत असे, याचें वर्णन पुढें एका प्रकरणांत येईल. परंतु या स्थळीं प्रसंगोपात्त म्हणून मायबापांचे व लेंकरांचे प्रेमसंबंध कसे असावेत, याविषयीं त्याचे विचार ध्यानांत घेतल्यास, पर्यायानें त्याच्या सुखी

---

१ तुकारामतात्यांची गाथा, भाग १, पृ. ३८.

२ तुकारामतात्यांची गाथा, भाग १, पृ. ३९.

३ अभंग १३४८.

बालपणाची कल्पना रंगविण्यांत थोडीबहुत मदत होईल. आळी करण्याचा व त्या पुरवून घेण्याचा मुलांस जन्मसिद्ध हक्कच आहे हें तर त्यानें गृहीतच धरलें आहे. "पोटा आलें बाळ। त्याचें जाणावें सकळ॥"[१] हें त्याचें सूत्र बालमनोविज्ञानाचें सार्वभौम मूलतत्त्व म्हणून आधुनिक मानसशास्त्रज्ञ सुद्धां शिरोधार्य मानितील. शिस्त लावणें हें बापाचें कर्तव्य, व म्हणून तो कर्दनकाळ नसला तरी कडक असावा ही आज देखील सर्वसाधारण अपेक्षा असते. परंतु "तुका ह्मणे सांगूं किती। बाप लेंकासी मारिती॥"[२] हें आश्चर्यवत् सांगणारा तुकाराम किती कोमल मनाचा असला पाहिजे! आवडीनें मुलाकडून क्वचित् सीमा सांडिली जाते, सख्यत्वानें अवज्ञा घडते. तें पत्करलें, पण मुलाला बापाची भीति अशी वाटतां कामा नये. "बाळें बापासी न भ्यावें."[३] बाप मुलाचा सखा असला पाहिजे, शास्ता नव्हे, हें अभयदान देणारें त्याचें दुसरें-सूत्र तितकेंच महत्त्वाचें आहे. बाप सखा असावा असें मानणाऱ्या तुकारामास आई ही सायुज्य प्रेमसुखाची माउली वाटावी हें साहजिकच आहे. मातेचें प्रेम वर्णितानां त्यानें अनेकदां 'कळवळा' हा शब्द योजिला आहे. तें प्रेम कसें असावें हें तिसऱ्या एका स्वल्पाक्षररमणीय सूत्रांत त्यानें सांगितलें आहे:—"नित्य नवा कळवळा। मायबाळामध्यें तो॥." हें सूत्र ज्या सुंदर कोंदणांत बसविलें आहे त्यानें तर त्याची मोहिनी मन कसें भारून टाकिते! ते चरण बाळाच्या वाळ्याच्या रुणझुणीच्या तालावरच गुणगुणावेसे वाटतात[४]—

"आवडीची न पुरे धणी। प्रीत मनीं बैसली॥ १॥
॥ ध्रु.॥ नित्य नवा कळवळा। मायबाळामध्यें तो॥ छ॥
सुख सुखा भेटीं आलें। होय वाल्हें पोटींचें॥ २॥"

मातेचा ळळा इतक्या लडिवाळ शब्दखेळांत गाइलेल्या काव्याच्या ओळी मराठी वाङ्मयांतच काय, पण इतरत्रही फारच थोड्या असतील. असल्या शुद्ध मातृप्रेमावर निष्ठुरतेची सावली सुद्धां पडलेली तुकारामाला खपत नसावी. लेंकराच्या लाडाचे आड निष्ठुरता जरा सुद्धां येतां कामा नये ही त्याची भावना खालील दोन सूचक प्रश्नांत चांगलीच प्रगट होते. "रडत मागें सांडी पोर। ते काय थोर माउली॥"[५]; "कोड आवडीचें। पुरवीना बाळकाचें॥ १॥ ॥ ध्रु.॥ तेव्हां कैसी ते माउली। जाणा काशासाटीं व्याली॥ छ॥"[६]. असो. नित्य नवा कळवळा असणारी माता, सदैव सख्य करणारा पिता, व दोघेंही बाळकाचें सकळ सहानुभूतीनें जाणून हित[७] करणारे ज्ञाते—अशा लाडाकोडांच्या पण हितकारक वातावरणांत खुद्द तुकारामाचा बाळपणांत प्रेमानें प्रतिपाळ झाला असावा.

---

१ अभंग ३३२३.
२ अभंग ३८३५.
३ अभंग १९९४.
४ अभंग ३७२५.
५ अभंग ३११२.
६ अभंग ४००२.
७ तुका ह्मणे मायबापाचें उचित। करावें तें हित बाळकाचें॥ (अभंग ४२७७).

तुकाराम हा मधला मुलगा असल्यामुळें ज्येष्ठ सावजी व कनिष्ठ कान्होबा यांच्याएवढें त्याचें कदाचित् बालपणीं कोडकौतुक झालें नसेल. धाकट्या मुलाकडे मातेनें साहजिकच अधिक लक्ष पुरविलें असतां मोठ्या मुलाच्या कोमल मनाला जें दुःख होतें त्याचें दीनवाणें रोदन दोन स्थळीं अभंगांत ऐकू येतें. हा आर्त स्वर बालतुकारामाचा आहे किंवा त्याच्या मुलांचा आहे हें सांगणें कठिण आहे. एके स्थळीं त्या बालमनाच्या वेदनेची तळमळ व्यक्त केली आहे कीं "धाकुट्याचे मुखीं घांस घाली माता । वरी करी सत्ता शाहाणियां ॥१॥ ॥ ध्रु. ॥ ऐसें जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ॥ छ ॥ दोन्ही उभयतां आपण चि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न ॥ २ ॥ तुका ह्मणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें रडतें स्तनीं ॥ ३ ॥."[1] दुसरे स्थळीं हृदयाला भिडणारी विनवणी केली आहे कीं "जाणतें लेंकरूं । माता लागे दूर धरूं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ तैसें न करीं कृपावंते । पांडुरंगे माझे माते ॥ छ ॥."[2] मधल्या मुलाला ज्या कारणांस्तव हेळसांडीच्या कल्पनेनें दुःख होतें तींच कारणें त्याला लवकर स्वावलंबी बनवून स्वतःच्या पायावर उभें राहावयास शिकवितात. असा साधारणतः अनुभव येतो कीं दुसरें मूल पहिल्या मुलाचे दोष टाळावयाचा प्रयत्न करीत असतें. त्या दृष्टीनें पाहतां सावजीच्या वृत्तीच्या विरुद्ध अशी जी तुकारामाची व्यवहारचतुर वागणूक पुढें दिसून आली तिचें बीजारोपण शिशुपणांतच झालें असलें पाहिजे. ज्येष्ठ-कनिष्ठाप्रमाणें तुकारामाचेंही कपडेलत्ते, दागदागिने यांच्या बाबतींत चांगलेंच कोडकौतुक झालें असलें पाहिजे ; कारण हीं संपन्न सावकार-महाजनाच्या घरांतील नवसाचीं लेंकरें होतीं. मुलाला अलंकार आपल्या हातें लेववून माता संतोषते, विशेषतः 'जोडी' करून ठेवणारा बाप "लेवऊनी पाहे डोळा अळंकार । टेवा दावी थोर करूनियां ॥ "[3] अशीं जीं तुकारामानें वर्णनें केलीं आहेत तीं त्याच्या बालपणांत व पुढें झालेल्या कोडकौतुकाला शोभणारीं आहेत. एकंदरींत, दूधदुभतें, खाणेंपिणें, नोकरचाकर, कपडेलत्ते इत्यादि अनेक संपत्ति-उपभोगांनीं समृद्ध असलेल्या संपन्न सुखवस्तु कुटुंबांत प्रेमळ मायबापांनीं तुकारामाचें संगोपन केलें. त्यामुळें उत्तम शरीरसंपत्तीच्या स्वास्थ्याबरोबर मातापित्यांच्या प्रेमसुखावर पोसलेलें भावनांचें समाधानही त्याला लाभलें.

मधला मुलगा म्हणून भावंडांत वाढल्यामुळें एकांतिकपणा, दुराग्रह, अहंगंड इत्यादि दोषांना त्याच्या स्वभावांत प्रवेश मिळण्याला आरंभापासूनच वाव नव्हता. उलट, नमतें नसलें तरी मिळतें-जुळतें घेण्याच्या प्रवृत्तीला बालपणचें वातावरण अनुकूळ होतें. आपलाच आग्रह नेहमींच खरा करून घेण्याइतका बलिष्ठ वरचढपणा मधल्या मुलाला साहजिकच लाभत नाहीं, व परिणामीं त्याचा स्वभाव सोशीक व सहनशील बनत जातो. निषेधाचा आघात झाला असतां तें हित मानून त्याशीं आधीं जुळतें घेण्याची पहिली नैसर्गिक प्रवृत्ति व्हावी व मागाहून विचारांतीं झगडण्याची स्फूर्ति उसळून यावी, असा

---

१ अभंग २४२.

२ अभंग २४६६.

३ अभंग ३३६७.

अनेक प्रसंगीं तुकारामाचा स्वभावगुण पुढील आयुष्यांत दिसून येतो. अभंगांच्या वह्या बुडविण्याच्या आकांताच्या प्रसंगीं स्वभावांतलें हें सत्त्व-रजांचें द्वंद्व विशेष उठून दिसतें. याचें बीज बालपणच्या त्याच्या मधल्या स्थितींत सांपडतें.

खेळगड्यांनीं त्याचा स्वभाव आणखी खेळीमेळीचा केला असला पाहिजे. तुकाराम हा स्वतःतच गुरफटलेला एकलकोंडा मुलगा नव्हता. अगदीं लहानपणीं खापराचे होन कल्पून तो खेळला असला पाहिजे; तसेंच मुलींच्या 'मंगळदायकांत' रमलाही असला पाहिजे.[१] पुढें वाढत्या वयांत गांवांतील मुलांच्या मस्तीच्या खेळांतही त्यानें भाग घेतला असला पाहिजे. खेडेगांवांत त्या काळीं मुलांस आवडणाऱ्या खेळांची त्यानें एक विस्तृत यादी दिली आहे; ती समग्र उद्धृत करण्यासारखी आहे[२]:—"बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा। खेळतां या पोरा नानामतें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ विटू दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडीं। चंपे पेंड खडी एकीबेकी ॥ छ ॥ हमामा हुंबरी पकव्याच्या बारे। खेळे जंगीभोंवरे चुंबाचुंबी ॥ २ ॥ सेलडेरा आणि निसरभोंवडी। उचली बाले धोंडी अंगवळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें बाळपण गेलें। मग तारुण्य आलें गर्वमूळ ॥ ४ ॥." यापैकीं बरेचसे खेळ तो स्वतः खेळला असला पाहिजे. केवळ पाठांतराच्या पुस्तकी ज्ञानावर ही यादी आधारलेली दिसत नाहीं. यांतील कांहीं खेळांवर त्यानें जीं रूपकें रचिलीं तीं देखील नुसतीं कविसंकेतांच्या भाषेनें सजविलेलीं दिसत नाहींत. खेळाची भाषा त्याच्या तोंडीं बसली होती, खेळ अंगवळणीं पडले होते याचें एकच उदाहरण पुरेसें होईल. शरण आल्याचें फळ आपणास मिळालें नाहीं, देवाचें पावनपण आपल्या कामास आलें नाहीं हें ठसवून सांगण्याकरितां, खेळाडूस जिव्हारीं लागणाऱ्या भाषेनें तुकारामानें शेवटीं देवास डिंवचलें कीं, "तुका ह्मणे तुह्मी खादली हो रडी। आह्मी धरली सेंडी नाम तुझें ॥." [३] रडी खाल्ली असतां खेळगड्यांत पंचाईत करून फजितखोर कोण हें ठरवून घेण्याचे अनेक प्रसंग तुकारामाच्या बालपणांत आले असतील. अशाच प्रसंगांनीं लाभालाभ आणि जयाजय सम मानण्याच्या योगसाधनेची संवय लागते, व स्वभावही ऋजु बनत जातो. या सर्व गुणांस्तव भावंडें व खेळगडी यांना पुढें तुकारामानें दत्ताच्या गुरुंप्रमाणें गुरुस्थानीं स्थापिलें असतें.

वेदविद्या शिकणें तुकारामाला शक्य नव्हतें, परंतु व्यवहारास उपयोगी पडणारी विद्या अवगत करून घेणें त्याला अत्यावश्यक होतें. म्हणून जरी अक्षरें "घोंकण्याचा" त्याला अधिकार नव्हता तरी तीं लिहावयास शिकविण्यास गांवांतील पंतोजीनें खात्रीनें नकार दिला नसता. या अर्भकाचेसाठीं पंतांनीं हातांत पाटी धरावी[४] यांत लोकविलक्षण असें कांहींच नव्हतें. गांवांतील सावकार-महाजनांच्या मुलांना इतरांपेक्षां अंक-लिपि-ज्ञानाची अधिक जरुरी वाटावी व श्रीमंतांच्या आश्रयावर अवलंबून राहाणाऱ्या पंतोजीनें त्यांना विशेष खंतीनें शिकवावें, हें अगदीं स्वाभाविक दिसतें. तुकारामाला लिहितां येत असे हें निश्चित;

१ अभंग ३००.

२ अभंग ३०८१.

३ अभंग ४१७०.

४ अभंग ४०८२.

याविषयीं दुमत असें अद्यापि कोठेंच स्पष्ट दिसून आलें नाहीं. "हातीं न धरीं लेखणी"[१] असें निर्वाणीच्या प्रसंगीं देवास निर्धारानें निक्षून सांगणारा तुकाराम बालपणींच लेखणी धरण्यास शिकला असला पाहिजे हें उघड आहे. तुकारामाच्या काव्यलेखनाच्या प्रारंभाचें वर्णन करितांना "बाळवद् अक्षरें लिहावीं पाहीं। हा मागें अभ्यास नव्हता कांहीं।"[२] असें जें महिपतीनें म्हटलें त्याचा अर्थ असा नव्हे कीं, तुकाराम बाळबोध लिपि शिकलाच नाहीं. त्या काळीं व्यवहाराच्या प्रौढबोधासाठीं, विशेषत: व्यापाराच्या व्यवहारांत, मोडी लिपीचा सर्रास उपयोग होत असे; व म्हणून तुकारामासारख्या वाणीव्यवसायांत सरावलेल्या तरुणास बाळबोध लिपीचा अभ्यास म्हणजे सराव नव्हता, एवढाच महिपतीच्या म्हणण्याचा आशय आहे.[३] असो. तुकारामास लिपीच्या नदीमुखानें वाङ्मयमहोदधींत प्रवेश करण्यास कोणत्या भाग्यवान पंतोजीनें शिकविलें, त्याची शिक्षा अक्षरश: छडीची शिक्षा होती किंवा कसें, तुकारामाचे सहाध्यायी कोण होते, अशा कितीतरी गोष्टींची माहिती मिळेल काय म्हणून आशाळभूत दृष्टीनें शोधूं पाहणाऱ्या चरित्रकाराच्या वांट्यास आतांपर्यंत निराशाच आली आहे. पंतांचा मोडी कित्ता गिरवून क्वचित् त्यांनीं वेडावांकडा पाडिलेला धडा जोडतांना पीडा अनुभवून[४] त्यांनीं शिकविलेल्या आंकडेमोडीनें व्याजाचे हिशोब मांडून, व्यवहारास लागणारें लिहिण्यावाचण्याचें व गणिताचें शिक्षण तुकारामानें बालपणीं घेतलें इतकीच काय ती निश्चित माहिती अनुमानानें आपणांस काढतां येते.

गुरूकडून तुकारामाला प्रत्यक्ष अक्षरांची ओळख घडली. त्याचप्रमाणें घरांतील नित्यपाठ व गांवांतील कथाकीर्तनें यांत अनायासें घडणाऱ्या अक्षरवाङ्मयाच्या श्रवणानें तो बहुश्रुतही झाला असला पाहिजे. दळणकांडणांत वाजणाऱ्या कांकणांच्या गजरांत गाइलेल्या छंदांनीं व गीतांना त्याला अनेकदां जाग आली असेल. दारांत तुळशीवृंदावन, देवघरांत सिंहासनावर अधिष्ठित झालेली कुळास मिळालेल्या भक्तिनिधानाची विठ्ठलमूर्ति, नित्यनेमानें पंढरीची वारी करणारा बाप, यांच्या सांनिध्यांत तो सारखा वावरत होता. विठ्ठल हें कुळीचें दैवत असल्यामुळें, व त्या मूर्तीचें गांवांत व इतरत्र महत्त्व वाढलें असल्यामुळें, चातुर्मासादि उत्सवांत नित्य व नैमित्तिक भजनें, पुराणें व कीर्तनें त्या मूर्तीसमोर चालूच असतील. विठ्ठलाच्या या पूजाअर्चेत तुकारामानें लहानपणापासून भाग घेतला असेल. घरांतील तशींच देवळांतील भजनें त्यानें नित्य ऐकिलीं असतील. उत्सवप्रसंगीं कथाकीर्तनांत बापाबरोबर तो जाऊन बसला असेल. पंढरीस जाणारे वारकऱ्यांचे मेळावे त्यानें पाहिले असतील. याप्रकारें ज्ञानदेव, नामदेव, जनी, एकनाथ इत्यादिकांचे अभंग, कबीराचे दोहे, मिराबाईचीं पदें त्याच्या कानांवरून अनेकदां गेलीं असतील. पुराणांतलि आख्यानें व भक्तांचीं चरित्रें ह्यांची माहिती आणि संस्कृत सुभाषितांची ओळख पुराणिकांनीं व कीर्तनकारांनीं त्याला करून दिली असेल. इतकेंच

---

१ अभंग २२२८.

२ भक्तलीलामृत, अध्याय ३२, ओवी ४९.

३ "बाळबध अक्षर। घडसुनी करावें सुंदर॥" असा उपदेश ब्राह्मणांना सुद्धां रामदासांना करावा लागला हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. (दासबोध, दशक १९, समास १, ओवी १.)

४ अभंग ६३९.

नव्हे तर गीता-भागवतांचेंही त्याला वारंवार श्रवण घडलें असलें पाहिजे. "कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ।। गीता भागवत करिती श्रवण । आणीक चिंतन विठोबाचें ।।"[१] हें वर्णन बोल्होबाच्या कुटुंबास सर्वथैव शोभतें. कांहींनीं समज करून घेतल्याप्रमाणें बोल्होबा "ज्ञानी"[२] नसला तरी 'आपुलिया हिता जागता' असा खचित होता. भागवत संप्रदायाचे गीता आणि भागवत हे तर दोन डोळेच होते. गीता-भागवताचें वाचन त्याकाळीं महाराष्ट्रांत बरेंच लोकप्रिय होतें.[३] तुकारामाच्या पूर्वीही गीता-भागवतांच्या पठणाचा संप्रदाय विशेषत: पुण्याच्या परिसरांत रूढ होता.[४] तेव्हां लहानपणापासून गीता-भागवतांचें श्रवण घडल्यामुळें वेदवाणी नसली तरी या ग्रंथांची देववाणी तुकारामाच्या परिचयाची झाली असली पाहिजे. तुकाराम पुढें नित्यनेमासाठीं लोकांस गीता वाचावयास सांगत असे[५] व गीतेचें त्यानें स्वत: अभंगांत भाषांतरही केलें; ती गीता बालपणींच त्याच्या मतिपथांत यावयास सुरुवात झाली होती. एवंच, तुकाराम श्रुतीचें पठण करूं शकला नाहीं तरी बहुश्रुत बनूं शकला; संस्कृत विद्या त्याला लाभली नाहीं तरी अभिजात वाङ्मयाच्या श्रवणानें त्याला सुसंस्कृत केलें; आणि सर्वांत महत्त्वाचा संस्कार म्हणजे, भक्तीचें काव्य श्रवणद्वारा व विशेषत: आचरणद्वारा त्याच्या चित्तांत संचरूं लागलें. सरस्वतीच्या या संस्कारांत लक्ष्मीचे बाजारपेठेंतील संस्कार पुढें मिसळले गेले, हें पुढील प्रकरणांत दिसून येईल. एका अर्थी साक्रेटिसाप्रमाणें तुकारामाचें सारें जीवन बाजारपेठेंत वावरणाऱ्या बहुजनांच्या संगतींत गेलें. घरचे सात्त्विक संस्कार बाजारपेठेच्या रजोगुणी वातावरणांत त्यानें आणून सोडले; पण बाजाराच्या रजोरेणूंनीं त्यानें ते मलिन होऊं दिले नाहींत, याचें कारण त्यांच्या पावित्र्यानें बालपणापासूनच त्याचें मन पावन होत चाललें होतें.

या संस्कारांना तुकारामाला परंपरेचें नकळत प्रेम जडलें. या परंपरेंत व्रतें, वारी, कुळधर्म, कुळाचार, मूर्तिपूजा, इत्यादि आर्यधर्माच्या समग्र काव्याचा समावेश झाला होता. एकादशी-सोमवारासारखीं व्रतें बोल्होबाच्या घरांत पाळलीं जात होतीं; पंढरीची वारी नित्यनेमानें घडत होती; विठ्ठलाच्या मूर्तीची पूजा अहर्निश चालली होती व तिचे उत्सव उत्साहानें साजरे केले जात होते. इतर कुळधर्म व कुळाचार नेमानें पाळले जात होते. अशा वातावरणांत वाढलेल्या मुलांना—आणि विशेषत: पुढें कर्ता झालेल्या मुलाला—परंपरेचा अभिमान वाटूं लागतो. तुकारामाच्या आयुष्यांत परकीयांना जें अगम्य वाटतें त्या परस्परविरोधी भासणाऱ्या आचरणाचें रहस्य परंपरेच्या या प्रेमांत सांपडतें. आचारधर्मांत तो सनातनीच राहिला; परंतु मानवधर्मांत सुधारकांचा अग्रणी बनला. परंपरेंत त्यानें खंड पडूं दिला नाहीं; परंतु मानवप्रेमाचें अद्वैती पाखंड त्यानें वाढविलें. या गूढाचा उलगडा बालपणांतील संस्कारांची घडी उघडूनच करतां येतो.

---

१ अभंग ३४.

२ 'मुळीं बाप होता ज्ञानी' हें अभंग ३०७६ मधील वर्णन, समग्र अभंग वाचला असतां, ज्ञानेश्वराचें आहे, बोल्होबाचें नव्हे हें उघड दिसतें.

३-४ "गुरूपदेश" आणि "बहिणाबाई व मंबाजी" हीं प्रकरणें पहा.

५ भक्तलीलामृत, अध्याय ३७, ओव्या ५६-५७.

प्रकरण सहावें

## सावकारी आणि व्यापार

सुखासमाधानाचें, खेळकर आणि शुभसंस्कारी बालपण मागें टाकून तुकारामानें त्या काळच्या कल्पनेप्रमाणें तेराव्या वर्षी तारुण्यांत प्रवेश केला. बालपणीं बापाबरोबर बाजारपेठेंतील महाजनकीच्या घरीं गेला असतां तेथील व्यवहाराची तुकारामाला थोडीशी तोंडओळख झाली होतीच; व त्या "वेव्हाराची मात" त्याच्या कानांवरून गेली होती. व्याजानें ऋण काढून चीजवस्त गहाण ठेवण्यास तेथें बोल्होबाचीं कुळें सारखीं येत होतीं. खतें, खतावण्या, रोजकीर्दा तेथें रोज लिहिल्या जात होत्या. सावकारीच्या या धंद्याबरोबर महाजनकीच्या अधिकारांत वजनमापांच्या खरेपणाची शहानिशा चालूच होती; विशेषतः 'सळे' धरून मापाचा चोखपणा नक्की केलेला तो पाहात होता. याप्रमाणें कुळांतील सावकारी-महाजनकीच्या धंद्यामुळें तुकारामाला जरी बालपणींच बाजारपेठेंतील व्यवहाराची कल्पना येऊं लागली होती तरी प्रत्यक्ष व्यवहार संभाळण्याइतका जाणतेपणा त्याला अद्यापि आला नव्हता. परंतु यापुढें तो खापराच्या होनांशीं खेळण्याऐवजीं खरे होन मिळविण्याच्या मार्गाला लागला. त्याच्या अकारण आणि निर्व्याज बालचेष्टा सुटून यापुढें व्याजाच्या आकारणींत तो गुंतला गेला.

याचें कारण असें झालें कीं, त्याचा ज्येष्ठ भाऊ सावजी यानें संसारांत मन घालून कर्तेपणाची धुरा सांभाळण्याचें नाकारलें. सावजी तेव्हां सुमारें सोळा-सतरा वर्षांचा होता, व साठीच्या जवळ आलेला बोल्होबा संसाराचा भार सावजीच्या शिरावर ठेवण्यास साहजिकच उत्सुक होता. त्यानें सावजीला जवळ बोलावून म्हटलें कीं, "आतां आमुचें वार्धक्यपण। तूं वडील पुत्र सुजाण। तरी संसारांत घालोनि मन। देणें मागणें सांभाळीं॥ पाहोनि खर्डा खतावणी। ऐवज सर्व ध्यानासि आणी॥".[१] परंतु सावजी संसारांत गुंतावयास सर्वथा तयार नव्हता. त्यानें बापाच्या चरणीं लागून आपली मनीषा कळविली कीं, "तीर्थाटणासि जावें आतां। वैराग्य चित्ता येतसे॥ परी तुह्मी माता पिता शिरीं। यास्तव गुंतोनि राहिलों घरीं। शास्त्रविरुद्ध जातां दुरी। लोकाचारीं विपरीत॥".[२] वडील मुलाची ही उदास स्थिति समजल्यावर संसाराचा शकट चालविण्यांत तुकारामाची मदत घेण्याची कल्पना बोल्होबास साहजिकच सुचली. सावजीच्या या कर्मसंन्यासानें तुकारामाला स्वधर्माचें नियत कर्म करण्याची सुसंधि तारुण्यांत पदार्पण करतांच मिळाली.

वाणीव्यवसायाचें तें कर्म कौशल्यानें करून तुकारामानें नकळत कर्मयोगाचा भरींव पाया घातला. तारुण्याला तुकारामानें 'गर्वमूळ' हें खास विशेषण लावलें आहे. यौवनांत सहज स्फुरणारा हा गर्व कर्तुम्-इच्छेचा व कर्तुम्-शक्तीचा असतो. तुकारामाच्या

१ भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या १७२-३.

२ भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या १७४-५.

या इच्छेला व शक्तीला परिस्थितीनें विशेष वाव दिला. तेरा ते सतरा वर्षांपर्यंत परिस्थिति इतकी अनुकूल होती कीं वय लहान असून सुद्धां, अनुभवी बापाच्या देखरेखीखालीं संसाराची व व्यवहाराची जबाबदारी वाहण्यांत तो तरबेज झाला, व साहजिकच त्याचा स्वाभिमान सफल झाला. उगवत्या तारुण्यांत कर्तबगारीला भरपूर वाव देणारी परिस्थिति असली तर सळसळणारी नवी शक्ति बहरून फलद्रूप होते, व मग तारुण्याचा मद शमून बुद्धीला स्थैर्य येतें. या मदाच्या वेषाचें तुकारामानें "अठोनी वेठोनी बांधला मुंडासा।" व "हातीं दीडपान वरती च मान।"[1] असें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. तुकारामाला या वेषांत पाहून बोल्होबाला आधींच कौतुकाचें समाधान झालें असेल, व त्या समाधानांत ही भर पडली कीं वैश्य व्यवसायांत तो "सर्वार्थी निपुण" झाला. "सोयरे धायरे इष्टमित्र। ह्मणती बोल्होजीचा दक्ष पुत्र। त्याज देखतां संसार। आवरिला साचार तयानें॥...तुका दक्ष संसारिक दिसे। वयही नसे फार त्याचें॥ ऐशारीतीं सोयरे जन। मागें पुढें करिती स्तवन। ऐकोनि बोल्होबाचें मन। समाधान पावतसे॥."[2] याप्रमाणें सावजीच्या सावटींत खुंटून खुरटी न होतां तुकारामाच्या तारुण्यांतील उत्साहाची स्वतंत्र वाढ व्हावी असा दैवी संकेत होता. त्या संकेताप्रमाणें प्रपंचाच्या आसक्तींत ती नवचेतना बद्धमूल झाली. प्रपंचांतून परमार्थ साधण्याच्या अनासक्तियोगाची पहिली पायरी कर्मकौशलानें घडविली जाते. "आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते।" ही कर्मयोगाची कारणपरंपरा श्रीकृष्णासारख्या कर्मयोग्यांच्या मुकुटमणीनें स्वानुभवानेंच सांगितली असली पाहिजे.

लक्ष लावून एकाग्रतेनें कोणतेंही काम करणें यालाच कौशल किंवा दक्षता म्हणतात. दक्षता हा तुकारामाचा देहस्वभाव होता. या आंगच्या दक्षतेला आरंभींच बापाकडून योग्य दीक्षा मिळाल्यामुळें तुकाराम तात्काळ सर्वार्थी निपुण झाला यांत नवल नाहीं. भांडवलाच्या गांठोळीबरोबर त्याहूनही बहुमोल असें आपल्या यशस्वी जीवनांतील व्यवहारज्ञानाचें गाठोडें बोल्होबानें तुकारामाच्या हवालीं केलें. बापाच्या या थोर उपकारांची आठवण तुकारामानें हृदयांत कृतज्ञतेनें जतन करून ठेविली होती. खुद्द देव आपला कसा सांभाळ करितो याचें पुढें वर्णन करितांना त्याला संसाराच्या आरंभीं पित्यानें केलेल्या प्रतिपाळाची उपमा आठवली, या एकाच दाखल्यानें त्यानें आपली सारी कृतज्ञता दाखविली आहे. तो उल्लेख स्मरणीय आहे :—"लेकरा आईतें पित्याची जतन। दावी निजधन सर्व जोडी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ त्यापरि आमचा जालासे सांभाळ। देखिला चि काळ नाहीं आड ॥छ॥."[3]

कल्पना नसतां, अकस्मात् मिराशीचा वारसा देऊन बापानें आपल्या पंखाखालीं रक्षण करीत करीत स्वतःच्या पंखांनीं आपणास कसें उडावयास शिकविलें याचें तुकारामानें अन्यत्र असें वर्णन केलें आहे कीं—"बाप करी जोडी लेंकराचे ओढी। आपुली करवंडी वाळवूनी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ एकाएकीं केला मिरासीचा धनी। कडिये वागवूनी भार खांदीं ॥छ॥ लेवऊनी पाहे डोळा अळंकार। टेवा दावी थोर करूनियां ॥ २ ॥ तुका ह्मणे नेदी गांजूं आणिकांसी। उदार जीवासी आपुलिया ॥ ३ ॥."[4]

१ अभंग ३०८२. २ भक्तलीलामृत, अध्याय २६, ओव्या १८४-८७.
३ अभंग ८३७. ४ अभंग ३२६७.

ज्या पैतृक धनाच्या मिराशीचा या प्रकारें तुकाराम अनायासें स्वामी झाला तें बरेंचसें सावकारीनें जोडलेलें होतें. महाजनकीच्या वाड्यांत मुख्यत्वें सावकारीचा व महाजनकीचा व्यवहार चालत असे. अभंगांत इतस्ततः विखुरलेले वर्णनाचे भिन्न उल्लेख जुळवून या काळांतील तुकारामाच्या व्यावसायिक जीवनाचें आपणांस एक अभंग आलेख्य बनवितां येईल. दागिन्यांच्या तारणावर कुळें कर्ज काढावयाला आलीं आहेत. त्यांनीं आणिलेल्या चीजवस्ता नीट तपासून पारखून घेतल्या पाहिजेत. "सोनें दावी वरी तांबें तयापोटीं। खरियाचे साटीं विकूं पाहे।",[1] असे ठक होतेच. त्यांच्या या 'मुलाम्याच्या भ्रमानें' बिलकूल फसतां कामा नये. योग्य भाव आकारून कर्ज किती द्यावयाचें हें ठरविलें पाहिजे. या "निक्षेपिल्या धनाचें" डोळ्यांत तेल घालून रक्षण केलें पाहिजे; नाहींतर सावकारीच्या सान्या पतीवर पाणी पडावयाचें. दुसरे कोणी जामिनावर किंवा जमिनीवर कर्ज उभारावयाला आले आहेत. आधील बाकी किती, ती झडली किंवा कसें, नवी उचापत किती मागतात, याचा हिशेब करून त्यांना खतांत व्यवस्थित गुंतविलें पाहिजे. चारचौघांची साक्षी घालूनच हा व्यवहार केला पाहिजे. बहुतांची अशी ग्वाही घातलेला "महजराचा" लेख जर मुळांतच असला तर पुढें चौवाचाराची कटकट करावयास नको. कर्ज दिल्यानंतर, रोजकीर्दी, जमा, खतावण्या, सालझाडा इत्यादि झाड्यापाड्याचें लिगाड कायमचें मागें लागावयाचेंच. "रोजकीर्दी होतां झाडा। रोकडा चि पर्वत ॥."[2] हिशेब चोख ठेविले पाहिजेत; अर्थात् ताळमेळवणी बिनचूक झाली पाहिजे. कितीतरी वेळां "चुकलिया ताळा। वाती घालुनि बैसे डोळां।"[3] अशी तुकारामाची स्थिति झाली असेल. पुढें ब्रह्मानंदीं टाळी लागण्याच्या साधनेंत ही ताळ्याची रंगलेली तालीम एकनाथाप्रमाणें तुकारामालाही उपयोगी पडली असावी! सावकारीबरोबरच स्वतःच्या व पेठेंतील इतरांच्या व्यापाराची व्यवधानें सुद्धां तरुण तुकारामास सांभाळावीं लागत होतीं. हाटाचे, पेठेचे व्यवहार व तंटेनिवाडे[4] महाजनाकडे येतच असावयाचे. वजनमापाच्या खरेपणाची खातरजमा महाजनाशिवाय कोण करणार? पुढें महाजनकीची अर्थार्जनाची वृत्ति जरी सोडून दिली तरी सत्य प्रस्थापित करणाऱ्या महाजनाच्या या कर्तव्याचा अभिमान तुकारामानें सोडला नाहीं. हरीभक्तीच्या पेठेंत सुद्धां तो सादावून सांगत असे कीं—"तुका ह्मणे माप। खरें आणा माझे बाप॥".[5] अन्यत्र तो छातीठोकपणें सवाल टाकतो कीं—"तुका ह्मणे माझे हातींचें वजन। यासी बोल कोण ठेवूं सके॥?"[6] वजनमापासारख्याच जकाती-कौल-विसार इत्यादि कटकटींची निवृत्ति करणें हा सुद्धां महाजनाच्या वृत्तीचा एक महत्त्वाचा भाग होता; त्यांतही तुकारामाला भाग घ्यावा लागे. एवंच, महाजनकीच्या वाड्यांत या असल्या "व्यापारचावटींत" दिवस निघून जात असे. कधीं सावकारीच्या वसुलीकरितां बाहेर कुळांच्या घरीं जावें लागे. तेव्हां निराळाच अनुभव येत असे. "हिशोबें तें आलें घ्यावें। हें तों ठावें सकळांसी॥"[7] असें जरी असलें तरी वेळेवर देणें देणारीं कुळें विरळा. "जेथें मुदल न ये हातां। व्याज मरावें लेखितां॥"[8] अशा नापाक कुळांबरोबर हिशोबाचे खटखटे

१ अभंग ९४६. २ अभंग २८०४. ३ अभंग २७५७.
४ पहा अभंग १०९०. ५-६ अभंग १०४१, ३४८५. ७-८ अभंग ९६२, १२२५.

काय कामाचे? या चुकार ऋणकोंशीं हुज्जत घालावी लागे; कचित् धरणें धरून बसावें लागे; कधींकधीं हात धरून त्यांस दिवाणांत न्यावें लागे. हे सारे डाव खेळण्यांत तो हळूहळू तरबेज होत होता. त्याच्या व्यवसायाची भरभराट होत होती; कारण त्याचें हें सदाचें ब्रीदवाक्य होतें कीं—"तुका ह्मणे आह्मी नव्हों फजितखोर। तुटीचा व्यापार करावया ॥."[१]

या चार वर्षांत व पुढें दिवाळें निघेपर्यंत केलेल्या व्यवसायामुळें तुकारामाच्या मनोवृत्तींना कसें वळण लागलें, व त्याच्या वाणींत कोणता ध्वनि आला याचा थोडासा शोध करणें मोठें उद्बोधक ठरेल. या व्यवसायांतील अनुभवामुळें सावकारीचा त्याला कसा किळस आला, व संपत्ति या संस्थेची अनर्थमूलक खरी उपपत्ति त्याला कसी उमगली, याचा पुढें स्वतंत्र विचार करावयाचा आहे. या ठिकाणीं मनोवृत्तींना व्यवसायानें पाडलेले पीळ उकलावेयाचे आहेत. पहिलाच पीळ सत्याच्या कधीं न सुटणाऱ्या गांठीनें घट्ट केला गेला. व्यवहाराची व विशेषतः व्यापाराची भरभराट असत्याच्या प्रतिष्ठेवर आधारली आहे असाच अनेकांचा प्रचलित समज आहे. वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. सत्याला सोडून व्यवहारांतलें कोणतेंच पाऊल टाकतां येणार नाहीं; आणि ज्यानें सत्याचा आधार सोडला त्याचा धंदा अंतीं अधोगतीला जावयाचाच. कराराशिवाय व्यापार नाहीं; आणि कराराची सारी मदार सत्यावर. बाजारपेठेंतले सारे सौदे सत्याच्या विश्वासावर चालतात; सोद्यांनीं कचित् केलेल्या फसवणुकींनीं, अपवादानें नियमासारखा हा सिद्धांत नित्य प्रस्थापित होत असतो. गिऱ्हाइकांना फसवूं पाहाणारे व्यापारी आपापसांत परस्परांकडून सत्य कसोशीनें पाळून घेत असतात. व्यापाराचा सारा कायदा प्रतिज्ञेवर प्रतिष्ठित आहे. साध्या फळभाजीच्या बाजारपेठेंत सुद्धां एकदा 'हात्या' होऊन सौदा पटला म्हणजे कितीही खोट आली तरी खोटें करावयास व त्या मूक सत्याची हत्या करावयास कोणी धजत नाहीं. व्यापाराच्या सत्यनिष्ठेवर तुकारामाचा मोठा कटाक्ष होता. सत्याचा हा आग्रह व्यवसायाच्या अनुभवानें बळावला होता. वादपटूंच्या घटपटाच्या भाषेपेक्षां हाटपेठेच्या रोकठोक भाषेनें तो हरिभक्तीचें अद्वैत समजावून सांगत असे; व त्या भाषेंत सत्यावर उदात्तत्वाचा भर होता. त्याची वैखरी सारखी खऱ्याचाच जप करीत असे. खरें भांडवल, खरें वित्त, खरें माप, खरें वजन ह्यांच्याच उपमा त्याच्या अभंगांत सारख्या उमटतात. "खरें भांडवल सांपडलें गांठी। जेणें नये तुटी उदमासी।"[२]; "मोटळें हाटीं सोडिल्या गांठी। विकऱ्या घातले कण।......खरें माप हातीं घेऊनि बैसलों। मानिती ते चौघे जन। खरें वित्त तेथें आले चोजवीत। गिऱ्हाइक संतजन॥"[३]; "तुका ह्मणे खोटें गुंपतां विसारें। हातिंचिया खरें हातीं द्यावें॥;"[४] "घेतों खऱ्या मापें। तुका देखोनियां सोपें॥;"[५] "बरवे दुकानीं बैसावें। श्रवण मनन असावें ॥१॥ ॥ ध्रु. ॥ सारअसाराचीं पोतीं। ग्राहिक पाहोनि करा रितीं ॥ ध्रु ॥ ... सत्य तराजू पैं धरा। नका कृत्रिम विकरा ॥३॥ तुका जाला वाणी। चुकवुनि चौऱ्यासीच्या खाणी ॥४॥"[६]. आपल्या वाणीपणाप्रमाणें नांवावर सुद्धां त्यानें

१ अभंग ४३४६. अभंग १३९७, १७०९, २२६२, २२९० यांत सुद्धां हाच व्यवहारधर्म आहे.
२ अभंग ८९०. ३ अभंग ३२८९. ४-५-६ अभंग २०८९, २८९८, ४०५२.

कोटीनेंच सत्य चढविलें आहे: " तुके तरि तुकीं खऱ्याचे उत्तम । " ![1] व्यापाराइतकेंच सावकारींत सत्य लागतें हें त्याला पटलें होतें. दागिना गहाणांत ठ्यावयाचा असेल तर तो जायांचा नसून खऱ्या मालकीचा, मुलाम्याचा नसून खऱ्या सोन्याचा पाहिजे या सत्याच्या पायावर सावकारीची उभारणी असते याची त्याला जाणीव होती. ठेवलेला ठेवा अभिलाषानें बुडविणें म्हणजे धंदाच बुडविणें होय हा निर्बंध जसा सावकारास पाळावा लागतो, तसाच " चौघांचिया मतें । आधीं खरें केलें होतें ॥ "[2] हा साक्षीच्या व्यवहाराचा मूळचा लेख कुळावर बंधनकारक आहे असें तो मानीत असे. अर्थातूच " आलें तें हिशोबें अवघिया प्रमाण "[3] अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. तो या व्यवहाराकडे सत्यप्रतिज्ञेच्या दृष्टीनें पाहावयास शिकला होता. सत्यसंधेवांचून सावकारींत गत्यंतर नाहीं अशी त्याची खात्री झाली होती. याप्रमाणें व्यवहाराच्या स्वानुभवानें पूर्वाश्रमींच सत्य आत्मसात् केल्यामुळें पुढें संतपणीं " सत्य तेंचि परब्रह्म " हा साक्षात्कार त्याला सहज झाला. बोलांत, चालींत, 'बोले तैसा चाले' या सत्यव्रतांत, त्याचें समग्र जीवन ओतप्रोत सत्यधर्मी झालें. ह्या सत्यविस्ताराचीं मूळें चिखल मानल्या गेलेल्या सावकारींत व व्यापारांत पोसलीं गेलीं होतीं. व्यवसायांतून अनायासें जीवन घडतें तें असें. साक्रेटिसाप्रमाणें तुकारामानें बाजारपेठेंत तत्त्वज्ञान आणिलें ; पण बाजारपेठेंतून सत्य तत्त्वज्ञानांत आणून सोडणारा असा दुसरा सुकृती तत्त्वज्ञानी विरळाच सांपडेल.

महाजनकीच्या व सावकारीच्या व्यवसायानें त्याला केवळ सत्याचीच नव्हे तर सत्याचा आग्रह धरण्याची संवय जडली. जो व्यवहार मुळांतच साक्षीनें निवडला होता, जो चौघांच्या मतें खरा केला होता, तो दिवाणांत नेऊन आपल्या बाजूनें निवाडा करून घेण्यांत तो सराईत झाला होता. त्याच्या तोंडीं दिवाणाची, चौघांच्या मतांची, निवाड्याची भाषा रुळली होती, म्हणून पुढें अभंगांत त्याच्या मुखीं ती तशीच खेळत राहिली. धंद्यामुळें सत्याकरितां व न्यायाकरितां भांडण्याचा त्याला सराव पडला. आपला दावा खरा असला म्हणजे कुळाच्या दारांत पोट बांधून धरणें धरण्याचा व तुझ्यावर हत्या घालीन असा त्रागा करण्याचा आपणास अधिकार आहे असा सावकारीच्या शिरस्त्यानुसार त्यानें आपला ग्रह करून घेतला होता. आपली बाजू खरी असली म्हणजे पांचामुखांतला परमेश्वर त्या सत्याला अनुसरूनच निवाडा देईल हा त्याचा विश्वासाचा भाव होता. म्हणून पुढील आयुष्यांत निवाड्याचे प्रसंग कोणी आणिले तर त्यांना तोंड देण्यांत तो बिलकूल डगमगत नसे ; किंबहुना त्यांचें तो स्वागतच करी. उपवास, धरणें, निवाडा हा सत्याग्रहाचा सर्वांत परिणामकारक प्रकार कवित्व बुडविलें त्या प्रसंगीं झाला. त्याचें स्वतंत्र व विस्तृत वर्णन पुढें येईलच. त्या सत्त्वपरीक्षेच्या मागें मनाचा कोणता निर्धार कारणीभूत झाला याचीं सूचक अशीं दोनतीन वचनें या विवेचनाशीं जोडलीं म्हणजे पुरे. (१) " करूं कवित्व काय नाहीं आतां लाज । मज भक्तराज हांसतील ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ आतां आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विरसला ॥छ॥"; (२) " अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों ॥"; (३) " तेरा दिवस झाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥ १ ॥...तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥ २ ॥".[4]

१ अभंग ३७८७. २ अभंग २२५०. ३ अभंग ५०९. ४ अभंग २२२४, २२४४, २४९३.

सावकारी, महाजनकी व व्यापार यांचे जसे तुकारामाच्या मनावर, तसे त्याच्या भाषेवरही कधीं न लोपणारे असे संस्कार झाले. तुकारामाचा व्यवसाय आपणांस जरी ठाऊक नसता तरी हा वाण्याची वाणी इतकी सहज बोलतो यावरूनच तो वाणी होता याचा अनायासें वाचकांस ठाव लागला असता. चिनी मातीच्या वस्तूंवर आधीं चित्रें काढतात, व मग तीं आगींत तावूनसुलाखून निघालीं म्हणजे उठावदार व टिकाऊ होतात. त्याप्रमाणें वाणीव्यवसायाचे संस्कार पूर्वाश्रमांत तुकारामाच्या चित्तावर चितारले गेले. मागाहून वैराग्याच्या धगधगितोज्ज्वाळ वह्नीच्या दाहानें व भक्तीच्या वोपानें ते आणखी डोळ्यांत भरूं लागले. भक्तीच्या अभंगांतील निवडून काढलेले, बाजरपेठेच्या, दुकानाच्या, महाजनकीच्या भाषेच्या चित्र-काव्याचे अनेक नमुने आतांपर्यंत दिले आहेत. पण विशेष डोळ्यांत भरतें तें हें, कीं विठोमाउलीपाशीं लडिवाळ बाळासारखा सारखा छंद घेणारा तुकाराम तसाच वारंवार ऋणकोधनकोच्या भांडणाच्या भाषेंत हुज्जत घालत असतो; जणूं काय सावकारी अद्यापि त्याच्या भाषेंत भिनून राहिली आहे. दोनतीन उदाहरणें पुरेशीं होतील :—

(१) "आमचा तूं ऋणी ठायींचा चि देवा । मागावया ठेवा आलों दारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वर्म तुझें आह्मां सांपडलें हातीं । धरियेले चित्तीं दृढ पाय ॥ छ ॥
बैसलों धरणें कोंडोनियां द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं नेदी ॥ २ ॥
तुज मज सरी होइल या विचारें । जैंळो भांडखोरें निलाजिरीं ॥ ३ ॥
भांडवल माझें मिरविसी जनीं । सहस्र वोवणी नाममाळा ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी केली जिवें साटी । तुह्मां आह्मां तुटी घाल्लूं आतां ॥५॥"[१]

(२) "कासया लागला यासी चौघाचार । मुळींचा वेव्हार निवडिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ग्वाही बहुतांची घालूनियां वरि । महजर करीं आहे माझ्या ॥ छ ॥
तुह्मां वेगळा लागें आपल्या च ठायीं । होतें करुनि तें ही माझें माझें ॥ २ ॥
भांडण सेवटीं जालें एकवट । आतां कटकट करूं नये ॥ ३ ॥
ठेविला ठेवा तो आला माझ्या हाता । आतां नाहीं सत्ता तुज देवा ॥ ४ ॥
तुका ह्मणे वांयांविण खटपटा । राहिलों मी वांटा घेऊनियां ॥ ५ ॥"[२]

(३) "भक्तिऋण घेतलें माझें । चरण गाहाण आहेत तुझे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम व्याज देईं हरी । माझा हिशेब लवकरी करीं ॥ छ ॥
माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्त्तन ॥ २ ॥
तुझे नाम आहे खत । सुखें करीं पंचाईत ॥ ३ ॥
तुका ह्मणे गरुडध्वजा । यासी साक्ष श्रीगुरुराजा ॥ ४ ॥"[२]

---

१ अभंग २२६७. २ अभंग ३३९८, ४३२०.

प्रकरण सातवें

## यौवन आणि संसार

व्यवसायांत सर्वार्थी निपुण होत असलेला तुकाराम घरच्या संसारांत कसा वावरत होता हें जाणण्याची सामान्य वाचकास साहजिकच इच्छा होते. सामान्यांतलें असामान्यत्व शोधून काढण्यांत कवी व विज्ञानी रंगलेले असतात; तर असामान्यांतील सामान्यत्वाशीं संबंध जोडून आपलेपणाचें नातें प्रस्थापित करण्यांत सामान्य मनुष्यास समाधान वाटतें. म्हणूनच संसार कडू वाटण्यापूर्वीं तुकारामानें तो गोड कसा करून घेतला होता, हा स्थितधी संसारधी असतानां त्याची चालचलणूक कशी होती, हें कुतूहल उपलब्ध माहितीच्या आधारें पुरें करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

त्या काळच्या रिवाजाप्रमाणें तुकारामाचें बाळपणींच लग्न झालें होतें. ही त्याची पहिली बायको लोहगांवच्या मोझे घराण्यांतील, म्हणजे बहुधा मामाच्या घराण्यांतील, होती व तिचें नांव रखुमाबाई होतें, अशी परंपरागत माहिती आहे. तुकारामाच्या दोन भावांची लग्नें त्याच्या लग्नाबरोबर किंवा थोडीं पुढेंमागें झालीं असतील. महिपतीच्या म्हणण्याप्रमाणें हे सर्व विवाह बहुत द्रव्य खर्चून यथास्थित केले होते; व धनसंपदा पाहून थोर थोर सोयरे झाले होते. तुकाराम संसारांत लक्ष घालूं लागला तेव्हां त्याचे आईबाप, थोरला व धाकटा भाऊ व त्यांच्या बायका, स्वतःची बायको, कदाचित् बहिण व आणखी कांहीं नातेवाईक, अशी मंडळी या एकत्र कुटुंबांत नांदत होती. दासी-कामारी-राबत होत्या. गुरेंढोरें व धनधान्य यांची समृद्धि होती. कुळाचार व कुळधर्म व्यवस्थित पाळले जात होते.

उपलब्ध पुराव्यावरून तुकाराम या तारुण्यांतील काळांत सद्वर्तनी होता हें गृहीत धरावयाला कोणताच प्रत्यवाय नाहीं. असें असून सुद्धां कांहीं शिष्ट लेखकांनीं प्रच्छन्नपणें किंवा उघडपणें आपल्या पातळीवरून त्याच्या तरुणपणींच्या चारित्र्यावर चिखल फेंकण्याचा प्रयत्न केला आहे. आपण त्यांच्या मिथ्यारोपांचा पुनरुच्चार करून वाचा विटाळावयाचें टाळावें असें सर्वसामान्य वाचकाप्रमाणें मलाही वाटणें स्वाभाविक आहे. "न केवलं यो महतोऽपभाषते शृणोति तस्मादपि यः स पापभाक् ।". परंतु हें पाप पत्करून सुद्धां खोट्या आरोपांचें निराकरण करणें हें चरित्रकाराचें पवित्र कर्तव्य होय.

त्या काळच्या तरुणांचें दुर्वर्तन कोणत्या प्रकारचें होतें याची कल्पना तुकारामाच्या प्रासंगिक वचनांवरून करतां येते. जगाच्या आरंभापासून माणसांच्या दुराचाराच्या तोंडवळ्यांत विशेषसा फेरबदल झाला नाहीं. देशकालवर्तमानाप्रमाणें रूपरंगांत काय तो फरक होतो. दारू, जुगार व व्यभिचार या कलीच्या त्रिमूर्तीचे उपासक सर्वदा सांपडतात. तुकारामाचा काल याला अपवाद कसा असणार? पुढें तुकारामानें सोंगटी-सारीपाटांसारख्या

निष्पाप खेळांचा[१] किंवा गोपिकावस्त्रहरणासारख्या[१] नाटकांच्या करमणुकीचा देखील निषेध केला आहे. कदाचित तरुणपणीं याचा विधिनिषेध त्यानें मानला नसेल. मद्यद्यूतादि दुर्व्यसनांचा प्रसार त्याला सभोंवतालीं दिसत होता. "खेळे द्यूतकर्म । मग बोंबली जुलूम ॥"[२] असल्या शहाण्यांना तो ओळखीत होता. "भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ॥"[३] असले "गाढवाहुनी हीन नर" आसमंतात् वावरत होते. चाट[४] मेळवून सुरापान करणारे इतरे जन तर होतेच; व यथासांग मद्यपान करणारे ब्राह्मणही होते. "वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विषयीं भांड ॥ तुका ह्मणे किती करावे फजित । ते चि छंद नित्य बहु होती ॥".[५]

स्वत: तुकारामाला तारुण्यांत यांतले कोणतेही छंद होते काय? महाराष्ट्र-सारस्वतकार भावे पुढें शब्दप्रवाहांत 'थोडे ज्यास्त वाहवले'[६]; परंतु अगदीं आरंभींच त्यांनीं सहज ओघांत येऊन लिहिलें कीं "(तुकारामाच्या) मनानें संसाराची बाजू साफ सोडली व तें तेथून मुरडून ईश्वरचरणांकडे वळलें. पूर्व वयांतील वृत्ति पार पालटून गेली आणि जुने छंदही सर्व सुटले. 'परद्रव्य परनारी। झाली विषाचिये परी ॥'"[७]. अवतरणाच्या संनिकर्षावरून जो निष्कर्ष निघतो त्यावरून भाव्यांच्या पोटींचा भाव प्रगट होतो. "सम दृष्टि अने तृष्णा त्यागी, परस्त्री जेने मातरे । जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झलि हाथरे ।"[८] हें वैष्णवजनांचें वर्णन आतां हिंदुस्थानांत आपल्या परिचयाचें झालें आहे. वैष्णवजनांच्या या परंपरेला अनुसरून तुकारामानें जीव तोडून वारंवार विनविलें आहे कीं "इतुलें करीं भलत्या परी। परद्रव्य परनारी। सांडुनि अभिलाष अंतरीं । वर्त्ते वेव्हारीं सुखरूप ॥"[९]. ख्रिस्ताप्रमाणें या बाबतींत त्याचा अभिलाषावर अधिक कटाक्ष असे. परस्त्रीला तोंडानें सगळेच माता म्हणतात; परंतु "परस्त्रीतें म्हणतां माता। चित्त लाजवितें चित्ता।" हें सामान्य माणसाच्या मनांतलें "कानकोंडें" तो पुरतें ओळखून होता.[१०] म्हणूनच हा अभिलाष टाकून, तें विष कल्पून, याच नीतीनें सर्वांनीं देव जोडावा, "आणीक ते आटी न लगे कांहीं।," असें तो अट्टाहासानें सांगत असे.[११] जो अभंग भंगून त्यांतील एक ओळ भाव्यांनीं आपल्या भावार्थाच्या 'ओळींत' बसविण्याचा प्रयत्न केला त्याचा उद्दिष्ट हेतु आत्मचरित्र सांगण्याचा नसून, जो देवार्पण झाला त्याचे पापपुण्याचे श्रम आपोआप चुकतात हें सांगण्याचा आहे. या असल्या वचनांचा संदर्भ तुकारामाच्या पूर्वाश्रमींच्या जीवनाशीं विपरीत विधीनें जोडणें म्हणजे रामाचा मरा करण्याची करामत करणें होय.

तुकारामाला पूर्वाश्रमीं कुकर्मकर्तृत्व चिकटविणाऱ्या या भावे-प्रयोगाचें दुसरें रूप जरा अधिक स्पष्ट आढळतें. 'तुकारामबुवांचा अस्सल गाथा', या पुस्तकाच्या पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत भावे लिहितात[१२]:—"वास्तविक पाहतां 'माझीया मीपणां वरी पडो पाशाण'

१ अभंग ३०७, १२६८. २ अभंग १६२०. ३ अभंग ५९९. ४ अभंग २८९६.
५ अभंग ९०४. ६ महाराष्ट्र-सारस्वत. भाग पहिला (आवृत्ति तिसरी, शके १८४६), पृ. ३३८.
७ कित्ता, पृ. ३२४. ८ नरसी मेहेत्याचें प्रख्यात पद. ९ अभंग ६६१. १० अभंग १६१७.
११ अभंग ६१. १२ पृ. २०.

या अभंगांतील 'काया वाचा मनें अघटीत करनें : चर्मचक्षु हात पायें : नींदा द्वेश घात : विस्वासी वीभचार : लक्षीमी मद मात घडले मांहां दोश : पत्नी दोन भेदाभेद : पत्रिवचनी घडली अवज्ञ्या : आवीचार : कुटळ कुचर वादी नींदा : वीषवी लंपट हीणा :, इत्यादि स्वत:संबंधींच्या उल्लेखांवरून तुकोबा पूर्ववयांत थोडेसे वाहवलेले असावे, अशी कल्पना कोणाच्याहि मनांत यावी, व 'परस्त्री आतां मज माते समान' (अस्सल गाथा पृ. ११९ अ. ६३८) या अभंगांतील शब्दांची खोंच लक्षांत येऊन ती कल्पना दृढ व्हावी; आणि मनुष्य कोणत्याहि वृत्तीचा असला तरी पश्चात्तापाच्या धगधगीत ज्वालांनीं त्याच्यांतील सर्व हिणकस भाग जळून जाऊन तो पूर्णपणें शुद्ध होऊं शकतो, व सर्व जगाला वंद्य ठरून, अत्युच्च पदाला जाऊन पोंचूं शकतो, हा उत्तम धडा मनानें शिकावा. पण असें कांहींच होत नाहीं. भक्तीच्या प्रेमाश्रूंनीं भरून गेलेल्या डोळ्यांना या अभंगांत कांहींच दिसूं शकत नाहीं. आणि मन या अभंगांपासून हा धडा पढूं जाणत नाहीं. भक्तीच्या आणि श्रद्धेच्या परंपरेनें मन एका चकारींत खिळून गेलें, व त्यानें चिकित्साबुद्धीला एकदां रजा दिली, म्हणजे काय प्रकार घडूं शकतात याचें हें एक मीं उदाहरण दिलें, इतकेंच; पण या माझे लिहिण्याचा भलताच अभिप्राय घेऊन, तुकारामांत कांहीं अवगूण होते, किंवा त्याचें साधुत्व कमी दर्जाचें होतें असें मला वाटतें असा कोणींहि आपला समज करून घेऊं नये". याच अभंगाचा आधार देऊन इतरांनीं मूळच्या 'खोचींत' आपल्या अंतरींच्या अधिक खुणा घालून त्यांतील 'धडा' गिरवून तो सहज पढतां यावा म्हणून डोळ्यांत भरण्यासारखा मोठा ढोबळ केला आहे. पहिल्या बायकोच्या तथाकथित व्याधीचा खोटाच बोभाटा करून, बाप अनुकूल नसतां तुकारामानें 'कामलालसेनें' दुसरी बायको मिळविली असावी असा 'बळकट संशय' गद्रे यांना याच अभंगावरून आला; त्याचा विस्तारानें पुनरुच्चार[1] करण्याची आवश्यकता नाहीं. तुकारामाच्या या अभंगांत त्यांच्या मतें प्रतिबिंबित झालेल्या वर्तनाचें गद्र्यांनीं "ऐन पंचविशींतील व पुढीलही बहुतेक चाळे" असें वर्णन केलें आहे.[2]

ज्या अभंगाचा हे चिकित्सकबुद्धीचे विद्वान् असा आधार घेतात तो या ठिकाणीं "अस्सल" गाथेबरहुकूम आधीं उद्धृत करितों[3]:—

"माझीया मीपणांवरी पडो पाशाणं : जळो हे भुशणं : नाम माझें : ॥
पापा नाही पार दुषाचे डोंगर : जालों ये भुमीस वोझें : ॥ १ ॥
॥ धृ ॥ काये वीटंबना सांगो कीती : पाशाण फुटती : यैसें दुष :
नरनारी सकळ : उतम चाडाळ : न पाहाती माझें मुष : ॥ छ ॥
कायावाचामनें : अघटीत करनें : चर्मचक्षु हातपायें :
नींदा द्वेश घात : वीस्वासी वीभचार : आंणीक सांगों कीती काये : ॥ २ ॥

---

१ पृ. ४१—४२ पहा.  २ गद्रे, पूर्वोल्लेखित लेख, पृ. १०९.

३ तुकारामबुवांचा अस्सल गाथा, भाग १, पृ. ६४, अभंग ३५६. (प्रस्तुत गाथेंतील अभंग २८३५).

लक्षीमी मद मात घडले मांहां दोश : पत्नी दोन भेदाभेद :
पीत्रुवचनी घडली अवझ्या : आवींचार : कुटळ कुचर वादी नींदा : ॥ ३ ॥
आणीक कीती सांगों तें अवगुण : न वळे जीव्हा कांपें मन :
भुतदया उपकार : नाही शब्दाधी : र : विशवी लपंट हीणा : ॥ ४ ॥
संत मानभाव आईका ही उतरे : अवगुण आईचार : वृधी पापा :
तुका ह्मणे सरतें करा पांडुरंगी शरण आलों : माये बापा : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥"

अनुतापाच्या मनोवृत्तींत लिहिलेला दुसरा एक एतद्विषयक अभंग[1]—ज्याची इतरांनीं खास दखलगिरी घेतलेली दिसत नाहीं—परिपूर्णतेच्या दृष्टीनें समग्र उद्धृत करणें आवश्यक आहे.

"मी तंव अनाथ अपराधी। कर्महीन मतिमंदबुद्धी।
तुज म्यां आठविलें नाहीं कधीं। वाचे कृपानीधी मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं ऐकिलें गाइलें गीत। धरिली लाज सांडिलें हित।
नावडे पुराण बैसले संत। केली बहुत परनिंदा ॥छ॥
केला करविला नाहीं उपकार। नाहीं दया आली पीडितां पर।
करूं नये तो केला व्यापार। वाहिला भार कुटुंबाचा ॥ २ ॥
नाहीं केलें तीर्थांचें भ्रमण। पाळिला पिंड करचरण।
नाहीं संतसेवा घडलें दान। पूजावलोकन मुर्तीचें ॥ ३ ॥
असंगसंग घडले अन्याय। बहुत अधर्म उपाय।
न कळे हित करावें तें काय। नये बोलूं आठवूं तें ॥ ४ ॥
आप आपण्या घातकर। शत्रु जालों मी दावेदार।
तूं तंव कृपेचा सागर। उतरीं पार तुका ह्मणे ॥ ५ ॥"

याच्याच जोडीला तुलनेसाठीं कान्होबाच्या नाटाच्या अभंगांतील[2] एक उतारा विचारांत घेतला पाहिजे; तो असा :—

"देवा मी चांडाळ चांडाळ। ह्मणतां लागताहे वेळ।
नसे पाहातां भूमंडळ। ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥ १ ॥...
निंदा द्वेष घात विश्वास। करितां नाहीं केला आळस।
करूं नये ते केले संतउपहास। अभक्ष तें ही भक्षिलें ॥ ५ ॥
पाळिलें नाहीं पितृवचन। सदा परद्वारीं परधनीं ध्यान।
बोलों नये घडलें ऐसें अन्योन्यविण। दासीगमन आदिकरूनी ॥ ६ ॥
कायामनें वाचाइंद्रियांशीं। सकळ पापांची च राशी।
तुकयाबंधु ह्मणे ऐसियासी। आलों हृषिकेशी तुज शरण ॥ ७ ॥"

तुकारामाच्या ह्या अभंगांतील पापांचें चित्रण इतकें भडक कां दिसतें हें कळण्यासाठीं त्या अभंगांची मनोभूमिका नीट न्याहाळून पाहिली पाहिजे. ही मनोभूमिका पापांतून मुक्त

१ अभंग ६१३. २ अभंग ६७०.

होणाऱ्याची होती. पापविमोचनाचे प्रमुख प्रकार मनूनें थोडक्यांत दिले आहेत ; ते असे[१] :— "ख्यापनेनानुतापेन तपसाऽध्ययनेन च । पापकृन्मुच्यते पापात्तथा दानेन चापदि ॥". यांतील पहिला प्रकार जो "ख्यापन" त्याचें मनूनें पुढच्याच श्लोकांत[१] एका उपमेनें मोठें मार्मिक स्पष्टीकरण केलें आहे. "यथा यथा नरोऽधर्मं स्वयं कृत्वाऽनुभाषते । तथा तथा त्वचेवाहिस्तेनाधर्मेण मुच्यते ॥". पापाची जुनी कात टाकून देण्याचा हा प्रकार ख्रिस्ती धर्मानेंही स्वीकारिला आहे. 'कन्फेशन्' करण्यांत,—आपल्या पापांचा कबुलीजबाब वाचण्यांत—हाच प्रधान हेतु आहे. ऐकणाऱ्याचे कान कितीही अपवित्र असोत, प्रत्येक संतानें हृदय खुलें उघडून आपल्या पूर्वीच्या पापांचा पाढा जाहीर रीतीनें वाचला आहे. ह्याप्रकारच्या गौप्यस्फोटानें सांचलेली सगळी घाण निघून जाते ; दंभाचें आवरण गळून पडतें ; व सत्याची नवी कात लाभते.[२] असें केल्यानें जुना पापलेख साफ पुसला जातो ; व स्वच्छ पाटीवर नवजीवनाचा ओनामा लिहितां येतो.

प्रसिद्धीइतकाच अनुताप हा पापविमोचनाचा प्रभावी प्रकार आहे. 'हें चि प्रायश्चित । अनुतापीं न्हाय चित्त ॥'[३]. अनुतापानें पोळलेला साधक स्वतःचा धिक्कार करीत असतो. अनुतापाच्या दुर्बिणींतून त्याला मागें दूर गेलेलीं पापें अवास्तव मोठीं व अनर्थावह दिसतात. खोटीं आचरणें सामान्य माणसांच्यापेक्षां संतांच्याच पोटांत अधिक सलतात. हे त्याचे निर्भत्सनेचे शब्द अक्षरशः घ्यावयाचे नसतात. "मी अवगुणी अन्यायी" हा देवापुढें नित्याच्या वाचनासाठीं तुकारामाचा जाहीरनामाच होता. यांतील अवगुणांच्या व अन्यायांच्या कलमांची आपण जर कीस काढूं लागलों तर तुकारामावर आपण मोठाच अन्याय करूं. पापाच्या जाणिवेनें, इतर संतांप्रमाणें त्यालाही पछाडलें होतें. तो म्हणत असे :—"मी तों अपराधाची राशी । शिखा अंगुष्ट तोंपाशीं ॥"; "तुका ह्मणे दोषी । मी तों पातकांची राशी ॥"[४]. हे सर्व उद्गार आपण जर "परमार्थानें" घेऊं लागलों तर अनर्थच व्हावयाचा.

आधीं तुकारामानें योजिलेल्या शब्दांचा संदर्भाशीं नीट अर्थ लावून त्यानें प्रख्यापित केलेल्या दोषांची यादी आपण मुक्रर करूं. वर उद्धृत केलेल्या "माझिया मीपणावर पडो पाषाण" या अभंगांतील "पापा नाहीं पार", "न पाहाती माझें मुख", "आणीक किती सांगों ते अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन", इत्यादि सर्वसाधारण अतिशयोक्तीचे उद्गार जमेस धरतांना हा सारा अनुतापाचा आक्रोश आहे हें आपण विसरतां कामा नये. प्रत्यक्ष दोष असे मुख्यत्वें दुसऱ्या व तिसऱ्या ओळींत, आणि गौणत्वें चौथ्या ओळींत सांगितले आहेत. "काया वाचा मनें अघटित करणें । चर्मचक्षु हात पाय ।" या

---

१ मनुस्मृति, अध्याय ११, श्लोक २२७-२२८.

२ "Confession is part of the general system of purgation and cleansing which one feels one's self in need of, in order to be in right relations to one's deity. For him who confesses, shams are over and realities have begun ; he has exteriorized his rottenness ... One would think that in more men the shell of secrecy would have had to open, the pent-in abscess to burst and gain relief, even though the ear that heard the confession were unworthy." 'The Varieties of Religious Experience', William James (The Modern Library pp. 452-53).

३ अभंग ७३०. ४ अभंग ७४५, ७३८.

सामान्यवादाचा, कायिक, वाचिक व मानसिक या तीनही प्रकारच्या पापांचा साकल्यानें समावेश करण्यापलीकडे दुसरा विशेष हेतु नाहीं. "निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार" या शब्दांचा अन्वयार्थ माझ्या सीध्या मतीला सरळ लावावासा वाटतो. ज्याच्या लेखाच्या अस्सलपणाबद्दल भावेप्रभृति अभिमान बाळगतात त्या संताजी तेली जगनाड्यानें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें दोन टिंबें देऊन "नींदा द्वेश घात: विस्वासी वभिचार" असे दोन निराळे चरण पाडले आहेत, हें अन्वय लावतांना आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. अघटित करणें कोणतें? तर मी निंदा केली, द्वेष केला, घात केला, विश्वासीं व्यभिचार म्हणजे ज्यानें विश्वास टाकिला त्याची फसवणूक केली, हा अन्वयार्थ उघड आहे. असें असतां इंग्रेजी भाषांतर करणाऱ्या देशी व परदेशी पंडितांनीं,[१] आणि त्याहूनही मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही कीं विष्णुबुवा जोगांनींही[२] या चरणांचा अर्थ "निंदा, दुसऱ्याचा द्वेष, विश्वासघात आणि व्यभिचार इत्यादि सर्व लक्षणें माझ्या ठिकाणीं पूर्ण आहेत" असा केला आहे! ऋजुमार्गानें अर्थ सिद्ध करण्याऐवजीं वक्रमार्गाचा आश्रय करणें या सर्वांस आवश्यक कां वाटलें याचा समज पडत नाहीं. कान्होबाच्या अभंगाप्रमाणें एकाच चरणांत "निंदा द्वेष घात विश्वास" अशी शब्दरचना असती तर कदाचित् शब्दविपर्यासानें अर्थ साधण्याला कांहींतरी सबब मिळाली असती. पण या ठिकाणीं पाठक्रम सरळ आहे. चरणाचें कुंपण बळेंच ओलांडून, उलटी मंडूकप्लुति घेऊन "विश्वासीं" हा शब्द "घात" शब्दाच्या पूर्वी आणून जोडावयाचा, आणि अशा प्रकारें व्यभिचार उघडा पाडून त्याचें स्वतंत्रच पाप निर्माण करावयाचें, हें मला सर्वथैव असमर्थनीय वाटतें. "विश्वासीं घात" हा शब्दप्रयोग तुकारामाच्या अभंगांत दुसरीकडे मला आढळला नाहीं. नुसता "घात" हा शब्द अनेकदां आला आहे.[३] तुकारामाच्या आवडीच्या वापरांतील तो एक शब्द होता. या उलट "विश्वासीं व्यभिचार" या शब्दरचनेंतील व्यभिचार ह्या शब्दाचा प्रयोग, योग व रूढी या दोघांनाही अनुसरूनच आहे; आणि हा दोष व्यापारांत व सावकारींत सहज संभवतो.[४] तारुण्याचा मद चढूं लागला कीं कामानें मन व्यापून जावें अशी निसर्गानेंच आपल्या कार्याकरितां व्यवस्था करून ठेविली आहे. त्या वयाचें "श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं। पाहे परनारी पापदृष्टी।... करितां टवाळी जन्म गेला॥"[५] असें तुकारामानेंच स्वाभाविक वर्णन केलें आहे. हें जरी खरें असलें, तरी हा आधींच दोन बायकांचा दादला आणखी परदारीं हिंडत होता असा त्याचा तरी कबुलीजबाब

१ Mysticism in Maharashtra, Ranade, p. 290. The Poems of Tukaram, Translated and Re-arranged etc. by Fraser and Marathe, Vol. II, p. 70.

२ सार्थ श्रीतुकारामाची गाथा. भाग १ ला, दुसरी आवृत्ति (१९२६) पृ. ६३१.

३ 'केला माझा घात दुर्बळाचा' (अभंग ६७६); 'आपला घात आपण चि करी' (अभंग ९४७) हीं दोन उदाहरणें पुरेशीं आहेत. अभंगांच्या शब्दसूचींच्या अभावीं बिनधोक विधान करणें शक्य नाहीं.

४ रा. ग. हर्षे यांनीं हाच अर्थ घेतला आहे. ते म्हणतात :—"त्याचप्रमाणें शेतीभातीच्या व सावकारीच्या व्यवहारांतही चोखपणा राखतां आला नाहीं, 'विश्वासीं व्यभिचार घडला,' असें त्यांनीं नमूद करून ठेविलें आहे". तुकाराम (शके १८५५), पृ. ९.

५ अभंग ३०८२.

नाहीं. उलट कान्होबानें आपल्या दासीगमनाचा स्पष्टच उल्लेख केला आहे. पापप्रख्यापनाचा सत्य हा आत्मा आहे. त्यांतही लपवालपवी करण्याची हातचलाखी तुकारामानें दाखविली हें असत्य त्याला अनुमानानें चिकटविणें शोभणार नाहीं. "आतां" या संताजीच्या पाठांतली जी "खोंच" भवे यांनीं उगाळून घांसली, ती बिचाऱ्या संताजीच्या विचारांत तरी आली असेल कीं नाहीं देव जाणे. संताजीनें या अभंगांचा सगळा गट[1] दिला नाहीं; व त्याचा पाठ मान्य केला तरी परस्त्रीविलोभनाच्या प्रत्यक्ष प्रसंगाच्या अनुषंगानेंच तो पाठ घेतला पाहिजे. तुकारामाचे तारुण्यांतले इतर कांहींही दोष असोत, व्यभिचाराचा त्यांत खात्रीनें समावेश झाला नव्हता.

बाकीचे दोष तरी काय होते ? दोन्ही अभंग[2] मिळून यादी दिसायला लांबलचक असली तरी ती खरोखर साधी असून सामान्य माणूस तिची कधींच क्षिति बाळगणार नाहीं. निंदा, द्वेष, दुसऱ्याचें नुकसान, ज्यानें विश्वास टाकिला त्याला बुडविणें, दोन बायकांत भेदाभेद आणि तोही लक्ष्मीमदानें, पितृवचनाची अवज्ञा, अविचार कुटाळी, कठिण हृदय, वाद करणें, शब्दाचा धड नसणें, विषयलंपटपणा, करूं नये व्यापार करणें, ज्याशीं संग करूं नये अशांशीं संगति ठेवणें,—हे ते सारे दोष. या दं ांपासून कोणता व्यापारी, तसें पाहातां कोणता माणूस, अलिप्त राहिला आहे ? राहिल्याचा जो दावा करीत असेल त्यानें पहिला खडा मारावा ! हे अवगुण सर्वसाधारण माणसाच्या इतके अंगवळणीं पडलेले असतात कीं त्यांस दोष म्हणण्याऐवजीं त्या नैसागक प्रवृत्ति आहेत असेंच तो म्हणेल. तेव्हां तारुण्यांत तुकाराम दुराचारी होता असें मानण्याचा तुम्हांआम्हांला अधिकार नाहीं. कोणाही सामान्य माणसासारखीच त्याची वागणूक होती. त्या वयांत तो सामान्य माणूस होता हाच त्याचा खरा अवगुण ! असो. स्वयं कल्पिलेल्या पूर्वीच्या पापांतून पश्चात्तापानें तो पावन झाला हा धडा ज्यांना आवडतो त्यांना तो पाठ करीत ठेऊन, आपण पानें उलटून, अवघें विश्व ब्रह्मरूप देखण्याचा त्याच्या चरित्रांतील जो अंतिम धडा तो समजून घेण्यासाठीं पुढें गेलेलें बरें.

पितृवचनीं अवज्ञा घडली असें जें तुकाराम म्हणतो त्याचा अर्थ आपण काय करावयाचा ? अनुतापानें साधूस पापाचा नसता वास यावयास लागतो हेंच खरें ! बापाची अवज्ञा करण्याचे प्रसंग तुकारामाच्या तारुण्यांत कसे आणि कोणते उद्भवणें शक्य होतें ? बापाच्या इच्छेविरुद्ध त्यानें दुसरें लग्न केलें ही कल्पना सर्वस्वीं निराधार आहे हें आपण मागें[3] पाहिलें आहे. पहिली बायको मामाच्या घरची, आणि तशांत नाजूक प्रकृतीची असल्यामुळें तिच्याखातर तिचा दास होऊन तुकाराम 'पित्रांस उदास' झाला असेल हें विशेषसें संभवत नाहीं. ज्यानें पुढें असें म्हटलें कीं—"मायबापें केवळ काशी। तेणें न वजावें तीर्थासी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ पुंडलीकें काय केलें। परब्रह्म उभें ठेलें ॥छ॥...तुका ह्मणे

१ अभंग ५२२-५२४ पहा; संताजीनें यांतला फक्त शेवटचाच अभंग दिला आहे. महिपतीनें दोन अभंगांचा (५२३-४) गट कल्पिला आहे. भक्तलीलामृत अध्याय ३६, ओंवी ४४.

२ अभंग २८३५ व ६१३. ३ पृ. ४५-४६ पहा.

मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ३ ॥"[१], व ज्याला पितृवचन हीच विष्णूची महापूजा[२] वाटली त्यानें कलियुगाच्या विपरीत चालीप्रमाणें "पुत्र ते पितियापाशीं । सेवा घेती सेवका ऐसी ।"[३] असें उफराटें वर्तन ठेवलें असेल हें तर निखालस संभवत नाहीं. तुकारामाचा स्वभाव आग्रही, त्याच्याच शब्दांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे 'अनावर', होता, व निर्भीडपणें स्पष्ट बोलण्याची त्याची सहज प्रवृत्ति होती. तेव्हां व्यवसायाची धुरा सांभाळतांना व्यवहाराच्या बाबतींत बापाचा व त्याचा क्वचित् मतभेद होणें संभवनीय होतें. वृद्धानें वयोमानाप्रमाणें व अनुभवानें दिलेली पोक्त सल्ला व सावधानाची सूचना तारुण्याच्या उसळत्या उत्साहाला व कर्तुमृशक्तीच्या जोमाला कशी मानवणार ? दादाजीचा शिवाजीशीं मतभेद हा व्हावयाचाच ! व्यवहाराच्या बाबतींत तरुण तुकारामाची अशी अपेक्षा असणें अगदीं स्वाभाविक आहे कीं "पट्ट पुत्र सांभाळी । पिता त्याची आज्ञा पाळी ।"[४]. पुढें, बापाच्या मार्गदर्शनाच्या अभावीं तुकारामानें केलेले व्यवहार अंगाशीं येऊन शेवटीं थोड्याच अवधींत त्याचें दिवाळें निघालें यावरूनच बापाचा लगाम त्याला थोडाबहुत जाचकारक वाटला असावा असें वाटतें. याखेरीज बापाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा करण्याचे प्रसंग त्याच्या तारुण्यांत आले असतील असें वाटत नाहीं. उलट आपल्या मायबापांवर त्याचें किती प्रेम होतें हें त्यांच्या मृत्यूनें पाडिलेल्या दु:खच्छायेनें दिसून येतें. आईला दुखविल्याचा त्यानें कोठें ओझरता देखील उल्लेख केला नाहीं. पहिली सून तिच्याच माहेरची असल्यामुळें सासू-सुनेच्या कलहाची वार्ताही ऐकूं येत नाहीं. बोल्होबाचा सारा जीव कर्त्या तुकारामापाशीं गुंतणें साहजिक होतें. "सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथें चि संकल्प ॥"[५]; आणि मागें वर्णिल्याप्रमाणें तुकारामाच्या चित्तांत बापाविषयीं नितांत कृतज्ञता वसत होती.

दमेकरी बायकोबरोबर आनंदाचा संसार नांदणार नाहीं हें जाणून, व व्यवसायाच्या दृष्टीनें पुण्यांतील एका धनाढ्य सावकाराच्या घराण्याशीं संबध जोडणें फायदेशीर होईल या अपेक्षेनें बोल्होबानेंच तुकारामाचें दुसरें लग्न त्याच्या वयाच्या तेरा ते सतरा वर्षांच्या दरम्यान घडवून आणिलें असावें हें मागें सूचित केलें आहे. ही दुसरी बायको पुण्यांत आप्पाजी गुळवे नांवाचा "थोर धनवंत" सावकार होता त्याची कन्या. ती 'थोर' म्हणजे वयानें थोर होती असें महिपति म्हणतो. वयानें कितीही थोर असली तरी ही श्रीमंताची लेक त्याकाळच्या चालीरीतीप्रमाणें दहा-बारा वर्षांपलीकडे वाढलेली नसावी. संसारास सत्वर उपयोगी पडावी म्हणून जरी हें लग्न जुळवून आणिलें होतें तरी दुष्काळापूर्वी रखुमाबाईस मूल झालें असून हिला पुढें कांहीं वर्षांनंतर मुलें व्हावयास लागलीं यावरून सुद्धां लग्नाच्या समयीं ती वयांत आलेली नसावी असें वाटतें. हिचें नांव अवळी किंवा आवळी म्हणजेच आवडी असें होतें. हें माहेरचें आवडीचें नांव मागें पडून घरचें जिजा हें नांव महाराष्ट्रांत पुढें गाजलें.

---

१ अभंग २९०६. २ अभंग २२६१. ३ अभंग ३०३५.
४ अभंग १२५. ५ अभंग ४३६५.

ह्या दुसऱ्या लग्नाविषयीं तुकारामास त्या वेळीं काय वाटलें असेल ? श्रीमंतीला त्या काळांत दोन बायका शोभा देत असत. पत्नी दोन आणि त्यांच्यांत भेदाभेद, हा जो पुढें तुकारामाला महादोष वाटला तो लक्ष्मीच्या मदामुळें घडला हें तो स्वतःच कबूल करितो. आपली प्रकृति व नवऱ्याची श्रीमंती पाहातां त्यानें घरांत सवत आणली याचें रखुमाबाईला त्याकाळीं मोठेसें दुःख झालें असेल असें दिसत नाहीं. आंवडा गिळून तिनें या आवडीचें स्वागत केलें असेल एवढेंच ! भेदाभेदांचा जाच व्हावयाचे प्रसंग पुढें यावयाचे होते ; त्यांची आगाऊ कल्पना कशी यावी ? हा लग्नसमारंभ संपला त्यवेळीं तुकारामास हायसें कसें वाटलें असेल हें त्याच्या एका अभंगांतील रूपकाची भाषा वापरून असें वर्णितां येईल कीं :— "याजसाटीं केला होता अटाहास । शेवटाचा दिस गोड व्हावा ॥ आतां निश्चितीनें पावलों विसांवा ।...कवतुक वाटे जालिया वेचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥ तुका ह्मणे... परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥."[१] खेळीमेळीचें सुख चारच दिवस टिकलें असेल. पुढें सवतीमत्सराचीं कांहीं संवत्सरें जावयाचीं होतीं !

आपला दोन बायकांचा संसार ज्यांत सामाविला होता त्या एकत्र कुटुंबाचा मोठा संसार, कर्ता तुकाराम आतां जीव लावून आवरूं लागला. घरांतले व्रतोत्सव, कथापूजन, हरिजागर यांच्या व्यवस्थेंत तो शिरस्त्याप्रमाणें जागरूक होताच. आतां समवयस्क सोबत्यांच्या संगतींत सोंगट्या-सारीपाटादि खेळांत व ललितादि करमणुकींत त्याला क्वचित् जागरणेंही होऊं लागलीं. बाहेर व्यवहाराच्या व्यासंगांत गुंतलेलें त्याचें मन घरीं प्रियजनांच्या संगतींत अधिकाधिक रंगूं लागलें. स्त्रियांच्या अंगसंगांत त्या वयांत त्याला विशेष सुख मिळूं लागलें. तो मानी स्वभावाचा असल्यामुळें कोणाच्या आधीन होईल हें शक्यच नव्हतें. बाइलवेड्यांचा त्यानें अभंगांत जो उपहास केला आहे त्यावरून स्वतः तो कामाचा अंकित होऊन आवडीचा वेडा झाला असेलसें दिसत नाहीं. तरीपण त्याच्याच शब्दांत बोलावयाचें म्हणजे त्यानें दोनी पत्नींना खचित 'लाड दिले' असतील. त्यांच्याशीं गुजगोष्टी करितांना तुला "घडीन दोरे चुडा । तूं तव माझा जोडा जन्माचा कीं ॥ वेणीचे जे नग सर्व ही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥"[२] असें तो गोडगोड बोलला असेल. पैशाची कमतरता नसल्यामुळें यांखेरीज "ताईत सांकळी गळांचि दुलडी । बाजुबंदजोडी हातसर ॥ नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगीची कांचोळी जाळिया फुलें ॥"[२] हीं सारीं वस्त्राभरणें त्यानें पत्नींना आणून दिलीं असतील. भावांबहिणींना व त्यांच्या कुटुंबानाही तो विसरला नसेल. संसारांतच त्याला साफल्य लाभूं लागलें. सभोंवतालीं प्रेमाचें, कौतुकाचें, गौरवाचें वातावरण होतें. धंदा मोठा चालला होता; बहिण दादा दादा म्हणत होती. "माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ॥ सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ॥ धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ॥".[३] अशाप्रकारें, बंधुमित्रांशीं आनंदाच्या वादांत, स्त्रियांशीं सुखाच्या संवादांत, "जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे । मातृभिः सेव्यमानानाम्" असे रामाप्रमाणें तुकारामाचे सुखाचे निश्चिंत दिवस जाऊं लागले.

---

१ अभंग १३२८. २ अभंग ४२४५. ३ अभंग २९१७.

## जिवलगांचा वियोग

ते दिवस कधीं व कसे संपले हें कळलें सुद्धां नसेल. बघतां बघतां सुखाच्या अभ्रांची सावली दूर सरली, व त्रिविधतापांची झळ तुकारामाला लागावयास सुरुवात झाली. आतांपावेतों त्याच्या जीवनांत "माता पिता बंधु सज्जन । घरीं उदंड धन धान्य । शरीरीं आरोग्य लोकांत मान्य । एकही उणें असेना ॥"[१] अशी दैवाला हेवा करण्यासारखी सुस्थिति होती. यापुढें त्यांतून एक एक उणें होऊं लागलें. उणें होत होतच शेवटीं परिपूर्णता प्राप्त होते याची प्रचीति पुढें यावयाची होती. त्याक्षणीं मात्र जीवित शून्य झाल्याचा आभास झाला.

दैवाचा पहिला घाला बापावर पडला, व जें छत्र त्याला ताप लागूं देत नव्हतें तेंच कोसळून पडलें! तुकारामाचे सतरावे वर्षी बोल्होबांस देवाज्ञा झाली. "बाप मेला न कळतां" या चरणावरून कांहींनीं अशी कल्पना करून घेतली आहे कीं बोल्होबा हे तुकाराम लहान असतांनाच वारले असावेत; व पितृवचनीं अवज्ञा घडली या वचनाशीं[२] मेळ घालतां त्यांना असें दिसलें कीं शैशवावस्थेच्या सीमारेषेवर असतांनाच तुकाराम पितृसुखास आंचवला, व ती अवज्ञा द्वडपणापलीकडे फारशी नसावी.[३] हा अभंग[४] तुकारामानें तत्क्षणीं दुःखाच्या आवेगांत नव्हे, तर मागाहून आयुष्याचें सिंहावलोकन करतांना लिहिला हें उघड आहे. गाथेंत त्याचा प्रारंभ "दाईल मेली मुक्त जाली" या चरणानें होतो. सर्वसंग्रह गाथेंत सुद्धां असाच प्रारंभ दिला असून, बाप मेला न कळतां हा चरण दिलाच नाहीं. गाथेच्या संहितेंत हा चरण नाहीं, इतकेंच नव्हे तर गाथेकरितां तपासलेल्या चारही हस्तलिखितांत हा चरण नव्हता म्हणून त्याचा पाठभेदांत सुद्धां उल्लेख नाहीं. यांतील एक हस्तलिखित पंढरपूरचें असून खुद्द गंगुतात्यांनीं शुद्ध करून दिलें होतें. तथापि गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत गाथेपूर्वी (१८६७ सालीं) छापलेल्या पंढरपूर-प्रतींत हा चरण आहे; व तीच पाठ-परंपरा आर्यभूषण व सांप्रदायिक ओळीच्या गाथांनीं चालविली आहे. हा चरण जरी जमेला धरला तरी तुकारामाच्या बालपणांतच बोल्होबा निधन पावले हें अनुमान चुकीचें ठरतें. "संवसारें जालों अतिदुःखें दुखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥"[५] ह्या तुकारामाच्या आत्मचरित्रकथनाविषयीं वादच नाहीं. त्याचा अर्थ एकच संभवतो, तो हा कीं आई व बाप सेखीं म्हणजे शेवटीं मृत्यु पावल्यामुळें संसारांत दुःख पावलों. बाप लहानपणींच मेला असता तर या वचनांत तात्पर्यच राहात नाहीं. हें वर्णन, तुकारामाचें व त्याच्याहून लहान जो कान्होबा त्याचेंही[६] पितृवचनीं अवज्ञा घडली हें वचन, व पितृविषयक पूर्वी वर्णिलेली

---

१ भक्तलीलामृत, अध्याय २७, ओवी १२. २ अभंग २८३५.

३ तुकाराम, रा. ग. हर्षे, पृष्ठें ३ व ७. ४ अभंग ७७८.

५ अभंग १३३३. 'सतरावे वर्षी तत्वतां । क्रमोनि गेलीं मातापिता ।' (भक्तलीलामृत, अध्याय २८, ओवी १३३) या विधानांत महिपतीनें अभंगांतील शब्दांचाच आधार घेतला आहे.

६ अभंग ६७०.

परिस्थिति यांची संगति लाविली म्हणजे महिपतीनें सांगितल्याप्रमाणें तुकारामाच्या सतरावे वर्षी बोल्होबा निवर्तले हेंच खरें ठरतें. आणि मग 'न कळतां मेला' याचा अर्थ "माझ्या अपरोक्ष आकस्मिक रीतीनें"[१] असा घ्यावा लागतो. बापाचा मृत्यु तुकारामाच्या गैरहजिरींत, म्हणजे वसुली-व्यापाराकरितां बाहेरगांवीं गेला असतां, किंवा नकळत म्हणजे आजारासारखी कांहीं आगाऊ सूचना नसतां झोपेंत किंवा एरवीं हृदयक्रिया बंद पडून, प्रत्यक्ष प्राणोत्क्रमणाचे समयीं तुकाराम समोर नसतां, झाला असावा. याच्या उलट आई 'मज देखतां' म्हणजे डोळ्यांसमोर मृत्यु पावली असावी.

बापाच्या मृत्यूमुळें तुकारामाच्या शिरावर संसाराची सारी जबाबदारी येऊन पडली. जी संसाराची चिंता पूर्वी जाणवत नव्हती तिचें उरावर आतां मोठेंच दडपण जाचूं लागलें. या आघातांतून तो उठतो न उठतो तोंच जिच्या मांडीवर खेळल्याची अजून विस्मृति झाली नव्हती त्या प्रेमळ मातेला मांडी देण्याचा प्रसंग त्याच्यावर आला. वृद्ध दंपतीचा जन्माचा जोडा विखंडिला म्हणजे दुसरा जोडीदार जास्त दिवस मागें राहूं शकत नाहीं, असा जरी अनुभव असला तरी बाप मेल्यामुळें अनाथ झालेल्या तुकारामाला आतां आपण सर्वस्वीं पोरके झालों असें वाटूं लागल्यास नवल नाहीं. ज्याला साप सुद्धां समोर मारलेला पाहवत नसे[२] त्या कोमल हृदयाच्या तुकारामाला मातेनें डोळ्यांदेखत प्राण सोडले हें पाहून किती दु:ख झालें असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

या दु:खाचा भर ओसरण्यापूर्वींच दुसऱ्या एका कौटुंबिक आपत्तीशीं तोंड देण्याचा तुकारामावर प्रसंग आला. लागोपाठ तिसरा मृत्यु घरांत झाला; या खेपेस मृत्यूची पाळी सावजीच्या पत्नीवर आली. मृत्यूच्या सांनिध्यानें देहबुद्धि आधींच दुरावते. तशांत सावजी या पडत्या फळांची आज्ञा घ्यावयास तयारच राहिला होता. लोकाचारापुरताच त्याचा संसार उरला होता. काळानेंच त्याला संन्यास घेण्यास याप्रकारें आपोआप अनुमति मिळवून दिली. त्यानें घर सोडलें, व तो तीर्थाटणास निघून गेला. त्याला 'पुनरागमनाय च' म्हणण्यांत कांहीं अर्थ नव्हता हें तुकाराम ओळखून होता. हा अठरा वर्षांचा जिवश्चकंठश्च सोबती, पित्याच्या निधनानंतर पित्यासमान, शब्दानें तरी धीर देणारा पाठीराखा, आतां आपणास कायमचा अंतरला हें जाणून सावजीला महायात्रेचा निरोप देतांना मायबापांच्या मृत्यूच्या आघातांनीं आधींच व्यथित झालेलें तुकारामाचें हृदय खरोखर पिळून निघालें असेल.[३]

---

१ हर्षे (कित्ता) पृ. ३.

२ अभंग ३७४३ पहा.

३ सावजीचें पुढें काय झालें, त्याची व तुकारामाची पुन: कधीं भेट झाली कीं नाहीं, याविषयीं महिपतीखेरीज इतर स्वतंत्र माहिती कोठेंच मिळत नाहीं. महिपतीनें लिहून ठेविलें आहे तें असें :—"परम अनुताप धरूनि मनीं। बंधु तो गेला तीर्थाटणीं। मुखीं अमृत संजीवनी। नामस्मरणीं सर्वदा ॥ सप्तपुऱ्या ज्योतिर्लिंगें बारा। दृष्टीसीं पाहिलीं त्या अवसरा। पुष्करादि तीर्थें करोनि सत्वरा। दुस्तर संसारा निवटिलें ॥ कायिक वाचिक मानसिक। तपें आचरला स्वाभाविक। षड्वैरी जिंकोनि देख। शांति सुख पावला ॥ सर्व तीर्थें करोनि जाणा। मागुती आला आनंदवना। संत समागम धरोनि नाना। आत्म साधना विचारी ॥ आत्मस्थिति पावोनि पूर्ण। जाहलें स्वस्वरूपीं समाधान।". (भक्तलीलामृत, अध्याय २७, ओव्या २४-२८). हें वर्णन ठराविक परंपरेचें दिसतें.

पाने १३६
२६३८७
च १५२०

प्रकरण नववें

## दिवाळें आणि दुष्काळ

जिवलगांच्या या वियोगामुळें तुकाराम आतां व्यवहारांत आणि संसारांतही अगदीं उघडा पडला. हृदय उघडें करून त्याची व्यथा सांगण्यास कोणीच सांगाती उरला नाहीं. अशी परिस्थिति अकस्मात् प्राप्त झाली असतां भावनांचा कोंडमारा होऊन मनुष्य भांबावून जातो. आपुलाची वाद आपणाशीं करण्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळें तो अंतर्मुख होतो. वृत्ति आंत वळल्या म्हणजे प्रवृत्ति नकळत मंदावते. तशांत तुकारामावर हा प्रसंग आयुष्याचे प्रारंभीं, सतरावे-अठरावे वर्षीच आला. पोरबुद्धींच्या पत्नींकडून हृदयाला खरा विश्राम मिळून भार हलका होईल ही अपेक्षाच नव्हती. एकाकी असलों तरी व्यवहाराच्या धकाकीच्या मामल्यांत चिकाटी धरून निभावून जाईन इतकी हिंमत अजून त्याच्या अंगांत आली नव्हती.

व्यवसायावर याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. धंद्यांत मंदी यावयास सभोंवताली झपाट्यानें निकृष्ट होत जाणारी आर्थिक परिस्थिति हें शिवाय बलवत्तर कारण होतेंच. महिपतीला या मनोवृत्तींच्या व आर्थिक प्रवृत्तींच्या गहनांत शिरण्याची जरूरी वाटली नसावी. त्याला निवृत्तीच्या रंगणांत चंचल लक्ष्मीचा क्षणिक नाच दाखवून भक्तीचा विकास रंगवावयाचा होता. पुढें तुकारामाला सुद्धां यांत देवाचाच हात दिसला. "देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगें वारावार करोनि ठेवी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । ह्मणोनि करंटा करोनि ठेवी ॥ छ ॥ ... तुका ह्मणे मज प्रचित आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥ ३ ॥".[१] कांहींसें याच दृष्टीनें महिपतीनें या पुढील तीन वर्षांत परिपूर्ण झालेल्या तुकारामाच्या भाग्यनाशाकडे पाहिलें आहे. या लीलामृतकाराला ती सारी यदृच्छया झालेली लीला वाटली. फिरलेल्या कालचक्राच्या भ्रमणाचें वर्णन करितांना प्रत्यक्ष घडामोडींच्या सुसंगत क्रमाकडे त्यानें दुर्लक्ष करून भक्तीच्या अद्भुत लीलेवर लक्ष लाविलें.

सावजी तीर्थाटणास निघून गेल्यापासून तों दिवाळें निघेपर्यंतचा, तुकारामाच्या व्यवसायाचा इतिहास महिपतीनें वर्णिला आहे तो असा :—"देहूसि तुका वैष्णव । खेद करित नित्य नित्य । ह्मणे मातापिता क्रमिलीं निश्चित । बंधूची गत हे झाली ॥ ... पितयाचें धन होतें बहुत । तेंही जाहलें वाताहत । जैसा शीत काळ येतां अभ्र समस्त । विलया जात आकाशीं ॥ ... तैसें तुकयाचें धनधान्य समस्त । अटोनि गेलें जेथील तेथ । यास्तव होऊनि चिंताक्रांत । ह्मणे कैसी मात करावी ॥ आपुलें द्रव्य दुसऱ्यावर । ते बोलें न देती साचार । उदीम न चले अणुमात्र । कैसा विचार करावा ॥ कुटुंबवत्सल खर्च पदरीं । ह्मणोनि धांवे हटबाजारीं । द्रव्यासाठीं नानापरी । प्रयत्न करी बहु फार ॥ येणेंही नयेचि

१ अभंग ३०५१.

–ज. १५२० । २६३६१ । १३६

पुरवठा । मग दुकान मांडोनि बैसे चोहटा । वाचेसि हरिनामाचा फांटा । व्यापार खोटा न करवे ॥ ह्मणे उणें द्यावें कोणास । तरी असत्य वर्ततां महादोष । गिऱ्हाईक मागतसे जैसें । धारणे विशेष तें द्यावें ॥ सर्वभूतीं दयापूर्ण । असत्य सर्वथा न बोले वचन । वाचेसि अखंड हरिस्मरण । एकही क्षण न विसंबे ॥ ऐसी स्थिति देखोनि पाहें । देव कसवटीं लाविताहे । याही व्यापारें पुरवठा नये । मग आणिक उपाय करितसे ॥ वैश्यव्यवसाय नानाविध करी । परी कोठेंही साह्य न होचि श्रीहरि । चित्तीं कष्टी होतसे भारी । आटती परी देखोनी ॥ आपण कष्टेनि रात्रंदिवस । ढोरावरी गोण्या वाहतसे । शीत उष्ण निद्रा आळस । कांहींच ध्यानास आणीना ॥ आणिक कर्ज घेऊनि फार । मागुती धंदा केला थोर । परी नफा न होय अणुमात्र । चिंतातुर यासाठीं ॥ आणिक ऋण घेऊनि पाहे । कांहीं हातवटी करूं जाय । तेणेंही न दिसेचि सोय । ह्मणे करावें काय विठोबा ॥ बहुत कष्टी होऊनि चित्तीं । स्मरण करीत अहोरातीं । कांहीं ऋण घेऊनि मागुतीं । वस्तभाव होती तेहि मोडिली ॥ वजन करोनि हिशोब पाहत । घरीं वाणी मिळाले समस्त । तंव ते अधिकचि आलें आंत । कैसी मात करावी ॥ सोयरे पिशुन ते वेळे । ह्मणती याचें तों निघालें दिवाळें । सावकार येऊनि द्वारीं बैसले । अश्रुपातें भरले नेत्र तेव्हां ॥".[१]

या वृत्तांताच्या अनुषंगानें महिपतीनें कांहीं चमत्कार बसविले आहेत. ते सारे दिवाळें आणि दुष्काळ यांच्या दरम्यान घडले अशी महिपतीची कथा आहे. दिवाळें निघाल्यानंतर चार ढोरांतील तीन रोगानें मेलीं. उरलेल्या बैलावर गोणी घालून तुकाराम उदीमास निघाला असतां त्याच्या भजनाला कंटाळलेले त्याचे सोबती त्याला चुकवून पुढें गेले व तो एका भयानक अरण्यांत वादळांत सांपडला. त्यानें देवाचा धांवा केला व करुणा भाकली. देवानें पांथस्थाचें रूप घेऊन त्याची संकटांतून सोडवणूक केली.[२] यानंतर महिपतीच्या ह्मणण्याप्रमाणें "पर्जन्य गेला देशांतून । दुष्काळ आला पुढें कठिण । मुलें माणसें खाण्यावांचुन । होती हैराण सर्वदा ॥" अशी परिस्थिति ओढवली. तेव्हां जें कांहीं थोडेंबहुत भांडवल उरलें होतें त्याच्या मिरच्या घेऊन तीन गोण्या भरून तुकाराम कोंकणांत गेला. तिकडे गोण्या उसवून दुकान मांडून बसला असतां कोंकणांतल्या धूर्त मंडळींनीं त्याच्या चांगुलपणाचा भलता फायदा घेऊन उधाराच्या नांवाखालीं त्याला गोण्यांसह सपशेल कसें लुबाडलें, देवाला त्याच्या या उदास वृत्तीची चिंता कशी वाटली, व स्वतः चाकराचें रूप घेऊन त्या सर्व मंडळीकडून गळफांस लावून घेण्याची भीति घालून सुद्धां पैन्पै कशी वसूल करून आणली व शेवटीं तुकारामाबरोबर प्रेमानें भोजन कसें केलें याचा भक्तिरसभरित वृत्तांत महिपतीनें वाणला आहे. ते पैसे घेऊन घरीं परत येत असतां वाटेंत एक ठक आडवा आला, व त्याच्या वचनावर विश्वासून तुकारामानें सोन्याचा मुलामा दिलेलीं पितळेचीं कडीं विकत घेतलीं. घरीं आल्यानंतर लोकांस हें सोनें दाखविलें तेव्हां "सावकार पिटिती कपाळ । कांता हळहळ करी ॥" असें तुकारामानें आपलें हंसें करून घेतलें.[३] शेवटचा

१ भक्तलीलामृत, अध्याय २७, ओव्या २९-४८.

२ भक्तलीलामृत, अध्याय २७, ओव्या ६०-९९.

३ भक्तलीलामृत, अध्याय २७, ११३-२१७; अध्याय २८, ओव्या ११-३०.

प्रयत्न म्हणून धाकटी बायको अवलाई सावकाराकडे गेली; व धनवंत भावांच्या नांवाचा फायदा घेऊन स्वतःची पत दाखवून तिनें दोनशें रुपये कर्ज काढले; व तुकारामाला बैलावर मिठाच्या गोण्या घालून वाण्यांबरोबर बालेघाट प्रांतीं पाठविलें. तुकारामानें तिकडे मीठ विकून गूळ भरला; व पुढें शहरांत जाऊन गूळ विकून पैसे करून सर्व परत फिरले. वाटेंत बाजारांत त्यांचा तळ पडला असतां खाडश्मश्रु वाढलेला, गळ्यांत काष्ठाचा नांगर बांधलेला एक बंदिवान ब्राह्मण उरलेलें कर्ज फेडण्याची भीक मागावयाला आला. शेटेसावकारांनीं त्याला अर्थात् हांकून लावला; पण तुकारामाला त्याची दया येऊन त्यानें आपल्यापाशीं असलेले सर्व पैसे देऊन त्याला कर्जमुक्त करून वर त्याला जेऊं खाऊं घातलें.[१] आतां बायको क्रोधायमान होऊन तुकारामाला ताडण करील, सावकार ऋण मागतील हें जाणून, देवानें तुकारामाचें रूप घेऊन, सावकाराचे पैसे सव्याज परत केले व त्याच्याच हातीं आवलीकडे रोखा आणि नफ्याचे पांच सोन्याचे होन पाठविले. हा सारा वृत्तांत दुष्काळापूर्वी घडला अशी माहिपतीच्या कथेची मांडणी आहे.[२]

भक्तलीलामृतांत विस्तारानें वर्णिलेल्या या महिपतीच्या वृत्तांतांत यदृच्छया धननाश, बाजारांत दुकान मांडून बसणें, नानाविध वैश्यव्यवसाय, त्याच्यापायीं ऋण, दिवाळें, गुरांचा नाश, वणजेच्या सफरी व अंतीं दुष्काळाचा हाहाःकार असा क्रम दिलेला दिसतो. तरी सुद्धां महिपति स्वतःच पुढें म्हणतो कीं " एकविसाव्यांत विपरीत काळ । तुकयासि पातला तत्काळ । तेव्हां निघतांचि दिवाळें । सोइरे सकळ हांसती ॥ ". त्याचप्रमाणें लोकांवर जें वडिलाचें देणें होतें त्याच्या सावकारीचे कागद दुष्काळानंतर तुकारामानें बुडविले असेंही महिपतीचें म्हणणें आहे. म्हणजे अगोदर दिवाळें व मागाहून दुष्काळ हा क्रम सुसंगत दिसत नाहीं. भक्तविजय या पूर्वी लिहिलेल्या ग्रंथांत जो वृत्तांत संक्षिप्तांत दिला आहे[३], त्यांत क्रमाची ही

१ खंडेरायकृत तुकारामचरित्रांत (अनेककविकृत लघुकाव्यमाला. भाग चौथा. पृ. १३०). ब्राह्मणाच्या बंधविमोचनाची जी कथा सांगितली आहे तो ब्राह्मण बहुधा हाच असावा. या ब्राह्मणास, त्याच्या सुंदर स्त्रीवर नजर ठेऊन, सुप्यांमध्यें राज्य असणाऱ्या वेळोजीपंतानें संकटांत टाकिलें होतें. तसें असेल तर दयेइतकीच अन्यायाची चीड येऊन, अधिकाऱ्यांच्या जुलमास न जुमानतां तुकारामानें हें दान केलें असावें.

२ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओव्या ३४-८७.

३ " मातापिता कमलियावर । दुःखरूप जाहला संसार । दुष्काळ पडला थोर । तेणें द्रव्य समग्र आटलें॥ धनधान्य जें कांहीं होतें । तें आटोनि गेलें जेथिंच्या तेथें ।··· तेवी स्वदेशीं पडतां दुष्काळ । धनधान्य आटोनि गेलें सकळ । मुलेंमाणसें करिती तळमळ । परी अन्न न मिळे सर्वथा ॥ ज्येष्ठ कांतेसि पुत्र दोघेजण । कनिष्ठेसि नव्हतें संतान । भाजीपाला खाती उकडोन । परी दृष्टीस कण दिसेना ॥ तरी होणार न चुकेचि सर्वथा । ज्येष्ठ निवर्तली अन्नान्न करितां । तेणें लज्जित होऊन चित्ता । प्रपंचममता नाठवे ॥ संपत्ति वैभव हरपतां जाण । त्यासवेंच गेला सन्मान । देखतां हांसती सोयरे पिशुन । तेव्हां लज्जित मन तुकयाचें ॥ जे राखीत होते बहुत मर्यादा । तेचि स्वमुखें करिती निंदा । अन्नवस्त्राची सदा आपदा । उदीमधंदा चालेना । ··· असा कठिण काळ येतांचि देखा । परमलज्जित झाला तुका । प्रपंचीं कोणी न दिसे सखा । मग चित्तीं विवेका आठविलें ॥ कांहीं करितां उदिमाची हातवटी । तंव तेथें अधिक होतसे तुटी । हा कठिण काळ पडतां संकटीं । अनुताप पोटीं उपजला ॥ म्हणे प्रपंच लटका मिथ्या माया । नरदेह केवळ नाशवंत काया । म्यां जन्म दवडिला वायां । पंढरीराया विसरोनी ॥. " भक्तविजय, अध्याय ४८, ओव्या २५–३८.

संगति महिपतीनें अनुसरली नसून दुष्काळ हेंच आर्थिक विनाशाचें खरें कारण दिलें आहे; आणि तेंच वस्तुस्थितीचा विचार केला असतां खरें दिसतें. त्याचप्रमाणें, दुष्काळानें शिखराला नेलेल्या विपदांच्या पर्वतप्राय परंपरेंतून हरिभक्तीचा उगम झाला हें खरें निदान होय. आईबापांच्या मृत्यूनंतर हरिभक्तीनें चित्त व्यापिल्यामुळें व्यवसायाची हेळसांड झाली व त्यामुळें परमेश्वर साहाय्यार्थ धांवून आला हें भक्तिमाहात्म्य प्रत्यक्ष घडलेल्या घटनांच्या माहात्म्यास बाध आणितें. खुद्द तुकारामाचें सूत्रात्मक आत्मचरित्र सुद्धां याच घटनांच्या मालिकेंत ओविलें आहे. आपणास वैराग्य कोण्या प्रकारें झालें हें सांगतांना त्यानें असा वृत्तांत दिला आहे[1] :—" संवसारें जालों अतिदु:खें दुखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥२॥ दुष्काळें आटिलें द्रव्यें (व्ये) नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥ ३ ॥ लज्जा वाटे जीवा त्रासलों या दु:खें । वेवसाय देखें तुटी येतां ॥ ४ ॥". यापुढील अभंगांत " बहु पीडिलों संसारें । ...न पडतां पुरें । या विचारें राहिलों ॥ सहज सरलें होतें कांहीं । द्रव्य थोडें बहु तें ही ॥ " असे उद्गार आढळतात. व शेवटच्या अभंगांत त्यानें देवाचे आभार मानिले आहेत कीं :—" बरें जालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ॥ छ ॥... बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥ ३ ॥ ".

या पंक्तींमधून ओझरती दिसूं येणारी वस्तुस्थिति इतर माहितीच्या आधारें आपणांस नीट न्याहाळितां येते. सावकारी हीच तुकारामाच्या घराण्याची खरी संपत्ति होती. तुकारामाचींच वचनें असें सुचवितात कीं व्याजाच्या भारानें दख्खनचा शेतकरी कासावीस होऊं लागला होता.[2] मुसलमानी अंमलाखालीं त्याची आर्थिक परिस्थिति अनेक कारणांस्तव सारखी खालावत चालली होती. शहाजहानच्या कारकीर्दींत वसुलीच्या बाबतींत दख्खन सर्वांत मागासलेला भाग होता याची आर्थिक इतिहास लिहिणाऱ्यांनीं खास दखलगिरी घेतली आहे.[3] परचक्रांमुळें प्रजा 'कावली' होती, 'जाजावली' होती; "माणसा खावया धान्य नाहीं । आंथरुण पांघरुण तें हि नाहीं । घर कराया सामग्री नाहीं । काये करिती ॥ " ; " सदा दुश्चीत अवघे जन उद्वेगरूपी ।" " अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडिले लोक ॥" असें रामदासांनीं

१ अभंग १३३३–३५.

२ पृ. ५९, ६२ पहा.

३ " The Badshahnama which was written about the year 1650 classes the four Deccan Provinces along with Gujarat as constituting an exception to the general conditions prevailing in the Mogul Empire. The author gives figures to show that in the first 20 years of Shahajehan's reign, the Imperial revenue had increased largely ; but that these five provinces were stationary or even showed a decline in yield ; and he expressly attributes this fact to the famine of 1630-32 ... The Deccan remained impoverished for at any rate a generation ." From Akbar to Aurangzeb, Moreland, p. 218.

लिहून ठेविलें आहे.[१] खुद्द तुकारामानें " देवा । काय निद्रा केली धांवा ॥ " अशी शेवटीं ज्या अभंगांत देवाची करुणा भाकिली त्यांत तात्कालीन हलाखीचें " बैसोनियां तक्तां । अन्नेंविण पिडिती लोकां ॥... राजा प्रजा पीडी। क्षेत्री दुश्चितासी तोडी । " असें वर्णन केलें आहे.[२] अन्यत्र जोहाराच्या रूपकांत सारावसुलीनें लोकांची कसी वासलात लागत असे हें सांगतांना तुकारामानें योजिलेल्या भाषेवरून रयतेंत कांहींच त्राण राहिलें नव्हतें हें उघड दिसतें. " देती घेती परज गेली । घर खालीं करूनियां ॥...अन्नधियांचें अवघें नेलें । कांहीं ठेविलें नाहीं मागें ॥...घराकडे पाहूं नये सें चि जालें । " हें तें वर्णन वाचलें म्हणजे अंतीं त्यानें म्हटल्याप्रमाणें " जाली ते निश्चिती बोलों नये " असेंच वाटतें.[३] या सर्व परिस्थितीचा आशय " दुःखदारिद्रउद्वेगें । लोक सर्वत्र पीडिले ॥ " या एका अष्टाक्षरींत रामदासांनीं आणला आहे.[४]

परचक्राच्या छळानें पिळून निघालेल्या व जुलमी राजाच्या अंमलानें गांजलेल्या या प्रजेवर आतां अस्मानीसुलतानी कोसळूं लागली. महाराष्ट्राच्या या कोरड्या भागांत पावसाची सदाची रडारड असते. तेव्हां तर पावसानें जरा कोठें डोळे वटारले कीं जराही त्राण नसलेल्या या निःसत्त्व प्रजेची अक्षरशः पांचावर धारण बसत असे ! " पाऊस मुलखा गेला म्हणजे लोक परागंदा " व्हावयास सुरुवात होई.[५] शके १५४६ त, म्हणजे तुकारामाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षी या प्रकारच्या अवर्षणाची चाकण विभागावर आलेली एक आपत्ति सुदैवानें त्यावेळेपुरती टळली; कारण पुढें पर्जन्य उदंड पडला व समस्त संतोषी झाले.[५] परंतु हा संतोष अधिक काळ टिकला नाहीं. इ. स. १६२८ आणि १६२९ ( शके १५५०–१ ) या दोन सालांतील फसल ठीक नव्हता. इ. स. १६२९ त पावसास आधीं उशिरां सुरुवात झाली, व शेंवटीं शेवटीं अतिवृष्टीनें पिकांची आणखी खराबी झाली.[६] " मंद झाल्या मेघवृष्टि ", " अपीक धान्यें दिवसें दिवसें "[७] असा खरोखरच अनुभव येऊं लागला होता. " मेघ पडों भीती "[८] अशी स्थिति होती खरी; तरी पण पिकांनीं समूळच क्षिति सांडली नव्हती. इ. स. १६३० च्या ( शके १५५२ च्या ) उन्हाळ्यांत लोकांना अजून आशा वाटत होती; परंतु पुढें ती पिकांबरोबर करपून मरून गेली. सर्वत्र हाहाःकार झाला. 'काळ

१ परचक्रनिरूपण, श्रीसांप्रदायिक विविध विषयांक २४. 'पर' चक्राइतकेंच 'निज' चक्रही पाठीस लागलें होतें. "In 1630 Shahaji had plundered and seized the Nizamshahi country round Punā. Soon afterwards a Bijapuri army had looted and burnt Punā, Indapur and other villages of Shahaji and "totally desolated them". Next he had recovered possession of them by force. Then had followed the famine of 1630-31, the most terrible in the sad history of the Deccan". Shivaji And His Times. Jadunath Sarkar, 4th Edition, 1948, p. 23.

२–३ अभंग २६७, १२९.

४ श्रीसमर्थावतार, शं. श्री. देव, पृ. १८८.

५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५ वा. राजवाडे, पृ. ४६८.

६ Moreland (ibid.) p. 207, f. n. 1.

७ अभंग ३०३५. ८ अभंग ४१८६.

दुकाळें कहर पडला ' 'दर मणी होन दीड जाला', 'पायली ज्वारिस एक होन अशी धारण बसली', 'उपवासीं मरों लागलों', असे उल्लेख पुणें-नगर-सातारा विभागांतील तत्कालीन पत्रव्यवहारांत सांपडतात.[१] समकालीन प्रवाश्यांनीं व बखरकारांनीं लिहून ठेवलेली वर्णनें[२] दगडाचें हृदय असलेल्या माणसास सुद्धां रडूं आणतील इतकीं हृदयद्रावक आहेत. पाऊस मुळींच न पडल्यामुळें बीं मरून गेलें; गवत देखील रुजलें नाहीं. गुरें अगणित मेलीं. हजारों माणसें भुकेनें व्याकुळ होऊन घरच्याघरीं मेलीं; पूर्वी सुखासमाधानानें नांदणारीं असंख्य कुटुंबें दख्खन सोडून परागंदा होऊन अन्नाकरितां वणवण फिरूं लागलीं. अन्नासाठीं कित्येकांनीं स्वतःचे व बायकापोरांचे देह विकले, इतकेंच नव्हे तर पोटचीं पोरें देखील शिजवून खाल्लीं. नरमांस उघड उघड विकण्यापर्यंत पाळी आली. या दैवी आपत्तीचा अजून कडेलोट व्हावयाचा होता. इ. स. १६३१ त पिकें तयार व्हावयाच्या वेळेस अतिवृष्टीनें खराबी झाली; व पुरांनीं आणखी नासधूस झाली. परिणामीं रोगराईचा फैलाव झाला; व अंतीं सुदृढ प्रकृतीचा माणूस बघावयाला मिळेनासा झाला. या साऱ्या अनर्थपरंपरेचें यथार्थ वर्णन शिवभारतकारानें असें केलें आहे[३] :—"चिरस्य विषये तस्य न ववर्ष वृषा यदा । सस्यं सुदुर्लभमभूत्स्वर्णं तु सुलभं तदा ॥ प्रस्थमात्राणि रत्नानि विनिमय्य धनी जनः । कथंचन समादत्त कुलत्थान्प्रस्थसंमितान् ॥ आहाराभावतोऽत्यर्थं हाहाभूताः परस्परम् । पशून्वै पशवो जक्षुर्मानुषा अपि मानुषान् ॥".

"बरी या दुष्काळें पीडा केली ।" व "दुष्काळें आटिलें द्रव्ये नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ।" असा ज्याचा तुकारामानें स्पष्ट उल्लेख केला आहे तो हाच दुष्काळ होय या बाबतींत इतिहासाच्या अभ्यासकास संदेहच उरत नाहीं. तथापि तुकारामाच्या मनोवृत्तींची परिणति कशी झाली याच्या कालगणनेची स्वतः कल्पिलेली उपपत्ति ज्यांना टाकवत नाहीं अशा कांहीं तत्त्वज्ञान्यांना हें इतिहासाचें सत्य साहजिकच सोइस्कर वाटत नाहीं. कोणी म्हणतात[४] :—"इ. स. १६२९ (शके १५५१) हें दुष्काळाचें एकमेव वर्ष म्हणून त्याजकडे धांव घ्यावयाची जरूरी नाहीं. हिंदुस्थानांत मधूनमधून दुष्काळ पडतच असतात; तेव्हां शके १५४१ च्या आसपासचा कोणता एकादा दुष्काळ अभिप्रेत होता हें असंभवनीय नाहीं." याचीच री ओढतांना दुसरे म्हणतात[५] :— "तुकारामाच्या २१ व्या वर्षातील विपरीतकाळ म्हणजेच शके १५५१-५२ तील इतिहास-

---

१ शके १५५३ चा दुष्काळ. मिरीकर. भा. इ. सं. मं. शके १८३८ चें वार्षिक इतिवृत्त. पृ. ५०-५१. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १८, पृ. २९; खंड १५, पृ. ४४४-४६.

२ Badshahnama. Abdul Hamid Lahori. Elliot and Dawson, Vol. 7, p. 24.
The Travels of Peter Mundy in Europe and Asia, 1608-1667. Edited by Temple, Vol. 2, p. 55, Appendix A.
I. Van Twist. Amsterdam (1648).

३ कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत. संपादक स. म. दिवेकर, शके १८४९, अध्याय ८, श्लोक ५३-५५.

४ पहा—Mysticism in Maharashtra, Ranade, p. 263.

५ पांच संतकवी, तुळपुळे. पृ. ३०७.

प्रसिद्ध दुष्काळ होय असें पांगारकरांना वाटतें. पण तसें वाटण्याचें खरोखर कारण नाहीं. महाराष्ट्रांत आलटूनपालटून अवर्षण होतच असतें, व अशांतीलच एक दुष्काळ तुकारामाच्या वांट्यास आला इतकेंच. तो अमक्याच वर्षीचा दुष्काळ असें मानण्यास कोणताहि पुरावा नाहीं." महिपतीनें योजिलेल्या "पूर्वार्ध" या शब्दाच्या राजवाड्यांनीं केलेल्या मीमांसेशीं हे लेखक जरी सहमत असले तरी इतिहासज्ञ राजवाडे "दुष्काळ" शब्दाच्या या संदिग्ध अर्थाबद्दल मुग्धच राहिलेले दिसतात. दुष्काळ निराळा आणि अवर्षण निराळें. साध्या अवर्षणांत तुकारामासारख्या सधन सावकाराच्या स्त्रीला अन्नान्न करून मृत्यु येणें सर्वथैव संभवनीय नाहीं हें उमजण्यास सामान्य ज्ञान पुरेसें आहे. शके १५४१ च्या आसपास एकादा दुष्काळ किंवा दुष्काळासारखें अवर्षण पडलें होतें असें इतिहासांत नमूद नाहीं. गॅझेटिअरमध्यें[१] पांचशें वर्षांच्या दुष्काळांचा आढावा घेतला आहे; त्यावरून इ. स. १४७२–३ व इ. स. १५२० या सालांच्या दुष्काळांनंतर इ. स. १६३० पर्यंत दरम्यान दुष्काळ पडल्याचा इतिहासांत उल्लेख दिसत नाहीं. उलट, त्याकाळच्या कागदपत्रांत शके १५५२ च्या दुष्काळानें केलेल्या कहराचे अनेक उल्लेख सांपडतात. जेधे यांच्या शकावलींत "शके १५५२ प्रमोद संवत्सरे ये वर्षी दुकाळ पडिला" अशी नोंद आहे.[२] वर सांगितल्याप्रमाणें, इ. स. १६४८ त व्हिस्ट यानें प्रसिद्ध झालेल्या पुस्तिकेंत, मंडी या समकालीनाच्या प्रवासवर्णनांत, १६५० च्या सुमारास लिहिलेल्या बादशाहनाम्यांत, इ. स. १६७४ पूर्वी लिहिलेल्या परमानंदकवीच्या शिवभारतांत —सर्वत्र इ. स. १६३० (शके १५५२) च्याच दुष्काळाचीं वर्णनें सांपडतात. तुकाराम इ. स. १६३० त हयात होता हें निःसंशय; पण त्यानें दोन दुष्काळ पाहिले होते असें मानण्यास आधारच नाहीं. गुरूपदेशानंतर दारिद्र्याचें व्रत घेतलेल्या तुकारामानें इ. स. १६३० च्या दुष्काळाचा अनर्थ उतारवयांत पाहिला असता तर अभंगांत त्याची निराळीच प्रतिक्रिया आपणांस पाहावयास मिळाली असती. विशेष ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं महिपतीनेंही मोरलंडच्या वृत्तांताशीं जुळतें असेंच दुष्काळाच्या चढत्यावाढत्या दुर्दशेचें वर्णन मोठ्या बारकाईनें केलें आहे. "तों पुढें वरग पडलें कठिण । दो पायल्यांची जाहली धारण । पर्जन्य निःशेष गेला तेणें । चाऱ्याविण बैल मेले ॥" असें प्रथम सांगितल्यानंतर, पुढें "महाकाळ पडिला पूर्ण । जाहली धारण शेराची ॥ तेंही न मिळेचि कोणाप्रती । प्राणी मृत्युसदनासि जाती ।" असें दुष्काळाच्या अत्युग्र रूपाचें त्यानें दर्शन घडविलें आहे.[३] या सर्व बाजूंनीं विचार केला असतां, तुकारामानें उल्लेखिलेला व महिपतीनें वर्णिलेला दुष्काळ म्हणजे इ. स. १६२९-३१ चा दुष्काळ होय यांत शंकेला स्थानच राहात नाहीं.

अशा या विपरीत काळानें तुकारामाच्या जीवनावर हळू हळू कशी अवकळा आणिली, व अंतीं त्याला संसारांतून कायमचें कसें उठविलें हें सहज कळण्यासारखें आहे. घरांतील मृत्यूंचे दुर्धर आघात मस्तकीं पडतांच तो कांहीं काळ तरी बधिर होऊन सुन्न व्हावा

१ Bombay Gazetteer, Poona. Vol. 18, Part II, pp. 223-4.
२ जेधे यांची शकावली, टिळक. भा. इ. सं. मं. शके १८३८ चतुर्थ संमेलन वृत्त, पृ. १७८.
३ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओवी ८९ व ओव्या ११२–३.

हें साहजिक होतें. लागोपाठ घडत राहिलेल्या प्रियवियोगांनीं खिन्नतेची छाया लांबतच जात होती. या आपत्तींनीं, आणि विशेषतः पित्याच्या मृत्यूनें, उफाळणाऱ्या उत्साहाला पायंबद लावला असणारच; व दक्षता कांहींशी शिथिल झाली असणार. "पित्याचें जें काय धन। पुत्रा कोण वंचील॥"[१] या विश्वासानें तुकाराम आरंभीं आरंभीं "निर्भर" राहाणें स्वाभाविक होतें. पण शहाणा असला तरी पोरसवदा समजल्या जाणाऱ्या तुकारामाला बापाचा आब एकदम कसा यावा? सावकार हृदयाचा नित्य कठोर असावा लागतो व दिसावा लागतो; व तसा तो नकळत होतोही. पण ही भूमिका प्रारंभींच तुकारामाच्या अंगवळणीं पडणें सुलभ नव्हतें. या सर्व कारणांनीं सावकारीची वसुली व्हावी तितकी समाधानकारक होत नव्हती. तशांत इ. स. १६२८ आणि १६२९ या दोन सालांत फसल ठीक नसल्यामुळें वसूल आणखी घटत गेला. "मुदल न ये हातां। व्याज मरावें लेखितां॥"[२] अशीच परिस्थिति निर्माण झाली. लागोपाठ कोरडीं वर्षें आलीं तर रयतेपेक्षां, व्याजावरच जगणाऱ्या सावकाराला ज्यास्त रडण्याचा प्रसंग येतो. जेथें पुरेसें पिकलेंच नाहीं तेथें भरपाई होणार तरी कशी? महिपतीनें वर्णिल्याप्रमाणें "आपुलें द्रव्य दुसऱ्यावर। ते बोलों न देती साचार।" असाच अनुभव येणार.[३] घरच्या शेतीचें उत्पन्न इतरांच्याच प्रमाणानें कमी होत होतें. वाढत्या प्रपंचाच्या खर्चाचा बोजा उत्तरकार्यांनीं आणखी वाढत गेला.[४] तशांत किंमतीही सारख्या भरमसाट वाढतच जात होत्या. अशा ओढाताणीच्या परिस्थितींत पदरचें द्रव्य सारखें मोडून खाण्याची पाळी यावी यांत नवल नाहीं. या दोन वर्षांत आणि विशेषतः इ. स. १६३० सालीं तुकारामाच्या पदरची पुंजी पुरी संपुष्टांत आली असली पाहिजे. या साऱ्या दुर्दशेचें वर्णन त्यानें स्वानुभवानें केलें असल्यानें त्याच्या त्या सहजोद्गारांत आपोआपच अन्वर्थक शब्द आले आहेत. "न पडतां पुरें", "बहु पीडिलों संसारें", "सहज सरलें होतें कांहीं। द्रव्य थोडें बहु तें ही", "दुष्काळें आटिलें द्रव्य", "वेवसाय देखें तुटी येतां", या पंक्तींतील[५] प्रत्येक क्रियापदांत दुष्काळाच्या चढत्या कमानीच्या आपदा प्रतिबिंबित झाल्या आहेत. या दुष्काळांत पदरचें मोडून देखील गुजराण करणें शेवटीं शेवटीं अशक्य झालें. शिवभारतकारानें वर्णिल्याप्रमाणें धान्य सुदुर्लभ झालें व सोनें सुलभ झालें. पायलीभर रत्नें दिलीं तरी पायलीभर कुळीथ मिळण्याची पंचाईत.[६] "जो परयंत आपले पदरी होत ते कुल विकून खादले" असा विलाप करणाऱ्या अंबरापुरकर निंबरे यासारख्या प्रतिष्ठित व सधन गृहस्थासही शेवटीं

---

१ अभंग १४११.

२ अभंग १२२५.

३ भक्तलीलामृत अध्याय २७, ओवी ३६.

४ या काळांत आईच्या आग्रहास्तव वाजवीपेक्षां फाजील खर्च करून कान्होबाचा लग्नसमारंभ तुकारामानें थाटांत केला; आणि पुढें आईस तीर्थयात्रेस नेलें त्यांतही खर्च झाला; यामुळें बोजा वाढला व तीर्थयात्रेच्या गैरहजेरींत सावकारीची हानि झाली, अशी दिवेकर यांनीं तुकारामाची सांपत्तिक स्थिति बिघडण्याचीं कारणें दिलीं आहेत. हीं कारणें निराधार दिसतात. तुकाराम, दिवेकर, पृ. ३२-३३.

५ अभंग १३३३-३४.

६ पृ. ७९ वर दिलेलें शिवभारतांतील अवतरण पहा.

घरदार, इमारतीची लांकडें विकण्याचा प्रसंग आला ;[१] तशीच तुकारामाची अवस्था झाली असेल याची सहज कल्पना येते. संतजनांना उपमा देतांना त्याच्या तोंडून स्वानुभवाची भाषा आली कीं "हिरा ठेवितां काळें गाहाण । मोल न तुटे दुकाळीं जाण ॥"[२]. याप्रमाणें दुष्काळाची पहिली चढण आक्रमितानां गांठींचें मोडूनच तुकारामास कुटुंबाचा निर्वाह करावा लागला.

पण ही बांधलेली शिदोरी या खडतर यात्रेंत किती दिवस पुरणार ? तुकाराम हा केवळ देवापुढें हात जोडणारा अशी कांहींनीं समजूत करून घेतली आहे. पण तो हात जोडून स्वस्थ बसणारा खचित नव्हता. सावकारीच्या व्यवसायांत तूट येऊं लागली तेव्हां त्यानें इतर वाणीव्यवसायाचे उद्योग सुरू केले. मुख्यत्वें त्यानें वणजेचा व्यापार केला होता असें दिसतें. संसारानें फार पीडिलों असतां "मोडीं पुसें पिटीं ढोरें"[३] असें जें त्यानें म्हटलें आहे तें बैलांवरून मालाच्या गोण्या वाहून विकावयाच्या या वणजाऱ्यांच्या व्यापाराविषयीं. भूतकाळाकडे मागें वळून बघतांना तुकारामाला ज्या वेदना अजून जाणवत होत्या त्या वणजेच्या व्यापारांत स्वतःस पडलेल्या कष्टांच्या किंवा घडलेल्या नुकसानाच्या नसून मुक्या जनावरांना पिटाळावें लागलें, व त्यांच्या शेपट्या पिरगळाव्या लागल्या ह्या वणजेच्या सफरींतील अपरिहार्य पण निष्ठुर वर्तनाच्या ! या सफरींचें महिपतीनें केलेलें वर्णन मागें दिलेंच आहे. मिरच्या घेऊन कोंकणांत किंवा मीठ घेऊन बालेघाटांत तुकाराम या प्रकारें कदाचित गेलाही असेल. त्यानें इतरही नानाविध व्यवसाय केले असतील. सावकाराच्या प्रतिष्ठेची लाज गुंडाळून बाजारपेठेंत दुकानाचा पसारा मांडिला असेल. रूपकाच्या आवडीवरून जर कल्पना बांधावयाची तर सावकारीइतकाच दुकानाचा व्यापार त्याच्या खास परिचयाचा होता. पुढें हरिभक्तीच्या पेठेंत त्याला आपलें दुकानदाराचें रूप वारंवार दिसत असे. त्या हरिभक्तीच्या दुकानांत तुकारामानें आपला व लोकांचा जरी अमाप फायदा करून दिला तरी त्या बिकट परिस्थितींत त्यानें केलेले वैश्यव्यवसायाचे दुकानादि सारे सायास व्यर्थ गेले. अनुभव नसल्यामुळें म्हणा, किंवा वजनमापाच्या खरेपणाबद्दल खास आग्रह बाळगल्यामुळें म्हणा, अगर काळच आर्थिक हलाखीचा असल्यामुळें म्हणा, ही सारी धडपड करून सुद्धां दुष्काळांतील जीवनाच्या झगड्यांत त्याचा निभाव लागला नाहीं. असाच कांहीं व्यवहार अंगाशीं आल्याविषयींचा किंवा बुडत्याचा पाय तुटीच्या अधिक खोलांत गेल्याविषयींचा एक अभंग सांपडतो; त्यांत हताश वैतागाची परिसीमा गांठलेली दिसते :—"सुखें होतों कोठें घेतली सुती । बांधविला गळा आपुले हातीं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ काय करूं बहु गुंतलों आतां । नये सरतां मागें पुढें ॥ छ. ॥ होतें गांठी तें सरलें आतां । आणीक माथां ऋण जालें ॥ २ ॥ सोंकरिलियाविण गमाविलें पिक । रांडापोरें भिके लावियेलीं ॥ ३ ॥ बहुतांचीं बहु घेतलीं घरें । न पडे पुरें कांहीं केल्या ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं न धरावी आस । जावें हें सर्वस्व टाकोनियां ॥ ५ ॥"[४].

१ पूर्वोल्लेखित मिरीकर यांचा 'शके १५५३ चा दुष्काळ' हा लेख. २ अभंग ४२१८.
३ अभंग १३३४. ४ अभंग १२०७.

अठरा ते एकवीस वर्षांचे दरम्यान तुकारामानें केलेल्या नानाविध वैश्यव्यवसायांचा महिपतीनें दिलेला वृत्तांत सर्वसाधारणपणें अशा प्रकारें सुसंगत वाटतो. केवळ दोनच गोष्टींची संगति लावणें तितकेंसें सोपें वाटत नाहीं. अखंड नामस्मरणांत चित्त गुंतल्यामुळें व्यापाराकडे दुर्लक्ष झालें हें महिपतीचें निदान, निदान या कालखंडापुरतें तरी पटत नाहीं. हरिभक्तीमुळें या काळांतील आर्थिक आपत्ति तुकारामानें आपल्यावर ओढवून घेतल्या नसून, आर्थिक आपत्तींनीं परिणामीं त्याला हरिभक्तीकडे ओढून नेलें ही त्याची भक्तिमार्गानें प्रत्यक्ष घडलेली प्रगति होय. संतचरित्रकाराला संतपण हेंच सत्य व पूर्वाश्रमींचा संसार ही माया दिसणें स्वाभाविक आहे. परंतु संतपदवी पावेपर्यंत संसारांत गुंतलेल्या त्या व्यक्तीला मायाच सत्य वाटते. मागें एकदां उद्धृत केलेल्या नाटांतील अभंगांतील अवगुणाख्यान अक्षरश:[१] खरें मानावयाचें असेल तर असें म्हणावें लागतें कीं या कालखंडांत त्याची एकंदरींत वृत्ति खास हरिभक्तीची नसावी. नंतरच्या विपरीत काळांत जगणें हाच एकमेव धर्म साधावयाचा होता; देवधर्म संदींत पडला असेल तर नवल नाहीं. तुकारामाला व्यापार खोटा करवत नसे हें खरें; परंतु त्याच्या 'वाचेस हरिनामाचा फांटा' इतक्यांतच फुटला होता असें वाटत नाहीं[२]. कोंकणांत गेल्यानंतर मिरच्यांच्या गोण्या उसवून जेव्हां त्यानें दुकान मांडिलें, तेव्हां "चित्तीं बैसली पांडुरंगमूर्ती । देहाकृती नाठवे ॥" अशी त्याची स्थिति झाली, व तो देहींच विदेही झाल्यामुळें लोकांनीं त्याच्या मिर्च्या जवळजवळ लुटून नेल्या[३] हें सांगतांना आपण भविष्यकाळ वर्तमानरूपानें चालविला याची जाणीव स्वत: महिपतीलाही होती. मुलांबाळांना उपवास पडूं लागले तेव्हां तुकाराम घरोघर फिरूं लागला हा प्रसंग पुढें रंगवितांना महिपतीला अशी शंका आली कीं श्रोत्यांना यांत वर वर्णिलेल्या भक्तस्थितीशीं विरोध दिसेल. त्यानें या शंकेचें निरसन पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे;[४] पण त्या खुलाशानें शंका मिटत नाहीं. खरें पाहतां या कालखंडांत तुकारामानें देवाचें भजन केलें असेल तर तें आर्त म्हणून, कदाचित अर्थार्थी म्हणून, ज्ञानी म्हणून खचित नव्हे.

तुकारामाला संकटांतून सोडविण्यासाठीं प्रत्यक्ष पांडुरंगाला धांवून यावें लागलें या प्रकारचे तीन चमत्कारांचे प्रसंग या कालखंडांत महिपतीनें वर्णिले आहेत.[५] ते वाचून शंकेखोर माणूस असा प्रश्न विचारील कीं मग देवानें दुष्काळाच्या अन्नान्न दुर्दशेंतूनच

१ "नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हित । नावडे पुराण बैसले संत ।...नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मुर्तीचें ॥" अभंग ६१३.

२ भक्तलीलामृत, अध्याय २७, ओवी ३८.

३ कित्ता. ओवी ११८, १२३.

४ "तंव श्रोते आशंकित होऊनियां । प्रश्न वक्तयातें करिती ॥ तुक्यासि विरक्ति बाणलियावरी । तरी कां जातसे घरोघरीं । ऐसा प्रश्न केला चतुरीं । तरी तेचि परी अवधारा ॥ माशी भक्षिल्या होत वमन । परी पित्त उसळे क्षण क्षण । मग बोटें घालूनि काढितां जाण । अरोग तेणें होय काया ॥ तैशाच रीतीं साधक जन । संसारासि विटविती मन । लोकनिंदा होय जेणें । तेचि कारण योजिती ॥ मागें एकदोन वेळां निश्चित । संकटीं रक्षिलें पंढरीनाथें । ते कीर्ति प्रगटतां जनांत । ह्मणतील संत मजलागीं । ते निरसावयालागीं जाण । लोक निंद्य व्हावें आपण । सर्व पदार्थीं विटवावें मन । हिंडे ह्मणोन घरोघरीं ॥" कित्ता. अध्याय २८. ओव्या ९४–९९.

५ पृ. ७५-७६ पहा.

तुकारामाची सोडवणूक कां केली नाहीं ? त्याच्या बायकोला व मुलाला मृत्युमुखीं कां घातलें ? यावर महिपतीतर्फे असें उत्तर देतां येईल कीं देवाची लीला आणि दैवाची लीला यांत केवळ वरच्या मात्रेच्या एका वळशाचाच नव्हे तर अंतर्गत शुद्ध सत्त्वाचा फरक आहे. दैव अनिर्बंध दिसतें; देव भावाच्या नियमांनीं बांधलेला आहे. "दया क्षमा शांति। तेथें देवाची वसति।", किंवा "जें का रंजलें गांजलें। त्यासि ह्मणे जो आपुलें॥...देव तेथें चि जाणावा॥" हीं समीकरणें जर आपण मान्य केलीं तर बंदिवान ब्राह्मणावर दया दाखवून स्वतःच्या कर्जाची चिंता विसरून त्याचें कर्ज निवारण करणाऱ्या तुकारामापाठीं देव प्रगट होऊन उभा राहिला यांत चमत्कार तो कसला ? दुसऱ्या दोन चमत्कारांचें तात्पर्य हें कीं देवावर भार टाकून जो निश्चित होतो त्याची काळजी देवाला वाहावी लागते. असे निश्चित होणारे शूर विरळा; बहुतेक चिंतेनें ग्रासूनच चूर केलेले असतात.

या चमत्कारांचीं रहस्यें कशींही असोत; तुकारामाची पार्श्वभूमि व्यवहारज्ञानशून्य कल्पिल्याशिवाय महिपतीला ते रंगवितां येणें शक्य नव्हतें. चमत्कारांचें रूप उठावदार चितारण्यापुरतीच ती पार्श्वभूमि अनुरूप समजावी, प्रत्यक्ष ती तशी नव्हती, हें मुद्दाम सांगितलें पाहिजे. तुकारामाला "संसारयुक्ति" कळत नव्हती हा एक लोकभ्रम आहे. बापाबरोबर चातुर्यानें व्यवसाय चालविणारा तुकाराम सहसा व्यवहारज्ञान विसरला व भोळसटासारखा विश्वास टाकून सारखा फसूं लागला हें संभवनीयच वाटत नाहीं; आणि तेंही अशा प्रसंगीं कीं जेव्हां केवळ जगण्यासाठीं जागरूकता राखावी तेवढी थोडीच होती. हरिभक्तीच्या पेठेंत सुद्धां तुटीचा उदीम किंवा तुटीची साटोवाटी करावयास जो बिलकूल तयार नव्हता[1], "जातीचें वाणी मी पोटींचें कुडें। नका मजपुढें ठकाठकी॥"[2] असें देवाला सुद्धां ज्यानें बजावून सांगितलें, "मजसवें नको चेष्टा। नव्हे साळी कांहीं कोष्टा॥"[3] असें अभिमानानें जो सांगत असे, त्यानें गळ्याला फांस लागण्याच्या दिवाळखोर परिस्थितींत भोळ्या विश्वासानें फसवून घेऊन स्वतःचें हंसें करून घ्यावें हें संभवतें तरी कसें ? त्यानें आपद्धर्म म्हणून सुद्धां व्यापारांत सत्य सोडलें नसेल; करुणेच्या आवेगांत सगळी कमाई दान देखील दिली असेल; पण ठकांना उघड्या डोळ्यांनीं आपणास खचित लुबाडूं दिलें नसेल. अशी जबर शंका संभवते कीं त्याच्या कांहीं अभंगांतील रूपकांवरून भाविकांनीं आपलीच बुद्धया फसवणूक करून घेतली आहे. या रूपकांत सत्यप्रसंगांचा आभास नव्हे तर प्रत्यक्ष रूपच दिसतें असा त्यांनीं ग्रह करून घेतलेला दिसतो. दुकानाचें रूपक तुकारामाच्या अभंगांत साहजिकच वारंवार येतें. लोकांनीं पुरा लाभ घ्यावा म्हणून तो "उधार घ्या रे उधार घ्या रे। अवघे या रे जातीचे॥"[4], "नका कोणी करूं घेतां रे आळस। वांटितों तुह्मांस फुकाचें हें॥"[5] असें आग्रह करून सांगत असे. एकदां तर त्यानें असें वर्णन केलें आहे कीं "घातला दुकान। देती आलियासी दान॥ १॥ ॥ ध्रु.॥ संत उदार उदार। भरलें अनंत भांडार॥ छ॥ मागत्याची पुरे। धणी आणिकांसी उरे॥ २॥ तुका ह्मणे पोतें। देवें भरिलें नव्हे रितें॥ ३॥."[6] कोंकणांतील

१ अभंग २२६२. २ अभंग १८५९. ३ अभंग ५८४.
४ अभंग ४५००. ५ अभंग ४४३४. ६ अभंग २६३८.

सफरींत घातलेल्या दुकानांत मिरच्यांचीं पोतीं याच प्रकारें उधारीच्या नांवाखालीं फुकाचें दान म्हणून वांटलीं गेलीं ही आख्यायिका या अशा वचनांनीं सुचून त्यांतील शब्दांनीं सजविली तर नाहींना, असा साहजिकच संशय येतो. काळाबरोबर आख्यायिका अशाच वाढत असतात. मुलाम्यानें फसून पितळेचें कडें सोन्याचें म्हणून तुकारामानें विकत घेतलें हा फसवणुकीचा दुसरा प्रसंग यासारखाच रचिलेला दिसतो. "काळकुट पितळ सोनें शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्षी देतें ॥"[१] याची पुरी जाणीव त्याला होती. "शुद्ध कसूनि पाहावें वरि रंगा न भुलावें । तुका ह्मणे घ्यावें जया नये तुटी तें"[२] हें व्यवहारज्ञान तो लोकांना सांगत असे. सावकारीच्या व्यवसायांत दागिने तपासून कसाला लावून पारखून घेण्याचा ज्याला अभ्यास होता, तो हें काय जाणत नव्हता कीं "बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंगें हें पितळ न देखतां ॥ ?"[३] तेव्हां तो स्वतः भोळेपणानें मुलाम्याच्या भ्रमानें भुलून कसा जाईल? हे व यासारखे दुसरे अनेक उद्गार म्हणजे फसवणुकीच्या जुन्या प्रसंगानें निर्माण झालेल्या हीनगंडाच्या आठवणी खात्रीनें नव्हत. हा प्रसंग सुद्धां कदाचित् पुढील अभंगांतून तर उगम पावलेला नसेल ना? "सोनें दावी बरी तांबें तयापोटीं । खरियाचे साटीं विकूं पाहे ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवडी दोहींचें वेगळालें ॥ छ ॥...तुका ह्मणे थीता नागवला चि खोटा । अपमान मोटा पावईल ॥ ३ ॥."[४] याच दिशेनें शोध करीत राहिलें तर असेंही वाटूं लागतें कीं रानांत सोबती तुकारामास एकटा सोडून गेले असतां त्यानें देवाचा धांवा केला व चक्रपाणी गोणी उचलावयास आले, ह्या महिपतीनें वर्णिलेल्या प्रसंगाची स्फूर्ति बहुशः खालील दोन अभंगांवरून मिळाली असावी :—(१) "पडियेलों वनीं थोर चिंतवनी । उसीर कां आझूनि लावियेला ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ येईं गा विठ्ठला येईं गा विठ्ठला । प्राण हा फुटला आळवितां ॥ छ ॥ काय तुज नाहीं लौकिकाची शंका । आपुल्या बाळका मोकलितां ॥ २ ॥ तुका ह्मणे बहु खंती वाटे जीवा । धरियेलें देवा दुरी दिसे ॥ ३ ॥.—(२) आपुले गांवींचें न देखेसें जालें । परदेसी एकलें किती कंठूं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि पाहें मूळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ॥ छ ॥ पाहातां अवघ्या दिसतील दिशा । सकळ ही वोसा दृष्टीपुढें ॥ २ ॥ तुका ह्मणे कोणी न संगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ॥ ३ ॥"[५].

एका अर्थी या सर्व चमत्कारांपेक्षां दुष्काळाच्या सत्याचे चमत्कार अधिक अद्भुत होते. तीनच वर्षांपूर्वी ज्याचा भरभराटीचा व्यवहार चालला होता त्याचें आतां दिवाळें निघण्याची वेळ आली. "सुखात्तु यो याति नरो दरिद्रतां धृतः शरीरेण मृतः स जीवति ॥" अशी त्याची स्थिति झालीच होती. अंतीं व्यवहारांतलें आपलें मरण आपल्या डोळयांनीं त्याला पाहावें लागलें. महिपतीच्या वर्णनापेक्षांही तुकारामानें स्वतः केलेलें दिवाळ्याचें वर्णन हृदयाला कळवळा आणतें. "निघालें दिवाळें । जालें देवाचें वाटोळें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥

---

१ अभंग ३३७. २ अभंग २२९०. ३ अभंग २१६६.
४ अभंग ९४६. ५ अभंग १२७८–७९.

आतां वेचूं नये वाणी । विचारावें मनिच्या मनीं ॥ ध्रु ॥ गुंडाळिलीं पोतीं । भीतरी लावियेली वाती ॥ २ ॥ तुका ह्मणे करा । ऐसा राहे माजी घरा ॥ ३ ॥". "दिवाळखोर नारायण । यावरी बहुतांचें ऋण ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ उठतां चि उभे द्वारीं । अवघे दे दे ह्मणती हरी ॥ ध्रु ॥ माजघरीं दडे हरी । माया तडकी आड करी ॥ २ ॥." या अभंगांत[1] देवाला जरी दिवाळखोर केला असला तरी दिवाळ्याचे तुकारामानें प्रत्यक्ष भोगलेले परिणामच वर्णिले आहेत हें उघड दिसतें.

दिवाळें निघालें तेव्हां तुकारामाला लाजेनें मेल्यासारखें झालें असेल; पण लाजेनें मेल्याहून मेल्यासारखें होण्याचा खरा प्रसंग अजून पुढेंच होता. आधींच त्याची "जनांत उडाला पातेरा । कोणी येऊं न देती घरा ॥"[2] अशी अवहेलना होऊं लागली होती. आणखी आतां "घरीं अन्न किंचित नसे । पोरांसि पडती उपवास । उसने कोणीच न दे त्यास । दुष्काळ बहुवस देखोनी ॥"[2] अशी दारुण स्थिति प्राप्त झाली. कोठें मागावयाला गेला तर लोक कपाळाला आंठ्या घालून "ऐसेंचि जाहलें घरोघरीं"[2] असें निष्ठुर उत्तर देत असत. प्रत्येकास आपला प्राण प्यारा असणारच. अशा पाषाणहृदयी माणसांना उद्देशूनच पुढें तुकारामानें सवाल टाकिला असेल कीं "दारीं हाका कैसें करवतें भोजन । रुची तरि अन्न कैसें देतें ॥"[3]. त्यावेळीं प्राण पूर्णपणें अन्नमयच झाले होते. देवाच्या पायीं मन कसें लांचावलें पाहिजे हें सांगतांना तुकारामानें पुढें "दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन ।", "क्षुधार्थी अन्नें दुष्काळें पीडिलें । मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ॥"[4] अशा अन्नाला हपापलेल्या माणसांच्या उपमा घेतल्या आहेत. "बरगासाटीं खादलें शेण"[5] हें सुद्धां त्याच्या अनुभवाला आलें. होतें नव्हतें तें सारें विकून थोडेंबहुत धान्य मिळत होतें तोंपर्यंत त्यानें मिळविलें. "घरीं गोण्या ताट मूठ होतें । तें विकिलें त्वरित वाणियासी ॥ त्याचें आठ शेर धान्य । आलें तेव्हां महा प्रयत्नें । करोनियां पातळ तरण । कुटुंब रक्षण करीतसे ॥ तेंही धान्य तेव्हां सरलें । इष्टमित्रीं उपेक्षिलें । न जावेंचि ऐसें जाहलें । कोठें वहिलें सर्वथा ॥ जातां धनवंतांच्या घरा । ते उठवोनि लाविती सत्वरा । लौकिकीं उडाला पातेरा । संसार मातेरा जाहला कीं ॥."[6] पुढें शेराची धारण झाल्यावर "दो चौंदिवशीं मिळे तरण । भाजीपान भक्षिती ॥."[6] तुकारामाची पहिली बायको आधींच दम्यासारख्या दुर्धर व्याधीशीं झगडतांना भागलेली होती. तशांत बाळंतपणाचे कष्ट संपतात न संपतात तोंच दारिद्र्याच्या वेदना व दुष्काळाच्या यातना जाचूं लागल्या. घरांतील बाकीच्या तरण्याताठ्या मंडळींना जे उपवास सहन करतां आले ते तिला सोसणें शक्य नव्हतें. शेवटीं गरीब बिचारी अन्न अन्न करीत मेली! इतक्या लहान वयांत आणि अशा खडतर परिस्थितींत तिचें तान्हें बाळ मागें जास्त दिवस जगूं शकलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. तुकारामाचा

१ अभंग ३१८८ व (४६०७ च्या पुढें दिलेल्या अभंगांपैकीं) अभंग ४.

२ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओव्या ९२–९३, १०१. ३ अभंग २४६३.

४ अभंग ४५०२, ३९०८. ५ अभंग ८५१. (बरग = दुष्काळ.)

६ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओव्या १०८–११४.

हा ज्येष्ठ मुलगा, संतोबा, ज्याचे ठायीं त्याची " गहन प्रीति " होती, तोही मरण पावला. तुकारामाची माया या बायकोवर व मुलावर गुंतली होती. बोल्होबाच्या मृत्यूनें प्रारंभ झालेलें " पंचक " पुरें झालें ; आणि त्याबरोबर तुकारामाचा पहिला प्रपंचही संपला. पुढें असक्त होऊन " उदासीनवदासीनः " असा झाला असतां तुकाराम हें म्हणूं शकला खरें कीं—" बाईल मेली मुक्त जाली । देवें माया सोडविली ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ छ ॥ पोर मेलें बरें जालें । देवें मायाविरहित केलें ॥ २ ॥"[1]. पण आपल्या मुलाच्या आईला अन्नासाठीं व्याकुळ होऊन प्राण सोडतांना पाहून या एका काळच्या सधन सावकाराला त्याक्षणीं मायावाद खचित आठवला नसेल. लाजेनें आणि दुःखानें ब्रह्मांडच आठवलें असेल. संतांना आत्मचरित्र सांगतांना " लाज वाटे जीवा त्रासलों या दुःखें "[2] असें जें तुकारामानें म्हटलें त्यांत त्या प्रसंगींची हृदयाची व्यथा थोडीबहुत प्रतीत होते. त्यावेळीं विठू नव्हे तर संतू हृदयाचा विश्राम होता. त्याला आणि त्याच्याबरोबर संसाराच्या साऱ्या भावनांना मूठमाती देण्यास उभा राहिलेल्या तुकारामावर पूर्वार्धाचा पडदा या ठिकाणीं टाकावा हें उचित.

---

१ अभंग ७७८. २ अभंग १३३३.

प्रकरण दहावें

## सारासारविवेक

उत्तरार्धाचा पडदा वर नेण्यापूर्वी विष्कंभकाच्या या प्रकरणांत विपरीत काळाच्या चार वर्षांत तुकारामाच्या अंतःकरणप्रवृत्तींची कोणत्या दिशेनें प्रगति होत होती याचा शोध करावयाचा आहे. या शोधांतच भावी संविधानकाची सूचना सांपडेल. दुःखांनीं व्यथित होत असतांनाच हृदय नकळत पालटत जातें. आघातांनीं हतबुद्ध झालेल्या माणसाच्या बुद्धीची अंतःशुद्धि होतच राहते. आपदांच्या मुशींत त्रिविधतापांचे संस्कार होत असतांनाच विकार पृथक् होऊन शुद्ध सारतत्त्व निष्पन्न होतें. भट्टींत हा जो सारासारविवेक चालू असतो त्याचें निरीक्षण करणें अत्यावश्यक आहे. नराचा नारायण होण्याची किमया अगम्य दिसते खरी; पण या निरीक्षणानें तिचें रहस्य सुगम होतें.

या चार वर्षांत तुकारामास सावकारीचा हळूहळू वीट येऊं लागला होता. व्याजानें संपत्ति संपादन करण्यांत जी आत्महानि होते तिची जाणीव त्याला होत होती. "ऋण वैर हत्या। हें तों न सुटे नेंदितां॥"[1] हा सावकारीचा निर्घृण नियम माणुसकी जाणतच नाहीं. सुपांतले व जात्यांतले—कालांतरानें तो या सर्वांना सारखेंच भरडून टाकतो. निःसत्त्व रयतेकडून रोख्यांतील लेखाप्रमाणें आपणास येणें असलेला मांसाचा लचका तोडून घेण्याइतका तुकाराम कसाब शायलॉक झाला नव्हता. "व्याजें कासाविसी बहु केलें"[2] अशीं गयावया करणारीं कुळें त्याला आतां प्रत्यहीं भेटत होतीं. त्यांच्या दारांत धरणें बसणें, त्यांना माजघरांत कोंडणें, "धरूनि पालव असुडीन करें"[3] अशी त्यांची चारचौघांत विटंबना करणें—हे सारे सावकारीचे निष्ठुर पाश आवळणें त्याच्या अंगवळणीं पडेना. खिस्तीच्या उदीमांत आनंद मानणारे ब्राह्मणही त्याच्या माहितींत होते. त्यांचें ब्रह्म-ज्ञान त्याजपाशीं नव्हतें, उलट स्वतः कुणबी असल्यामुळें कुणबी कुळांच्या सुखदुःखांचें त्याला चांगलेंच ज्ञान होतें. या खिस्त्यांचा किळस यावा अशा भाषेंत त्यानें कसा उपहास केला आहे पहा:—"खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलयुगीं। महारवाडीं मांगीं हिंडतसे॥ १॥ ॥ध्रु.॥ वेवसाव करितां पर्वत मांगासी। ते पैं विटाळासी न मानिती॥ छ॥ मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा। तोंडावरि थुंका पडतसे॥ २॥"; "अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार। हिंडे घरोघर चांडाळाचे॥ १॥ ॥ध्रु.॥ अंत्यजा खिचडी वेताती मागून। गाळियाप्रदान मायबहिणी॥ छ॥."[4] दुष्काळांत थकलेल्या कुळांकडून वसुली उकळण्यासाठीं हीं सारीं ब्रह्मास्त्रें वापरण्याइतकें त्याचें मन निर्विकार झालें नव्हतें. व्याज हें पाप आहे—

१ अभंग १२२८.
२ अभंग २५३८.
३ अभंग १६७६.
४ अभंग ३९२१, ३९२२.

'शमलं कुसीदम्'[१]—हें त्याच्या सभोंवतालच्या इस्लामास सुद्धां पसंत असलेलें उपनिषदाचें तत्त्वज्ञान दुष्काळानें त्याला शिकविलें. म्हणूनच दुष्काळानंतर कर्जरोखे इंद्रायणींत बुडवून हें पाप त्यानें कायमचें धुवून टाकिलें.

किंबहुना श्रीमंतींत पापाचा अंश हा असावयाचाच याची त्याला प्रचीति येऊं लागली होती. वजनमापांचें सत्य व्यापारी पाळत नव्हते व भोळ्याबाबड्या साळ्या-कोष्टयांना ठकवीत होते हें तो पाहात होता. ठकाठकींतच नफा ठीक होतो. सत्याचा जय होतो खरा; पण संपत्तीच्या चढाओढीत सत्यवानास हमखास विजय मिळत नाहीं—हें नानाविध वैश्यव्यवसाय करून त्याला आतां कळून चुकलें होतें. नफ्याच्या प्रमाणांत पापाची रास वाढते हें व्यवहाराचें त्रिकालाबाधित त्रैराशिक तो शिकत होता. आपल्या भोंवतालच्या प्रतिष्ठित धंद्यांहुद्यांविषयीं त्याचा जो ग्रह झाला होता तो त्यानें पुढें आपल्या शिरस्त्याला अनुसरून स्पष्ट शब्दांत मांडला आहे :—"कांहीं दुसरा विचार । न लगे करावा चिफार ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ सेव्या ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ॥ छ ॥ पाप न लगे धुंडावें । पाहिजे तरि तेथें जावें ॥ २ ॥ जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ॥ ३ ॥ गाई ह्मैसी हेड । तुंप विकी महा द्वाड ॥ ४ ॥ तुका ह्मणे पाहीं । तेथें पुण्या रीघ नाहीं ॥ ५ ॥."[२] या पापांपासून अलिप्त राहावयाचा प्रयत्न करून त्यानें आपलें हंसें करून घेतलें होतें; कारण सत्यानें पैसा मिळवितां येतो ही कल्पनाच मुळीं व्यापाऱ्यांना हास्यास्पद वाटते. या दृष्टीनें अर्थार्जन हें त्याला अनर्थावह वाटूं लागलें होतें. "अवघें पापं केलें तेणें । जेणें सोनें अभिळाषिलें ॥ "[३] हा सिद्धांत तो अनुभवानें बसवीत होता.

आणि दुष्काळांत त्याला हें कळून चुकलें कीं, सोनें असलें काय नसलें काय सारखेंच. गरीब असो वा श्रीमंत असो, देहधारणासाठीं अन्न सर्वांना सारखेंच लागतें. जेथें अन्नच मिळत नाहीं तेथें अन्नाऐवजीं सोनें कांहीं चावून खातां येत नाहीं. दुर्भिक्षपरचक्रादि आपत्ति गरीब श्रीमंत हा भेद सहसा करीत नाहींत. धनसंचय विफल होय, व धान्यसंचय हा तर माणुसकीविरुद्ध घोर अपराध होय, हें दुष्काळानें त्याच्या मनावर कायमचें बिंबविलें. "एक शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ कां रे तृष्णा वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ॥ छ ॥"[४] हा प्रश्न आपल्या मनाला त्यानें कितीदां तरी विचारला असेल. एका दिवसाला लागेल त्यापेक्षां अधिक संचय करावयाचा नाहीं हें व्रत घेऊन दुष्काळाचा हा चिरस्मरणीय धडा न विसरतां त्यानें पुढें आचरणांत आणला.

ज्यांच्याकरितां "दिवसा व्यापारचावटी । रात्री कुटुंबचिंता मोटी । " करावयाची, "खाटेवरि पडतां । (ज्यांची) व्यापी चिंता तळमळ," तीं सारीं "पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं"[५] केवळ सुखाचे सोबती आहेत, याची विपरीत काळांत त्याला खात्री पटली. आधींच तो दोन बायकांच्या भांडणांनीं वैतागून गेला होता. या निजसेजेच्या अंतुऱ्यांच्या नाजूक कटकटी मिटविण्यांत त्याचा जीव मेटाकुटीला आला असणार. एका छपराखालीं

---

१ महानारायणोपनिषद् २०-१२. २ अभंग ४०२२. ३ अभंग २७०.
४ अभंग २०१६. ५ अभंग ४२०७, २०४१, १६८४.

दोन स्त्रिया म्हणजे भांडणतंटा, हा संकेत चिनी वर्णलिपींत वज्रलेप करून टाकिला आहे ! तुकारामानें स्वानुभवानें हा सिद्धांत बांधला कीं, "एका पुरुषा दोन नारी। पाप वसे त्याचे घरीं ॥ ".[१] दोन बायकांबरोबर या पापाचाही तो धनी झाला होता. ही दुसरी नवी राणी तरणीताठी आणि मोठ्या श्रीमंताची लेक. तिचा "धागडधिंगा" तसाच मोठा. पहिली जुनी सोबतीण; आणि तशांत तिनें पुत्राचा अहेर केलेला. एकीकडे काम ओढी तर दुसरीकडे प्रेम ओढीत होतें. या भेदाभेदांच्या ओढाओढीमुळें 'सेजबाजभोगविलासांत' तरुण दंपतीच्या एकचित्ततेनें त्याचा लय लागेना. नुकसान येऊन धंदा बसला. तेव्हां नव्या व्यवसायांच्या अखंड हव्यासानें पीडिलेल्या जीवाला विलास गोड तरी कसे लागावे ? धनाबरोबर बायकांकडून मिळणारा प्रेमाचा मान आटत चालला होता. स्वतःच्या पोटाला चिमटे घ्यावयाची जेव्हां त्यांना पाळी आली तेव्हां तर त्या त्याला उघड चिमटे घेऊं लागल्या. "घरीं हळहळ करिती दारा। ह्मणती संसारा काय करूं ॥... आह्मीं उठलों माणसांतून। खावयासि अन्न मिळेना ॥ घरीं कांता ऐशा रीतीं। नानापरीचे अपशब्द बोलती। बाहेर पिशुन सर्व हांसती ॥. "[२] अशा वातावरणांत "जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें"[३] हें साऱ्या संसारसंबंधांचें सारतत्त्व त्याला समजूं लागलें.

ज्या मायबापांच्या व दारापुत्रांच्या संगांत माया गुंतवावयाची ते तर नित्य मृत्यूच्या संगतींत असतात, हें लागोपाठ घडलेल्या पांच मृत्यूंनीं त्याला पुरतें कळून चुकलें. मृत्युदुःखाचें 'आर्यसत्य' अशाप्रकारें त्याच्या आयुष्यांत आरंभींच स्थापिलें गेलें. त्यानेंच म्हटल्याप्रमाणें "जीवा नाहीं कुडचिं लाहातें। ये भिन्न पंच भूतें। रचतें खचतें संचितें। असार रितें फलकट ॥ पुत्र पत्नी सहोदर। मायबाप गोताचा पसर। मिळतां काष्टें लोटतां पूर। आदळीं दूर होतीं खळाळीं ॥ "[४] हा अनुभवाचा कडू घुटका त्याला घोळवून घोळवून गिळावा लागला.

गोताचा पसाराच काय, भोंवतालीं दिसतें तें सारेंच फलकट सृष्टीच्या एका निःश्वासानें चटसारें उडून जातें हें त्याला दिसून आलें. राष्ट्रावर आलेल्या असल्या दारुण आपत्तींनीं जगताला अनीश्वर म्हणणारे आसुरी संपत्तीचे वारस सुद्धां क्षणभर गोंधळून जातात. लिस्बन शहराचा एक भाग दिसतां दिसतां खचून जाऊन समुद्रांत लुप्त झाला असतां युरोपांतील अठराव्या शतकांतील निरीश्वरवादी सुद्धां संदेहांत गटांकळ्या खाऊं लागले. तेव्हां हें जग केवळ 'कामहैतुक' नसून, मानवांचीं क्षुद्र कळसूत्री बाहुलीं खेळविणारा कोणी नियंता असला पाहिजे असें तुकारामासारख्या सामान्य माणसास वाटलें तर आश्चर्य कसलें ? एकट्या मानवाचा दुबळेपणा विश्वांतील विश्वंभरांत विलीन होतांच नाहींसा होतो, व त्याला देवाचें बळ लाभतें ही सिद्धि महाराष्ट्रांतील संतचरित्रांच्या द्वारा त्याच्या ऐकिवांत आली होती. तिच्या शोधाकडे त्याची वृत्ति साहजिकच वळूं लागली.

---

१ अभंग १२३७. २ भक्तलीलामृत, अध्याय २७, ओवी ५६–५८.
३ अभं २९६६. ४ अभंग ६३४.

अशा मनोवृत्तींत तुकाराम सारासारविवेक करूं लागला तर नवल नाहीं. तुकारामाच्या वैराग्याकडे दोन निरनिराळ्या दृष्टींनीं लोक पाहात आले आहेत. कांहींस असें वाटतें कीं "प्राणी भोगिती त्रिविध नरक । मग पश्चात्तापें करूनि देख । मोक्षसुख पावती ।"[1] ह्या संतचरित्रांच्या सिद्धांताचें हें आणखी एक उदाहरण आहे. संसार वमन झाला तरी पुनःपुनः संसारचक्र सारखें चालू ठेवणें यांतच कांहींना पुरुषार्थ वाटतो. त्यांच्या मतें तुकारामाचें वैराग्य हा संसाराच्या रणांगणांतून पाय मागें घेणाऱ्या भ्याडाचा पळपुटेपणा होय. त्यांना असें वाटतें कीं आपत्तींच्या भारानें तुकाराम वांकला, त्याची दृष्टि विकृत झाली, व त्याच्या हतबल आत्म्याला समग्र जीवनाचें दर्शन होऊं शकलें नाहीं.[2] तुकारामाच्या वैराग्याच्या दोन मीमांसेंतील ही उत्तर मीमांसा सर्वथैव चुकीची आहे. पूर्व मीमांसेंत तथ्य आहे, पण तें परंपरागत पद्धतीनें मांडलें आहे. त्रिविधतापांनीं याप्रकारें पोळला असतां जो संसारांत पूर्ववत् लोळूं शकतो त्याला ग्रामपशु म्हटल्यानें मोठासा अन्याय होणार नाहीं. उलट अनुताप झाला म्हणजे माणूस मुक्त होतोच असा नियम नाहीं. अनुतापाचा मार्ग चालूं लागलें म्हणजे वळणावरच कांहीं मोक्षाचें गांठोळें ठेवलेलें नाहीं. तो मार्ग खडतर आहे; वाटेंत अनेक कांटे आहेत. प्रस्थान काढणाऱ्या सर्वांनाच पेणें गांठतां येत नाहीं.

खरें पाहतां वर सांगितल्याप्रमाणें तुकारामाच्या वृत्तींत हळूहळू पालट होत चालला होता. ज्यांना आपण आधुनिक भाषेंत "जीवनाचीं मूल्यें" म्हणतों त्यांच्याप्रत तो संसाराच्या अंधकारांतून चांचपडत चालला होता. आर्यांच्या भाषेंत यालाच सारासारविवेक म्हणत असत. बुद्धाच्या शब्दांत[3] सांगावयाचें म्हणजे :—

असारे सारमतिनो सारे चासारदस्सिनो ।
ते सारं नाधिगच्छन्ति मिच्छासङ्कप्पगोचरा ॥
सारं च सारतो ञत्वा असारं च असारतो ।
ते सारं अधिगच्छन्ति सम्मासङ्कप्पगोचरा ॥

---

१ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओंवी १३०.

२ प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धनांसारख्या रसग्रहणक्षम अभ्यासकानें ही मीमांसा करावी ह्याचें थोडेंसें आश्चर्य वाटतें. ते म्हणतात :—"It is not my purpose now to discuss whether the profoundly pessimistic view he took of the world was philosophically true, whether the revulsion of feeling was not the result of a blurred vision, whether it does not point to a soul too small to comprehend life in its entirety, and too narrow and feeble to keep unbent against the shock of calamities. It is enough for us to note the fact. The battle of life proved to Tukaram too full of perils and risks, it wore to him a forbidding look—a look of horror. Tukaram could not stand the fire, he fled the field. His was not a militant spirit. His was the heroism of quiet retirement." Some Abhangas of Tukaram. Prof. W. B. Patwardhan. The Fergusson College Magazine, Vol. I, No. 3, September 1910.

३ धम्मपद, ११–१२.

(असार तें सार मानी, देखे सारीं असार जो ।
तयाला सार लाभेना, मिथ्या संकल्पि जो भ्रमे ॥
सारांत सार जो जाणी, असारांत असारही ।
तयाला सार लाभे, जो सत्यसंकल्पि वावरे ॥)

संसार हा दारापुत्रधनांभोंवतीं उभारिलेला पसारा आहे. त्यांतील सार आणि असार शोधून काढण्यांत तुकारामाच्या वृत्ती आतां गुंतल्या. या शोधांत सत्यसंकल्पाचा दाता पांडुरंग त्याला भेटला, या कटेवर हात ठेवलेल्या नावाड्यानें त्याची नाव पैलतीराला नेली हा कुळांतील संस्काराच्या पूर्वसंचिताचा योगायोग होय. भवसागरांतील वादळाच्या मारानें डोलकाठी तुटून पडली तरी सुद्धां तारूं सोडून जाणारा तुकाराम हा भित्रा खलाशी नव्हता. "डगमगी तो वांयां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥"[१] हें ब्रीदवाक्य झंझावाताशीं झुंझणाऱ्या वीरांना त्यानें दिलें आहे. जडत्व कमी करण्याकरितां अहंतेची गांठोळीं फेकून देत, वासना उपसून टाकीत, तारूं तरंगत ठेवण्यासाठीं तो अखंड झगडत राहिला असता. पण विठ्ठलाच्या हातीं सुकाणूं दिल्यामुळें भवाब्धि पार तरून जाणें त्याला सोपें झालें.

---

१ अभंग २३१३-१३.

प्रकरण अकरावें

## साधना

संसारसागर तरून पार करण्याच्या सफरीच्या प्रवासवृत्ताची विस्तृत रोजनिशी— इंग्रेजींत "लॉग्-बुक" म्हणतात ती—तुकारामानें आपल्या अभंगांत लिहून ठेविली आहे. किंबहुना तुकारामाचे समग्रच अभंग त्याच्या अध्यात्मसिद्धीचें आत्मवृत्त होत असें म्हटलें तरी चालेल. ही सफर कमीअधिक सायासांनीं पुरी करून अनेकांनीं पूर्वी पार गांठला होता. त्यांनीं स्वानुभवानें प्रमुख मार्ग आंखून दिले होते. बुद्धासारख्यांनीं बिनतोड गणित करून त्यांतील एका बिकट मार्गाच्या नकाशांत निश्चिति आणिली होती. पण भक्तीचें साधें होकायंत्र जवळ बाळगणाऱ्या सामान्य नाविकाला तुकारामाच्या अभंग-रोजनिशीइतका दुसऱ्या कशाचाही उपयोग होत नाहीं. वाटेंत विघ्नें कोणतीं व कोठें आलीं, व भगवत्कृपेनें तीं कशीं दूर करितां आलीं, याची बित्तंबातमी तुकारामाच्या अभंगांत सांपडते; व मागच्यांस शहाणे करून सोडते. टीकांचीं व हेटाळणीचीं वादळें सारखीं कशीं उठत होतीं, निषेधांचे जबर आघात कसे बसंत होते, दिवसानुदिवस जमीन न दिसल्यामुळें निराशेच्या सोसानें कंठ कसा सुकून गेला, कामक्रोधादि चांच्यांनीं छापे कसे घातले, इंद्रियांच्या नाविकसंघानें बंडाळी कशी केली, चिंतेच्या भोवऱ्यांत तारू कसें सांपडलें,—इत्यादि एक ना दोन, अनेक प्रसंगांचीं सत्यचित्रें तुकारामानें स्पष्ट शब्दांत ठशठशीत रेखाटलीं आहेत. दुर्दैवाची एकच गोष्ट ही कीं खुद्द तुकारामाच्या हातच्या मूळ वह्या सांपडत नसल्यामुळें इतरांनीं कालांतरानें आपल्या सोयीप्रमाणें केलेल्या उताऱ्यांच्या नकलांवरच आपणांस अवलंबून राहावें लागतें. त्यांत अभंगांचा कालक्रम बिनचूक सांभाळिला गेला नाहीं; व म्हणून रोजनिशींतील नोंदी मागेंपुढें झाल्या आहेत. त्यांची व्यवस्थित जुळवाजुळव भक्तीच्या या कल्याणमार्गानें प्रत्यक्ष पार तरून गेलेल्या अधिकारी नाविकालाच करतां येईल. "काशिस जावें, नित्य वदावें" असे या सफरीविषयीं नुसत्या बोलांचे संकल्प करणाऱ्या मजसारख्या अजाणाला हें काम जुळणार नाहीं. मला हा सारा दृष्टीआडचा अपरोक्षानुभव आहे. या मार्गांतील अंतरींच्या खाणाखुणांचें सूक्ष्म गणित तर राहोच, पण धोपट मार्गाच्या ढोबळ ठोकताळ्यांचें स्थूल रेखागणित सुद्धां मला अवगत नाहीं. तेव्हां अध्यात्ममार्गाचा तुकारामानें अनुसरलेला अनुक्रम मी केवळ कल्पनेनेंच लावण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या चुकीच्या अनुमानांनीं त्या नाविकाग्रणीचें मार्गदर्शन भलत्याच दिशेस लावलें नाहीं ना, आणि त्याहीपेक्षां त्याच्या स्वानुभवाच्या सुसंगतींत काल्पनिक विपर्यासांची ढवळाढवळ करून मी त्या संत गुरुरायावर अन्याय तर करीत नाहीं ना, याची सारखी चिंता वाटते. असो. आतां चरित्राच्या उत्तरार्धाचा, चुकत चुकत कां होईना, अंत गांठणें हेंच श्रेयस्कर होय.

तुकारामाची वृत्ति संसारांतून मुरडली याचें कारण तो संकटांनीं गांगरून रडवा झाला होता हें नसून संसाराच्या असार पसाऱ्याची त्याला खरी जाणीव झाली हें होय. धर्माचें आद्यसाधन जें शरीर तेंच मुळीं क्षणभंगुर आहे, काळानें तें सदाचें मुखांत कवळिलें आहे, हें दुष्काळांतील कृतांताच्या तांडवांत त्याला स्पष्ट दिसून आलें. म्हणून "शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयाचिया ॥ "[१] हा निरुत्तर करून टाकणारा प्रश्न त्याला विचारावासा वाटला. धन नाशिवंत असून शिवाय देहधारणास देखील निरुपयोगी आहे हा अन्नान्न करून मेलेल्या प्रिय पत्नीच्या विलापांतील करुण सूर त्याच्या कानांत सारखा घुमत होता. म्हणून त्याला साहजिकच इच्छा झाली कीं "घेईं राहे ऐसें धन";[२] आणि "थोडें परी निरें । अविट तें घ्यावें खरें ।".[३] कांहीं काळ शोकानें शोक वाढविणारा व परत संसारांत पूर्ववत् गढून जाणारा तो सामान्य माणूस नव्हता. दुष्काळानें विसकटून टाकलेली व्यवहाराची घडी पुनः नीट बसविण्याइतकें कौशल्य त्याच्या अंगीं खचित होतें. तशांत, खातीं माणसें कमी झाल्यानें संसाराचा भार फार हलका झाला होता. आतां घरांत केवळ तो व आवलि, कान्होबा व त्याची बायको इतकीं इन मिन तीन नसलीं तरी फक्त चारच माणसें उरलीं होतीं. त्यांचें भरणपोषण त्याला कधींच जड गेलें नसतें; व थोड्याच अवधींत व्यवसायाचा जम बसवून त्याला पैसाही जमा करितां आला असता. पण त्याच्या आकांक्षा आतां निराळ्या होत्या. "आतां कांहीं सोस न करीं आणीक । धरीन तें एक हें चि दृढ ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ जेणें भवसिंधु उतरिजे पार । तुटे हा दुस्तर गर्भवास ॥ छ ॥ जोडीन ते आतां देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ॥ २ ॥ तुका ह्मणे बरा जोडला हा देह । मनुष्यपणें इहलोका आलों ॥ ३ ॥ ".[४] कांच टाकून त्याला परिस शोधावयाचा होता. प्रपंचाकडे माघारा होऊन तो खऱ्या अर्थानें परमार्थाकडे वळला. बुद्धासारखा त्याचा हा निर्धार अढळ राहिला. सभोंवतालच्या सांसारिकांचा या बाबतींतील उदासीनपणा पाहून त्यानें जे आश्चर्याचे उद्गार काढले आहेत ते वाचतांना आपण जणूं काय बुद्धचरितांतील उताराच वाचीत आहोंत असा भास होतो. "वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥ छ ॥ काय मानुनियां राहिले निश्चिती । काय जाब देती यमदूतां ॥ २ ॥ कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥ ३ ॥ काय हातीं नाहीं करील तयासी । काय जालें यांसी काय जाणों ॥ ४ ॥".[५] संसाराच्या मांडीवरून आपत्तीनें सापत्नभावानें ओढून काढल्यानंतर ध्रुवाप्रमाणें त्याला आतां अढळ पद शोधावयाचें होतें. "जगति क्षयधर्मके मुमुक्षुर्मृगयेऽहं शिवमक्षयं पदं तत्"[६] या निर्धारानें तुकाराम संसाराकडे पाठमोरा झाला. आपत्तींचे आघात झाल्यामुळें संसाराकडे पाठ दाखवून तो पळून गेला नाहीं. तो भ्याड नसून खरा शूर होता. "जिंकावा संसार । येणें नांवें तरी शूर ॥ ".[७]

---

१ अभंग ५४८. २ अभंग ९०९. ३ अभंग ५७८. ४ अभंग ९३८.

५ अभंग १४९६. "कृपणं बत यज्जनः स्वयं सन्नवशो व्याधिजराविनाशधर्मा । जरयार्दितमातुरं मृतं वा परमज्ञो विजुगुप्सते मदान्धः ॥ " बुद्धचरित. अश्वघोष. सर्ग ५, श्लोक १२.

६ बुद्धचरित, सर्ग ५, श्लोक १८. ७ अभंग ३१११.

नगर वाचनालय सातारा


संसार जिंकल्याशिवाय आपण परत मागें फिरूं अशी शंका सुद्धां त्याच्या मनाला शिवली नाहीं, म्हणून लागेबांधे तोडून त्यानें रानांत कायमची दडी मारिली नाहीं. पळता पाय घेण्याची दुर्बुद्धि आठवूं नये या भीतीनें गड सर करण्यास निघणारे सूर्याजी शिडीचा दोर कापून टाकतात. "रणीं निघतां शूर न पाहे माघारें"[१] अशी मनोमन साक्ष पटल्यानंतर वैराग्याचा जोहार करावयाची आवश्यकताच नसते. सावजीप्रमाणें तुकाराम कायमचा तीर्थाटणास निघून गेला नाहीं, किंवा बुद्ध-रामदासांप्रमाणें त्यानें संसार सोडला नाहीं, याचें रहस्य हेंच कीं त्याला संसाराशीं झगडून विजय मिळवावयाचा होता, संसाराला डावलून त्याला पुढें जावयाचें नव्हतें.

या युद्धाची तयारी आपण कोणत्या साधन-सामुग्रीनें केली हें त्यानें संतांना वर्णिलेल्या सूत्रात्मक आत्मचरित्रांत संक्षेपानें सांगितलें आहें. दुष्काळापासून गुरूपदेशाची मजल गांठेपर्यंतच्या वृत्तांताचीं तीं सूत्रें अशीं :—

"देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ॥ ५ ॥
आरंभीं कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥ ६ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥ ७ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें धृपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥ ८ ॥
संताचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥ ९ ॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनि ॥ १० ॥
वचन मानिलें नाहीं सुहृदाचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥ ११ ॥
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥ १२ ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १३ ॥
यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ १४ ॥."[२]

थोड्याशा निराळ्या सुरांत गाइलेल्या पुढच्याच दोन अभंगांत त्यानें वरील कांहीं सूत्रांवर स्वतःच वार्तिकें रचिलीं आहेत, तीं अशीं :—(१) "प्रियापुत्रबंधु । यांचा तोडिला संबंधु । सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा ॥ ४ ॥ तोंड न दाखवे जना । शिरें सांदी भरें राणां । एकांत तो जाणा । तयासाटीं लागला ॥ ५ ॥... सहज वडिलां होती सेवा । ह्मणोनि पूजितों या देवा । "[२]... (२) "बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥ ४ ॥ बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ॥ ६ ॥."[२]

लौकिक युद्धाची तयारी लोकांत करावी लागते, तर वैष्णवांच्या अखंड युद्धप्रसंगाची तयारी एकांतांतच करतां येते. लोकांत तोंड दाखवायला जागा नुरल्यामुळें आपण सांदींत शिरून रानांत भरलों, व त्यामुळें एकांत आपल्या पाठीस लागला या नम्रत्वानेंच तुकाराम आपली आध्यात्मिक उन्नति सुचवीत आहे. लोकांतून उठलेलाच एकांतांत जाऊन बसतो. साधकास एकांत अखंड सेवावा लागतो, व अभ्यास निरंतर करावा लागतो. "अखंड

१ अभंग २६५७.    २ अभंग १३३३-१३३५.

येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ॥ ", किंवा " अखंड येकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा ॥ "[१] हा अध्यात्मसिद्धीचा कल्प रामदासांनीं केवळ कल्पनेनें नव्हे तर इतर साधुसंतांप्रमाणें स्वानुभवानेंच सांगितला आहे. "येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें ॥ "[२] हें त्या कल्पाचें फळ. घडलेल्या परिस्थितीचें समालोचन करून आत्मसंशोधन करण्यासाठीं—केवळ लाजेनें दडून बसण्यासाठीं नव्हे—तुकाराम एकांतवासांत गेला.

महिपतीच्या वृत्तांताप्रमाणें तुकाराम उदास होऊन एकांतांत जाऊन विचार करूं लागला कीं, " माझें आयुष्य तो किती । तेही वेंचिलें संसार भ्रांतीं । आतां उरल्याकाळीं निश्चिती । रुक्मिणीपती भजावा ॥ " "ऐसा निश्चय करोनि चित्तीं । जातसे भांबनाथ पर्वतीं ॥ ...पर्वतावरी जावोनि देखा । अंतरीं आठवोनि वैकुंठनायका । करुणा अनेका भाकित ॥. " भांबनाथ पर्वतावर तुकारामानें अगदीं आरंभींच निर्वाण मांडलें असें महिपतीचें म्हणणें आहे. " सप्त दिवसपर्यंत जाण । नेत्र झाकिले एकाग्र मनें । नसेचि फळ अथवा जीवन । नामस्मरण करितसे ॥ शरिर वाचा एकाग्र मन । करुणा भाकी निजप्रीतीनें । तो कौतुक दावी रुक्मिणीरमण । तें परीसा सज्जन भाविकहो ॥ कृष्णवर्ण अति विशाळ । सर्परूप धरूनि घननीळ । तुकया भोंवता ते वेळ । महाकाळ फिरे जैसा ॥ विशाळ फडी उभारोनी । धुधुक्कार टाकी तये क्षणीं । तुका भय न धरीच मनीं । नेत्र झाकोनी तटस्थ ॥ तो आकाशवाणी अकस्मात् । तुकयासि बोले निज गुह्यार्थ । महासर्प होऊनियां येथ । रुक्मिणीकांत आले कीं ॥ तरी तूं नेत्र उघडोनि आतां । दृष्टीसीं पाहे प्रेमळ भक्ता । चित्तीं भय न धरीं सर्वथा । ऐसी वार्ता ऐकिली ॥."[३] तुकारामानें आपण पांडुरंगाचा उपासक असल्यामुळें हें रूप पाहावयाचें नाहीं म्हणून ठरविलें, व पाहीन तर संतांनीं हृदयभुवनांत सांठविलेलें पांडुरंगाचें ध्यानच पाहीन असा आग्रह धरला. तेव्हां तुकारामाचा अंतर्भाव जाणून पांडुरंगाच्या सुंदर ध्यानानें देव प्रगटले. अन्न टाकून भावाला अहर्निश धुंडीत फिरणारा कान्होबा त्याचसमयीं अकस्मात् तेथें येऊन पोंचला. हा चमत्कार नसून प्रत्यक्ष घडलेला वृत्तांत होय हें वाचकांच्या मनावर ठसविण्याकरितां महिपतीनें अंतीं असा शेरा मारिला आहे कीं—" निजभक्तासि देखोनि जाण । देव पावले अंतर्धान । जेथें लागले देवाचे चरण । अद्यापि तें स्थान असे कीं ॥ ते स्थळीं खिळा ( शिळा ? ) रचोनि देखा । कान्हयानें मांडिल्या पादुका ॥."[४]

भांबनाथ पर्वतावर साक्षात्कार झाल्याचा उल्लेख असलेला एक अभंग सर्व गाथ्यांत सांपडतो; तो असा :—[५] " पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार जाला । विठोबा भेटला निराकार ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली । वृत्ति थिरावली परब्रह्मीं ॥ छ ॥ निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ॥ २ ॥ सर्प

१ दासबोध, ११, १०, १७; १८, ३, २०. २ किंत्ता १८, १०, ४८.

३ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओव्या १५२, १६५-१७०.

४ भक्तलीलामृत, अध्याय २८, ओव्या १७१-१९८; अध्याय २९., ओव्या १८-१९.

५ अभंग ४३५४.

विंचू व्याघ्र आंगासीं झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ॥ ३ ॥ दीपकीं कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका ह्मणे ॥ ४ ॥." एकांतांत जाऊन ध्यानधारणा करावयाचा तुकारामाचा पुढेंही नित्यक्रम होता. तो मधून मधून यासाठीं 'गुप्त' होत असे. अशाच एका अज्ञातवासांत समाधी लागून भांबनाथ पर्वतावर त्यानें वर्णिलेला साक्षात्कार झाला असावा. साधनेचा आरंभ देवाच्या आराधनानें झाला असेल हेंही शक्य आहे. परंतु अगदीं आरंभींच तुकारामानें सात दिवसपर्यंत निर्वाणींचें ठाण मांडून देवावर संकट घातलें असेल हें संभवत नाहीं. अशा तऱ्हेचें धरणें बसणें तुकारामाला विशेषसें पसंत नव्हतें असें त्याच्या पुढील चरित्रावरून दिसतें. दुष्काळांतील दिवाळें, हृदयद्रावक परिस्थितींत घडलेले स्त्रीपुत्रांचे मृत्यु यांमुळें "लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें" अशा मानसिक उद्वेगाच्या वैतागांत त्यानें एकांतांत जाऊन चिंतनानें मन शांत करून बुद्धि स्थिर करावयाचा प्रयत्न केला असणार. त्याप्रीत्यर्थ जवळपासच्या रानांत जाण्यांत कांहींच हांशील नव्हतें; कारण नातेवाइकांस ताबडतोब सुगावा लागला असता. म्हणून त्यानें दूरच्या भांबनाथ पर्वतावरील "न कळे ठिकाण कोणासी" असें अरण्य सेविलें. शेवटीं कान्होबानें तेथेंही त्याला शोधून काढलें, व घरीं परत आणिलें. ही सर्व घटना साहजिक दिसते. महिपतीच्या दृष्टीनें त्यानें वर्णिलेली घटना तितकीच साहजिक आहे. संसारांतून उठल्यानंतर, निर्धारानें देवाच्या दर्शनाचा हट्टच धरून बसावयाचें हा संतांचा परिपाठ त्या संतचरित्रकाराच्या नित्य पाठांत असला पाहिजे. तशांत भांबगिरीवर साक्षात्कार झाल्याचा तुकारामाचाच खुद्द अभंग होता. त्या अभंगाचा अनुबंध जोडून, त्यांत खास उल्लेखिलेल्या सर्पामार्फत विठोबाचा निराकार साक्षात्कार महिपतीनें साकार घडविला. महिपतीच्या काळीं होत्या तशा आजही त्या स्थळीं पादुका आहेत. तुकारामाच्या स्मरणार्थ त्या कान्होबानेंही स्थापिल्या असतील. पण देवाचे चरण त्या स्थळीं लागले म्हणून त्या कान्होबानें तेव्हांच मांडिल्या या महिपतीच्या विधानाला दुसरा कांहीं आधार मिळत नाहीं. तें कसेंही असो, आपण तात्पर्याचा भाग एवढाच घ्यावयाचा कीं, वैराग्याच्या पहिल्या भरांत आत्मसंशोधनार्थ तुकाराम भांबनाथ पर्वतावरील अरण्याच्या एकांतवासांत कित्येक दिवस राहिला होता. पुढें सुद्धां ही त्याची आवडती जागा होती. बौद्धावतारांत मौन पाळणाऱ्या विठ्ठलाला कौल लावण्यासाठीं जुन्या बौद्धविहारांतील स्तूपासंनिधची ही वास्तु मोठी प्रशस्त होती. संसारांतून विटलेल्या त्याच्या मनाला या कांतारांतील एकांतांत अंतर्मुख होऊन अंतर्यामींच्या विठ्ठलाचा साक्षात्कार झाला. चित्तवृत्तींचा निरोध करण्यासाठीं एकांतासारखें साधन नाहीं. तशा एकांतांत वैराग्याच्या तीव्र संवेगांत थोड्याशा अभ्यासानें व विशेषतः ईश्वरप्रणिधानानें—पांडुरंगाच्या पायीं भाव स्थिर केल्यानें—स्वस्वरूपच तुकारामाला पांडुरंग दिसलें यांत आश्चर्य नाहीं. पादुका पांडुरंगचरणांच्या असोत अगर नसोत, या एकांतवासापासून तुकारामाची पांडुरंगचरणीं मिठी पडली.

जुनें सख्य सोडल्याशिवाय नव्या प्रेमाला हृदयाचें स्वामित्व कसें देतां येईल? देवाचें हें नवें प्रेम घरा आलें याची जी पहिली खूण दिसली तिनें तात्काळ खात्री पटवून दिली. या एका खुणेनें हेंही स्पष्ट झालें कीं, तुकाराम अगतिक होऊन अंधश्रद्धेनें विठ्ठलाकडे

वळला नव्हता ; तर सारासारविवेक करून आपल्या जीवनांतील एकएक कूटप्रश्न बुद्धीच्या पूर्ण विचारानें सोडवीत होता. बुद्धीनें विचारांतीं केलेल्या निश्चयाची जी निष्ठा तिलाच श्रद्धा म्हटलें पाहिजे. तुकारामांत आतां अस्तेय आणि अपरिग्रह यांविषयीं अशी श्रद्धा निर्माण झाली होती. जोडीच्या हव्यासानें[१] केवळ पैशाचेंच पिसें लावणारी सावकारीसारखी दुसरी संस्था नाहीं. सावकारींत केवळ रुक्याकडेच पाहावें लागतें ; आणि "पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥."[१] परधन व परिग्रह यांपासून ज्याला सर्वस्वीं अलिप्त राहावयाचें आहे, त्यानें या दोघांची तृष्णा चक्रवाढ व्याजानें वाढविणारी जी सावकारी ती आधीं सोडली पाहिजे. मागें वर्णिल्याप्रमाणें वाटत आलेल्या असमाधानानें आतां पूर्ण विचारांतीं तुकाराम या निर्णयाप्रत येऊन पोंचला. विचार व आचार यांच्यामध्यें उच्चाराचाही अडथळा त्याला सहन होत नसे. आधीं केलें मग सांगितलें असा त्याचा स्वभाव होता. त्या स्वभावाला अनुसरून त्यानें तो निर्णय ताबडतोब अंमलांत आणण्याचें ठरविलें. भांबनाथावरील सात दिवसांच्या निर्वाणानंतर भावासमवेत तुकाराम देहूस परत येऊन इंद्रायणीच्या डोहापाशींच थांबला. सावकारीचें पाप धुतल्याशिवाय त्याला घरीं जावयाचें नव्हतें. म्हणून तिकडेच स्नान करून पारणें सोडल्यावर आधीं आपल्या सावकारीच्या धंद्याचा त्यानें अमोघ उपायानें कायमचा निकाल लावला. त्याचें वर्णन महिपतीच्या शब्दांत केलेलें बरें. "मग कान्हयापासोनि वैष्णवभक्तें । मंदिरींहूनि आणविलीं खतें । लोकांवरी वडिलांचें द्रव्य होतें । तेव्हां बोलत कान्हयासी ॥... परहस्तींचें धन । दुश्चित मन सर्वदा ॥ आमुचें देईल किंवा नाहीं । ऐसी दुराशा आठवे जीवीं । यास्तव इंद्रायणीच्या डोहीं । खतें ये समयीं बुडवितों ॥ ऐसें पुसतां भक्त प्रेमळ । कान्हया बोले ते वेळ । तुह्मी तों विरक्त जाहलां केवळ । प्रपंच सकळ मजमागें ॥ आह्मींही वडिलांसि सांगूं नये । पुढें लेंकरें करितील काय । जाणोनि कान्हयाचा मनोदय । योजिली सोय तुकयानें ॥ दोन विभाग करूनि निश्चित । कागद बुडविले उदकांत । अर्ध विभाग कान्हयातें । देऊनि बोलत काय तया ॥".[२] खासगी संपत्ति सर्व पापांचें मूळ आहे याची लोकांना खात्री पटवून देणारा टॉलस्टॉय "तर मग आह्मी काय करावें ?"[३] या अखंड विवंचनेंतच राहिला ; तुकारामानें काय करावें हें प्रत्यक्ष करूनच दाखविलें. दुष्काळांत सुधारणाऱ्या आर्थिक परिस्थितींत सावकारीच्या वाढत्या वसुलानें स्वतःची घसरलेली सांपत्तिक स्थिति सांवरण्याऐवजीं दस्तैवज बुडवून स्वजनांच्या त्या बाबतींतील आशा तुकारामानें अक्षरशः रसातळाला नेल्या. हा कांहीं उद्वेगाचा त्रागा नसून, विवेकानें जागा होऊन त्यानें कधीं न फिरवितां येणारा हा निर्णय घेतला. अभंगांच्या वह्या उदकांत तरल्या त्यापेक्षां अवघ्या एकवीस-बावीस वर्षांच्या उमरेवर सावकारीच्या खतांच्या वह्या त्यानें उदकांत बुडविल्या हाच खरा चमत्कार होय ! महिपतीला वाटलें कीं, "भिक्षा मागोनि सेविजे अन्न"[४] असें तुकारामानें ठरविलें. पण तो समज चुकीचा आहे. तुकारामानें ॐ भवतीच्या पक्षाची दीक्षा कधींच घेतली नाहीं असें

१ अभंग १९२५. २ भक्तलीलामृत, अध्याय २९, ओव्या २०-२७.
३ "What Then Must We Do ?" Tolstoy.
४ भक्तलीलामृत, अध्याय २९, ओवी २८.

आपणास पुढें दिसून येईल. खतें बुडविण्यांत आइतखाऊ जीवनाच्या पापाचा संपर्क कायमचा सोडून, स्वकष्टाच्या उत्तम व्यवहारानेंच पोटापुरतें मिळविण्याचा तुकारामानें निश्चय जाहीर केला.

सावकारीस विन्मुख झाल्याचें या लोकविलक्षण रीतीनें जाहीर केल्यानंतर आपण आतां देवाकडे सन्मुख झालों हें त्यानें तशाच विलक्षण प्रकारें लोकांस लागलीच कळविलें. विश्वंभराच्या भक्तीनें आकृष्ट होऊन मूर्तिमंत विठ्ठलच तुकारामाच्या घरीं पूर्वीं चालत आला होता. त्या मूर्तीसाठीं घरांत देवघर केलें होतें; व तेथें सिंहासनावर त्या ठेवीत असत. यात्रेकरूंची वाड्यांत गर्दी होऊं लागली म्हणून बोल्होबानें वाड्याजवळच इंद्रायणीच्या कांठीं थोड्या खर्चानें एक देऊळ बांधलें होतें. त्या देवळांत आषाढी व कार्तिकीच्या उत्सवप्रसंगीं बोल्होबा मूर्ती ठेवीत असे; व कांहीं दिवस वाड्यांतील देवघरांत मूर्ती ठेवी. बोल्होबाच्या मृत्यूनंतर, दुष्काळाच्या बिकट परिस्थितींत हें देऊळ दुर्लक्ष होऊन मोडकळीस आलें होतें.[१] "देवाचें देऊळ होतें तें भंगलें। चित्तासी तें आलें करावेंसें॥".[२] चित्तांत एकदां करावेंसें आलें म्हणजे दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे न पाहतां तें स्वयेंचि कष्टत करावें असा तुकारामाचा शिरस्ता होता; त्याला अनुसरून, "ऐसा संकल्प करोनि मनीं। देवालय उकलिलें तये क्षणीं। आपुल्या हातीं कुदळी घेउनी। चिखलपाणी करीतसे॥". "एकला एकटा करील काय। कैसें होईल देवालय।"[३] असें जाणून गांवांतील पांचांमुखींचा परमेश्वर आपोआपच त्याच्या साह्यार्थ धांवून आला; व देउळाचें उद्यापनापर्यंतचें सर्व कार्य यथासांग पार पडून गांवास भूषण मानिल्या गेलेल्या स्वयंभू मूर्तीची तुकारामाच्या हातून नव्यानें प्रतिष्ठापना झाली. देउळाचें कार्य पुरें करण्याचा पांडुरंगानें गांवकऱ्यांस व गांवचा पांड्या महादाजीपंत यास आदेश दिल्याचा चमत्कार महिपतीनें वर्णिला आहे. पण खुद्द तुकारामास सेंट फ्रान्सिसासारखा देवानें आदेश दिला नव्हता; तो त्याच्या 'चित्तानें'–मनोदेवतेनें–दिला होता, हा या दोघांच्या स्फूर्तींतील फरक होय.[४] सेंट फ्रान्सिसाचा हृदयपालट साराच चमत्कारावर आधारला आहे; तुकारामाचा, सारासारविचारानें घेतलेल्या निश्चयाच्या बळानें घडून आला होता. दुष्काळानंतर मोडकळीस आलेला घराचा संसार दुरुस्त करण्याऐवजीं तुकारामानें मोडकळीस आलेलें स्वतःचें 'देवाईल' स्वयंस्फूर्तीनें प्रथम दुरुस्त केलें यांतच

१ परिशिष्ट पहा. २ अभंग १३३३.

३ भक्तलीलामृत, अध्याय ३०, ओव्या १४–१५.

४ "Among the cornfields flanked with olives, there was a chapel which had fallen to ruin from age, and where hung above the altar a Byzantine Christ, full of sweet serenity.........One day Francis passed by this place. He went in, and as he knelt before the crucifix praying, suddenly the Christ called him by name and said : 'Francis, go and repair My house which, as thou seest, is wholly falling into ruin'. It is impossible, his biographer continues, to describe the miraculous effect that these words produced on him who heard them, since he himself avowed that he was incapable of expressing it."—St. Francis of Assisi—A new biography by Omer Englebert, translated and edited by Edward Hutton, London, 1950, p. 63.

त्यानें प्रपंचांत परमेश्वराचें अधिष्ठान स्वीकारिलें. प्रपंचाच्या हाटांत देवाचा नफा पाहण्याच्या या नव्या वाणीव्यवसायाला महाजनकीच्या वाड्यापेक्षां देऊळच जास्त सोइस्कर होतें.

तुकारामानें देउळाचा जो जीर्णोद्धार केला तो केवळ पुण्यसंपादनाच्या प्रतिष्ठेसाठीं नव्हे ; तर हरिकीर्तन करावयास स्वतःच्या हक्काची जागा असावी म्हणून. विठ्ठलभक्तीच्या भोळ्या सेवेचा मार्ग अनुसरावयाचें त्याच्या मनानें ठरविलें होतें. हा विठ्ठलदेव आधींच त्याला कुळपूज्य होता. कुळाची तशीच महाराष्ट्राच्या संतांची परंपरा त्या विठ्ठलाच्या मागें उभी होती. आतांपर्यंत आपण त्याची उपेक्षा केली ही जाणीवही त्याच्या मनांत होतीच. आत्मसाधनेचे इतर मार्ग एक तर त्याला खुले नव्हते किंवा त्याच्या वृत्तीला मानवले नसते. याची पुढील एका प्रकरणांत विस्तारानें चर्चा केली आहे. विठ्ठलाचें देऊळ उभारल्यानंतर तेथें उभें राहून त्यानें कीर्तन करावयास सुरुवात केली एवढेंच येथें आपणास ध्यानांत घ्यावयाचें आहे. आरंभीं तो एकादशीला कीर्तन करूं लागला. संसार संभाळूनच तो हें कीर्तन करीत असे. मानदंभ थुंकून टाकण्यासाठीं, लोकलाज सोडण्यासाठीं कीर्तन हें त्याला एकमेव साधन वाटलें. आज सुद्धां प्रतिष्ठित माणसास भजन-कीर्तनांत देवाचें नांव मोठ्यानें घ्यावयास संकोच वाटतो ; कारण प्रतिष्ठेचा अहंकार आड येत असतो. त्याला सुद्धां पूर्वी अशीच लाज वाटत असे. " नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हित ।" [१] या त्याच्या आठवणी आपण मागें वाचल्या आहेत. आतां त्याला ही 'अस्मिता' विसरून जावयाची होती, व आपलें हित साधावयाचें होतें. "तरणा भाग्यवंत। नटे हरिकीर्तनांत ॥." [२] खरें हरिकीर्तन म्हणजेच जाहीर देवार्पण. असें कीर्तन एकादशीस करतांना त्याला आरंभींआरंभीं काय वाटलें असेल याची कल्पना खालील अभंगावरून करतां येते :—" गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि ह्मणें हरी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥ छ ॥ मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ॥ २ ॥ तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी विनंती । तुह्मी परिसा कमळापती ॥ ४ ॥." [३] दिवाळ्याची व अन्नान्न करून झालेल्या बायकोच्या मृत्यूची लोकलाज त्याला पूर्वी जाचली होती. त्या दिव्यांतून पार पडल्यानंतर व विशेषतः मनाचा निर्धार केल्यानंतर लोकलाजेला आतां तो जुमानीत नव्हता. [४]

प्रथम प्रथम पुढें गात होते त्यांचें तो धृपद धरीत असे ; तेवढ्यानें त्याला स्वतःला घडघडाटानें कीर्तन कधींच करतां आलें नसतें. त्याला असें आढळून आलें कीं, पाठांतराशिवाय कीर्तन करतां येत नाहीं. पाठांतराला अभ्यास करावा लागतो. तेव्हां

---

१ अभंग ६१३. २ अभंग २३१३. ३ अभंग २९५६.

४ लाजेवर त्याचा मोठा कटाक्ष असे ; व तिला फजित करावयाचा सोपा उपाय त्यानें सुचविला आहे. " देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा । लाजे नका थारा देऊं कोणी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ मोडिलें या रांडे सुपंथ मारग । चालविलें जग यमपंथें ॥ छ ॥ परिचारीं केली आपुली च रूढी । पोटींची ते कुडी ठावी नाहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे आणा राउळा धरून । फजित करून सोडूं मग ॥ ३ ॥" (अभंग ३४६८).

"बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर । भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ "[१] ही तपश्चर्या करण्याचें त्यानें ठरविलें. संवय नसल्यामुळें "नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ।" असें तो स्वतःच प्रांजलपणानें सांगतो ; पण अभ्यासाचे सायास करून असाध्यही साध्य करून घेण्याचा आग्रह तो सोडीत नसे. पाठांतर व त्याकरितां लागणारें वाचन त्यानें अखंड चालू ठेवलें ; व अंतीं वाग्देवीचा प्रसाद प्राप्त करून 'वाचमर्थोऽनुधावति' अशी सिद्धि मिळविली.

च. १५२० / २६३८१ / १९३६

ही सिद्धि त्याला सहजासहजीं मिळाली नाहीं. ती मिळविण्याकरितां त्यानें किती परिश्रम केले याचें, त्याच्या वाङ्मयाचे संस्कार ओळखून, महिपतीनें मार्मिक वर्णन केलें आहे. संतवाङ्मयाचे आधुनिक व्यासंगी विद्वान् पांगारकर[२] यांनीं महिपतीच्या या कथालेखांत साम्यस्थळांच्या उल्लेखांनीं भरतकाम केलें आहे एवढेंच. तें महिपतीचें वर्णन असें. "निजांगें करावें कीर्तन । ऐसी इच्छा धरिली मनें । संत बोलिले पुरातन । त्यांचीं वचनें पाठ केलीं ॥ पहिला अभ्यास कांहीं नव्हता । आवडी आतां उपजली चित्ता । प्राकृत अभंग शतकोटि कर्त्ता । नामदेव वार्त्ता बोलिले कीं ॥ त्या नामयाचे अभंग निश्चित । पाठ करोनि गात नाचत ।... आणिक संतांचे पाहिले ग्रंथ । कबीर भक्त यवन विख्यात । तयांचीं जीं वचनामृतें । तीं पाठ करित प्रीतीनें ॥ आणिक अध्यात्म ग्रंथ थोर । स्वमुखें वदले ज्ञानेश्वर। त्यांची शुद्ध प्रती साचार । वैष्णव वीरें मिळविली ॥ श्री विष्णु अवतार एकनाथ देखा । त्यांणीं भागवतावरी केली टिका । त्याचा प्रयत्न करोनि निका । ग्रंथ नेटका मिळविला ॥ त्या ग्रंथाचें करावया मनन । एकांत स्थळ योजिलें कोण । रमणिय भांडार पर्वत जाण । ते स्थळीं जाऊन बैसतसे ॥ ग्रंथांचें पारायण करोनी । अर्थ अन्वय ध्यानासि आणी । पूर्वाभ्यासी जो शिरोमणी । कैवल्यदानी साह्य जया ॥ ग्रंथ व्हावया पाठांतर । तुकयासि श्रम न लागती फार । मनन करितां अहोरात्र । मुखीं अक्षरें बैसती ॥ प्रसादिक एकनाथाचीं वचनें । जें का भावार्थ रामायण । त्याचेंही पाठांतर पूर्ण । निजप्रीतीनें करितसे ॥ श्री भागवतींच्या कथा सुरस । स्वमुखें वदले महापुरुष । त्याही पाहिल्या सायासें । लीला विशेष श्रीहरीची ॥ योगवासिष्ठ अमृतानुभव पूर्ण । श्रीज्ञानेश्वर बोलिले वचन । त्याही ग्रंथांचें करोनि मनन । अर्थ शोधून ठेविला ॥ आणिक पुराणें ऐकती फार । परी मन न करिती साचार । तेणेंचि त्यांचा पडे विसर ।... तैसी तुकयाची नव्हे बुद्धी । आधीं करोनि चित्त शुद्धी । मग जाऊनि एकांत संधी । अर्थ शोधी ग्रंथाचा ॥ ".[३]

तुकारामाच्या पाठांतराचा, वाचन-मननादि साधनेचा महिपतीनें वर दिलेला वृत्तांत सर्व दृष्टींनीं स्वाभाविक दिसतो. तुकाराम म्हणजे खेडवळ कुणबी ; त्याला, संताजीच्या "अस्सल" गाथ्यावरून अनुमान करितां, शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें देखील कळत नव्हतें ; त्याची भाषा ग्राम्य कुणबाऊ ;—असा अनेक पंडितांनीं आपला

१ दासबोध, दशक ४, समास २, ओवी ३.

२ श्रीतुकारामचरित्र, प्रकरण सहावें, तुकोबांचें ग्रंथाध्ययन.

३ भक्तलीलामृत, अध्याय ३०, ओव्या ३८–५३.

पाने ९३६ १०२ २६३९ च १५२०



बुद्धयाच समज करून घेतला आहे. त्यांना व इतरांना सुद्धां[1] ही कल्पना होत नाहीं कीं आजकाल मराठी विषय घेऊन एम्. ए. झालेल्या विद्वानांपेक्षांही तुकारामानें ग्रंथांचा अधिक व्यासंग केला होता. परंतु त्या काळची व विशेषत: तुकारामाच्या कुळाची सांस्कृतिक परिस्थिति व परंपरा पाहिली म्हणजे त्यानें असा व्यासंग केला यांत कांहींच नवल वाटत नाहीं. त्या काळीं जनता निरक्षर असून अज्ञानांत बुडाली होती असें दिसत नाहीं. अतिशयोक्तीनें कां होईना, खुद्द तुकारामच अशी तक्रार करीत असे कीं "घरोघरीं सांगती ज्ञान" "घरोघरीं बहु जाले कवि".[2] ज्ञानेश्वरापूर्वीपासून सुद्धां भगवद्गीता हा महाराष्ट्रांतील भागवतपंथाचा अत्यंत आवडीचा ग्रंथ होता. त्याचीं नवींनवीं विवरणें चालूच होतीं. त्यांपैकीं ज्ञानेश्वरी व गीतार्णव या दोन प्रसिद्ध टीका त्या ग्रंथावर तुकारामापूर्वींच झाल्या होत्या; व तुकारामाच्या समकालीनांत गीतेचा मोठा प्रसार असून ती यथार्थ जाणून घेण्याचाही सारखा प्रयत्न चालला होता. भागवतसंप्रदायांत ज्ञानेश्वरीचें पारायण नित्यक्रमांतलें होतें. आपापल्या बुद्धीप्रमाणें केलेल्या नकला वापरूनच हीं पारायणें करीत असत. असल्या नकलांचा सुळसुळाट झाल्यामुळेंच एकनाथांना पाठशुद्ध प्रत तयार करावी लागली. आळंदीच्या परिसरांत ज्ञानेश्वरीच्या प्रती, दारांतील सोन्याच्या पिंपळाच्या पानासारख्या, पसरल्या असणारच. तुकारामाच्या वारकरी घराण्याला देहू गांवांत किंवा जवळपास ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत सांपडणें कठिण नव्हतें. ज्ञानेश्वरी ही गीतेची गुरुकिल्ली आहे;

---

१ उदाहरणार्थ, बाबाजी गणेश परांजपे यांनीं पांगारकरांस निष्कारण दोष दिला आहे. "श्रीतुकोबारायांचे अभंग" या पुस्तकाच्या प्रस्तावनाभागांतील 'चरित्रांत' श्री परांजपे लिहितात (पृ. ३६) :—"तुकोबांनीं विश्वासानें व आदरानें संतांचीं कांहीं वचनें पाठ केलीं. या वचनाचा आधार घेऊन कै. ल. रा. पांगारकर यांनीं तुकोबांचें ग्रंथाध्ययन असें एक सहासष्ट पृष्ठांचें रसभरीत प्रकरण लिहिलें आहे. पण देहूसारख्या ठिकाणीं येवढे ग्रंथ त्यावेळीं मिळणें शक्य होतें का? बरें ग्रंथ होते असें जरी मानलें तरी ते ग्रंथ तुकोबांस वाचावयास मिळण्यासारखे होते का—? कोणी वाचूं दिले असते का? ग्रंथाध्ययन करण्याजोगें तुकोबांचें बाल वय होतें का? जाती वगैरे मनांत न आणतां ग्रंथांतील रहस्य उकलून सांगतील असे महात्मे देहूच्या आसपास कोणी होते का? या गोष्टींचा पांगारकरांनीं विचार करावयास हवा होता. पण यांपैकीं एक हि विचार त्यांना शिवला नाहीं. अभंगांत आलेल्या विचारासारखा विचार एखाद्या ग्रंथांत आलेला पाहिला कीं तो ग्रंथ तुकोबांनीं अभ्यासिला होता, असें म्हणण्यास पांगारकर तयार!! सुमारें १००/१२५ वचनें अभंगांत व बायबलमध्यें सारखीं आहेत. एवढ्यानें तुकोबा बायबल शिकले होते असें का म्हणावयाचें?" पांगारकरांचा असा उपहास करून लगेच पुढच्याच पृष्ठावर परांजपे लिहितात (पृ. ३७) :—"हरिपाठ (ज्ञानेश्वर), श्रीज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पासष्टी, श्रीज्ञानेश्वर अभंग— निवृत्तिनाथ—अभंग, नामदेवराय (अभंग), जनाबाई (अभंग), एकनाथ, भागवत रामायण, अभंग —व कबीर यांच्या वचनांचा तुकोबारायांच्या मनावर पुष्कळ च संस्कार झाला असणार." पांगारकरांनीं या वेगळें काय सांगितलें होतें? ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ वाचण्यास बाल वय लागतें हा प्रश्नच विचित्र आहे. सर्वांनाच ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाचीं रहस्यें उकलून दाखवण्यास 'महात्मे' लागत नाहींत. प्रतिभावान् आत्मचिंतनानें ग्रंथ जाणतो. आळंदी, पुणें, चिंचवड यांच्या परिसरांत त्याकाळीं हस्तलिखितांचाही दुष्काळ पडल्याचें ऐकिवांत नाहीं. असो. परळकरांची सुद्धां (तुकारामचरित्र पृ. ५६–८) अशीच धरसोड झाली आहे.

२ अभंग १४१२, १४६८.

योगेश्वर कृष्णाच्या गीतेचा भावार्थ ती लोकांना उकलून दाखवीत असे. साडेतीनशें वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरीची भाषा लोकभाषेपासून विशेष दूर नव्हती. तेव्हां मुख्यत्वें ज्ञानेश्वरीच्या मदतीनें तुकारामानें गीता उत्तम अवगत करून घेतली होती यांत कांहींच शंका नाहीं. संप्रदायाचा दुसरा प्रधान ग्रंथ म्हणजे भागवत. एकनाथापूर्वीही याजवर मराठी टीका होती. परंतु एकनाथाचा सर्ववंद्य ग्रंथ नवीन होता; व त्याची प्रत दुष्प्राप्य नव्हती. हरिदासपुराणिकांच्या मदतीनें, पांडित्याच्या कसोटीनें नसला तरी भक्तीच्या आदरानें, मूळ संस्कृत ग्रंथही समग्र पारखून घेतां आला असता. तुकारामाला हे संस्कृत ग्रंथ आत्मज्ञानाकरितां वाचावयाचे होते; दुसऱ्यांपुढें आपल्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्याकरितां पंडितासारखे पढावयाचे नव्हते, हें आपण ध्यानांत ठेविलें म्हणजे महिपतीनें वर्णिल्याप्रमाणें त्यानें मूळ भागवत ग्रंथ 'सायासानें' कसा पाहिला असेल याची नीट कल्पना येते. गीता-भागवत या आधारभूत ग्रंथांचें तुकारामानें नांवानिशीं खास उल्लेख केले आहेत. "कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्विक। तयाचा हरिख वाटे देवा ॥ गीता भागवत करिती श्रवण। आणीक चिंतन विठोबाचें ॥"[१] हा उल्लेख यापूर्वीं आलाच आहे. खुद्द पंढरीच्या विठोबाकडे "गीता जेणें उपदेशिली। ते ही विटेवरी माउली ॥"[२] या दृष्टीनें तो पहात असे. 'योगक्षेमं वहाम्यहम्' ह्या गीतेंतील जमानतीचा "गीतिमाजी शब्द दुंदुभीचा गाजे"[३] असा त्यानें डांगोरा पिटिला आहे. पुढें नित्यनेमासाठीं लोकांस तो गीता वाचावयास सांगत असे व गीतेचें त्यानें अभंगांत भाषांतरही केलें. गुरूपदेशानंतर झालेल्या कवित्वाच्या स्फूर्तींत त्यानें जी ओव्यांची दाम-माळा ओविली तींत भागवताचा कलाबतु कसा झळकतो आहे पहा:—"त्याची च उच्छिष्ट बोलतों उत्तरें। सांगितलें खरें व्यासादिकीं ॥ व्यासें सांगितलें भक्ति हें चि सार। भवसिंधु पार तरावया ॥ तरावया जना केलें भागवत।".[४] तुकारामानें मूळ भागवताचे बाराही स्कंध नीट पाहिले होते, त्यांतील अनेक श्लोक त्याच्या पाठांत बसून गेले होते हें पांगारकरांनीं वेंचक उताऱ्यांच्या अंतःप्रमाणांवरून सुस्पष्ट केलें आहे.[५] सारांश, गीता व भागवत हे ग्रंथ तुकारामानें आत्मसात् केले होते यांत तिळमात्र शंका नाहीं. ह्या ग्रंथांचें त्याचें परिशीलन केवळ या साधनेच्या काळांतच नव्हे तर नित्य सदाकाळ चालू होतें; कारण त्याला वाद-छळणा करीत फिरण्यासाठीं त्यांचा नुसता अन्वयार्थ समजून घ्यावयाचा नव्हता, तर आपल्या आयुष्याशीं त्यांचा अन्वय जोडून जीवनांत त्यांचा अर्थ प्रत्यहीं अनुभवावयाचा होता.

"आहे पुराणीं वाणी", किंवा "बहु ग्रंथीं बोलिलें", "दर्शनें धांडोळलीं" असे जे तुकारामानें मोघम हवाले दिले आहेत ते पुराणदर्शनादि ग्रंथ स्वतः वाचून दिले आहेत असें मानण्यापेक्षां श्रेष्ठांच्या आधारें व बहुश्रुतत्वाच्या बळावर दिले आहेत असें मानणें अधिक सयुक्तिक दिसतें. ज्ञानेश्वर-एकनाथादींनीं मराठीच्या नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळ केला होता; त्यांच्या जोरावर कोणालाही छातीठोकपणें वरील हवाले देतां यावेत. तुकारामाचें इतर संस्कृताचें ज्ञान व्युत्पन्न पंडिताचें नसून मर्मज्ञ रसिकाचें होतें असें

१ अभंग ३४. २ अभंग २४५६. ३ अभंग ४३४३.
४ अभंग ४५०५. ५ परिशिष्ट पहा.

आपणास निश्चित ह्मणतां येईल. त्यांत बहुश्रुतत्वाचा भाग मोठा होता. 'देवपूजानैवेद्य-समयीं'[१] तसेंच पुराणकीर्तनादि प्रसंगीं, संतांच्या संभाषणांत जें जें कांहीं कानावर पडलें तें तें मनांत जपून ठेवून योग्य प्रसंगीं त्याचा उठावदार उपयोग तुकारामानें केला आहे. "ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला"[२] ह्या विद्वानांस सुद्धां सकृद्दर्शनीं न कळणाऱ्या विलक्षण उपमेचा उगम वैद्यकाच्या ग्रंथांपाशीं पोंचतो हें[३] एकच उदाहरण त्याच्या सर्वसंग्राहक चतुरस्र बुद्धीचें द्योतक म्हणून पुरेसें व्हावें. त्यांतल्या त्यांत "भर्तृहरीचीं नीतिवैराग्यशतकें व आचार्यांचें पांडुरंगाष्टक, षट्पदी आणि महिम्नादि स्तोत्रें" तुकारामाच्या अवलोकनांत व पाठांत असावींत;[१] तसेंच विष्णुसहस्रनामाचे नित्य पाठ हा दुसरा नाम–देव करीत असावा असें त्याच्या अभंगांवरूनच स्पष्ट होतें. गीता-भागवतासारखे विष्णुसहस्रनामाचे त्यानें नामानें अनेकवार उल्लेख केले आहेत.[४] वैराग्य बळकट करण्याचा व भक्ति पुष्ट करण्याचा हा सारा नेहमींचा खुराक होता. वेदाचीं अक्षरें घोकण्याचा आपणास अधिकार नाहीं याची जाणीव असणाऱ्या तुकारामानें इतर अक्षरांचा श्रम मुख्यत्वें साधनेच्या काळांत केला असावा. "तुकोबांना भावार्थ समजण्याइतकें संस्कृत चांगलें येत होतें"[५] ही पांगारकरांची समजूत बरोबर आहे. सु-संस्कृत माणसाच्या शिक्षणांत याहून अधिक संस्कृताची आवश्यकता नाहीं.

संस्कृताच्या साधनेपेक्षां मराठी संतकवींची उपासना या काळांत तुकारामानें मनोभावानें केली. संस्कृतापेक्षां तो या प्राकृतावरच खरा पोसला होता. "गाईन ओंविया शिष्टांच्या आधारें", संतांचें शेष बडबडतों, हें तो आरंभीं आरंभीं उघड बोलून दाखवीत असे.[६] भांबनाथ-भंडाऱ्यांत त्याला हा निधि—हें "खरें नानवट निक्षेपीचें जुनें ठेवणें" सांपडलें होतें! तें उकलण्यास मजुरी करून त्याला खपावें लागलें.[७] त्याचें ऐश्वर्य आपल्या डोळ्यांत भरतें; मजुरीचे कष्ट आपण विसरतों. नामदेव, ज्ञानेश्वर व एकनाथ हे त्याचे जिवाभावाचे आवडते सांगाती. त्यांच्या संगतीच्या एकांतांत साहजिकच त्याला काळवेळाचें भान राहात नसे. ज्ञानेश्वराला त्यानें पितृस्थानीं स्थापिलें आहे इतकें सांगितलें म्हणजे पुरे.[८] त्या ज्ञानी बापानें त्याला भातुकें दिलें होतें; म्हणून त्याला कौतुकाची शब्दक्रीडा करितां आली. त्या सिद्ध महाराजाच्या, ज्ञानियांचा गुरु राजा महारावाच्या, पायांपाशीं तो शिकला,[९] व इतका पारंगत झाला कीं ज्ञानेश्वरांनींच धरणेकऱ्याला त्याच्याकडे उपदेश घेण्यास पाठविलें. "पंढरिये माझें माहेर साजणी। ओंविये कांडणीं गाऊं गीत ॥"[१०] या ओंविया गातांना नामदेवास "जिवलगा माझिया

१ श्रीतुकारामचरित्र, पांगारकर, पृ. १६१, १६४.
२ अभंग ३४०३.
३ वज्राचें म्हणजे हिऱ्याचें भस्म करावयाचें असेल तर प्रथम त्या प्रयोगांत ढेकणांचें रक्त लागतें असें रसवैद्यकाच्या ग्रंथांत सांगितलें आहे. रसरत्नाकर, अध्याय ४, श्लोक ४१; रसरत्नसमुच्चय अध्याय ४, श्लोक ३५.
४ परिशिष्ट पहा.
५ पांगारकर (किता) पृ. १६३.
६ अभंग १६४९, १८५२.
७ अभंग ८८३.
८ अभंग २३३२, ३०७६.
९ अभंग २३३३–३४.
१० अभंग १५६८.

नामदेवा" म्हणून त्यानें गाढ सख्याच्या भावानें आळविलें आहे. नामदेव त्याच्या मनीं वसत होता म्हणून तर तो त्याला स्वप्नीं दिसला. नामदेवाचे उरले अभंग आपण शेवटीं लावले हें सांगण्याचा[१] आशयच हा कीं, नामदेवाची अभंग काव्यसरणी, त्याचा प्रसाद पोटीं ठेऊन आपण अनुसरिली. नामदेवाच्या काव्याशीं व कार्याशीं तो इतकें तादात्म्य पावला होता. नामदेवाइतकेंच, किंबहुना थोडें अधिकच, एकनाथानें त्याचें जीवन व्यापिलें होतें ; म्हणून "जीवींच्या जीवना एका जनार्दना ।" अशी एकनाथाला त्यानें आनंदानें ओवी गाइली.[२] ज्यांच्या वचनांचा विशेषत: या काळांत त्यानें अहर्निश जप केला असेल त्या जपमाळेंत कबीराचा चौथा मणि त्यानें बसविला आहे. कबीराचाही नाद त्याच्या काव्यांत बरवा उमटला आहे. वैष्णवांनीं मांडिलेल्या टिपरीच्या खेळाचें रूपक सजवितांना, "आणीक खेळिये होउनियां गेले । वर्णाविया वाचा मज नाहीं रे ॥" असें म्हणून, "त्रिगुणाचे फेरी थोर कष्टी होसी । या चौघांची तरी धरीं सोई रे ॥" असें त्यानें आग्रहानें विनविलें आहे.[३] चौघे कोण ? तर प्रथम नामदेव, आणि ज्ञानेश्वर, कबीर व एकनाथ. तुकारामानें वेदांचीं अक्षरें घोकलीं नसतील, पण या चार मुखांतून निघालेल्या भक्तिवेदांचें पठण व्यवस्थित केलें. हा वेदघोष त्याच्या काव्यांत सहज स्फुरतो व हा अखिल वेद त्याच्या जीवनाचें धर्ममूल होतें. 'आणीक खेळिये' सुद्धां त्यानें आपले संवगडी केले होते. खरें काव्य त्याकाळीं वाऱ्यामापें पसरून लोकमुखांत खेळत असे; छापखान्याच्या खिळ्यांनीं ठोकून प्रकाशकांना तें वेशीवर टांगावें लागत नसे. संतमंडळीच्या पाठांत जनी, कान्होपात्रा या मराठी कवयित्रींचीं कवनें होतींच. पण मीराबाईची लाडकी वाणीही सर्वत्र गुणगुणली जात असे. व्रजभाषेंतील कवनाशींही तुकारामानें परिचय करून घेतला; व "तुकाप्रभु दीनदयाला । वारि रे तुज पर हुं गोपाला ॥"[४] असें मीरेच्या मागें उभें राहून स्वत:चें धृपद गाइलें.[५]

हा सारा अभ्यास तुकारामानें केवळ काव्यालंकार साधण्यासाठीं केला नव्हता. त्याला कीर्तनाच्या कीर्तीसाठींही ही विद्या साधावयाची नव्हती. संतांचीं उत्तरें त्यानें "विश्वासें आदरें करोनियां" पाठ केलीं; पुढें गात होते त्यांचें "भावें चित्त शुद्ध करोनियां" धृपद धरिलें.[६] विश्वास, आदर, भाव, शुद्ध चित्त यांतील एकएक शब्द त्याची निष्ठेची भक्ति दर्शवितो. दुसऱ्या एका अभंगांत या पाठांतराविषयीं त्यानें आपली वृत्ति वर्णिली आहे:—"करूं तैसें पाठांतर । करुणाकर भाषण ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ जिहीं केला मूर्तिमंत । ऐसे संतप्रसाद ॥ छ ॥ सोज्ज्वळ केल्या वाटा । आइत्या नीटा मागीलां ॥ २ ॥ तुका ह्मणे घेऊं धांवा । करूं हांवा तें जोडी ॥ ३ ॥."[७] शुद्ध चित्त नसेल, भाव नसेल, तर पाठांतर काय कामाचें ? तसल्या पाठांतराची त्यानेंच संभावना केली आहे :—"व्यर्थ

---

१ अभंग १३२०-२१. २ अभंग १५६८.

३ अभंग १९०. ४ अभंग ११५८.

५ तुकारामाच्या व्रज व हिंदी भाषेच्या अभ्यासाची कल्पना दिवेकरांच्या "संत तुकाराम" या पुस्तकांतील "तुकारामजी की हिंदी कविता" या 'पंचदश परिच्छेदा' वरून ( पृ. १४९-१५६ ) येईल.

६ अभंग १३३३. ७ अभंग २५४८.

भराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥ घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥ ." [1] त्याला 'वर्म' पाहिजे होतें; अर्थरूप होऊन राहावयाचें होतें. [2] मुखानें पाठांतर जो घडघडीत बोलतो पण त्याप्रमाणें चालत नाहीं त्याला धम्मपदांत [3] दुसऱ्यांच्या गाई मोजीत राहाणाऱ्या गुराख्याची उपमा दिली आहे. कळपांत त्याचें स्वतःचें असें कांहींच नसतें. तुकारामाचें अक्षरशः हेंच मत होतें. "तुका ह्मणे गुरें राखोनि गोंवारी । माझीं ह्मणे परि लाभ नाहीं ॥." [4] संताच्या वाङ्मयांतून उपदेश घेतांनी तुकारामाला सुख वाटत होतें, याचें कारण त्याची अहंता गळत चालली होती; व उपदेश आत्मसात् करण्याचा आनंद तो अनुभवीत होता.

अहंता समूळ गळावी व संतांचा उपदेश प्रत्यक्ष आचरणांत आणावा म्हणून त्यानें परोपकाराची साधनाही आदरिली. "टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनि ॥" [5] हें त्या परोपकाराचें सूत्र. या सूत्रांत शरीर कष्टविल्याचें स्पष्टच लिहिलें आहे. त्या परिस्थितींत तुकारामाकडून दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा परोपकार होणें संभवनीय नव्हतें. द्रव्य खर्चून उपकार करणें तर त्याला शक्यच नव्हतें. कोणाचें कल्याण करतां येईल अशी हातीं अधिकाराची सत्ता नव्हती. ज्ञानदानाचें पवित्र कार्य पुढें सुरू व्हावयाचें होतें. तेव्हां देह चंदनासारखा प्रत्यक्ष झिजवूनच त्यानें या उमेदवारीच्या काळांत आपणाला शक्य होता तो परोपकार केला. अभंगांत अर्थात् उपकारकृत्यांची नामनिशाणीही मिळावयाची नाहीं. सत्पुरुषांची ही पद्धतीच आहे कीं, उजव्या हातानें केलेल्या उपकाराचा डाव्या हाताला सुद्धां ठावठिकाणा नसतो. या परोपकाराची स्फूर्ति व व्याप्ति ध्यानांत घेतां महिपतीनें दिलेला त्याचा वृत्तांत अत्यंत स्वाभाविक वाटतो. त्याचें नीरस गद्यांतर करण्यापेक्षां महिपतीच्या रसाळ ओव्यांतूनच तो वृत्तांत वाचणें बरें. "तुकयाची तो निष्काम वृत्ती । प्राप्त व्हावया रुक्मिणीपती । परोपकारीं वेंचितसे शक्ती । कैशा रीतीं तें ऐका ॥ कोणी पांथस्थ वाटेवरी । अकस्मात गांठ पडली जरी । त्याचें ओझें घेऊनि शिरीं । विसांवा क्षणभरी त्यास द्यावा ॥ पर्जन्य मार्गीं लागतां सबळ । पांथस्थ गांवांत पाहती स्थळ । तयांसि दाखवी चावडी देऊळ । नातरीं तत्काळ ने घरा ॥ पंथ क्रमितांचि लवलाहें । यात्रेकऱ्याचे सुजले पाय । मग उष्ण पाणी करोनि पाहे । रगडित देह निजांगें ॥ गायी वृषभांसी निर्बळपणी । मोकलोनि देती निर्दय धनी । तयांसि हातें कुरवाळोनि । चारा-पाणी घालीतसे ॥ मैदा साकर आणि घृत । एके जागीं करोनि ठेवित । मुंगियांच्या धांवीं घालित । ईश्वर प्रीत्यर्थ नित्यकाळीं ॥ अणुरेणु पर्यंत जाणा । भूतमात्रीं धरितसे करुणा । हिंसा घडे तें कर्म जाणा । सहसाही मना नावडे ॥ परी चा(ल) तां हालतां दिसे जवळी । ते रगडेल अवचित पायातळीं । यास्तव जीव कळवळी । जैसी मासोळी उदकावीण ॥ उष्णकाळीं झालिया उबारा । कीर्तनामाजी घालितसे वारा । अन्न

---

१ अभंग ३०७४. २ अभंग ४११६, ४२१२.

३ "बहुं पि चे सं (स) हितं भासमानो न तक्करो होति नरो पमत्तो । गोपो व गावो गणयं परेसं न भागवा सामञ्ञस्स होति ॥" धम्मपद, १९.

४ अभंग ३७१९. ५ अभंग १३३३.

न मिळतां क्षुधातुरा । प्रयत्ने मेळवुन दे त्यासी ॥ उष्णकाळीं जीवन वाटेवर । नसतां उपाय करितसे थोर । घागर भरोनि सत्वर । मार्गावर नें तेथें ॥... पांथस्थासि व्याधी मार्गीं होत । जवळीं नसतां सुहृद आप्त । तयासि राहवोनि देउळांत । औषध पथ्य करवीतसे ॥ जड भरत वर्णिला भागवतीं । तैसी तुकयाची जाहली स्थिती । संसारिक काबाड काम सांगती । तें सत्वरगती करीतसे ॥."[1] या सर्व कृत्यांना आपणास कौतुकानें 'परोपकार' म्हणून गौरवावेंसें वाटतें याचेंच आश्चर्य वाटतें. सुसंस्कृत माणसाच्या ठायीं इतकी माणुसकी, दाक्षिण्य व सौजन्य सहज असलें पाहिजे; व सुधारलेल्या पाश्चात्य देशांत हवापाण्यासारखें तें सर्वत्र सांपडतें. आपणच माणुसकीला व भूतदयेला इतके पारखे झालों आहोंत कीं, अपघातांत सांपडून हमरस्त्यावर तडफडणाऱ्या माणसाची, रहदारी सारखी चालू असतांना सुद्धां, कोणीच वास्तपुस्त करीत नाहीं; मग मूक जनावरांची तर गोष्टच नको! असो. तुकारामाच्या या सौजन्यानेंच तेलाच्या नळ्यांचे भार त्याच्या गळ्यांत अडकवून दिले. त्याचें असें झालें कीं, एक दुर्बळ म्हातारी काठी टेकीत हळूहळू बाजाराला चालली होती. तुकारामाला साहजिकच तिची दया आली, व तो म्हणाला "माते तूं बहु श्रमलीसी । तरी माझे पाठीसी बैस आतां ॥". म्हातारी म्हणाली, "माझें तेल आणून देशील तर मी परत जातें." तुकारामानें तेल आणून देण्याचें तात्काळ कबूल केलें. पुढें गांवांत अशी मात फांकली कीं, तुकारामानें आणून दिलेलें तेल खूप दिवस पुरतें, तेव्हांपासून लोकांनीं त्याच्या गळ्यांत तेलाचे नळे अडकविण्यास सुरवात केली. आवली हें बघून संतापानें चडफडत असे. "एका वृषभाचें ओझें निश्चिती । मनुष्या हातीं हे आणविती । मरोनि गेलिया माझा पती । संतोष पावती मग तेव्हां ॥" असें बोलून ती लोकांशीं भांडत असे.[2] बाजारांत सुद्धां खडे झाडणें, ओझीं उचलणें, चारा-पाणी आणून देणें, पाठाळें बांधणें अशीं दुसऱ्याच्या अडीअडचणींत हातभार लावण्याचीं, भूतदयेचीं, व सार्वजनिक हिताचीं उपकारकृत्यें तो करीत असे. महिपतीनें जडभरताचा जरी उल्लेख केला असला तरी भागवतांत वर्णिलेली जडभरताची असंभावितदेहाभिमानाची स्थिति—जिच्यावरून त्याला "जड" ही उपाधि लागली—तुकारामाला त्या काळीं प्राप्त झाली होती असें दिसत नाहीं. "स च प्राकृतैर्द्विपदपशुभिरुन्मत्तजडबधिरेत्यभिभाष्यमाणो यदा तदनुरूपाणि प्रभाषते कर्माणि च स कार्यमाणः परेच्छया करोति"[3] अशी तुकारामाची विदेही स्थिति झाली होती असेंही महिपतीच्या वर्णनावरून दिसत नाहीं. आत्मौपम्याच्या वृत्तीनें परोपकार करून अहंकार विसरावयाचा तो प्रयत्न करीत होता.

अहंकार विसरण्यास आधीं अंगीं नम्रता आणावी लागते. त्याकरितांच "संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥"[4] ही साधना तुकारामानें आचरिली. या नम्रपणानें लीनता तर येतेच; पण "साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता

---

१ भक्तलीलामृत, अध्याय ३१, ओव्या १०३-१५.

२ कित्ता, अध्याय ३१, ओव्या ११९-५६.

३ भागवत, स्कंध ५, अध्याय ९, श्लोक ९

४ अभंग १३३३.

साधूस लागली।"[१] हा आणखी फायदा होतो. आत्मसाधनेच्या मार्गांत लोकलाज ही अगस्तिमुनीच्या मार्गांतील विंध्यपर्वतासारखी आड येते. ती एकदां ओलांडिली म्हणजे परत मागें फिरण्याचें प्रयोजनच उरत नाहीं. अशा तऱ्हेनें संतांच्या चरणीं लागून तुकारामानें लाज सोडली व संतांना त्याची लाज लागली. संतांसंबंधीं बोलतांना तुकारामाला वरपांगी आदराचे शब्द दुबळे वाटत. त्यांच्या चरणींच्या रजरेणूंनीं आपण पावन झालों ही भाषा त्याच्या तोंडीं नित्य असे. हे संत कोण होते? त्यांच्या भेटीगांठी कोठें कोठें झाल्या? आळंदीस, पंढरपुरास गेला असतां त्याला भक्तिमार्गाचे वाटाडे कोणी भेटले का? यांचा शोध लावण्याचीं साधनें आज नाहींत याचा खेद होतो. जीवनांत दुसऱ्याशीं संबंध आल्यानें होणाऱ्या संस्कारांनींच व्यक्तित्वावर पुटें चढतात. बाहेरचें पाणी पडलें म्हणजेच मग संपुटांतील मोत्याचें जीवन सुरू होऊन त्याला पाणी चढतें. तुकारामाला संतभेटी वारंवार होत असल्या पाहिजेत. अशाच एका प्रसंगीं बाहेर पर्यटनास गेला असतां—आरंभींच्या काळांत कीं मागाहून तें सांगतां येत नाहीं—त्यानें असे उद्गार काढले आहेत कीं, "बरवें देशावर जालें। काय बोलें बोलावें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ लाभें लाभ दुणावला। जीव धाला दर्शनें ॥ छ. ॥ भाग्यें जाली संतभेटी। आवडी पोटीं होती ते ॥ २ ॥ तुका ह्मणे श्रम केला। अवघा आला फळासी ॥ ३ ॥"[२].

या परमार्थसाधनेंत दुकानादि संसारधंद्याकडे साहजिकच दुर्लक्ष होत जाऊन कुटुंबाची उपेक्षा होऊं लागली. वनांतराच्या एकांतांत मधूनमधून चिंतन व संतांच्या ग्रंथभांडाराचा शोध, सायंकाळीं देवळांत गात-नाचत भजन, तर कधीं कीर्तन, देह कष्टवून परोपकार;—सावकार तुकारामाचें हें परिवर्तन पाहून आतेष्टांस विस्मय वाटूं लागला. "ऐसिया प्रेमळा ह्मणताती वेडा!"[३] त्रिविध जन नानापरींचीं वचनें बोलूं लागले. आपल्या या साधनेसंबंधीं लोक काय बोलत होते याची कल्पना देणारें स्वत: तुकारामानेंच वर्णन केलें आहे; त्यावरून त्या काळांतील त्याच्या जीवनक्रमाचीही कल्पना येते:—

"देवाचा भक्त तो देवासी गोड। आणिकांसी चाड नाहीं त्याची।
कवणाचा सोइरा नव्हे च सांगाती। अवघियां हातीं अंतरला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निष्काम वेडें ह्मणती बापुडें। अवघियां सांकडें जाला कैसा।
माझें ऐसें तया न ह्मणती कोणी। असे रानीं वनीं भलते ठायीं ॥ छ. ॥
प्रात:स्नान करी विभूतिचर्चन। देखोनियां जन निंदा करी।
कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा। ह्मणती या चांडाळा काय जालें ॥ २ ॥
गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं। शिव्या देती आई बाप भाऊ।
घरीं बाइल ह्मणे कोठें व्याली रांड। बरें होतें षंढ मरता तरी ॥ ३ ॥
जन्मोनि जाला अवघियां वेगळा। ह्मणोनि गोपाळा दुर्लभ तो।
तुका ह्मणे जो संसारा रुसला। तेणें चि टाकिला सिद्धपंथ ॥ ४ ॥."[४]

माघारें फिरावयाचें नाहीं अशा निश्चयानें तुकाराम या सिद्धपंथाची वाट चालूं लागला.

---

१ दासबोध, दशक ४, समास ७, ओवी २४.
२ अभंग ८४६.
३ अभंग ४३५०.
४ अभंग १७८७.

प्रकरण बारावें

## कवित्वाचा प्रारंभ

या सिद्धपंथानें जातांना, ज्याच्यावर विसंबून डोळे मिटून वाट चालतां आली असती असा कोणी वाटाड्या तुकारामाला भेटला नाहीं. त्यामुळें, आपली दिशाभूल तर होत नाहीं ना अशी आरंभीं त्याला कधीं कधीं शंका देखील येत असे. इतकेंच नव्हे, तर आपलें पेणेंच चुकलें आहे काय या संदेहाचा क्वचित्, फारच क्वचित्, त्याला आभास सुद्धां झाला. मार्ग दाखविणारा तर कोणीच मिळेना; उलट मार्गापासून परावृत्त करणारे कानींकपाळीं सारखे ओरडतच होते. मार्ग किती दुष्कर होता याचीही कल्पना प्रत्यक्ष वाट चालतांनाच येऊं लागली. या सर्व परिस्थितीचें वर्णन तुकारामानें आरंभींच्या अभंगांत हृदय उघडें करून केलें आहे.

त्या मनोमंथनाचा पुढील प्रकरणांत विचार करण्यापूर्वीं साहजिकच या प्रश्नाकडे लक्ष जातें कीं या प्रकारचे अभंग तुकारामानें केव्हां गाइले असतील? गुरूपदेशानंतर, देवानें आपला अंगीकार केला याची खात्री पटल्यानंतर, केवळ मागच्या आठवणी काढीत बसला असतां, त्याच्या तोंडून हे असले उद्गार निघाले असतील हें संभवत नाहीं. तुकारामाच्या अभंगांतील सम-विषम स्थळांनीं सकृद्दर्शनीं गोंधळून जाणाऱ्या वाचकास, सर्वच अभंग गुरूपदेशानंतरच्या आत्मविश्वासाच्या समाधानवृत्तींत लिहिले असतील असें मानतांना संकोच वाटतो. नामदेवानें कवित्व करण्याविषयीं स्वप्नांत दिलेला आदेश व—आत्मचरित्रपर अभंगांतील पंक्तींचा क्रम बरोबर असेल तर—गुरूपदेशानंतर झालेली कवित्वस्फूर्ति, यांचाही चरित्रकारास मेळ घातला पाहिजे. महिपती व विशेषतः बहिणाबाई यांच्या लिखाणावरून संभवणाऱ्या या बाबतींतील कालक्रमाशीं हा मेळ जुळवून घेतला पाहिजे. तेव्हां या प्रकरणांत, ज्या पावन काव्यगंगेनें तुकारामाची कीर्ति अमर केली तिच्या उगमाचा शोध करीत जावयाचें आहे.

कालगतींतील एक मुख्य टप्पा, जो पुढील एका प्रकरणांत निश्चित केला आहे, तो या शोधांत येथें गृहीत धरला पाहिजे. इ. स. १६३० च्या दुष्काळानंतरच्या गुरुवारीं पडलेल्या एका माघ शुद्ध दशमीस तुकारामास सद्गुरूची कृपा झाली. ही तिथि शके १५६१ त, म्हणजे २३ जानेवारी १६४० रोजीं येते, असें अनेक दृष्टींनीं विचार करून पंधराव्या प्रकरणांत सिद्ध केलें आहे. तुकारामाच्या कवित्वास या तारखेनंतरच प्रारंभ झाला कीं दुष्काळानंतरच्या दहा वर्षांच्या या मुदतींत, दरम्यान् केव्हांतरी, त्यानें काव्यरचनेस सुरुवात केली, या प्रश्नाचा निर्णय प्रथम करूं या.

कवित्वाच्या प्रारंभासंबंधीं खुद्द तुकारामानेंच केलेले दोन उल्लेख सुप्रसिद्ध आहेत. ते असे:—(१) "नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें। सवें पांडुरंगें येऊनियां ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ सांगितलें काम करावें कवित्व। वाउगें निमित्य बोलों नको ॥ छ ॥ माप टाकी सळ

धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ॥ २ ॥ प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटीं लावी तुका ॥ ३ ॥;" "द्याल ठाव तरि राहेन संगती । संतांचे पंगती पायांपाशीं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ॥ छ ॥ सेवटील स्छळ नीच माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ॥ २ ॥ नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥ ३ ॥";[1]—(२) "सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥ १२ ॥ मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १३ ॥ यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ १४ ॥".[2]

रामकृष्णहरि या नाम-मंत्राचा स्वप्नांतील गुरूपदेश, व कवित्व करण्याविषयींचा नामदेवाचा स्वप्नांतील आदेश, हे दोन निरनिराळे प्रसंग आहेत यांत शंका नाहीं. यांतील कोणता प्रथम घडला हें तुकारामानें स्पष्ट करून सांगितलें नाहीं. गुरूपदेशाच्या अभंगांत कवित्वाचा मुळीं संबंधच येत नाहीं. तेव्हां "यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति" या चरणांतील 'यावरि' या शब्दाचा मागील पंक्तींतील गुरूपदेशाशीं कार्यकारण-संबंध लावितां येत नाहीं. 'यावरि'चा अर्थ केवळ कालक्रमानें नंतर, मागाहून, असा लाविल्यास नामदेवानें पांडुरंगासमवेत कवित्व करण्याचा स्वतंत्र आदेश गुरूपदेशानंतरच दिला असें मानावें लागेल; व कवित्वाचा प्रारंभ इ. स. १६४० च्याही पुढें झाला असें कल्पावें लागेल. निर्विवाद प्रत्यक्ष घडलेल्या कांहीं घटनांनीं त्या कल्पनेला बाध येतो व चरित्रक्रमाची एकंदरींत नीट उपपत्ति लागत नाहीं, असें आपणांस पुढें दिसून येईल. तेव्हां 'यावरि' इत्यादि चरणाचा अर्थ शक्य असल्यास निराळ्या प्रकारें लावला पाहिजे. दोन प्रकार संभवतात. एक तर 'यावरि' हा शब्द कालक्रम निश्चित करण्यासाठीं कांटेकोर अर्थानें योजिला नसून प्रास्ताविक 'आतां' या अर्थीं किंवा 'अशा प्रकारें' या अर्थीं ओघांत आला आहे असें मानावें. किंवा या चरणाचा खरा रोंख 'स्फूर्ति' या शब्दावर आहे असें समजावें ; म्हणजे सांगण्याचा आशय हा कीं, कवित्वाचा प्रारंभ जरी पूर्वीं झाला असला तरी जिला 'कवित्वाची स्फूर्ति' म्हणतां येईल ती गुरूपदेशानंतरच होऊं लागली. कवित्वाच्या प्रत्यक्ष घडलेल्या विकासाशीं व गुरूपदेशानंतरच्या तुकारामाच्या वाढत्या आत्मविश्वासाशीं हा आशय ठीक जुळतो.

इ. स. १६४० च्या प्रारंभीं झालेल्या गुरूपदेशाच्या बरीच पूर्वीं तुकारामाच्या कवित्वाची ख्याति महाराष्ट्रांत पसरली होती असें बहिणाबाईच्या वृत्तांतावरून दिसतें. बहात्तर वर्षांची आयुर्मर्यादा पुरी करून बहिणाबाईचें निज आश्विन शुद्ध प्रतिपदा बुधवार, म्हणजे २ आक्टोबर १७०० रोजीं निर्याण झालें.[3] म्हणजे तिचा जन्म १-२ आक्टोबर १६२८ (शके १५५०) रोजीं झाला असला पाहिजे. "कार्तिकांत वद्य पंचमी रवीवार । स्वप्नींचा विचार गुरु कृपा ॥"[4] असा वृत्तांत स्वत:स कोल्हापुरांत तुकारामानें स्वप्नीं दिलेल्या

---

१ अभंग १३२०–२१.          २ अभंग १३३३.

३ "बाहत्तरी वर्षें आयुष्य मर्यादा । आजी झाली सिद्धासनीं पूर्ण ॥" (अभंग ९९) "धन्य शत षोडशवरि द्वाविंशत काळीं । धन्य अश्विनशुद्ध प्रतिपदा बुध मेळीं ।...देहा त्यागुनि चरणा पावसि वनमाळीं ॥" (अभंग ६३९), श्री संत बहिणाबाईचा गाथा, कोल्हारकर.

४ कित्ता, अभंग २५.

उपदेशाविषयीं तिनें वर्णीला आहे. त्यावेळीं तिचें अकरावें वर्ष पुरें झालें होतें.[१] कार्तिक वद्य पंचमी रविवार हा योग २९ आक्टोबर १६४० (शके १५६२) रोजीं येतो. उपदेशापर्यंतचा सर्व प्रकार बारावें वर्ष चालू असतांना वडला त्या दृष्टीनें "अकरावें वरुष मज होतें तेव्हां"[१] असें जें बहिणाबाईनें म्हटलें आहे तें गैर दिसत नाहीं. पूर्वींच्या अभंगांत तिनें अकरा वर्षें पुरीं झाली होतीं हें स्पष्ट केलें आहे. रहिमतपुरास येण्यापूर्वीं "बहिणी म्हणे माझें वय वर्षें नव" असें सांगून तेथील ग्रामस्थ उपाध्याय काशीस गेला असतां त्याच्या जागीं काम करून एका वर्षाचा निर्वाह झाला, व तो परत आल्यानंतर त्यानें एक वर्ष "आम्हांसी रक्षिलें" अशी हकिकत तिनें सांगितली आहे. अशीं अकरा (९+१+१) वर्षें पुरीं झाल्यानंतर हें कुटुंब कोल्हापुरास गेलें.[२] "ऐसें वर्ष अकरा जालें मजलागीं । वाटे संतसंगीं असावेंसें ॥ कथा आयकावी पुराण श्रवणीं । ब्राह्मण-पूजनीं चित्त रिझे ॥"[३] अशी तिची वृत्ति अकरावें वर्ष संपल्यानंतर म्हणजे इ. स. १६३९ त झाली. त्यानंतर कोल्हापुरास "जयराम गोसावी त्यांची हरिकथा । नित्य भागवता श्रवण करूं ॥"[४] अशी तिची दिनचर्या असे. या सर्व हरिकथांत, म्हणजे १६३९-४० सालीं, तिनें तुकारामाचे अभंग ऐकिले होते. "पूर्वील हरिकथा आयकिल्या होत्या । त्या मनीं मागुत्या आठवती ॥ तुकोबाचीं पदें अद्वैत प्रसिद्ध । त्यांचा अनुवाद चित्त झुरवी ॥ ऐसीं ज्याचीं पदें तो मज भेटतां । जीवास या होतां तोष बहू ॥ तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदांसी कथेमाजीं ॥ तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ॥ तुकोबाची ऐकेन कानीं हरिकथा । होय तैसें चित्ता समाधान ॥ ...बहिणी ह्मणे हेत तुकोबाचे पायीं । ऐकोनियां देहीं पदें त्यांचीं ॥...तेरा दिवस ज्यानें वह्या उदकांत । घालोनीया सत्य वांचविल्या ॥ महाराष्ट्रीं शब्दांत वेदांतांचा अर्थ । बोलीला लोकांत सर्वद्रष्टा ॥."[५] हे अभंग बहिणाबाईनें जरी १६३९–४० सालीं लिहिले नसले तरी त्यांवरून हें स्पष्ट होतें कीं वेदांताचा अर्थ सांगणारे तुकारामाचे अद्वैतप्रसिद्ध अभंग महाराष्ट्रांतील जनता त्या सुमारास हरिकथेंत गाऊं लागली होती, व ते लोकांचे चित्त 'झुरवीत' होते. हें एकदां मान्य केलें म्हणजे क्रमानें हें म्हणणें प्राप्त आहे कीं इ. स. १६४० च्या जानेवारींतील गुरूपदेशानंतरच तुकारामाच्या या कवित्वास प्रारंभ झाला नसून, तत्पूर्वीं कांहीं वर्षें तरी तो कवित्व करीत होता, त्यांत अद्वैताचा वेदांत गुंफिला होता, व त्याची दूरवर प्रसिद्धीही झाली होती. बहिणाबाईच्या वृत्तांतावरून आपणांस असें निश्चित अनुमान करितां येईल कीं दुष्काळानंतर तीनचार वर्षांनीं, म्हणजे १६३३–४ च्या सुमारास, तुकारामाच्या कवित्वास प्रारंभ झाला असावा.

गुरूपदेशापूर्वींच तुकारामाच्या कवित्वास प्रारंभ झाला होता अशी महिपतीचीही मान्यता दिसते. आधीं लिहिलेल्या भक्तविजयांतील त्रोटक चरित्रांत व मागाहून लिहिलेल्या भक्तलीलामृतांतील विस्तृत चरित्रांत याच मान्यतेच्या अनुरोधानें महिपतीनें कवित्वाचा भाग आणिला आहे. वर उद्धृत केलेले कवित्वासंबंधींचे तुकारामाचे दोनही अभंग महिपतीनें

१ "अकरावें वरुष मज होतें तेव्हां ।" कित्ता, अभंग १५.

२ कित्ता, अभंग १०, १२.

३ कित्ता, अभंग १२.

४ कित्ता, अभंग १३.

५ कित्ता, अभंग २१-२४.

वापरिले आहेत. शरीर कष्टवून परोपकार करावयाची साधना केल्यानंतर कवित्वाची स्फूर्ति झाली असें भक्तविजयांत महिपतीनें वर्णिलें आहे. त्यांत गुरूपदेशाचा संबंधच आणला नाहीं; मात्र नामदेवानें स्वप्नांत दिलेल्या आदेशानुसार कवित्वास प्रारंभ झाला हा प्रसंग तुकारामाच्या अभंगांच्या आधारें रंगविला आहे.[१] भक्तलीलामृतांतील चरित्रांत साद्यंत कालक्रम शक्य तितक्या व्यवस्थित रीतीनें सांभाळिला आहे. त्या चरित्रांत देखील साधनेनंतर कवित्व व मागाहून गुरूपदेश असाच क्रम अनुसरिला आहे. तो महिपतीच्याच शब्दांत मांडितों:— "कर्म उपासना आणि ज्ञान। तिहीं कांडांत असे निपुण। दाखवी वरतून जनासि॥ कायिक तप तें कर्मकांड जाण। वाचिक उपासना वर्णावे गुण। पांडुरंगावीण कांहींच नेणें। पूर्ण आत्मज्ञान नव्हेचि कीं॥ हे तिन्ही तपांचे अलंकार जाण। तुकयाच्या अंगीं बाणलें लेणें। देव तुकाशी येईल जेणें। तें सात्विक पुण्य जोडलें॥ ऐसें जाणूनि पांडुरंगमूर्ती। विचार करीत आपुले चित्तीं। ह्मणे तुका वदेल माझी कीर्ती। ते कवित्व स्फूर्ति त्यासि द्यावी॥ मग नामदेवाचा धरोनि हात। देहूसि आले पंढरीनाथ। तुका रात्रीं असतां निद्रित। दृष्टांत दाखवित जगदात्मा॥... तुकयाचें अल्प संतोषी मन। पाठांतर इच्छित संतवचन। मग आज्ञा केली जगज्जीवनें। प्रासादिक वचनें बोलावीं॥."[२] तेव्हांपासून तुकारामानें "कवित्वासि प्रारंभ केला प्रीतीं। सप्रेम मतीं आपुल्या॥."[३] "कीर्तनामाजी साचार। चरित्र नसलें पाठांतर। त्याचा अभंग वरच्यावर। वैष्णववीर करीतसे॥".[४] बत्तिसाव्या अध्यायांत ही कथा सांगितल्यानंतर महिपतीनें तेहतिसाव्या अध्यायांत तुकारामाची कविता कोण लिहून ठेवीत असत हें प्रथम सांगितलें व नंतर पांडुरंगानें 'विप्रवेष' धरून तुकारामास माघ शुद्ध दशमी गुरुवार रोजीं गुरूपदेश कसा दिला याचें वर्णन केलें आहे.[५] सारांश, तुकारामाच्या कवित्वास गुरूपदेशापूर्वीं बराच काळ आधीं प्रारंभ झाला होता असें महिपतीचें मत दिसतें.

स्वतःच्या कवित्वाविषयीं तुकारामानें अभंगांत ठिकठिकाणीं जे उद्गार काढले आहेत. त्यांवरून सुद्धां असें स्पष्ट दिसतें कीं गुरूपदेशापूर्वीं तुकारामानें बरेंचसें कवित्व केलें होतें. हे उद्गार वाचतांवाचतांच ते स्वभावतःच दोन निरनिराळ्या प्रकारचे आहेत, याची तात्काळ खूण पटते. नामदेवासहित येऊन पांडुरंगानें कवित्व करण्याची आज्ञा दिली याची जरी त्याला जाणीव होती तरी आरंभीं तो आपल्या कवित्वाचा प्रस्ताव मोठ्या विनयानें, थोडासा घुटमळत, कधीं कधीं क्षमा याचून करीत असे. संतांच्या आधारानेंच तो आपलें काव्य पुढें आणीत असे. गुरूपदेशानंतर जरी त्यानें शालीनतेचा नम्रपणा सोडला नाहीं तरी तो आपल्या काव्याविषयीं, देवानें अंगीकार केला या प्रत्ययानें आत्मविश्वासाच्या अभिमानानें बोलूं लागला. हें संक्रमण प्रत्यक्ष अवतरणांवरून चटकन डोळ्यांत भरतें. पहिल्या विनयाच्या वृत्तींत "गाईन ओविया शिष्टांच्या आधारें"[६]

१ "हें शरीरतप करितां निश्चितीं। यावरी जाहली कवित्वाची स्फूर्ती। जे श्रुतिशास्त्रांनीं वर्णिली कीर्ती। ते प्राकृत मतीं बोलत॥." भक्तविजय. अध्याय ४८, ओव्या ५४-७९.

२ भक्तलीलामृत. अध्याय ३२, ओव्या ३१-४४.

३ कित्ता, ओवी ४८.

४ कित्ता, ओवी ५२.

५ कित्ता, अध्याय ३३, ओव्या १२०-१५५.

६ अभंग १६४९.

हें आपलें विधान विशद करतांना त्यानें संतचरणीं असें निवेदन केलें कीं—" पायांच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ॥ छ ॥ नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडिलों शेष ॥ २ ॥ तुमचे कृपेचें पोषणें । जन्मोजन्मीं तुका ह्मणे ॥ ३ ॥"; [१] "संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ॥ छ ॥ करितों कवतुक बोबडा उत्तरीं । झणी मजवरि कोप धरा ॥ २ ॥ काय माझी याति नेणां हा विचार । काय मी तें फार बोलों नेणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तो चि जाणे ॥ ४ ॥"; [२] "आरुष माझी वाणी बोबडीं उत्तरें । केली ते लेंकुरें सलगी पायीं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ करावें कवतुक संतीं मायबापीं । जीवन देउनि रोपीं विस्तारिजे ॥ छ ॥ आधारें वदली प्रसादाची वाणी । उच्छिष्टसेवनीं तुमचिया ॥ २ ॥ तुका म्हणे हे चि कारितों विनंती । मागेन पुढती सेवादान ॥ ३ ॥". [३] नामदेवासमवेत आलेल्या पांडुरंगाचा जो प्रसाद पोटीं राहिला होता तो, "प्रसादाची वाणी" ही भाषा योजतांना त्याच्या नकळत ओठीं आला. कवित्वाची आज्ञा करितांना नामदेव माप टाकीत होता, विठ्ठलानें सळ धरिली होती, हें [४] सदैव जीवंत वागवून आपण केवळ माप मोजणारा मापारी आहें अशा दृढ समजुतीनें तो आर्जवानें विनवून सांगतो :—

(१) "खरें नानवट निक्षेपीचें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मजुराच्या हातें मापाचा उकल । मी तों येथें फोल सत्ता त्याची ॥ छ ॥" [५]

(२) "करितों कवित्व ह्मणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥ छ ॥
काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तें चि वदें ॥ २ ॥
निमित्त मापासी बैसविलों आहें । मी तों कांहीं नव्हे स्वामिसत्ता ॥ ३ ॥
तुका ह्मणे आहें पाईक चि खरा । वागवितों मुद्रा नामाची हे ॥ ४ ॥" [६]

नामदेवाची मुद्रा धारण करणाऱ्या या पाईक मापाऱ्याला पांडुरंगानें अंगीकार करण्यापूर्वी असंतोष देखील वाटत असे, व महदनुभवाची आस लागली होती; ती खालील अभंगांत पुरी व्यक्त होते :—"शिकल्या शब्दाचें उत्पादितों ज्ञान । दरपणींचें धन उपर वाया ॥ १ ॥

---

१ अभंग १८५२. २ अभंग ९११. ३ अभंग २११२.

४ सळ (सळे) म्हणजे एकदां 'अभिमान' असें सांगून मग 'आग्रह' असा जो अर्थ परांजपे (श्री तुकोबारायांचे अभंग, प्रस्तावना, पृ. ४७८) देतात तो चुकीचा आहे. सळे शब्दाचा प्रयोग ६२२, ११२५, २०२०, २६९४, २८१२ या अभंगांत आला आहे; त्यावरून सळे ही 'धरावयाची' व 'ओढावयाची' बाब आहे व ती 'चढत' जाते असें स्पष्ट दिसतें; म्हणजेच, एक तर ती (पायलीसारख्या) मापांत भरलेलें धान्य कापून पूर्ण माप करण्यासाठीं ओढतात ती पट्टी असली पाहिजे, किंवा कडबा, गवत, भात वगैरे मोजतांना खुणेकरितां बाजूस काढून ठेवतात ती पेंढी, पुंजी इत्यादि वस्तु असली पाहिजे; व ती मोजणीबरोबर चढत जाते. कसेंही असो; 'सळे' चा मापाशीं व मोजणीशीं संबंध येतो; अभिमान किंवा आग्रह हा अर्थ जुळत नाहीं.

५ अभंग ८८३. ६ अभंग १००७.

॥ ध्रु. ॥ अनुभव कइं होईन भोगिता । सांकडें तें आतां हें चि आलें ॥ छ ॥ गायें नाचें करीं शरीराचे धर्म । बीजकळावर्म तुमचें दान ॥ २ ॥ तुका ह्मणे केला उशीर न साहे । द्याल तरी आहे सर्व सिद्ध ॥ ३ ॥"[१]

गुरूपदेश होऊन देवानें अंगीकार केल्यावर अंतरींचा निराळाच रंग बाहेर उमटूं लागला. प्रथम भाषा तीच दिसली तरी सूर निराळा ऐकूं येऊं लागला :—

"नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापूनियां ॥ छ ॥
मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ॥ २ ॥
राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारि । बोबड्या उत्तरीं हें चि ध्यान ॥ ३ ॥
तुका ह्मणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥ ४ ॥"[२]

या अभंगांतील पदयोजना नम्र दिसली तरी पदवी अत्युच्च आहे. बोल 'बोबडे' म्हटले असले तरी ते मंत्रानें भारलेले आहेत. स्वत:ला मूढ म्हणवून घेतलें असलें तरी अंगसंगें व्यापून उरलेल्या पांडुरंगाची गूढ शक्ति अंगांत आली आहे. पांडुरंगकृपेचा अनुभव जसजसा अंगांत मुरूं लागला तसतसा आत्मविश्वासही वाढून उघड दिसूं लागला. "वचनाचा अनुभव हातीं । बोलविती देव मज ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ परि हें न कळे अभाविकां । जडलोकां जिवांसी ॥ छ ॥ अश्रुत हे प्रसादिक । कृपा भीक स्वामीची ॥ २ ॥ तुका ह्मणे वरावरी । जातों तरी सांगत ॥ ३ ॥".[३] याहीपेक्षां आत्मबलानें दुसऱ्या दोन अभंगांत प्रांजलपणें निवेदन केलें आहे कीं :—

(१) "नव्हती हीं माझीं जायाचीं भूषणें । असे नारायणें उचित केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शब्दाच्या वोवोनी रत्नाचिया माळा । मुळींच जिव्हाळा झरवणी ॥ छ ॥
अर्थांतरीं असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज सरतें परतें । हें नाहीं अनंतें उरों दिलें ॥ ३ ॥"[४]

(२) "अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरिंची ॥ छ ॥
उतरूनि दिलें कशीं । शुद्धरसीं सरे तें ॥ २ ॥
तुका ह्मणे दुसरें नाहीं । ऐसी ग्वाही गुजरली ॥ ३ ॥"[५]

जो अनुभव 'कइं भोगिता होईन' असा ध्यास लागला होता, तो आतां अखंड सेवितां येत होता, तेव्हां या अभंगांत अनुभवावरच विशेष भर दिला आहे. तरीपण अजून संशयात्मे होतेच. त्यांना उद्देशून, जणूं काय भवभूतीच्या भाषेंतच, समानधर्मा असेल त्याला आपल्या कवित्वाची खूण कळेल असें खालील अभंगांत आश्वासन दिलें आहे. "विश्वास तो देव । ह्मणुनि धरियेला भाव ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ माझी वदवितो वाणी । ज्याणें धरिली धरणी ॥ छ ॥ जोडिलीं अक्षरें । नव्हती बुद्धीचीं उत्तरें ॥ २ ॥ नाहीं केली

१ अभंग ३७१८. २ अभंग १७९०. ३ अभंग ३२०४.
४ अभंग २४४२. ५ अभंग २८४५.

आटी । कांहीं मानदंभासाटीं ॥ ३ ॥ कोणी भाग्यवंत । तया कळेल उचित ॥ ४ ॥ तुका ह्मणे झरा । आहे मुळींचा चि खरा ॥ ५ ॥ ".[1] त्यानंतर शेवटीं अधिकाराची पण कारुणिकाची वाणी ऐकूं येते कीं :—

"नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ॥ १ ॥
लागलासे झरा पूर्ण नवनीतें । सेविलियां हित फार होय ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ॥ ३ ॥ "[2]

रामकृष्णहरि हा मंत्र गोवलेला अभंग गुरूपदेशानंतर लवकरच रचिला असला पाहिजे.[3] स्वतःच्या काव्याकडे पाहण्याची त्यापूर्वींची आणि त्यानंतरची तुकारामाची वृत्ति ध्यानांत घेतली म्हणजे गुरूपदेशापूर्वीं त्यानें बरेंचसें काव्य केलें होतें याची खात्री पटते. वर सांगितल्याप्रमाणें साधनेच्या तपश्चर्येच्या परिपाकानें तुकारामानें प्रथम काव्यसिद्धि संपादन केली ; व इ. स. १६३३ च्या सुमारास त्याच्या कवित्वास प्रारंभ झाला.

हें पहिलें कवित्व कोणत्या प्रकारचें होतें ? " पांडुरंगा करूं प्रथम नमना । " या नमनानें प्रारंभ केलेल्या ओव्या[4] गुरूपदेशानंतर लागलीच, निर्विकार आकाराला आलें त्या निरुपम सुखाच्या समाधींत, मुखावाटे बाहेर आल्या आहेत. हा काव्यविस्तार बाबाजीसद्गुरूच्या कृपेनें झाला आहे असें तुकारामानें आरंभींच सांगितलें आहे. या ओव्यांत गातांगातां सहज दाममाला गुंफिली आहे. या दाममालेंत व बाळक्रीडेच्या अभंगांतील दाममालेंत वरवर पाहणाऱ्यास सुद्धां वेगळेपणा दिसतो. नमनाच्या दाममालेला "शब्दाच्या वोवोनी रत्नाचिया माळा । मुळींच जिव्हाळा झरवणी ॥ अर्थांतरीं असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ॥ "[5] हें मागें उद्धृत केलेलें तुकारामाचें वर्णन अक्षरशः लावितां येईल. या ओव्यांत तुकारामाच्या काव्याचे समग्र गुण समुच्चयानें आले आहेत. संख्येच्या प्रमाणानुसार त्यांचें परिमाण, पुटें चढलेल्या रसायणाप्रमाणें जरी सूक्ष्म दिसलें तरी त्यांची शक्ति अमोघ आहे. बाळक्रीडेच्या दाममालेंत, नमनाच्या दाममालेंतील वर्णांचा प्रकर्ष व अर्थाची सूत्रबद्धता दिसून येत नाहीं. या बाळक्रीडेंत क्रीडेचा पदविन्यास सारखा दिसत नाहीं. भावनेच्या खेळांत शब्द सारखे नाचत नसून कधींकधीं नुसती वाट चालत आहेत असेंही वाटतें. कृष्णाच्या बाळलीलेवर तुकारामानें पुढें जीं अभंग-पदें[6] गायिलीं त्यांच्याशीं तुलना केली असतां बाळक्रीडेच्या ओव्या प्रासादिक असल्या तरी आरंभींच्या प्रयत्नानें साधिलेल्या दिसतात. दामाच्या जनरंजवाण्या कलेचें आकर्षण आरंभींच अधिक वाटणार.[7] पहिल्या काव्य-प्रबंधाला साजेल अशाच भावनेनें तुकारामानें बाळक्रीडेचा समारोप केला आहे ; त्यांत

१ अभंग ३५००. २ अभंग ४३९८.

३ नमनाच्या ओव्यांत (अभंग ४५०६) "लाहो करीन मी हा चि संवसारीं । राम कृष्ण हरि नारायण ॥ ३ ॥ " याप्रमाणें मंत्र गुंफिला आहे.

४ अभंग ४५०५-६. ५ अभंग २४४२.

६ अभंग १३९ पासून पुढचे काला चेंडुफळी हे अभंग, तसेंच ३७५-४१२ हे अभंग पहा.

७ जराशा दीर्घ काव्याला या ' दाम ' अलंकारानें नटविणें तुकारामाला आवडत असे. अभंग ४२०१-२, ४३६० पहा. या दामाचा अभ्यास बाळक्रीडेंत अंगवळणीं पडला असावा.

प्रसादापेक्षां धीटपणाची[१] अधिक जाणीव दिसते. "मना वाटे तैसीं बोलिलों वचनें। केली धिटपणें सलगी देवा ॥ १ ॥ वाणी नाहीं शुद्ध याति एक ठाव। भक्ति नेणें भाव नाहीं मनीं ॥ २ ॥ नाहीं जालें ज्ञान पाहिलें अक्षर। मानी जैसें थोर थोरी नाहीं ॥ ३ ॥ नाहीं मनीं लाज धरिली आशंका। नाहीं भ्यालों लोकां चतुरांसि ॥ ४ ॥ चतुरांच्या राया मी तुझें अंकित। जालों शरणागत देवदेवा ॥ ५ ॥".[२] एकंदरींत, कवित्वाची आज्ञा झाल्यावर बाळक्रीडेच्या ओव्या तुकारामानें प्रथम 'लिहिल्या' हें महिपतीचें म्हणणें खरें वाटतें.[३] तुकारामानें त्या "आपुले मतीनें" लिहिल्या होत्या असें महिपती म्हणतो; म्हणजेच तीं वचनें तो "मना वाटे तैसीं" बोलिला होता. बाळक्रीडा कथाकीर्तनांत तुकारामानें शीघ्र रचून बोलिलेली नाहीं. तुकारामाची ती पहिली "लिहिलेली" काव्यरचना होय.

"काय निघेल मुखांतून। इच्छिती श्रवण सर्वांचे।"[४] असें ज्याच्याकडे आतुरतेनें ध्यान लावून भजनकीर्तनप्रसंगीं लोक पाहत असत त्या तुकारामाच्या मुखावाटे प्रथम येण्याचा अग्रमान कोणत्या अभंगाला मिळाला हें जर निश्चित करतां आलें असतें तर चरित्रकारास एकादें नवें खंड शोधून काढल्याचा आनंद झाला असता! परंतु आज उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारें ओळखीच्याच भूमिकेवर कल्पनेनें वावरावें लागतें. मागील धृपद सोडून आतां पुढें जाऊन तुकारामाला स्वतःच कीर्तन करावयाचें होतें. कीर्तनांत आख्यानें, उपदेश, विनोद, कारुणिक वचनें हीं सर्व अंगें सांभाळावीं लागतात. तुकारामाच्या अभंगांत या सर्व साहित्याचा विपुल भरणा आहे. इतर कथाकीर्तनकारांप्रमाणें तुकाराम जरी हीं अंगें-उपांगें सांभाळीत होता तरी त्याच्या कीर्तनाचा रंग निराळाच होता; कारण त्याची कीर्तन-तरंगिणी परमेश्वराच्या पायांपासून निघाली होती; व तिच्या पोटीं पांडुरंगाचा प्रसाद होता. पहिला अभंग अशाच एकाद्या कीर्तनांत अगर भजनांत आख्यानाचा किंवा कारुणिक वचनाचा अवतरला असावा. महिपती म्हणतो त्याप्रमाणें "कीर्तनामाजी साचार। चरित्र नसलें पाठांतर। त्याचा अभंग वरच्यावर। वैष्णववीर करीतसे ॥ प्रसादिक कविता ऐकूनि कानीं। श्रोते आश्चर्य करिती मनीं। कीर्तनीं रंग येतसे चौगुणी। वरद वाणी

---

१ "धीट ह्मणिजे धीटपणें केलें। जें जें आपुल्या मनासि आलें। बळें चि कवित्व रचिलें। या नाव धीट बोलिजे ॥" दासबोध, दशक १४, समास ३, ओवी ८.

२ अभंग ४६०६.

३ "ते बाळक्रिडा तुक्यानें आपुले मती। प्रथमारंभीं लिहिली ग्रंथीं।" भक्तलीलामृत, अध्याय ३२, ओवी ५१. वि. ल. भावे (महाराष्ट्र-सारस्वत, भाग पहिला, पृ. २४०) यांचा या बाबतींत कांहीं गैरसमज झालेला दिसतो. कारण ते लिहितात :—"कवित्वाच्या सुरवातीस यांनीं 'बालक्रीडा' लिहिली असें महीपतीबोवा सांगतात. आणि तें खरें दिसतें. या बालक्रीडेच्या शंभर ओंव्या असून त्यांत प्रारंभीं दुसरे ओवींत 'त्याच्या कृपादानें कथेचा विस्तारु। बाबाजी सद्गुरु दास तुका ॥' असा उल्लेख आहे." म्हणजे भावे नमनाच्या ओव्यांचा बालक्रीडेंतच समावेश करितात, तें बरोबर दिसत नाहीं; कारण बालक्रीडेंत नमनाचा निराळा भाग आरंभीं आहे. शिवाय त्या ओव्या नऊशें आहेत.

४ भक्तलीलामृत, अध्याय ४०, ओवी ४३.

ह्मणोनियां ॥ ".[1] आरंभीं भागवतावर आधारलेलीं व इतर माहितीनें सजविलेलीं आख्यानें व संतचरित्रें तुकारामानें कवित्वाच्या शीघ्र स्फूर्तीनें तत्क्षणीं कीर्तनांत गाइलीं असतील. ज्यांचा प्रचार जास्त होता अशा कांहींचा गाथेंत अंतर्भाव झाला आहे. कांहीं इतरत्र विखुरलेलीं आढळतात. उदाहरणार्थ, गाथेंत दामाजीपंताचें चरित्र दिलें आहे.[2] यासारखीं इतरही चरित्रें त्यानें रचिलीं असलीं पाहिजेत. त्यांतील भानुदास-चरित्र व सुदाम-चरित्र हीं स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध झालीं आहेत.[3] ठिकठिकाणीं आढळणाऱ्या बाडांचा आस्थेनें शोध केल्यास आणखी कांहीं चरित्रें खचित उपलब्ध होतील.[4] चरित्रांप्रमाणें आख्यानेंही तुकारामानें रचिलीं आहेत. गाथेंत पक्ष्यांचें, मृगांचें, उपमन्यूचें, दावाग्निभक्षणाचें, (गुरूपदेशानंतर रचिलेलें) भक्तछळाचें, कुरुक्षेत्रावरील पक्ष्यांच्या पिलांचें रक्षण केलें-तें, अशीं आख्यानें आलीं आहेत.[5] याचप्रकारचीं आणखीही कांहीं असण्याचा संभव आहे. विनोदाचे अनेक चुटके गाथेंत आहेत.[6] तुकारामाच्या कवित्वपटाचें मुख्य अंग म्हणजे कारुणिक वचनें व उपदेश. आख्यान-चरित्र-विनोद ही केवळ त्या पटाच्या पालवावरील विणकामाची नक्षी. पहिल्या कवित्वांत कारुणिक वचनें व उपदेश यांची भरगच्च वीण असली पाहिजे.

कारुणिक वचनांच्या छटा आपणांस पुढील प्रकरणांत दिसतील. या स्थळीं आरंभींच्या कीर्तनांत सांगितलेल्या उपदेशाची थोडीशी ओळख करून घ्यावयाची आहे. तुकाराम स्वतःला 'अनावर' स्वभावाचा, 'भांड' म्हणवून घेत असे. असला 'भांड' एकदां कां सात्विक संतापानें खवळला म्हणजे स्वतःच्या तोंडाला धरणें त्यालाच जड जात असे. क्रोध हा षड्रिपूंपैकीं एक आहे खरा ; पण हे सर्व शत्रु चित्त शुद्ध असलें म्हणजे मित्रच होतात. आत्मज्ञान होऊन चित्त निर्विकार झालें म्हणजे कामक्रोधाच्या विकृतीचा भाव लोपून केवळ प्रकृतीचा स्वभाव राहातो. सिद्धावस्थेंत सुद्धां कामक्रोधांच्या प्रकृतिसिद्ध स्वभावाला नियुक्त स्थान आहे. अन्याय, असत्य, अधोगति यांच्याशीं गांठ पडली म्हणजे संताप उसळून वर आलाच पाहिजे. चैतन्याच्या तेजाचा तो धर्म आहे ; आणि सिद्ध म्हणजे अचेतन लांकडाचा ओंढा नव्हे. सिद्धावस्थेंतील तुकारामाचा क्रोध सात्विक होता ; संमोहाचें तमःपटल तर राहोच, शब्दरज सुद्धां त्यामुळें दिसून येत नसे. इतकेंच नव्हे तर "बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ।"[7]

---

१ भक्तलीलामृत, अध्याय ३२, ओव्या ५२-५३. २ अभंग ४३५६.

३ "तुकारामकृत भानुदासचरित्र" रा. म. आठवले. भा. इ. सं. मं. त्रैमासिक. वर्ष २३, अंक ४ (चैत्र शके १८६५) पृ. १. "तुकाराममहाराजांचें अप्रसिद्ध कवित्व". दा. के. ओक. कित्ता, पृ. २६

४ तळटीप तीनमध्यें उल्लेखिलेल्या लेखांत श्री. ओक म्हणतात :—"ह्याखेरीज निरनिराळ्या बाडांतून कित्येक फुटकळ अभंग व कांहीं पौराणिक कथानकें व संतचरित्रेंही आढळतात...दुसऱ्या एका बाडांत चोखामाळ्याचे अभंग, नामदेवचरित्र, रुक्मांगद चरित्र, वस्त्रहरणाचे अभंग, हरिपाळसंत इत्यादि महत्वाचीं व मोठीं प्रकरणें आहेत."

५ या आख्यानांसाठीं अनुक्रमें अभंग ६०७, ६७८, ४४९३, ४२३१-४२, ३०८६-३१०४, २५५० पहावेत.

६ उदाहरणार्थ, अभंग ३६, ५१८, ३०५२, ४२१९, ४२४४-५, ४४९५, ४४७७ पहा.

७ अभंग १३१.

अशा आर्जवानें तो पुढें आपल्या सहज स्वभावानें निघालेल्या तीक्ष्ण उत्तरांचें शल्य हळुवार हातानें काढून टाकीत असे. साधकावस्थेंतील तुकारामाच्या क्रोधाची भाषा त्या मानानें कर्कश व कठोर वाटते. गोड गोड बोलून आडपडदा ठेवणाऱ्या दांभिकांना ती कर्णकटु देखील वाटावी इतकी ती कडक आहे. पण आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं हे अभंग पहिल्या आवेशाचे आहेत, व त्यांच्या भाषेंत अजूनही मुख्यत्वें बाजारपेठेंतील ग्राम्यपणा होता. अद्यापि ती संतांनीं अळंकारिली नव्हती. उपदेशाच्या मांडणींतही आत्मस्थितीचें स्थैर्य व अनुभवाची अधिकारवाणी अजून प्रतीत होत नव्हतीं. उपदेशाचा थाट आरंभींच्या पूर्वरंगास साजेसाच होता. सारा रोंख दुराचरणावर, संतानिंदेवर, धर्मलंडतेवर होता ; व यमयातनांचें बुजगावणें सारखें पुढें केलें जात होतें. मासल्यादाखल कांहीं अभंग देतों ; त्यांवरून भाषेची व भावार्थाची कल्पना येईल.

ज्या हरिकथेंत तो आतां तन्मय होऊन आनंदानें गात-नाचत असे तेथें मुद्दाम येऊन आपल्या अशिष्ट वर्तनानें विघ्न करणाऱ्या दुष्टांवर आवेशानें तो तुटून पडला तर काय नवल ? त्याची भाषा त्यांच्या वर्तनाला साजेशीच होती :—" नावडे तरि कां येतील हे भांड । घेउनियां तोंड काळें येथें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ नासोनियां जाय रस यासंगती । खळाचे पंगती नारायणा ॥ छ ॥ तोंडावाटा नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुनें ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं संतांची मर्यादा । निंदे तो चि निंदा मायझवा ॥ ३ ॥ ".[१] " पानें जो खाईल बैसोनि कथेसि । घडेल तयासी गोहत्या ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ तमाखू ओढूनि काढला जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ॥ छ ॥ कीर्तनीं बडबड करील जो कोणी । बेडुक होउनी येइल जन्मा ॥ २ ॥ जयाचिये मनीं कथेचा कंटाळा । होती त्या चांडाळा बहु जाच ॥ ३ ॥ जाच होती पाठी उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका ह्मणे ॥ ४ ॥ ".[२] ज्या हरिनामाचा आधार त्यानें घेतला होता त्याची जे उपेक्षा किंवा अवहेलना करीत त्या घातकी लोकांवर त्यांना जागे करतील असेच आघात त्यानें आरंभीं केले आहेत. " नाम न वदे ज्याची वाचा । तो लेंक दो बापांचा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ हे चि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥ छ ॥ ज्यासी विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ॥ २ ॥ नाम न ह्मणे ज्याचें तोंड । तें चि चर्मकाचें कुंड ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचे दिवशीं । रांड गेली महारापाशीं ॥ ४ ॥ ".[३] देवधर्माचा जे उपहास करीत फिरत असत त्यांची थट्टा त्यानें शिव्याशापांनीं झाडून टाकिली आहे. "ह्मणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरि वाहाण ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ट भरो वाचे ॥ छ ॥ शाळिग्रामासि ह्मणे धोंडा । किडे पडोत त्याच्या तोंडा ॥ २ ॥ भावी सद्गुरु मनुष्य । त्याचें खंडो का आयुष्य ॥ ३ ॥ ".[४] दुर्जनांची त्यानें कधींच भीडमुर्वत ठेविली नाहीं ; त्यांच्याविषयीं किळस निर्माण करणें हें तो आपलें एक प्रधान कार्य समजत असे. आरंभीं त्यांची त्यानें मोजून पूजा केली आहे. "दुर्जनाची गंधी विष्टेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ अइका हो तुह्मी मात हे

१ अभंग ८३६. २ अभंग ३९९७.
३ अभंग २९८२. ४ अभंग ४३६६.

सज्जन । करूं संघट्टन नये बोलों ॥ ध्रु ॥ दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥ २ ॥ दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धांवे श्वान ॥ ३ ॥ दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥ ४ ॥ तुका ह्मणे किती सांगावें पृथक । अंग कुंभीपाक दुर्जनाचें ॥ ५ ॥."[१] संस्कृत सुभाषित या अभंगांत भोंवतालच्या दुर्जनांना समजेल अशा भाषेंत घोळवून त्या निर्भत्सनेनें अभिप्रेत बीभत्स रस साधला आहे. दुर्जन केवळ सत्ताधारी आहे म्हणून यादींतून न वगळतां उलट त्याची उचित शब्दांत निर्भयपणानें त्यानें संभावना केली आहे. "लोभावरी ठेवुनि हेत । करी असत्य न्याय नीत ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ त्याच्या पूर्वजां पतन । नरकीं किडे होती जाण ॥ कोटिगोहत्यापातक । त्यासी घडेल निष्टंक ॥ २ ॥ मासां श्रवे जे सुंदरा । पाजी विटाळ पितरां ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसियासी । यम गांजील सायासी ॥ ४ ॥."[२]

हरिभक्तीचें वारें अंगांत संचरल्यानंतर भावनेला व भाषेला हें जें प्रथम घुमारें आलें त्या अवसराचा फायदा घेऊन कांहीं टीकाकारांना अवसर भरल्याची भावना झालेली दिसते. महाराष्ट्र-सारस्वतकार भावे लिहितात[३] :—"रचनेंत विचारापेक्षां वृत्तीचें आणि विकारांचेंच प्राबल्य ज्यास्त किंबहुना मुख्य असल्यामुळें ज्ञानेश्वराच्या व्याख्यानावरून ज्ञानेश्वराच्या निर्विकल्प मनाची आणि साधु वृत्तीची ओळख पटते, तशी तुकोबाच्या अभंगांवरून तुकोबाच्या साधु वृत्तीची ओळख पटत नाहीं. 'नाम न वदे ज्याची वाचा'...हे असले अभंग, 'कुंकवाची उठाठेव । बोडकाबाई कशाला!', 'जळो त्यांचें तोंड', 'मोजून माराव्या पैजारा', 'त्यांच्या तोंडावरी थुंका' असल्या शिव्याशाप आणि असले कोरडे कितीहि आवश्यक किंवा उपयोगी असले, तरी शेवटीं हे जाडेभरडे च खरे. यांत आडपडदा मुळींच नाहीं, सौजन्यहि नाहीं. शिंदळीच्या भांडणांत शोभणारे हे शब्द 'वाट कृपेची करितु । दिशा चि स्नेहभरितु । जीवातळीं आथिरतु । जीव आपुला ॥' अशा भगवद्भक्ताच्या तोंडांत शोभत नाहींत. हें काय जगाला वळण! ही काय मनाची समता आणि शांति! ज्यांनीं क्रोधाला तिलांजलि दिली त्यांनीं असें बोलावें!"[४] हें केवळ भाव्यांचें एकट्याचें म्हणून नव्हे तर प्रातिनिधिक मत म्हणून याचा विचार केला पाहिजे. अशा प्रकारें पैजारा वेंचणारे तुकारामाचे अनेक वाचक सांपडतील. या असल्या त्वेषानें बोललेल्या शिवराळ उद्गारांची मोजदाद केली तर तुकारामाच्या वाङ्मयमूर्तींत गालबोटाएवढेच ते भरतील. तुकाराम हा भिंतीवर यमकें लिहून ठेवून वाड्यांतील निवांत स्थळीं अक्षरें जुळवीत बसणारा कवि नव्हता. जगाला नीति द्यावी व जे चुकत होते त्यांची फजिती करावी हें त्याचें जीवितकार्य होतें.[५] रंगणाच्या आखाड्यांत उतरून त्याला तोंडाला तोंड द्यावें लागे. स्थळकाळप्रसंगावर व समोरील व्यक्तीवर त्याच्या कीर्तनाचा रंग भरत असे. त्याचे श्रोते नुसते प्रतिष्ठित पांढरपेशेच नव्हते; शेतकरी-कामकऱ्यांचाच त्यांत मोठा भरणा असणार.

१ अभंग ११७. २ अभंग ३११४.

३ महाराष्ट्र-सारस्वत (आवृत्ति तिसरी, शके १८४६), भाग पहिला, पृ. ३३७.

४ वाहवलेली बाजू भाव्यांनीं लगेच सांवरून धरिली आहे हेंही नमूद केलें पाहिजे.

५ अभंग ८३४, ८१३.

त्यांनीं असल्या भाषेला कान खचित टवकारिले नसते. खेडवळाच्या दांडगेपणाबरोबर भाषाही दांडगी होते. नाजुक नागरास त्यांत जो ध्वनि चेतवितो तो खेडवळाच्या ध्यानींमनींही येत नाहीं. या सर्व गोष्टींचा यथार्थ विचार केला म्हणजे, तुकाराम क्रोधाच्या आहारीं जाऊन "शिंदळीच्या भांडणाची" भाषा वापरीत असे हें निदान व विधान असत्य ठरतें. माझ्या मतें ह्यांतील बरेचसे अभंग ऐन तारुण्याच्या जोमांत त्याची वाणी बाजारपेठेंत वावरत असतां, जगाबरोबर क्रोधाशींही झुंजत असतां, पहिल्या कांहीं वर्षांच्या कीर्तनप्रसंगीं उसळून वर आलेले आहेत. पुढें हा खळखळाट ऐकूं येत नाहीं. उलट वर सांगितल्याप्रमाणें कारुणिकाचा 'कां रे', 'कां बा' अशा शब्दांनीं रुजू केलेला आर्जवी अनुनयच अधिक ऐकूं येतो. भावार्थ तोच पण भाषा अगदीं सौम्य, कधीं कधीं "तुका ह्मणे तुह्मी क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ॥"[१] अशी अगदीं विनवणीची देखील कानीं पडते. असो. या अवाच्य शब्दांभोंवतीं घोंघावण्यापेक्षां ज्या अनिर्वाच्य सुखाच्या शोधानें तुकारामाची वैखरी गोडावत जाऊन अंतीं 'विश्वंभरी व्यापक' झाली,[२] त्या सुखानें हृदय हळूहळू व्यापून टाकल्यामुळें त्याचें कवित्व प्रासादिक कसें झालें हें समजून घेऊन ह्या कावित्व कीर्तनाच्या प्रकरणाचा समारोप केलेला बरा. स्वतःच्या शब्दांत हें समजून सांगण्यापेक्षां त्या काळच्या दुसऱ्या एका 'कवेश्वराच्या' शब्दांनीं तें अधिक चांगलें उमगेल. ते शब्द तुकारामाच्या काव्योदयाचें जणूं काय सूक्तच वाटतात:—"वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन । अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ जयास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी । चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ॥ जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण । सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत । तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद । भक्तीविण अनुवाद । आणीक नाहीं ॥ आवडी लागली अतरीं । तैसी च वदे वैखरी । भावें करुणाकीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ॥...ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं नलगे त्याला । स्वइछा वर्णूं लागला । ध्यान कीर्ती प्रताप ॥...त्याचे भक्तीचें कौतुक । तया नांव प्रसादिक । सहज बोलतां विवेक । प्रगट होय ॥."[३] नामदेवापायीं स्वप्नांत पांडुरंगाची भेट झाल्यानें जो प्रसाद पोटीं राहिला त्यानें ह्या 'प्रसादिक' काव्याचा मोठा विस्तार केला.

१ अभंग ४२८१. २ अभंग ६९२, ६९९.

३ दासबोध, दशक १४, समास ३, ओव्या २२–३४.

प्रकरण तेरावें

## लोहगांवचा वेढा

अशींच प्रासादिक कीर्तनें एकदां लोहगांवांत रंगांत आलीं असतां त्या गांवास परचक्राचा वेढा पडला. त्या प्रसंगीं तुकारामानें उद्वेगाच्या भरांत गाइलेले अभंग प्रख्यात आहेत. पण हा प्रसंग केव्हां व कसा घडला हें निश्चित ठरवावयाचा प्रयत्न अद्यापि झालेला नाहीं. 'भिजल्या' वहीच्या ओळीच्या आधारें या प्रसंगींच्या अभंग-संख्येच्या नव्या शोधाचा दावा सांगणारे श्री. परांजपे अगदीं अलीकडे लिहितात:—"ऐतिहासिक दृष्ट्या या लोहगांवच्या वेढ्याची तारीख-मिति ठरविली पाहिजे...हें प्रकरण आतां ऐतिहासिक दृष्ट्या नीट पाहिलें पाहिजे."[१] प्रस्तुत प्रकरणांत ह्या लोहगांवच्या वेढ्याची व त्या प्रसंगीं तुकारामानें गाइलेल्या अभंगांची जरा अधिक बारकाईनें चौकशी करून, सर्व बाजूंनीं सुसंगत असा एक निर्णय सुचवावयाचा आहे.

येरवड्याच्या पलीकडे पुण्याच्या ईशान्येस नऊ मैलांवर असलेल्या ह्या लोहगांवीं मोझे घराण्यांत तुकारामाचें आजोळ होतें, व त्याची पहिली बायको रखुमाबाई ही त्याच घराण्यांतील होती ही माहिती पूर्वीं येऊन गेली आहे. म्हणून या गांवावर तुकारामाचें विशेष प्रेम होतें. या गांवाशीं तुकारामाच्या चरित्रांतील अनेक प्रसंगांचे संबंध येण्यास तें प्रेम कारणीभूत झालें. या गांवाशीं घनिष्ट दळणवळण असल्यामुळें तेथें त्याचे सर्वांत अधिक संख्येनें टाळकरी होते. अन्यत्र कोठेंही नसलेलें तुकाराममूर्तीचें देऊळ या गांवांत आहे हें सांगितलें म्हणजे या गांवचे लोक खरोखरच तुकारामाचे मूर्तिपूजक कसे होते याची कल्पना येते. पंढरीहून आळंदीस जाणाऱ्या वारकऱ्यांस लोहगांव आज देखील तुकारामतीर्थच वाटतें, म्हणून तर वारी तेथें थांबवितात. तुकारामाच्या आयुष्यांतील लोहगांवाचें माहात्म्य महिपतीनें एका समर्पक उपमेनें वर्णिलें आहे:—"मथुरेसि कृष्ण जन्मला पाहीं । परी गोकुळींच्या सुखास पार नाहीं । तैसा तुकयाचा प्रेमा सर्वही । लोहगांवीं लुटिला ॥".[२] याप्रमाणें तुकारामाच्या प्रेमबोधावर मुग्ध झालेले लोहगांवकर त्याला कधींकधीं महिनेच्या महिने गांवीं आग्रह करून ठेवीत, व त्याच्या कीर्तनांत तल्लीन होत असत. बहुधा ही कीर्तनपर्वणी चातुर्मासांतच साधिली जात असावी.

---

१ श्री तुकोबारायांचे अभंग (१९५०), प्रस्तावना, पृ. ९८.

२ भक्तलीलामृत अध्याय ३६, ओवी १०४.

[1] दुष्काळापासून निर्याणापर्यंतच्या (इ. स. १६३०–१६५०) काळांत लोहगांवावर परचक्राचा वेढा पडल्याचा एकच प्रसंग इतिहासांत नमूद आहे. शके १५५१ (इ. स. १६२९) च्या आश्विनांत शहाजीराजांनीं त्यावेळीं निजामशाहीच्या अंमलाखालीं असलेला पुणें प्रांत जप्त केला त्याला परचक्र ह्मणतां येणार नाहीं. तदनंतर शके १५५५ च्या आश्विनापासून १५५६ च्या ज्येष्ठ पर्यंतच्या नऊ महिन्यांत निजामशाहीचा जो विस्तृत मुलुख शहाजीनें आपल्या ताब्यांत घेतला त्यांत पुणें प्रांताचा अंतर्भाव झाला होता. किल्ले व लष्करी ठाणीं मराठे व ब्राह्मण अंमलदार नेमून फौजबंद करून, तसेंच निजामशाही कारकून व मुत्सद्दी ब्राह्मण मंडळीच्या करवीं रयतेची आबादी करवून फौजेच्या व सरकारच्या खर्चाचे बंधनिर्बंध शहाजीनें घालून दिले. अशा प्रकारें शके १५५५ च्या श्रावणापासून शके १५५७ च्या माघापर्यंत सुमारें ३२ महिने शहाजीनें निजामशाहीचा कारभार केला. तेव्हां आपल्या दक्षिणेंतील महत्वाकांक्षेच्या मार्गांतील सदा सलणारा हा शहाजीचा कांटा कायमचा काढून टाकावा या इराद्यानें शके १५५७ च्या माघ अखेर जंगी सामान व सैन्य घेऊन स्वतः शहाजहान बादशाह दौलताबादेस आला. त्याच्याबरोबर अठ्ठावन हजार सैन्य असून, त्याच्या जोरावर आदिलशहा व कुतुबशहा यांना तो मार देणार होता व शहाजीचा फन्ना उडविणार होता. तेव्हांपासून इ. स. १६३४–६ च्या दरम्यान पुणें जिल्ह्याच्या जुन्नर किंवा उत्तर भागावर मोंगलांचें परचक्र सारखें फिरूं लागलें. शहाजहानाच्या या प्रचंड मोहिमेच्या पूर्वरंगाशीं आपणांस प्रस्तुत वृत्तांतांत विशेष कर्तव्य नाहीं. शहाजीविरुद्ध मोहीम पावसापूर्वीं खलास करितां आली नाहीं म्हणून शके १५५८ च्या आषाढांत (१६३६ च्या जुलै महिन्यांत) शहाजहान स्वतः आग्र्यास निघून गेला. मागें दक्षिणेंत खानजमान होताच. जुन्नर व कोंकण प्रांतांत त्याच्या सैन्याला यश मिळत होतें. तशांत आदिलशाहीशीं केलेल्या ताज्या तहानुसार विजापुरच्या रणदुल्लाखानाचें सैन्यही त्याला साहाय्य करीत होतें. हुकमाप्रमाणें खानजमान शके १५५८ च्या ज्येष्ठांत, म्हणजे इ. स. १६३६ च्या जून महिन्याच्या अखेरीस नगराहून निघाला, व तेथें किल्ल्याला वेढा घालण्यास दोन हजार माणसें ठेऊन, शहाजीस पुण्यानजीक धरींच पकडण्याच्या उद्देशानें त्यानें स्वतः पुण्याचा रस्ता धरला. "मध्यें घोड, भीमा, भामा, इंद्रायणी इत्यादि पावसाळ्यांत पाण्यानें फुगणाऱ्या नद्या आहेत. पैकीं घोडनदीस अतिवृष्टीमुळें पूर आल्यामुळें खानजमानाला तेथेंच महिनाभर चिखलांत मुक्काम करावा लागला. नंतर शेवटीं खानजमानाचें सैन्य (इंद्रायणी नदीपासून दक्षिणेस तीन मैलांवर व पुण्याचे ईशान्येस दहा मैलांवर असलेल्या[2]) लोहगांवीं श्रावण महिन्यांत येऊन थडकलें. तेथें आल्यावर त्याला समजलें कीं शहाजी सिंहगडाखालीं सुखानें मुक्काम करून आहे, व त्याच्या व आपल्यामध्यें अनेक नद्या

---

१ या परिच्छेदांतील अवतरण व माहिती "राधामाधवविलासचंपू" या ग्रंथाला वि. का. राजवाडे यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंतून घेतली आहे (पृ. ६७–७९ विशेषतः पृ. ७२). याच प्रकारची माहिती Aurangzeb, Jadunath Sarkar, Vol. I, p. 47 या पुस्तकांत दिली आहे. 'शहाजहानाच्या चढाईस शहाजीचें उत्तर', द. वि. आपटे. शिवचरित्र निबंधावली, शके १८५१ पृ. ९७ पहा.

२ Aurangzeb, Jadunath Sarkar, Vol. I, p. 47 (foot-note).

व नाले श्रावणझडीनें तुडुंब भरून गेले आहेत. अशा स्थितींत काय करावें हें त्याला सुचे ना." या परिस्थितींत शके १५५८ च्या श्रावण महिन्यांत म्हणजे १६३६ च्या जुलै-आगस्टांत मोंगलांच्या परचक्राचा, गाथेंत वर्णिल्याप्रमाणें, "लोहगांवास परचक्रवेढा पडला." तुकारामाचें त्या काळीं चातुर्मासांत लोहगांवीं वास्तव्य असलें पाहिजे, व त्याचीं कीर्तनें तेथें चालू असलीं पाहिजेत.

यानंतर, निर्याणापर्यंत लोहगांवावर परचक्राचा वेढा पडल्याचा उल्लेख सांपडत नाहीं; व तत्कालीन इतिहासाचीं स्थित्यंतरें पाहिलीं म्हणजे तसा उल्लेख सांपडणें शक्यही नाहीं. इ. स. १६३६ च्या आक्टोबर महिन्यांत महाराष्ट्र कायमचा सोडून शहाजी विजापूर दरबारीं गेला व पुणें परगणा वगैरे मुलखाची जहागीर व अंतीं मोकासी देखील इ. स. १६३७ सालापासून दादाजी कोंडदेवाच्या देखरेखीखालीं आली. इ. स. १६४७ त दादाजी निधन पावला. तोंपावेतों पुणें प्रांतावर व लोहगांवाच्या आसपास परचक्र फिरलें नाहीं. इ. स. १६४७ ते १६५० च्या दरम्यान पुणें प्रांतांत विजापुरचें सैन्य शिवाजीचें पारिपत्य करण्यासाठीं एकदांच आलें; पण त्याला दुरूनच मागें हटविण्यांत आल्यामुळें लोहगांवास वेढा घालण्याची त्याला संधिच मिळाली नाहीं. हा प्रकार इ. स. १६४९ सालीं घडला.[१] त्यासमयीं शहाजी कर्नाटकांत कैदेंत असतां विजापुर दरबारानें कोंडाणा किल्ला काबीज करण्यासाठीं फतेखान नांवाचा सरदार रवाना केला. त्यानें खळद-बेलसर हस्तगत केलें; त्याचा साथी बाळाजी हैबतराव यानें शिरवळास तळ दिला. परंतु शिवाजीचा सेनापति कावजी यानें बाळाजीस ठार मारून विजापुराच्या सैन्यास शिरवळांतून हुसकून लाविलें. शिवाजी तेव्हां पुरंदरास होता. फतेखानानें पुरंदरावर चढाई केली, परंतु त्याचा पराभव होऊन त्याच्या सैन्याला पळून जावें लागलें. या स्वारींत लोहगांवाचा कोठेंच संबंध येत नाहीं. शिरवळ व पुरंदर हीं दोनही स्थळें लोहगांवापासून दूर आहेत. तेव्हां इ. स. १६३६ नंतर निर्याणापर्यंत लोहगांवास परत परचक्राचा वेढा पडला नाहीं हें निर्विवाद होय.

इतिहासाशीं मेळ घातल्यावर असें दिसतें कीं लोहगांवच्या वेढ्याच्या प्रसंगाशीं शिवाजीचा संबंधच पोचूं शकत नाहीं. त्यासमयीं शिवाजीचें वय सहा, किंवा इ. स. १६२७ जन्मसाल मानल्यास नऊ, वर्षांचें होतें. सर्व गाथांत लोहगांवच्या वेढ्याच्या प्रसंगा रचिलेले म्हणून जे अभंग दिले आहेत तेच उद्धृत करून महिपतीनें त्या प्रसंगास मात्र निराळेंच अद्भुत स्वरूप दिलें आहे. आधीं लिहिलेल्या भक्तविजय ग्रंथांत निवेदन केलें आहे तें असें:[२]—तुकाराम पुण्यास एका वाण्याचे घरीं कीर्तन करीत असतां त्यावेळा शिवाजी सिंहगडावर राहात होता. तेव्हां अविंधांचें प्राबल्य थोर होतें. कोणाला नकळत लपून रात्रीं शिवाजी कीर्तन ऐकावयास आला. मोहोरांनीं भरलेलें रुप्याचें तबक त्यानें समोर ठेविलें

१ Shivaji, Sarkar, 4th Edition, pp. 37-8.

२ भक्तविजय, अध्याय ४८, ओव्या ९५-१६९.

असतां तुकारामानें त्याचा अव्हेर केला. "ते दिवसीं असे हरिदिनी । कीर्तन ऐके प्रेमें करूनी । तों दोन सहस्र पठाण चाकणाहूनी । अविंधें त्वरित पाठविले ॥ हेर ठेविले होते पाळतीं । त्याणीं सांगितलें यवनाप्रती । कीं पुणियासि आला नृपती । दर्शनासि रातीं तुकयाचे ॥ मग स्वार पाठविले त्या दुर्जनीं । कीं त्यासि आणावें शीघ्र धरूनी । नानापरीचीं शस्त्रें घेऊनी । आले धांवूनि अर्धरात्रीं ॥ जेथें मांडिली होती कथा । तो वाडा वेढिला सभोंवता ॥". कीर्तनांत कुजबुज सुरू झाली. तुकारामाच्या कानापर्यंत गोष्ट गेली ; व 'सज्ञान' जनांनीं सुचविलें कीं राजाला सत्वर पळवून त्याचे प्राण वांचवावेत. "तयांसि तुका बोले काय । कीर्त्तनांतूनि सर्वथा उठों नये । धर्मनीति ऐसी आहे । जाणतां न काय सकळिक ॥ ऐसें ऐकोनि नृपती । निश्चय करून बैसला एकचित्तीं । ह्मणे तारिता मारिता रुक्मिणीपती । त्याविण त्रिजगतीं असेना ॥ आज एकादशी पर्वकाळ सुदिन । सन्निध संत वैष्णवजन । येथें कीर्त्तनांत आलें जरी मरण । तरी भाग्य धन्य पैं माझें ॥". पठाणांस शिवाजीची ओळख नसल्यामुळें पकडावा कोणास अशी पंचाईत पडली. त्यांनीं सेनापतीस ही आपली अडचण कळवली, तेव्हां त्यानें सरळ हुकूम दिला कीं कीर्तनांस बसलेल्या सर्वांची सरोस कत्तल करा, म्हणचे त्यांत सहजच शिवाजी सांपडेल. तुकारामानें हें सर्व अंतर्यामीं जाणलें व 'मी भीत नाहीं आपुल्या मरणा' इत्यादि अभंगांनीं देवाचा धांवा केला. शेवटीं देवानें शिवाजीचें रूप घेऊन घोड्यावर स्वार होऊन, पठाणांस हुलकावण्या दाखवीत रानांत नेऊन घातलें ; व इकडे कीर्तन निर्विघ्न पार पडून राजा घरीं परत जात असतां हा आश्चर्यकारक वृत्तांत त्यास समजला. मागाहून रचिलेल्या भक्तलीलामृतांत [१] हीच कथा निराळ्या संदर्भांत गोविली आहे. मोहोरांचें तबक दिल्याचा प्रसंग आधीं लोहगांवास झाला त्याचें पूर्वीं एका अध्यायांत [२] वर्णन करून, मागाहून श्रीपाद संन्याश्याच्या तक्रारीवरून दादाजी कोंडदेवानें तुकारामातर्फे न्याय दिल्याचें सांगितलें आहे.[३] ह्या न्यायाचें "जाहलें आद्यंत वर्तमान । शिवाजीस लिहिलें अधिकारियानें । मग पुणीयासी येऊनि नृपनंदनें । घेतलें दर्शन तुकयाचें ॥". त्यावेळीं एकादशीच्या कीर्तनसमयीं वरील प्रसंग घडला ; व सिंहगडावर परत जातांना प्रसाद मागतां तुकारामानें त्यास ओंजळभर लीद दिली अशी भक्तलीलामृतांतील कथा आहे.

महिपतीनें या प्रकारें गाथेंतील अभंग लोहगांवच्या वेढ्याशीं न जोडतां पुण्यांतील एका कीर्तनाशीं जोडले आहेत. व त्यांतही सोन्याच्या मोहोरांचें तबक मधूनच पुढें केलें आहे. दोन वृत्तांतांत कालगणनेची संगति राखिली नाहीं. शिवाय अद्भुताचा भाग निराळाच. याचेंच अद्भुततर वृत्त असें रूढ केलें गेलें कीं पठाणास सर्वत्र शिवाजीच दिसू लागला व ते गोंधळून गेले.[४] या चमत्काराला अनुलक्षून गॅझेटिअरमध्यें व

---

१ भक्तलीलामृत अध्याय ३९, ओंव्या ८–३५.
२ कित्ता अध्याय ३६.
३ कित्ता अध्याय ३८.
४ तुकाराम बोलपटानें हें वृत्त लोकप्रिय केलें आहे.

ग्रांट डफसाहेबांनीं हा प्रसंग इ. स. १६६३ सालीं घडला असावा अशी नोंद केली;[१] व इतिहासकार वि. का. राजवाडे यांनीं लिहिलें कीं "पुण्यास झालेल्या तुकारामाच्या कथेच्या वेळीं चाकणहून दोन हजार पठाणांच्या स्वारीचा काल अदमासानें बसवितां येण्यासारखा आहे. फिरंगोजी नरसाळ्यानें चाकणचें ठाणें शिवाजीच्या स्वाधीन करण्याच्या पूर्वीं ही गोष्ट झाली असावी".[२] फिरंगोजी नरसाळ्यानें चाकणचें ठाणें शिवाजीच्या स्वाधीन इ. स. १६४८ त केलें असा समज आहे.[३] महिपतीच्या ह्मणण्याप्रमाणें दादाजी कोंडदेवाच्या हयातींत हा कीर्तनाचा प्रसंग घडला; म्हणजे १६४६ च्या सुमारास शिवाजीची हालचाल प्रथम सुरू झाली तेव्हां हा प्रसंग घडला असें अनुमान करावें लागतें. तुकारामाच्या कीर्तनांत शिवाजीस पकडण्याचा घाट चाकणच्या मुसलमानांनीं घातला असेल व तो फसलाही असेल. पण त्याचा महिपतीनें लोहगांवच्या वेढ्यांतील अभंगांशीं संबंध जोडला याचें कारण हेंच कीं लोहगांवास वेढा कधीं व कोणत्या परिस्थितींत पडला याची त्यास माहिती नसावी. असल्या प्रसंगाचें वर्णन करितांना चमत्कारास जसा पांडुरंग तसा इतिहासास शिवाजीच डोळ्यांपुढें उभा राहाणें स्वाभाविक होतें. महिपतीला अभंगांची जशी बिनचूक माहिती होती तशी या धुमश्चक्रीच्या काळांतील झपाट्यानें बदलत गेलेल्या ऐतिहासिक घडामोडींची माहिती नसावी यांत नवल नाहीं. म्हणून लोहगांवावरील परचक्राच्या वेढ्याचा प्रसंग निश्चित करतानां महिपतीस प्रमाण मानून चालणार नाहीं. इतिहासाच्या आधारें असें ठरतें कीं तो प्रसंग इ. स. १६३६ च्या जुलै-आगस्टच्या सुमारास खानजमानानें केलेल्या शहाजीच्या पाठलागांत घडला.

कीर्तनांतील कवित्वास इ. स. १६३३–४ च्या सुमारास प्रारंभ झाला होता असें जें मागें कल्पिलें आहे त्याच्याशीं कालक्रमानें हा प्रसंग जुळतो. तुकारामाच्या काव्याची ख्याति इ. स. १६४० पूर्वीं दूरवर पसरत चालली होती याचेंही हें एक गमक आहे. गाथेंत या प्रसंगीं तुकारामानें रचिलेले तीन अभंग दिले आहेत. भक्तलीलामृतांत ठिकठिकाणीं अभंगांची संख्या महिपतीनें काळजीपूर्वक दिली आहे. हें विस्तृत चरित्र लिहिण्यासाठीं त्यानें लेखी माहिती मोठ्या साक्षेपानें गोळा केलेली दिसते. "ऐसें अरिष्ट जाणोनि तेव्हां। मग विठोबाचा करीतसे धावा। चार अभंग वदले तेव्हां। अर्थ पहावा सज्जनीं॥"[४] अशी महिपतीची नोंद आहे. याचा अर्थ असा कीं महिपतीपुढें

---

१ "About the time Shivaji went to Poona to hear a Katha or song sermon by the Vani Saint Tukaram and narrowly escaped being made prisoner by the garrison of Chakan." याचा काल १६६३–६५ दिला आहे तो निखालस चूक आहे; कारण तुकारामाचें १६५० तच निर्याण झालें. Gazetteer of the Bombay Presidency, Vol. XVIII, Part II, Poona, p. 231. History of the Mahrattas, J. Grant Duff, London (1826) p. 89.

२ ऐतिहासिक प्रस्तावना, चित्रशाळा प्रेस (१९२८), पृ. २७५.

३ Shivaji, Sarkar, 4th Edition, p. 34.

४ अध्याय ३९, ओवी १६.

चार अभंगांचा एक गट होता. साहजिकच प्रश्न उद्भवतो कीं चौथा अभंग कोणता? श्री. परांजपे यांनी छापलेल्या (सध्या हरि वैकुंठे याजपाशीं असलेल्या) वहींत चार अभंगांचा गट दिला आहे. गाथेंत हा चौथा अभंग आहे, पण तो अन्यत्र दुसऱ्या एका गटांत दिला आहे. तो तसा कां दिला आहे व या गटांत परांजपे मानतात त्याप्रमाणें आणखी कांहीं अभंग आहेत कीं काय याची चर्चा करण्यापूर्वीं तुकारामाची मनोवृत्ति उमलून दाखविणारे हे चार अभंग[1] आधीं वाचूं.

(१) "न देखवे डोळां ऐसा हा आकांत। परपीडे चित्त दुःखी होतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुह्मी येथें नसालसें जालें। आह्मीं न देखिलें पाहिजे हें ॥ छ ॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें। न देखिजेत देशें राहातिया ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी लाजविली सेवा। हीनपणें देवा जिणें जालें ॥ ३ ॥"

(२) "काय म्यां मानावें हरिकथेचें फळ। तरिजे सकळ जनीं ऐसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उच्छेद तो असे हा गे आरंभला। रोकडें विठ्ठला परचक्र ॥ छ ॥
पापाविण नाहीं पाप येत पुढें। साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥ २ ॥
तुका ह्मणे जेथें वसतील दास। तेथें तुझा वास कैसा आतां ॥ ३ ॥"

(३) "भीत नाहीं आतां आपुल्या मरणा। दुःखी होतां जना न देखवे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आमची तो जाती ऐसी परंपरा। कां तुह्मी दातारा नेणां ऐसें ॥ छ ॥
भजनीं विक्षेप तें चि पैं मरण। न वजावा क्षण एक वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं आघाताचा वारा। ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥ ३ ॥"

(४) "बोलिलों तें आतां पाळावें वचन। ऐसें पुण्य कोण माझे गांठी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी। काळक्षेप आह्मी करूं कोठें ॥ छ ॥
न घडे यावरि न धरवे धीर। पीडतां राष्ट्र देखोनि जग ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी दिसे मोकलिलें। काय आतां आलें जीवित्वाचें ॥ ३ ॥"[2]

अभंगांची चाल, त्यांतील पंक्तींची संख्या, व मुख्यत्वें भावार्थाचा ओघ पाहतां हे चारही अभंग म्हणजे एकाच स्थायी भावनेचा धांवता प्रवाह आहे हें उघड दिसतें. आगीच्या कमी-जास्त आंचेप्रमाणें दुधास येणाऱ्या उमाळ्याचें स्वरूप बदलतें. तसाच कांहींसा अनुभव भावनेच्या मनस्तापानें होतो. ज्या ठेक्यांत शब्द लय पावतात त्याच ठेक्याला भावना अखेरपर्यंत धरून बसते. एकदां सूर धरलेला असला म्हणजे भावनेच्या त्या बैठकींत तो बदलत नसतो. कवींचा असा नित्याचा अनुभव आहे. तुकारामाच्या अभंगांत याचीं अनेक उदाहरणें मिळतात. हे चारही अभग एकाच प्रसंगीं रचिलेले आहेत, ते एकाच माळेचे मणि आहेत, हें त्यांच्या वर्णाकारांच्या सादृश्यावरून व एकाच भावनेच्या सूत्रांत ते ओविले आहेत यावरून सहज दिसून येतें. तिसऱ्या अभंगाच्या शेवटीं आघाताचा वारा नाहीं अशा स्थळीं तुकारामानें ठाव मागितला. त्याच मागणीच्या अनुरोधानें चौथ्या अभंगाचे पहिले दोन चरण स्फुरले. आपण मागणी बोलून दाखविली खरी, पण तुम्ही ती पुरी कराल अशी

---

१ अभंग ५५७–९; व अभंग १६०४.    २ अभंग १६०४.

खात्री बाळगण्याइतकी पुण्याई माझ्या गांठीं कोठें आहे?—अशी शंका त्यानें देवाला लागलीच बोलून दाखविली; व उद्वेगाच्या भरांत असेंही म्हटलें कीं "जर देवा! तुम्ही माझी मागणी पुरी करीत नाहीं तर मी आतां येथून निघून जातों; राष्ट्र, जग, पीडिलेलें बघून माझ्यानें धीर धरवत नाहीं; तेव्हां तुमची आज्ञा घेऊन, तुम्ही मला सोडलेंत असें समजून, कोठेंतरी आतां यापुढें काळ कंठीन". हा अखेरचा रुसवा स्वतःकडेच सगळा दोष घेण्याच्या वृत्तीला—जी नंबर दोनच्या अभंगांतही दिसून येते—शोभून दिसतो. सर्व छापील गाथांत हा चौथा अभंग "स्वामींनीं काया ब्रह्म केली" किंवा "स्वामी वैकुंठास गेले" त्यावेळच्या अभंगांतील गटांत दिला आहे. तो तसा कां दिला आहे हें समजणें सोपें आहे. "जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी। काळक्षेप आह्मी करूं कोठें।" या पंक्तीनें त्याला निर्याणाच्या गटांत नेऊन बसविलें. इतकेंच नव्हे, तर त्या गटांतून त्याला कोणी उठवूं नये, तो त्यांत बेमालूम मिसळून जावा, याकरितां त्याचे शेवटचे चरण निराळ्याच भाषेनें नटविले गेले. सर्वसंग्रह,[१] गणपत कृष्णाजी,[२] व पंडित—या तीनही गाथांत "तुका ह्मणे तुह्मी दिसे मोकलिलें। काय आतां आलें जीवित्वाचें॥" असे शेवटचे चरण आहेत. सांप्रदायिक ओळीच्या गाथेंतही ते तसेच दिले आहेत.[३] या चरणांत कोठेंही पाठभेद असल्याचें संपादकांनीं नमूद केलेलें नाहीं. असें असतां आर्यभूषण[४] व जोग[५] यांच्या गाथेंत "हातीं धरोनियां देवें नेला तुका। जेथें नाहीं लोकां पराश्रम॥" असा निर्याणाच्या प्रसंगाला अनुकूल दिसणारा आमूलाग्र कायापालट करून टाकिला आहे! तें कसेंही असो, हा चौथा अभंग लोहगांवास परचक्राचा वेढा पडला त्या समयींच्या गटांतला आहे हा निष्कर्ष अधिक सयुक्तिक आहे.

हा चौथा अभंग या गटांतील आहे या मान्यतेला एका तरी हस्तलिखिताचा आधार आहे हें शोधून दाखविल्याबद्दल तुकारामाच्या अभ्यासकांनीं श्री. परांजपे यांचे आभार मानिले पाहिजेत. परंतु, दुर्दैवानें त्यांनीं या अभंगांची ओळ मागें व पुढें इतकी ओढीत नेली कीं भावार्थ अवास्तव ताणून तुटणार नाहीं अशा स्थळीं थांबलें पाहिजे याची त्यांनीं विशेषशी चिंता केली नाहीं. आपणांस मिळालेल्या पोथींतील ओळ सारखी सांभाळीत गेलें पाहिजे हा आग्रहच मुळीं अवास्तव आहे. आपण उजेडांत आणिलेल्या पोथीच्या अस्सलपणाविषयींचा पूर्वग्रह, व तुकारामाचे सर्व अभंग सारखे सुसूत्र ओवलेले आहेत हा चुकीचा ग्रह, मिळून हा 'ओळीचा' आग्रह सिद्ध झाला आहे. या ग्रहदोषांचे परिणाम प्रस्तुत अभंगांचा संबंध जुळविण्यांत चांगलेच दिसतात. 'लोहगांवचा वेढा' या आपल्या प्रास्ताविक प्रकरणांत[६] परांजप्यांनीं हे अभंग ९६४–७९ पर्यंत आहेत असें स्पष्ट सांगितलें आहे. पुढें ९६३ अभंगाच्या शेवटीं कंसांत मुद्दाम असा शेरा दिला आहे कीं "येथें ओघ बदलला. खालील अभंग लोहगांवच्या वेढ्याचे आहेत". म्हणजे परांजप्याच्या मतें "लागो दीव्हें आंगा" या ९६४ व्या अभंगापासून ओळ सुरू होते.

१ अभंग १६८३. २ अभंग १९८७. ३ अभंग १९४४.
४ आर्यभूषण (आवृत्ति ५) अभंग ३६२५. ५ भाग २, अभंग ३६१४. ६ पृ. ९६.

असें असतां जें प्रास्ताविक विवेचन केलें आहे त्यांत "कळो आलें" या ९६२ व्या अभंगापासून ओळ कल्पिली आहे. ९६२–९६३ या अभंगांच्या प्रत्यक्ष निरूपणांत त्यांचा लोहगांवच्या वेढ्याशीं संबंधच आणिला नाहीं. प्रास्ताविक विवेचनांत ९६४–७९ पर्यंत ओळ कल्पून प्रत्यक्ष निरूपणांत ती ९८१ पर्यंत नेली आहे. या एकाच दाखल्यानें केवळ कल्पनेनें ओळ लावतांना कसा गोंधळ होतो हें आयतेंच शाबीत झालें आहे. परांजप्याच्या या (९६२–९७९) ओळीचे प्रस्तुत (पंडितांच्या) गाथेंत २६९५–२६९७, ९५७–९५९, २१७८, २७१७–२७२४, २६०८ पासून पुढें २६१२ (परांजपे-प्रत ९८९) असे खंड सांपडतात. हे सगळे खंड सख्या हरीच्या वहींत रांगेनें आले आहेत म्हणून ते एकाच रांगेंत बसवितां येत नाहींत. एकसूत्रांत बसवितांना विचारवान् पाणिनि सुद्धां फसतो हें आपण जाणतों. हे सर्व अभंग क्रमानें वाचले असतां महिपतीनें सांगितल्याप्रमाणें वर उद्धृत केलेले केवळ चारच अभंग एकजीव आहेत असें म्हणावें लागतें. "कराल तें करा। हातें आपुल्या दातारा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ बळियाचीं आह्मी बाळें। असों निर्भर या सळे ॥ ध्रु ॥ आतां कोठें काळ। करील देवापाशीं बळ ॥ २ ॥ तुका ह्मणे पंढरीराया। थापटितों ठोक बाह्या ॥" या २६०८ क्रमांकापासून सुरू होणाऱ्या गटांतील पहिल्या अभंगांत परांजप्यांना काय खूण गवसली कोण जाणे! लोहगांवच्या वेढ्यांतील अभंगांत हा व पुढचे दोनच अभंग गोवून परांजपे म्हणतात:— "मी दंड थोपटतों. पंढरीराया तूं हि दंड थोपट" अशी पंढरीराजास विनंती केली आहे. अशी विनंती आपल्या इष्टदेवतेस भक्तानें केल्याचें दुसरें कोठें उदाहरण आहे का? अशा रीतीनें समोर असलेल्या मूर्तीस आव्हान करतांच त्या विठुरायानें कांहींतरी खूण काय दाखविली असावी! पण महिपतीबोवांनीं ती खूण काय होती हें कांहीं नमूद केलें नाहीं. दुसऱ्या कोणी तशी नोंद केल्याचें आपणांस माहीत नाहीं. परंतु कांहीं तरी खूण पटाविली असावी हें निश्चित. कारण यापुढील दोन अभंग ती गोष्ट स्पष्ट करीत आहेत...हें पंढरीरायास केलेलें आव्हान—या संदर्भानें डोळ्यापुढें आलें—कीं याचा अर्थ काय करावा असा विचार करावयास लावील असा प्रश्न पुढें उभा राहतो...९७९–८० या अभंगांत जी खूण पटत आहे, ती अश्रुतपूर्व आहे...माझी अशी समजूत आहे कीं, थापटीतो ठोक बाह्या—म्हणून जें म्हटलें आहे, त्या सुमारास या परचक्राची बातमी कळून शिवाजी राजांनीं सैन्य पाठवून वेढा उठविला असेल. हें प्रकरण आतां ऐतिहासिक दृष्ट्या नीट पाहिलें पाहिजे."[१] खूण अश्रुतपूर्व आहे खरी! 'भिजल्या' वहीच्या या खुणा इतरांच्या कोरड्या मनास कळत नाहींत हें त्यांचें दुर्दैव होय. वास्तविक "थापटितों ठोक बाह्या" हें देवाच्या बळानें काळास दिलेलें आव्हान आहे असें त्या संदर्भांत लख्ख दिसतें. हा अभंग निराळ्याच गटांतील असून त्याचा अर्थ परंपरागत जो केला गेला आहे तोच बरोबर आहे.

असो. आतां या विषयांतराकडून चरित्राच्या मूळ ओळीकडे, कथासूत्रें गोळा करीत वळतांना, आपणांस असें दिसतें कीं कीर्तनकार ह्मणून तुकारामाचें काव्य-कार्य वाढत चाललें होतें. लोकांच्या अंतरंगांत प्रसंगविशेषानें वावरत असलेल्या भावना त्याच्या

१ पृ. ९७–८

कीर्तनांत तरंगतांना दिसत. तो बहुजनांशीं असा समरस होत असे व त्यांच्या हृदयांतील देवाला वाचा देत असे म्हणून तो लोकांना "जीवाचिये परी" आवडत असे. प्रचलित हालचालींवर त्याचें लक्ष असे. ज्या चतुर साबाजीचा मूर्ख मूर्तिजानें अलीकडेच खून केला होता[१] त्याचा मार्मिक उल्लेख त्याच्या कवनांत सांपडतो.[२] शहाजीनें जिजाबाईचा त्याग केला व शिवाजी पुंडाई करूं लागला याचीही नोंद त्यानें अभंगांत करून ठेविली आहे.[३] "प्रीति नाहीं राया वार्जेली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी ॥ १ ॥ ध्रु. ॥ तैसे दंभी जालों तरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहाती ॥ छ ॥ राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल ॥ २ ॥ बाहातरी खोडी परी देवमण कंठीं । तैसा जगजेठी ह्मणे तुका ॥ ३ ॥". या असल्या प्रासंगिक उद्गारांनीं ऐकणाऱ्यास रस वाटून नकळत तत्त्वज्ञान गळीं उतरे. इ. स. १६३३-३७ या तीन-चार वर्षांत सैन्य घेऊन शहाजी राजे या भागांत वारंवार फिरले असले पाहिजेत. ते नेहमींच सैन्य बरोबर ठेवीत; व सैन्यही त्यांना प्यार करीत असे. बखरकार लिहितो, "फौजेंतील शिपायाला व अंमलदारांना असें वाटे कीं नोकरी करावी तर ती राजा शहाजीची करावी. शहाजी केवळ आपला मायबाप आहे".[४] मोठ्या मोठ्या बलाढ्य सरदार-सेनापतींशीं प्रसंग पडेल त्याप्रमाणें मैत्री करण्यांत शहाजी चतुर होता; पण ऐन प्रसंगीं हे मित्र कामाला येत नाहींत असाही त्याला अनुभव येत असे. ही पार्श्वभूमि डोळ्यांसमोर ठेविली ह्मणजे असें सुचवावेंसें वाटतें कीं खालील अभंग[५] शहाजी लोहगांवच्या वेढ्यापूर्वी कीर्तनांत समोर बसला असतांना त्याला उद्देशून ह्मटला असला पाहिजे; दुसऱ्या कोणास उद्देशून ह्मटला असेल असें वाटत नाहीं :—"मैत्र केले महा बळी । कामा न येती अंतकाळीं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ छ ॥ नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥ २ ॥ धन मेळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥ ३ ॥ कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥ ४ ॥ तंववरि मिरविसी बळ । जंव आला नाहीं काळ ॥ ५ ॥ तुका ह्मणे बापा । चुकवीं चौऱ्यायशींच्या खेपा ॥ ६ ॥".

---

१ राधामाधवविलासचंपू, राजवाडे, प्रस्तावना, पृ. ६१.

२ अभंग ३९५-३ चतुर साबाजी, भा. इ. सं. मं. षाण्मासिक वृत्त शके १८३४, पृ. २११-२.

३ अभंग २३९४. ४ राधामाधवविलासचंपू, प्रस्तावना पृ. १०५. ५ अभंग ८६.

प्रकरण चौदावें

# मनोमंथन

साधना अखंड चालूच होती. कवित्वाचा प्रसादही पोटीं होता. तरीपण तुकारामाच्या जीवाला समाधान लाभलें नव्हतें. कवीचें मन हेंच खरें काव्य; आणि संतकवीचें मन साधनेनेंच घडविलें जातें. कवित्व ह्मणजे त्या मनाचे सु-समाधि साधण्याचे प्रयत्न. संदेहाच्या हेलकाव्यांत, निराशेच्या तळमळींत, निषेधाच्या आघातांत सांपडला असतां तुकारामाची जी मनःस्थिति झाली त्यांतूनच त्याच्या काव्याचा लय साधिला गेला. संसार हें गद्याचें माहेरघर होय. इतर मानवांप्रमाणें संतकवीलाही त्याच घरांत जन्म घ्यावा लागतो. विश्वंभरांत विलीन होण्यासाठीं त्या घराच्या भिंती ओलांडून मुक्त होण्याची आधीं धडपड करावी लागते. त्या मानसिक धडपडीची, मनोमंथनाची, तुकारामाच्या गुरूपदेशा-पूर्वींच्या काव्यानें कशी कल्पना येते तें या प्रकरणांत पाहावयाचें आहे.

कर्जखतें बुडविलीं तरी गुरूपदेशापूर्वीं तुकारामानें संसारधंदा समूळ सोडला नव्हता. त्याचा धाकटा भाऊ कान्होबा यानें निराळा संसार थाटला हें महिपतीचें म्हणणें तितकेंसें बरोबर दिसत नाहीं. आपल्या वांट्याचे कर्जरोखे कान्होबानें विभागून घेतले असतील; पण तो अखेरपर्यंत विभक्त झाला नव्हता असें तुकारामाच्या निर्याणप्रसंगीं त्यानें केलेल्या विलापावरून दिसतें. "मायबाप निमाल्यावरी। घातलें भावाचे आभारीं ॥"[१]; (तेव्हांपासून) "एका जिवावरी। होतीं दोनी कुटुंबारी ॥"[१] असें त्या विलापांत कान्होबानें स्पष्ट म्हटलें आहे. तो पुढें तुकारामाचा एक मुख्य टाळकरी झाला, व कवित्वही चांगल्या प्रकारचें करूं लागला, यावरून असें दिसतें कीं तुकारामाच्या निकट सहवासांत त्यालाही सुगंध लागला व त्याची वृत्ति पालटत गेली. निसुर संसार करून, पोट भरून, संदीं देवदेव करून,[२] हे दोघे भाऊ पुढें राहूं लागले.

पण आरंभीं हा संसार सुखासमाधानानें चालणेंच शक्य नव्हतें. गोविंदाचा ज्याच्या मनाला छंद लागत जातो त्याचा संसार गुण्यागोविंदानें कसा चालेल? श्रीमंतीच्या जुन्या आवडी अश्रूंनीं पुसून टाकल्या म्हणजेच दारिद्र्याची संवय होते. श्रीमंतींत वाढलेली आवडी निमूटपणें डोळे पुशीत गरिबींतील संसाराच्या ओढगस्ता काढील हें संभवत नव्हतें. ती फुंदून रडत असतां तिला जे 'असडे' येत असत त्यांची व्यथा पुढील पिढ्यांना कळावी अशी व्यवस्था, तिच्या कठिण उत्तरांचा लेखक होऊन, तुकारामानें स्वतःच करून ठेविली आहे.[३] 'पूर्णबोध' या प्रकरणांत तिच्या तक्रारींचा संपूर्ण विचार आपणांस

---

१ अभंग ३००७. २ अभंग ३००३, ३००९.

३ स्वामींचे स्त्रिनें स्वामींस कठिण उत्तरें केलीं ते ५६६–५७२ हे सात अभंग पहा.

करावयाचा आहेच. तुकारामाच्या मनोमंथनांतील खळबळीला तिच्या कर्कश व अवखळ वाचेचा जाच बऱ्याच अंशीं कारणीभूत होत होता. कान्होबाही त्या जाचांत आपला सूर मिळवीत असे. त्यामुळें "कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं"[१] असा त्याला मागाहून पश्चात्ताप झाला. या सुमारास गरिबीच्या सर्व पातकांचें मूळ जो पोरवडा तोही वाढूं लागला होता. दुष्काळापासून गुरूपदेशापर्यंतच्या दहा वर्षीच्या मुदतींत आवडीस दोन तीन मुलें झालीं असावींत. "घरांत समृद्धि असली म्हणजे मुलें दिलें तरी खात नाहींत; पण जरा कांहीं नसलें कीं त्यांना दुप्पट भूक लागते, आणि तीं आईबापांना वेवतावून सोडतात".[२] अशा परिस्थितींत संसारधंदा धरावा कीं सोडावा या भवतृष्णेची तुकाराम स्वतःच्या मनाशीं सारखी भवतिनभवति करीत असे. संसाराची ही "मृगजलनदी बुडविना तरी। आणूनियां वरी तळा नेते॥"[३] असा त्याला वारंवार अनुभव येत असे. 'बाह्यात्कार भक्ति' दिसली तरी 'अंतरीं संसार'च असल्यामुळें देवाच्या पायीं अंतर पडतें[४] याची टोंचणी त्याच्या चित्ताला सारखी लगून राहिली होती. "पुत्रदाराधन होता मनी धंदा। गोवियेलों सदा होतों कामें।"[५] याचा त्याला मोठा विषाद वाटत असे. आपण संसाराच्या हातीं आहोंत,[६] आपलें "चित्त गुंतलें प्रपंचें। जालें वेडें ममतेचें।";[७] त्याला सोडवून घेण्याची तो धडपड करीत होता, व त्यासाठीं देवाची सारखी करुणा भाकीत होता. "स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर। विषयीं पडिभर अतिशय॥ १॥ ॥ध्रु.॥ आतां सोडवणें धांवा नारायणा। मज हे वासना अनावर॥ छ॥ येउनियां आड ठाके लोकलाज। तें हें दिसे काज अंतरलें॥ २॥ तुका ह्मणे आह्मां जेथें जेथें गोवा। तेथें तुह्मीं देवा सांभाळावें॥ ३॥".[८] आपली भक्ति व कवित्व हीं सारीं वरपांगी सोंगें आहेत कीं काय याचेंही इतरांच्याच मापानें तो आत्मपरीक्षण करी. सत्यान्वेषणानें फजित करण्यांत तो आप-पर हा भाव मानीतच नसे. खालील दोन अभंगांत दुसऱ्यांइतकाच स्वतःविषयीं तो निष्ठुर झाला आहे:—"बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग। नाहीं जाला त्याग अंतरींचा॥ १॥ ॥ध्रु.॥ ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा। मनासी हा ठावा समाचार॥ छ॥ जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं। जातों विसरुनि सकळ हें॥ २॥ प्रपंचाबाहेरि नाहीं आलें चित्त। केले करी नित्य वेवसाय॥ ३॥ तुका ह्मणे मज भोरप्या चि परी। जालें सोंग वरी आंत तैसें॥ ४॥".[९] दुसऱ्या अभंगांत तो देवाला विचारतो:—"काय आतां आह्मीं पोट चि भरावें। जग चाळवावें भक्त ह्मूण॥ १॥ ॥ध्रु.॥ ऐसा तरि एक सांगा जी विचार। बहु होतों फार कासावीस॥ छ॥ काय कवित्वाची घालूनियां रूढी। करूं जोडाजोडी अक्षरांची॥ २॥ तुका ह्मणे काय गुंपोनि दुकाना। राहों नारायणा करुनी घात॥ ३॥".[१०] 'गुंपोनि दुकाना' या

---

१ अभंग २९८९.
२ महाराष्ट्र-सारस्वत, भावे. भाग पहिला, पृ. ३२५.
३ अभंग २२५५.
४ अभंग १८४४.
५ अभंग १९६०.
६ अभंग ३८७८.
७ अभंग ४१८२.
८ अभंग ८८५.
९ अभंग ८६६.
१० अभंग ९७७.

शब्दांचा अर्थ हरिनामाचा पसारा मांडून असा या संदर्भांत बसत नाहीं. व्यापाराच्या दुकानांत गुंतून असाच अर्थ अभिप्रेत दिसतो. "जगरूढीसाटीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरोनि ॥ तुका ह्मणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धी ।"[१] या वचनावरून सुद्धां, जगाची रहाटी मोडूं नये म्हणून, नियत कर्म करीत राहावें म्हणून, त्यानें दुकान घातलें होतें हें उघड दिसतें. त्याच्या म्हणण्याचा आशय असा कीं या दुकानाच्या प्रपंचामुळें आधींच देव दुरावतो आहे, आणि तशांत भूतभविष्यवर्तमान जाणण्याच्या रिद्धिसिद्धींचा जर आपण पसारा मांडला तर ती आणखी मोठी पीडाच व्हावयाची. दुष्काळानंतर कांहीं वर्षें तरी हा असला हाटांतील दुकानाचा धंदा तुकाराम करीत होता असें दिसतें. नेकीनें व सचोटीनें दुकानाच्या उत्तम व्यवहारानें पोटापुरतें तो धन जोडीत होता; पण तें पुरें पडत नसे. त्यामुळें पोटाची नित्य विवंचना असे. ह्या विवंचनेचें दडपण दूर करण्यासाठीं देवाचें बळ शोधीत तो आपल्या साचिंत मनाला खंबीर होण्यास शिकवीत होता. "अधीरा माझ्या मना ऐकें एकी मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ॥ हे चि चिंता काय खावें म्हणऊनि। भले तुजहूनि पक्षिराज ॥... तुका ह्मणे जळीं वनीं जीव एक। तयापाशीं लेख काय असे[२]॥". "कां रे नाठविसी कृपाळु देवासी। पोसितो जनासी एकला तो ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ छ ॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ २ ॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ४ ॥".[२] कर्जरोख्यांच्या लेखांवर त्याचा आतां भार नव्हता खरा; पण देवावर भार घालून आपण कौतुकानें खेळत राहण्याइतका निश्चितपणा अंगीं बाणला नव्हता. व्यवसायांत मन रमत नव्हतें; पण 'आला भागा' तो व्यवसाय करीत असतांच तें अद्यापि पांडुरंगांत रंगत नव्हतें.

संसार आणि परमार्थ यांचें द्वंद्व हें खरें पाहतां त्याग आणि भोग यांच्या द्वंद्वाचा समाहार आहे. तुकारामास या द्वंद्वाच्या चक्रव्यूहांतून बाहेर निसटावयाचें वर्म अद्यापि सांपडलें नव्हतें; म्हणून अंतर्बाह्य जग आणि मन यांचें युद्ध रात्रंदिवस चालूच होतें. लोभ-मद-मत्सरांना त्यानें दूर सारावयाचा प्रयत्न केला होता; त्यांची त्याला विशेष भीति वाटत नव्हती. परंतु काम-क्रोधांचें दमन तितकें सोपें नव्हतें. "काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥ नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ॥".[३] त्यानें ऐकिलें होतें आणि वाचलें होतें कीं, इंद्रियांचा जय आणि वासनेचा क्षय झाल्याशिवाय आत्मपदाच्या अक्षय अधिकाराची पात्रता येत नाहीं. हें भाग्य आपल्या नशिबीं नाहीं असें वाटून तो उदास होत असे. "मी तों सर्वभावें अनधिकारी । होइल कैसी परी नेणों देवा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ पुराणींचे अर्थ आणितां मनास । होय कासावीस जीव माझा ॥ छ ॥ इंद्रियांचीं आह्मी पांगिलों आंकितें । त्यांचे रंगीं चित्त रंगलेंसे ॥ २ ॥ एकाचें ही मज न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं राखों ॥ ३ ॥"[४]

---

१ अभंग १०७९.
२ अभंग २३०९–१०.
३ अभंग ४४२१.
४ अभंग ७०३=३८६२.

ह्याची त्याला विवंचना पडली होती ; व आपण इतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होतों कीं काय अशी त्याला भीति वाटत असे. "इंद्रियांचीं दिनें । आह्मी केलों नारायणें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि ऐसें सोसीं । काय सांगों कोणांपाशी ॥ छ ॥ नाहीं अंगीं बळ । त्याग करींसा सकळ ॥ २ ॥ तुका ह्मणे मोटें । प्रारब्ध होतें खोटें ॥ ३ ॥"; "हातीं धरूं जावें । तेणें परतें चि व्हावें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥ छ ॥ देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥ २ ॥ तुका ह्मणे पीक । भूमि न दे न मिळे भीक ॥ ३ ॥".[१] "इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ।" हा जुनाच अनुभव त्याला नव्यानें येत होता ; पण त्याच्यां पलीकडे जाण्याची वाट सांपडेना. या अशा सर्वस्वीं असहाय परिस्थितींत हतबुद्ध होऊन 'काय करूं ?' या प्रश्नाचें उत्तर त्याला सुचेना. "काय करूं आतां या मना । न संडी विषयांची वासना । प्रार्थितां ही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ॥...न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडा तोडी । भरलें विषयभोवडीं । घालूं पाहे उडी भवडोहीं ॥".[२] बरें, त्याला कोंडावयाचा प्रयत्न केला तर "अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरिनाथा । करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥ छ ॥ भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून । बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥ ३ ॥ किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ॥".[३] इंद्रियांची गती कुंठवावयाचा, चित्ताला विश्रांति द्यावयाचा, एकच उपाय तो जाणत होता ; आाणि तो म्हणजे कळवळून देवाचा धांवा करावयाचा. "आतां धांवें धावें गा श्रीहरी । गेलों वांयां नाहीं तरी । न दिसे कोणी आवरी । आणिक दुजा तयासी ॥".[२]

दुसरा कोणी गुरु भेटतो काय याचा सभोंवतालीं पुरता तपास करून तो निराश झाला होता. भाकर मागावयास गेलें असतां खापर देणारेच त्याला भेटत होते. "सिणलें तें गेलें सिणलियापासीं । जाली त्या दोघांसी एक गति ।".[४] असली सद्गति त्याला नको होती. 'भगवीं लुगडीं' वापरणारे संन्यासी, जटा लांबवून कासोटा नेसणारे गोसावी, कान फाडून मुद्रा घालणारे नाथ, कौडीकौडीसाठीं शिर फोडणारे मलंग, दाढी-डोई मुंडून काळें वस्त्र पांघुरणारे मानभाऊ, विभूति लावून घरोघरीं शंख वाजवीत फिरणारे जंगम, टिळाटोपी धारण करणारे वैष्णव,—असे नाना 'भेष' घेऊन हिंडणारे[५] पोटाचे नट त्यानें अनेक पाहिले होते. तरीपण "परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांगापा साचार नांव त्याचें ॥"[६] ह्या त्याच्या प्रश्नाचें उत्तर देणारा कोणीच भेटला नाहीं. ज्ञानी, पंडित, योगी यांचीही त्यानें पारख केली होती ; व त्यांचा नाद सोडला होता. "ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ॥... वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकांमधीं । पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें दखें चेष्टा

१ अभंग २४९५-६. २ अभंग ४०५३. ३ अभंग १८३७.
४ अभंग ४०६१. ५ अभंग ३९३४-३९४१. ६ अभंग ३९४१.

विपरीत ॥ आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करती रागें गुरगुरु ॥ तुका ह्मणे मज कोणांचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥ ".[1] बुद्धाप्रमाणें प्रचलित सर्व पंथांचा व मार्गांचा शोध करून त्याची आकांक्षा अपुरीच राहिली. "घरोघरीं अवघें जालें ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ निरें कोणापाशीं होय एक रज । तरी द्या रे मज दुर्बळासी ॥ छ ॥ आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दूरोनि दिसतसे ॥ २ ॥ काम क्रोध लोभ सिणवी बहुत । मेळवूनि आंत काळकूट ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेथें कांहीं हातां नये । आयुष्य मोलें जाये वांयांविण ॥ ४ ॥".[2] संतचरणापाशींच हें रज मिळेल, व विठ्ठलाचे पाय दृढ धरावे हाच एक उपाय आहे, असें या सर्व शोधाअंतीं त्यानें ठरविलें.

देवाचे पाय धरण्यांतसुद्धां लोक अंतराय आणूं लागले. निरोधाचें वचन त्याला सहन होत नसे; व त्याचें मन 'बहु कासावीस' होत असे.[3] हा मार्ग स्वीकारल्यामुळें लोकांत आपली स्थिति कशी झाली होती याचें त्यानें हृदयाला दया यावी असें वर्णन केलें आहे. "आतां सांडूं तरी हातीं ना पदरीं । सखीं सहोदरीं मोकळिलों ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ जनाचारामध्यें उडाला पातेरा । जालों निलाजिरा ह्मणऊनि ॥ छ ॥ कोणाचिया दारा जावेनासें जालें । म्यां च विटंबिलें आपणासी ॥ २ ॥ कोण जाला माझे बुद्धीसी संचार । नाहीं कोठें थार ऐसें जालें ॥ ३ ॥".[4] सखीसहोदरांना त्याला परत संसारांत ओढावयाचें होतें; म्हणून ते त्याला देवापासून दूर करीत होते. त्याहीपेक्षां त्याला विद्वानांचा निरोध व धिक्कार असह्य होत होता; कारण त्याच्या मुळाशीं सांसारिक कांहीं हेतु नसल्यामुळें त्यानें बुद्धिभेद अधिक होत असे, व मन घोटाळ्यांत पडे. "कैसी करूं आतां सांग तुझी सेवा । शब्दज्ञानें देवा नाश केला ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ आतां तुझें वर्म न कळे अनंता । तुज न संगतां बुडूं पाहें ॥ छ ॥ संध्या स्नान केली आचाराची नासी । काय तयांपासीं ह्मणती एक ॥ २ ॥ बुडविली भक्ति ह्मणती पाषाण । पिंडाचें पाळण स्थापुनियां ॥ ३ ॥ न करावी कथा ह्मणती एकादशी । भजनाची नासी मांडियेली ॥ ४ ॥ न जावें देउळा ह्मणती देवघरीं । बुडविलें या परी तुका ह्मणे ॥ ५ ॥".[5] हे शब्दज्ञानी नुसता वादच करीत असत; प्रत्यक्ष धिक्कार करणारेही दुसरे होते. "पांडुरंगा आतां ऐका हे विनंती । बहु माझे चित्तीं भय वाटे ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ नाहीं आइकिलें संतांचिया मुखें । तें या मज लोकें भेडसाविलें ॥ छ ॥ विष्णुदासां गति नाहीं तरावया । ह्मणती गेले वांयां कष्टत ही ॥ २ ॥ धिक्कारिती मज करितां कीर्तन । काय सांगों शीण ते काळिचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज वाटतें उदास । काय करूं यास पांडुरंगा ॥ ४ ॥."[6] आरंभीं या छळणेनें तो संदेहांत पडत असेः—"कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देइल धीर माझ्या जीवा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ शास्त्रज्ञ पंडित नव्हें मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ॥ २ ॥ कलियुगीं बहु कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां ॥ ३ ॥ मज हा

१ अभंग १५३६. २ अभंग १२८८. ३ अभंग १२२४.
४ अभंग ३६२६. ५ अभंग ३९३२. ६ अभंग ३९८८.

संदेह झाला दोहीं सवा। भजन करूं देवा किंवा नको ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां दुरावितां जन। किंवा हें मरण भलें दोन्ही ॥ ५ ॥".[१] त्यानें जन दुराविले आणि देव आणखी जवळ केला. भीति, निरोध, धिक्कार यांना न जुमानितां त्यानें आपला विश्वास ढळूं दिला नाहीं. या सर्वांना तितक्याच निर्धारानें तो प्रत्युत्तर देत असे कीं—"कोणी निंदा कोणी वंदा। आह्मां स्वहिताचा धंदा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ काय तुह्मांसी गरज। आह्मी भजूं पंढरिराज ॥ छ ॥ तुह्मांसारिखें चालावें । तेव्हां स्वहिता मुकावें ॥ २ ॥ तुका ह्मणे हो कां कांहीं। गळ दिला विठ्ठल पायीं ॥ ३ ॥".[२] याप्रकारें त्यानें आपला स्वहिताचा धंदा चालू ठेविला. "वचन मानिलें नाहीं सुहृदाचें। समूळ प्रपंचें वीट आला ॥ सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही। मानियेलें नाहीं बहुमतां ॥".[३]

•आपल्याच मतीनें विचार करीत असतां तत्त्वज्ञान्यांस सुद्धां न सुटलेल्या कोड्यांच्या गुंतागुंतींत तो सांपडत असे; पण बौद्धिक, भौतिक व आध्यात्मिक—सारीं कोडीं सोडविणारा विठ्ठलच समर्थ आहे असा त्याचा दृढ विश्वास होता. "विश्वव्यापी माया। तिणें झाकुळिलें छाया ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ सत्य गेलें भोळ्यावारी। अविद्येची चाली थोरी ॥ छ ॥ आपुलें चि मन। करवी आपणां बंधन ॥ २ ॥ तुका ह्मणे देवा। तुह्मी कोडीं हीं उगवा ॥ ३ ॥".[४] "जनीं जनार्दन ऐकतों हे मात। कैसा तो वृत्तांत न कळे आह्मां ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ जन्म जरा मरण कवण भोगी भोग। व्याधि नाना रोग सुखदुःखें ॥ छ ॥ पापपुण्यें शुद्धाशुद्ध आचरणें। हीं कोणांकारणें कवणें केलीं ॥ २ ॥ आह्मां मरण नाश तूं तंव अविनाश। कैसा हा विश्वास साच मानूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं चि निवडीं हा गुढार। दाखवीं साचार तें चि मज ॥ ४ ॥".[५] "काय तुज कैसें जाणवेल देवा। आणावें अनुभवा कैशा परी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ सगुण निर्गुण थोर कीं लहान। न कळे अनुमान मज तुझा ॥ छ ॥ कोण तो निर्धार करूं हा विचार। भवसिंधु पार तरावया ॥ २ ॥ तुका ह्मणे कैसे पाय आतुडती। न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ३ ॥".[६] पुढें त्याला समाधान वाटत असे कीं, असा "भोवनीं पडिलों" असतां "विठ्ठलसें वाचे आलें" हें बरें झालें, आणि आपला उद्धार आपणच करून घेतला. उद्वेगाच्या समुद्रांत पडला असतां "विचारिलें आधीं आपुल्या मानसीं। वांचो येथें कैसीं कोण्या द्वारें ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ तंव जाला साह्य हृदयनिवासी। बुद्धि दिली ऐसी नास नाहीं ॥ छ ॥".[७]

परंतु त्या मनोमंथनाच्या काळीं त्याचें मन निराशेच्या गुणें डगमगत होतें. आपण सत्यच तरेन काय? देव आपणाला मार्ग दाखवून अंगीकार करील काय? संतांच्या पंगतीस आपणास बसवील काय? याची त्याला सारखी हुरहुर वाटत असे; व अनुभव प्राप्त होण्याचा काळ कधीं येईल याची त्याला सारखी तळमळ लागली होती. "धरितों वासना परी नये फळ। प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ तळमळी चित्त घातलें खापरीं। फुटतसे परी लाहीचिया ॥ छ ॥ प्रकार ते कांहीं नावडती जीवा।

---

१ अभंग ९२३. २ अभंग ४३११. ३ अभंग १३३३. ४ अभंग ६९०.
५ अभंग ११३६. ६ अभंग २४३७. ७ अभंग ३१८२.

श्री तुकारामाचे चरित्र / गो. कु. म.



नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥ २ ॥ जातों तळा येतों मागुताला वरी । बोळशाचे फेरी सांपडलों ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढें ॥ ४ ॥".[१] अनुभवासाठीं वरखालीं होणाऱ्या जीवाचें दुसरें असलें चित्र क्वचितच पाहावयास मिळेल! अंगीकाराच्या आसेचे उसासे दुसऱ्या एका अभंगांत टाकले आहेत:—"कईं मात माझे ऐकती कान । बोलतां वचन संतां मुखीं ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ केला पांडुरंगें तुझा अंगीकार । मग होइल धीर माझ्या जीवा ॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि मुख अवलोकितों पाय । हे चि मज आहे थोरी आशा ॥ २ ॥ माझिया मनाचा हा चि विश्वास । न करीं सायास साधनांचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज होईल भरवसा । तरलों मी ऐसा साच भाव ॥ ४ ॥".[२]

आतां कोरड्या कवित्वानें त्याचें समाधान होईना. तो उतावळीच्या अगदीं हातघाईवर आला होता. "येतील अंतरा शिष्टाचे अनुभव । तळमळी जीव तया सुखा ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ आतां माझा जीव घेउनियां बळी । बैसवावें वोळी संतांचिये ॥ ध्रु. ॥ विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडे चि बोल फोस वांझे ॥ २ ॥ तुका ह्मणे आलों निर्वाणा च वरी । राहों नेदीं उरी नारायणा ॥ ३ ॥".[३] त्याचा जीव पुरूरव्यापेक्षांही वेडापिसा झाला होता. "पुसावेंसें हें चि वाटे । जें जें भेटे तयासी ॥ १ ॥ ॥ ध्रु. ॥ देव कृपा करील मज । कार्य लाज राखील ॥ ध्रु. ॥ अवघियांचा विसर जाला । हा राहिला उद्योग ॥ २ ॥ तुका ह्मणे चिंता वाटे । कोण भेटे सांगेसें ॥ ३ ॥".[४]

---

१ अभंग १९२०. २ अभंग १२४७. ३ अभंग ३७८६. ४ अभंग १२१७.

च. ९५२० / २६३८९ / १३६

वाचनालय सातारा
पाने १३६
दा. २६३८९
च. ९५२०

ह्या पुस्तकाच्या प्रती
डायरेक्टर, गव्हर्मेंट प्रिंटिंग आणि स्टेशनरी, मुंबई, यांजकडे विकत मिळतील
किंमत **एक रुपया** ; टपालखर्च निराळा